मालगुंड--वाई--डोंबिवली



वास्तव्य–काशिविहार, श्रीखंडेवाडी, मानपाडा रोड, डोंबिवली (पू).

भार्या : **शीला**–माहेर–ज्योती भार्गव गद्रे. रा. मुरूड हर्णै, जि. रत्नागिरी. पुत्र–१) **महेश**–जन्म २३ ।१० ।१९७८ इ. ४ थी मध्ये शिकत आहे.

२) **उमेश**–जन्म २९ ।८ ।१९८२ इ. १ ली मध्ये शिकत आहे.

१९४/१० **किशोर (कृष्ण) शंकर**–जन्म १८ ।२ ।१९५६. शिक्षण–एम्. ए. (संस्कृत), व्यवसाय–प्राध्यापक, वाई कॉलेज. वास्तव्य–वाई, जि. सातारा.

भार्या : **कविता**–शिक्षण–बी. कॉम. संगीत विशारद.

जन्म २४ ।६ ।१९६३. माहेर–उज्ज्वला गो. सहस्रबुद्धे, मिरज. द्रविड हायस्कूलमध्ये नोकरी.

१९५/९ **गणेश सीताराम**–जन्म १४ ।३ ।१९४०. शिक्षण–मॅट्रिक व्यवसाय–सेंच्युरी मिल, वरळी, मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–विष्णू भुवन, खो.नं.१. श्री बिल्डिंगसमोर, टिळकनगर, डोंबिवली (पू).

भार्या : **साधना**–जन्म १९४६. मॅट्रिक. माहेर–कुंदा विठ्ठल भट. रा. तळा, जि. रायगड.

१९६/१० **गोविंद गणेश**–जन्म ७ ।११ ।१९६५. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–भाभा अणुशक्ति केंद्रात, मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–विष्णूभुवन, खो.नं.१. श्री बिल्डिंगसमोर, टिळकनगर, डोंबिवली (पू).

मालगुंड घराणे क्रमांक १
वंशावळी क्रमांक २ (फ)
मालगुंड – नागपूर – भंडारा – ठाणे – पुणे – धोराजी (गुजराथ)



१९७/१० **भालचंद्र गणेश**–जन्म १८ ।१० ।१९७०.
शिक्षण–टी. वाय. बी. कॉम. शिकतआहे.
१९८/६ **सिद्धेश्वर त्रिंबक–** #
१९९/७ **दत्तात्रय सिद्धेश्वर–** #
२००/८ **महादेव दत्तात्रय–** #
२०१/९ **मोरेश्वर महादेव–** #
२०२/९ **सुभाष महादेव–** #
२०३/६ **लक्ष्मण त्रिंबक–** #
२०४/५ **विठ्ठल रघुनाथ–** #

घराणे क्र. १

वंशावळी क्र. २ (फ)

मालगुंड – नागपूर – भंडारा – ठाणे – पुणे – धोराजी (गुजराथ.)

२०५/४ **पांडुरंग काशीनाथ–** #
२०६/५ **काशीनाथ पांडुरंग–** #

मालगुंड घराणे क्रमांक १

वंशावळी क्र.२ (फ)

मालगुंड–नागपूर–भंडारा–ठाणे–पुणे–धोराजी (गुजराथ)



२०७/६ **सखाराम काशीनाथ**–यांना दोन पुत्र. विठ्ठल आणि विष्णू.

२०८/७ **विठ्ठल सखाराम**–मृत्यू जून १९३८.
भार्या : **रखमाबाई**–माहेर–माई कृष्णराव जोशी.मृत्यू १९६३. कन्या ९ व पुत्र ३.
कन्या :
१) **मैनाताई**–सासर–मैनाताई धारप. वास्तव्य–नागपूर (मृत).
२) **बनूताई**–सासर–बनूताई नारायणराव गद्रे. वास्तव्य–नागपूर (मृत).
३) **गंगूताई**–सासर–गंगूताई नारायणराव सहस्रबुद्धे. वास्तव्य–नागपूर (मृत).
४) **सुमती**–सासर–सुमती सीतारामपंत गोखले.वास्तव्य–नागपूर (मृत).
५) **रमाबाई**–सासर–रमाबाई कृष्णराव जोशी. वास्तव्य–पुणे (हयात)
६) **ताराबाई**–सासर–ताराबाई प्रभाकरराव जोशी. वास्तव्य–पुणे (हयात).
७) **कमलाताई**–सासर–कमलाताई सदाशिवराव जोग. वास्तव्य–नागपूर (हयात).
८) **कुसूम**–सासर–कुसूम भालचंद्रराव टिळक, विदिशा (मृत).
९) **शशिकला**–सासर–शशिकला दत्तात्रय गोरे, नागपूर (हयात).

२०९/८ **विश्वनाथ विठ्ठल**–वास्तव्य–नागपूर.
भार्या : मृत.
२१०/९ **विलास विश्वनाथ**–जन्म १९५०.
वास्तव्य–नागपूर.

भार्या : **शीला**–जन्म १९५६.
कन्या : **विद्या**–जन्म १९४७. सासर–विद्या नारायण सप्रे. रा. भू ता. राजापूर, जि. रत्नागिरी.
२११/८ **प्रभाकर विठ्ठल**–जन्म १ ।९ ।१९२४.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–रेल्वेत नोकरी, निवृत्त ऑगस्ट १९८२.
भार्या : **सुधा**–माहेर–इंदुमति रा. चिखली, बुलढाणा.
कन्या : **वासंती**–जन्म १९६७. शिक्षण–बी. ए. भाग २ रा शिकत आहे.
२१२/६ **प्रकाश प्रभाकर**–जन्म २९ ।५ ।१९५६.
शिक्षण–बी. कॉम. वास्तव्य–नागपूर.
भार्या : **अलका**–नागपूर.
२१३/९ **अविनाश प्रभाकर**–जन्म २ ।८ ।१९५८.
अविवाहित. शिक्षण–१२ वी पर्यन्त.
२१४/९ **धनंजय प्रभाकर**–जन्म ६ ।१ ।१९६२.
अविवाहित. शिक्षण–१२वी पर्यन्त.
२१५/८ **पद्माकर विठ्ठल**–जन्म १४ ।९ ।१९२६.
शिक्षण–मॅट्रिक पास. पोस्ट मास्तर म्हणून १९८४ साली निवृत्त. धार्मिक कार्यात सेवा करण्याची वृत्ती. सध्या आळंदी येथे नृसिंह सरस्वतीस्वामी महाराजांच्या मठात व्यवस्थापकाचे स्वेच्छेने काम. वर्षातून २–४ वेळा नागपूरहून आळंदीला वास्तव्य असते.
वास्तव्य–११२ विवेकानंद नगर, पोस्टल कॉलनी, खामला रोड, नागपूर.
भार्या : **सुषमा**–माहेर–सुशिला गणपतराव भिडे.
कन्या :**जयश्री**–जन्म ९ ।७ ।१९५९. शिक्षण–एम्. ए.
सासर–जयश्री सुमंत पालकर (गोखले), नागपूर.
२१६/९ **प्रदीप पद्माकर**–जन्म १३ ।६ ।१९५३.
शिक्षण–एम. एस्सी. व्यवसाय–नोकरी–ऑर्डनन्स् फॅक्टरी, जवाहरनगर, भंडारा येथे.
भार्या : **मीरा**–माहेर–मीरा सदाशिव करमरकर, नागपूर.
पुत्र–**अजित**–जन्म ८ ।१० ।१९८३ शिकत आहे.
२१७/७ **विष्णू सखाराम**–जन्म २९ ।१२ ।१८७५.
मृत्यू ६ ।१२ ।१९५०. शिक्षण–मॅट्रिक.
नोकरी–पोस्ट खात्यांत.
भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–मनूताई दामोदर चोळकर, मृत्यू २४ ।१२ ।१९३८. कन्या ४ पुत्र ४.

कन्या :
१) **कृष्णा**–जन्म १९०६. शिक्षण–मराठी ४ थी.
सासर–लक्ष्मीबाई विश्वनाथ जोशी, ठाणे.
२) **यमू**–जन्म १९०८. शिक्षण–मराठी ४ थी.
सासर–सीता रामचंद्र गोडबोले, ठाणे.
३) **सुशिला**–जन्म १९१४. शिक्षण–मराठी ४ थी.
सासर–अन्नपूर्णा नारायण भिडे, चिंधवली, ता. वाई, जि. सातारा.
४) **इंदू**–जन्म १९१८. शिक्षण–इंग्रजी ६ वी.
सासर–आनंदी पुंडरीकाक्ष गोळे, ठाणे.
२१८/८ **रघुनाथ विष्णू**–जन्म ७ ।४ ।१९११, भूज (कच्छ) शिक्षण–मॅट्रिक.
नोकरी–पोस्टखात्यात पोस्टमास्तर म्हणून कल्याण येथे निवृत्त.
भार्या : **मालती**–जन्म १९२०. माहेर–इंदुमती भिडे रा. हिंगणघाट. मृत ५ ।१ ।१९९१.
कन्या : **पुष्पा**–जन्म १४ ।१० ।१९५३.
सासर–अनुराधा गोपाळ गाडगीळ, डोंबिवली.
२१९/९ **प्रकाश रघुनाथ**–जन्म २७ ।२ ।१९५१.
शिक्षण–बी. ए. नोकरी–सेंचुरी रेयॉन, शहद. वास्तव्य–कल्याण.
भार्या : **मीरा**–मीरा गाडगीळ, सांगली.
कन्या : **अंजली**–जन्म २४ ।१० ।१९८२.
२२०/१० **आनंद प्रकाश**–जन्म १५ ।१० ।१९८६.
२२१/८ **गोविंद विष्णू**–जन्म २ ।१२ ।१९२२.
शिक्षण–मॅट्रिक पास. जी. आय. पी. रेल्वेत नोकरी. १९४१ साली जनरल मॅनेजर च्या ऑफिसात नोकरीस सुरुवात. १९८० डिसेंबर मध्ये व्हिजिलन्स खात्यातून अधीक्षक म्हणून निवृत्त. निवृत्तीनंतर ब्राह्मण सेवा संघ, नौपाडा, ठाणे येथे सहकार्यवाह म्हणून ऑनररी काम. सामाजिक कामाची आवड. वास्तव्य–कृष्णस्मृति, रामवाडी, नौपाडा, ठाणे.
भार्या : **शकुंतला**–जन्म १९२६. माहेर–इंदू विष्णू मराठे, ठाणे.
२२२/९ **रवींद्र गोविंद**–जन्म ६ ।१० ।१९५२.
शिक्षण–एस्. एस्. सी. आय. टी. आय. मेकॅनिकल ड्रॉफ्ट्समन चा कोर्स. व्यवसाय–एन्. आर. बी. ठाणे येथे नोकरी. वास्तव्य–स्नेहबंध सहनिवास, पाचपाखाडी,

ठाणे.
भार्या : **रेखा**–शिक्षण–बी.ए,एम्.आय.डी.सी. ठाणे मधे नोकरी. माहेर–रेखा विनायक लिमये, रत्नागिरी.
पुत्र–अमोल–जन्म ४ ।७ ।१९८१. २) **अनुप**–जन्म ४ ।१ ।१९८६.
२२३/९ **शिरीष गोविंद**–जन्म १८ ।१२ ।१९५५. शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–कॅनरा बॅक येथे नोकरी. वास्तव्य–२२ स्वर्णा अपार्टमेंट, उदयनगर समोर, पाचपाखाडी, ठाणे.
भार्या : **श्वेता**–बॉम्बे टेलिफोन् मधे नोकरी. माहेर–माधवी मोरेश्वर जोशी, डोंबिवली.
२२४/९ **नितीन गोविंद**–जन्म २९ ।७ ।१९६१. शिक्षण–एस्. एस्. सी. नंतर मेकॅ. ड्रॉफ्टसमन चा कोर्स पूर्ण. व्यवसाय–इंजि. चा स्वतःचा धंदा. नाटकाचा व गाण्याचा छंद. अविवाहित. वास्तव्य–कृष्णस्मृती, रामवाडी, नौपाडा, ठाणे.
२२५/८ **शंकर विष्णू**–जन्म २७ ।१ ।१९२५, पाचोरा. शिक्षण–मॅट्रिक. मध्य रेल्वेतून ऑफिस सुपरिंटेंडेंट या पदावरून निवृत्त. वास्तव्य–७, मनोरमा सोसा. हिंदू कॉलनी, ब्राह्मण सोसा. नौपाडा, ठाणे.
भार्या : **विद्या**–जन्म १९२९. माहेर–विमल विद्वांस.
कन्या : **माधुरी**–जन्म नोव्हे १९५२. शिक्षण–बी.ए,एस्.एन्.डी.टी. युनिव्हर्सिटी. सासर–माधुरी भगवान जोशी. माहिम.
२२६/९ **दिलीप शंकर**–जन्म ऑक्टो. १९५६. शिक्षण–बी. कॉम. नोकरी–युनायटेड वेस्टर्न बॅंक, ठाणे येथे नोकरी. अविवाहित.
२२७/९ **अजित शंकर**–जन्म ऑगस्ट १९६५ शिक्षण–बी. कॉम. नोकरी–बोरोसिल ग्लास वर्क्स मुंबई येथे. अविवाहित.
२२८/८ **विनायक विष्णू**–जन्म २८ ।९ ।१९२७, पाचोरा येथे. शिक्षण–इंटर कॉमर्स व्यवसाय–पोष्ट खात्यातून निवृत्त. वास्तव्य–समाधान बिल्डिंग, सहकार कॉलनी, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे–२.
भार्या : **विजया**–जन्म १९३३. शिक्षण–बी. ए, बी. एड्. माहेर–लीला रघुनाथ जोशी, बेडेकर विद्यामंदिर नौपाडा, ठाणे येथे नोकरी. सध्या निवृत्त.
कन्या :
१) **जयश्री**–जन्म १९५६. शिक्षण–बी. कॉम. सासर–जयश्री धनंजय भोगले, पुणे.
२) **गौरी**–जन्म १९६१. शिक्षण–बी. कॉम. सासर–गौरी उमेश चाफेकर, ठाणे.
२२९/६ **लक्ष्मण काशीनाथ**– #
२३०/६ **महादेव काशीनाथ**– #
२३१/७ **दत्तात्रय महादेव**–जन्म १८८०. मृत्यू १९६५.
भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर–अन्नपूर्णा पाटणकर, गोंदिया.
कन्या :
१) **इंदू**–जन्म १९०८ मृत्यू १९८०. सासर–इंदू शंकर सोहोनी. ७१४, नवी पेठ, 'दीपक' बंगला पुणे–३०.
२) **सुशीला**–जन्म १९२६. सासर–सुशीला दिपुभाऊ जोशी, हयात, ४ कृष्ण चाळ, शास्त्री हॉल, मुंबई–७.
२३२/८ **प्रभाकर दत्तात्रय**–जन्म २ ।१ ।१९१७, झाडसोकरा (उ. प्र.) येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–खडकी ॲम्युनिशन फॅक्टरीत नोकरी. वास्तव्य–१७५८, सदाशिव पेठ, उद्यान कार्यालयाजवळ, पुणे–३०.
भार्या : **शालिनी**–माहेर–इंदू विष्णू जोशी, रा. कराडे जि. रायगड.
२३३/९ **जयंत प्रभाकर**–जन्म २० ।७ ।१९५२. व्यवसाय–बॅंकेत नोकरी. वास्तव्य–१७५८, सदाशिव पेठ, पुणे–३०.
भार्या : **आशा**–माहेर–आशा चिंतामण चिवटे, पुणे.
कन्या : **अश्विनी**–जन्म ९ ।६ ।१९८३.
पुत्र–**अभिजीत्**–जन्म ४ ।१० ।१९७९.
२३४/९ **प्रशांत प्रभाकर**–जन्म २६ ।८ ।१९६२ अविवाहित.
२३५/८ **वसंत दत्तात्रय**–जन्म ४ ।९ ।१९१२, धोराजी (सौराष्ट्र) येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–पोस्ट खात्यातून निवृत्त. वास्तव्य–१८१, नवी पेठ, नव प्रसन्न हौ. सोसा. पुणे–३०. १०० वर्षे धोराजी येथे ३/४ पिढ्या झाल्या.
भार्या : **नलिनी**–माहेर–सुशीला कमल जोशी, गारूडे, जि. सातारा.
कन्या :
१) **वैजयंती**–जन्म २६ ।८ ।१९३७. सासर–वैजयंती विष्णू वझे, वाई.

२) **सुनीता–जन्म** ७ ।१० ।१९३८. **एम्. ए.**
सासर–सुनीता बळवंत केळकर, पुणे.
२३६/९ **अशोक वसंत–जन्म** ३ ।८ ।१९४५.
शिक्षण–बी.एस्सी.
भार्या : **अंजली–**
कन्या : **दीपाली–पुत्र–अमित–**
२३७/८ **नारायण दत्तात्रय–जन्म** २ ।७ ।१९१६.
धोराजी (सौराष्ट्र) येथे. शिक्षण–मॅट्रिक.
व्यवसाय–व्यापार. सुप्रसिद्ध स्वीट होम, पुणे या दुकानात भागीदार. वास्तव्य–'मधुकुंज' बी–१९, फाटक बाग सोसा. नवी पेठ, पुणे–३०. नोकरी निमित्त ब्रह्मदेश (बर्मा) मध्ये ३ वर्षे वास्तव्य.
भार्या : **उषा–**माहेर–कमल दत्तात्रय शिधोरे रा. नागोठणे जि. रायगड.
२३८/९ **अरूण नारायण–** #
२३९/९ **प्रमोद नारायण–** #
कन्या : **सोनल–पुत्र–दीपेश–**
२४०/८ **मधुकर दत्तात्रय–**जन्म २५ ।४ ।१९१४. मृत्यू ५ ।८ ।१९८७. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–विमा कंपनीत नोकरी (एल. आय. सी.). वास्तव्य–पुणे.
भार्या : **सुधा–**माहेर–सुनीता रामचंद्र केतकर.
कन्या : **कुंदा–**जन्म ९ ।१ ।१९४०. सासर–कुंदा रामचंद्र गोखले. रा. 'दीपक,' नवी पेठ, पुणे–३०.
२४१/९ **सुधीर मधुकर–**जन्म २३.।१२ ।१९४५, पुणे. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–बँकेत नोकरी.
वास्तव्य–१८१, नवी पेठ, नव प्रसन्न हौ. सोसा. पुणे–३०.
भार्या : **रेखा–**माहेर–रेखा पुरुषोत्तम फडतरे, पुणे.
कन्या : **शिल्पा–**जन्म १२ ।१० ।१९७३.
२४२/७ **गोपाळ महादेव–** #
२४३/७ **रामचंद्र महादेव–**मृत्यू १९२९ जबलपूर येथे.
भार्या : **सीताबाई–**माहेर–ताराबाई वासुदेव पाटणकर, दुर्ग (म. प्र.) जन्म १९०७. मृत्यू १९६७.
२४४/८ **गोविंद रामचंद्र–**जन्म ६ ।१ ।१९२३, जबलपूर येथे. शिक्षण–मॅट्रिक.
व्यवसाय–१६ ।७ ।१९४२ पासून १४ ।७ ।१९४८ टाटा केमिकल्स, मिठापूर, सौराष्ट्र, येथे नोकरी. नंतर १ ।२ ।१९४९ ते ३१ ।१ ।१९८१ ॲम्युनिशन फॅक्टरी, खडकी, पुणे येथे नोकरी.
भार्या : **सुमति–**जन्म २२ ।१ ।१९३०. माहेर–लीला हरिभाऊ पाटणकर, कल्याण.
कन्या : **आरती–**जन्म २३ ।११ ।१९६४ पुणे.
नोकरी–सी. डी. ए. ए. सासर–आरती आशुतोष रहाळकर, नाशिक. पति–आशुतोष नारायण रहाळकर, नाशिक.
२४५/९ **अनिल गोविंद–**जन्म २५ ।७ ।१९५४.
व्यवसाय–युनायटेड कमर्शियल बँकेत नोकरी.
वास्तव्य–४२/६७६, लोकमान्य नगर, पुणे–३०.
भार्या : **अपर्णा–**जन्म १९ ।२ ।१९५८. पुणे येथे रेल्वेत नोकरी.
२४६/५ **नारायण पांडुरंग–**माहिती मिळाली नाही.
२४७/५ **विश्वनाथ (बाळंभट्ट) पांडुरंग–**माहिती मिळाली नाही.

घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक २ (ग)

मालगुंड–पुणे–ठाणे–वाई–सातारा.

२४८/४ **पं. भास्करशास्त्री काशीनाथ–**हे काशीनाथ भट्टांचे सर्वात धाकटे व सहावे पुत्र. जन्म इ. स. १७८३ वाई येथे. मृत्यू १३ ।१ ।१८७१, सातारा. त्यांचा देह उंच, वर्ण गहू, हात गुडघ्यापर्यन्त पोचतील असे, (दीर्घ बाहू), विशाल कपाळ व डोळे किंचित तांबूस असून एका कानावर तीळ होता असे त्यांचे वर्णन गुरूवर्य महर्षि रामशास्त्री गोडबोले यांनी केले आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण वाईचे प्रसिद्ध वैय्याकरणी गोपीनाथ शास्त्री आगाशे यांचेकडे झाले. व्याकरण शास्त्रांत त्यांचे विशेष प्रभुत्व पाहून गुरुजी त्यांना 'पाणिनी' या नावाने संबोधित असत. त्यानंतर पुणे येथील नीळकंठ शास्त्री थत्ते (जन्म इ.स. १७५०. मृत्यू १८३४.) यांचे कडे झाले. इ.स. १८१२ त ते सातारा येथे गेले व तिथे घरीच अनेक शिष्यांना विनावेतन शास्त्रग्रंथ शिकवून ५८ वर्षे

मालगुंड घराणे क्रमांक १
वंशावळी क्रमांक २ (ग)
मालगुंड–पुणे–ठाणे–वाई–सातारा



आमरण सरस्वतीची सेवा केली. पं. काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे हे त्यांचे प्रथम शिष्य होत. त्यानी व्याकरण शास्त्राचे समग्र अध्ययन करून, काशीस जाऊन, तेथे न्यायशास्त्राची परिष्कार पध्दति स्वीकारूनही पंडितांमध्ये अग्रस्थान मिळविले, व मोठा शिष्यवर्ग निर्माण केला. पं. भास्करशास्त्री यांच्या दक्षिणेतील शिष्यांत पं. नारायणशास्त्री गोडबोले व पं. रामशास्त्री गोडबोले हे प्रमुख होते.

पं. भास्करशास्त्री यांची काशीतील शिष्यपरंपरा– पं. नीळकंठशास्त्री थत्ते यांचे समकालीन महाराष्ट्रात कऱ्हाड, वाई, नाशिक, पंढरपूर इत्यादि ठिकाणी जुन्या व्याकरण परंपरेने शिकलेले व तिचेच अभिमानी वैय्याकरणी होऊन गेले. पं. गोपीनाथशास्त्री आगाशे हे त्यापैकी प्रमुख होते. जोपर्यंत पं.नीळकंठशास्त्री थत्ते हयात होते तोपर्यंत विद्वानांना जरी या प्राचीन मताच्या अभिमानी वैय्याकरणींच्या विद्वत्तेची जाणीव होती, तरी केवळ शास्त्रीय मतभेदाने योग्य स्थान व राजाश्रय त्यांना मिळाले नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांना काही वेळा सामाजिक त्रासही सोसावा लागला. पं.गोपीनाथशास्त्री यांचेवरही अशाच प्रकारचे संकट आले व सातारा राज्यात रहाणे अशक्य झाले. तेव्हा काही विद्वान लोकांनी ही गोष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर घालून त्यांना सातारा राज्याच्या सीमेपलिकडे पोचते केले. पं. भास्करशास्त्री यांचाही जुन्या मताकडे कल होता व त्यांचे शिष्य पं. काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे यांना उघडपणे जुन्या मताचा अभिमान बाळगून मानाचे स्थान मिळविणे अशक्य झाल्यामुळेच ते आपले अध्ययन संपूर्ण झाल्यावर काशी येथे गेले. काशीमधे त्या वेळी जरी

मालगुंड घराणे क्र.१
वंशावळी क्र.२ (ग)
मालगुंड–पुणे–ठाणे–वाई–सातारा



वैद्यनाथ पायगुंडे किंवा भैरवमिश्र यांसारखी विद्वद्रत्ने नसली तरी तेथील वैय्याकरणी हे नैयायिकांच्या परिष्कार पध्दतीने वाद करण्यात निष्णात असल्यामुळे पं.काशीनाथशास्त्री यांच्या पांडित्याला वाव मिळेना. म्हणून ते प्रथम परत आले व नंतर पं.भास्करशास्त्री यांचेजवळ नव्यन्यायाचे व परिष्कार पध्दतीचे अध्ययन करून पुन्हा काशी येथे गेले. व तेथे वैय्याकरणींमधे त्यांनी उच्च स्थान मिळविले.'काश्यामेकः काशीनाथः' असे त्यांचे संबंधाने विद्वान लोकांत उद्गार निघत असत. त्यांनी उत्तम शिष्य तयार केले. त्यापैकी पं.राजारामशास्त्री कार्लेकर हे प्रमुख होते. पं.राजारामशास्त्री यांचे शिष्य पं.बाळशास्त्री रानडे यांचे नाव काशीमधे सर्वतोमुखी होते. इतकेच नव्हे तर उत्तर हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणांहून त्यांचेकडे अध्ययनास लोक जात असत. त्यांची स्मरणशक्ती, पाठांतर, वाक्पटुत्व व अध्ययन चातुर्य यांचे लोक कौतुक करीत. त्यांना काशी येथे बालसरस्वती नावाने संबोधित असत. ही बालसरस्वती संज्ञा त्यांना का दिली गेली या संबंधीचा एक गंमतीचा श्लोक काशीमधे विद्वान लोकांच्या मुखी आहे. तो पुढील प्रमाणे—"यद् द्वादशान्यिकतयापि (बारा चुका करून सुध्दा) न पाश्यान्ति शस्त्रं बुधा निगदितुं किल बालखिल्यम् । ऐकान्यिकोपी न बभूव यतोत्र तेन प्राणाभिधानमिह बालसरस्वतीति". विद्वद्वर्य गंगाधरशास्त्री तेलंग, शिवकुमारशास्त्री, तात्याशास्त्री पटवर्धन दामोदरशास्त्री भारद्वाज, नेपाळचे हेमराज पंडित, नित्यानंद पर्वतीय, केशवशास्त्री मराठे वगैरे अनेक विद्वान शिष्य त्यांनी तयार केले. काशी येथील प्रमुख वैय्याकरणी हे त्यांच्याच शिष्यपरंपरेत येतात.

सातारा येथील प्रतापसिंह महाराजांच्या दरबारात न्यायाधीशास हिंदू कायद्याचे बाबत मदतनीस म्हणून दरमहा रु. ५० वर त्यांची नेमणूक झाली होती. त्यांच्या या प्रशंसनीय कामगिरी बद्दल सातारा संस्थान खालसा झाल्यावरही ब्रिटिश सरकारने त्यांना रु.५० पेन्शन तहहयात मंजूर केले. व्याकरण, धर्म, मीमांसा, न्याय, वेदान्त इ. शास्त्रांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी धर्म शास्त्रावर 'संस्कार पद्धति' हा ग्रंथ लिहिला. त्यांना "विद्वन्मुकुटरत्न" अशी पदवी बहाल केली होती. आचरणाने शुद्ध व वृत्तीने शांत होते. निस्पृहता हा त्यांचा एक विशेष गुण होता. संसारात राहूनही ते पराकाष्ठेचे विरक्त होते. त्यांना तीन कन्या व वैजनाथ आणि महादेव असे दोन पुत्र होते.

भार्या : **उमाबाई**–माहेर—लेले, जकातवाडी. जन्म १७८८. मृत्यू १८५७. सातारा येथे घर खरेदी करून वास्तव्य झाले.

२४९/५ **महादेव भास्करशास्त्री**–जन्म १८२२. मृत्यू १८६४. हे वैदिक होते.

भार्या : १) **पार्वतीबाई** –माहेर—भिडे. जन्म १८३२. मृत्यू १८५२. ह्यांचे निधन लग्नानंतर लवकरच झाले. ह्यांचा पुत्र मोरेश्वर. २) **दुर्गाबाई**–माहेर—गद्रे. जन्म १८४१. मृत्यू १९२८. यांचे पासून दामोदर, रघुनाथ व वासुदेव असे तीन पुत्र झाले. त्यापैकीं सर्वात धाकटे हेच सुप्रसिद्ध विद्वान् महामहोपाध्याय वासुदेव शास्त्री होत.

२५०/६ **मोरेश्वर महादेव**–जन्म १८५२. मृत्य १८९६. यांचे आजोबा भास्करशास्त्री वारले तेव्हा मोरेश्वरपंत सुमारे २०/२२ वर्षाचे होते आणि ते त्यावेळी नोकरी धंद्यानिमित्त सातारा सोडून गेले होते. वडील महादेव भट्ट हे लवकर निवर्तल्यामुळे यांचे शिक्षण पं. भास्करशास्त्री यांचे पाशीच झाले.

भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर—गोखले. जन्म १८५८. मृत्यू १९१५. यांना तीन पुत्र. भास्कर, लक्ष्मण व दत्तात्रय.

२५१/७ **भास्कर मोरेश्वर**–

भार्या : **पार्वतीबाई**–माहेर—भिडे.

२५२/७ **लक्ष्मण मोरेश्वर**–जन्म १८८९. मृत्यू १९४२. जी. आय्. पी. रेल्वेत नोकरी. त्यांना सुतार कामाचा छंद होता. पुणतांबे येथे मृत्यू.

भार्या : १) **गंगाबाई**–माहेर—वेणूबाई काळे. पुत्र १. शंकर (बंडू).

कन्या : **कृष्णाबाई**–सासर—कृष्णाबाई जोशी, ठाणे.

२) **इंदिराबाई**–माहेर—जोगदेव. मृत्यू १९६४. पुत्र ३, मधुकर, प्रभाकर, सुधाकर.

कन्या : **पुष्पा**–जन्म १९३९. सासर—पुष्पा फडके, पुणे. प्राथमिक शिक्षिका.

२५३/८ **शंकर(बंडू) लक्ष्मण**–जन्म १ ।४ ।१९२३ पुणे येथे. शिक्षण—मराठी ४ थी पास. व्यवसाय—मध्य रेल्वेत परळ वर्कशॉप येथे नोकरी १९८१ त निवृत्त.

वास्तव्य—भावे बंगला, महर्षि कर्वे रोड, डॉ. बेडेकर हॉस्पिटल जवळ, नौपाडा, ठाणे.
भार्या : **नलिनी**–जन्म १९३०. माहेर—द्वारका वासुदेव काळे. सातार्डा, ता. सावंतवाडी.
कन्या :
१) **वीणा**–जन्म २३ ।४ ।१९५१. सासर—शर्मिला सुरेश दामले. वास्तव्य—विनोद वाडी, महर्षि कर्वे रोड, नौपाडा, ठाणे—२.
२) **रंजना**–जन्म २३ ।६ ।१९५३. सासर—रंजना भास्कर दामले बी. ए. (ऑनर्स). एल एल्. बी. फर्स्ट क्लास फर्स्ट १९७६. १९७५—७६ चे सुवर्णपदक प्राप्त. शिवाय वाडिया सुवर्णपदक व सर लॉरेन्स जेंकिन्स शिष्यवृत्ती मिळाली. पति—भास्कर वामन दामले. बी. ई. इलेक्ट्रिकल, टाटा पॉवर कंपनीत नोकरी. वास्तव्य—सत्यम् अपार्टमेंट, बी विंग, शिवमंदिर पथ, रामनगर, डोंबिवली (पूर्व).
२५४/९ **निशिकांत शंकर**–जन्म २० ।६ ।१९५६. शिक्षण—डी. इ. इ. व्यवसाय—बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी, सांताक्रूझ येथे, ज्युनिअर इंजिनिअर. वास्तव्य—भावे बंगला, नौपाडा, ठाणे.
भार्या : **स्नेहल**–शिक्षण—बी. एस्सी. (ऑनर्स). जन्म २२ ।७ ।१९५९. माहेर—वंदना मुरलीधर पेंडसे, डोंबिवली. युनियन बँकेत नोकरी.
कन्या :
१) **प्राजक्ता**–जन्म ७ ।७ ।१९८४.
२) **मानसी**–जन्म २२ ।८ ।१९८७.
२५५/८ **मधुकर लक्ष्मण**–जन्म १९३३ पुणे येथे. पुस्तक विक्रीचा व्यवसाय. अविवाहित.
२५६/८ **प्रभाकर लक्ष्मण**–जन्म १९३६ पुणे येथे. शिक्षण—इ. ८ वी पास. व्यवसाय—पेंटिंगचा वास्तव्य—११, नवकेतन सोसायटी, कोथरूड, पुणे-२९.
भार्या : **वसुधा**–माहेर—पुष्पा परांजपे, पोलादपूर, जि. रायगड.
कन्या :
१) **शुभदा**–वय २४ वर्षे. सासर—करंबेळकर.
२) **अनुपमा**–वय २२ वर्षे. सासर—कुलकर्णी.
२५७/९ **अभय प्रभाकर**–जन्म १९६८. शिक्षण—बी. कॉम्, पेंट टेक्नालॉजीचा डिप्लोमा. व्यवसाय—आऊटडोअर ॲडव्हरटायझींग व पेंटिंग कन्सल्टन्सी; अविवाहित.
२५८/८ **सुधाकर लक्ष्मण**–जन्म १६ ।५ ।१९४१ पुणे येथे शिक्षण—बी. ए. व्यवसाय—सदाशिव पेठेत स्वतःचे जनरल स्टोअर्स आहे. शिवाय ट्रान्स्पोर्टचा धंदा. वास्तव्य—१८३५, सदाशिव पेठ, पुणे-३०.
भार्या : **वैशाली**–माहेर—लता वासुदेव गोखले, पुणे.
कन्या : **वैजयंती**–जन्म २२ ।७ ।१९७१, शिकत आहे.
२५९/९ **विवेक सुधाकर**–जन्म १९ ।४ ।१९७० शिकत आहे.
२६०/७ **दत्तात्रय मोरेश्वर**–जन्म १८९५. मृत्यू १९४३. व्यवसाय—सरकारी नोकरी. पट्टीचे पोहणारे होते. वाईला कृष्णानदीत पोहत असत. उत्तम तालीमबाज. कुस्ती खेळत असत. पुण्यांत महाराष्ट्र व्यायाम मंडळ स्थापन करण्यात महत्त्वाचा वाटा होता. वास्तव्य—वाई, नंतर पुणे.
भार्या : **कमला**–माहेर—आवडी बाळकृष्ण करंदीकर.
कन्या :
१) **मालती**–जन्म १३ ।२ ।१९२८. शिक्षण—मॅट्रिक. सासर—मंगला वामन घांग्रेकर, पुणे.
२) **सुधा**–जन्म ६ ।११ ।१९४१. सासर—विजया रमेश पुणतांबेकर, पुणे.
२६१/८ **यशवंत दत्तात्रय**–जन्म ३१ ।१२ ।१९३० शिक्षण—रेडिओ इंजिनिअरिंगचा डिप्लोमा व्यवसाय—इंडियन एअर फोर्समध्ये नोकरी. निवृत्ती नंतर वॉटर फिल्टर बनविणे आणि विकणे. वास्तव्य—१४०२, सदाशिव पेठ, वा. ब. फडके पथ, पुणे-३०.
भार्या : **सुलभा**–जन्म ३० ।११ ।१९३५. माहेर—सुधा विठ्ठल फाटक, पुणे.
कन्या : **अनुपमा**–जन्म ८ ।१० ।१९६८. शिक्षण-बी. ए. (इंग्लिश). सासर—जोशी, संगमेश्वर. मु. पुणे.
२६२/९ **चंद्रशेखर यशवंत**–जन्म १५ ।५ ।१९६०. शिक्षण—केमिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा. व्यवसाय—प्रॉडक्शन इंजिनिअरिंगची खाजगी नोकरी.
भार्या : माहेर—सुनिता कुलकर्णी, तासगांव, जि. सांगली.
२६३/९ **अभिजित यशवंत**–जन्म २६ ।७ ।१९६२. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—सेल्समनची नोकरी. वास्तव्य—१४०२ सदाशिव पेठ, पुणे—३०.

२६४/६ **दामोदर (अण्णा) महादेव**–जन्म इ. स. १८५६ मृत्यू इ. सन १९३८. शिक्षण–प्रचलित रूढीप्रमाणे संस्कृत अध्ययनाखेरीज सातारा येथे सरकारी इंग्रजी शाळेत इ.५ वी पर्यन्त शिक्षण घेतले. व्यवसाय–इ. स. १८७७ पासून पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटमध्ये (पी.डब्ल्यू.डी.) काही काळ नोकरी केल्यावर पोस्ट खात्यात नोकरी केली. नोकरी निमित्त भोर, लोणंद, रहिमतपूर, मलकापूर, तासगाव, कोल्हापूर व महाबळेश्वर वगैरे ठिकाणी वास्तव्य होते. सतत सचोटीने काम करणारे अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यावेळी ज्या निवडक अधिकाऱ्यांना सीझनमध्ये महाबळेश्वर येथे जास्त कामासाठी पाठवीत असत, त्यात यांचा समावेश होता. सबपोस्टमास्तर म्हणून इ. स. १९१३ मध्ये महाबळेश्वर येथून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर काही काळ सांगली आणि नंतर पुणे येथे त्यांचे वास्तव्य होते. श्रीमत् शंकराचार्यांची पाद्यपूजा त्यांनी केली होती.
भार्या :१) १८५२ मध्ये विवाहानंतर अवघ्या दीड वर्षात निवर्तली. २) **सत्यभामाबाई**–माहेर–मथूबाई नारायण आगाशे सातारा. जन्म १८६२. मृत्यू १९४५. त्यांचे एकुलते एक पुत्र म्हणजेच नीळकंठ तथा राजाभाऊ.

२६५/७ **नीळकंठ (राजाभाऊ) दामोदर**–जन्म २३ ।८ ।१८९० सातारा. मृत्यू ११ ।५ ।१९८४. **शिक्षण–बी.ए.** (१९१२), (एस्. टी. सी.).
व्यवसाय–मुंबई सरकारच्या शिक्षण खात्यात नोकरी, शिक्षणाधिकारी म्हणून निवृत्त. वास्तव्य–'गंगावतरण', २०६५ सदाशिव पेठ, पुणे-३०. यांचे वडिलांची फिरतीची नोकरी असल्यामुळे ते त्यांचे चुलते वासुदेव शास्त्री यांच्याकडे राहिले. कराची येथील एन्.जे. हायस्कूलमध्ये १४ वर्षे शिक्षकाची नोकरी केली. नंतर पुणे येथे डेप्युटी डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन म्हणून नोकरी केली.
भार्या : १) **गंगाबाई**–जन्म १८९४. मृत्यू १९३४. माहेर–जोशी. लोणावळे, विवाह १९०६. प्रथम पत्नीपासून १ कन्या व २ पुत्र. २) **दुर्गाबाई**–जन्म १९१३. मृत्यू १९६२. माहेर–आपटे, मुंबई. यांचेपासून तीन कन्या झाल्या.
कन्या :
(१) **मैनावती**–सासर–शांता द. आपटे, मृत. पति–द. गो. आपटे, पुणे.
(२) **सुधा**–सासर–सुधा रा. लेले, मृत. पति–रा. गो. लेले, नवी दिल्ली.
(३) **ललिता**–सासर–गायत्री अ. गोडसे, मृत. पति–अ. ग. गोडसे, बगदाद.
(४) **पद्मा**–अविवाहित. मृत्यू २१ ।५ ।१९८७.

२६६/८ **हरि नीळकंठ**–जन्म १९२३ कराची येथे मृत्यू १२ ।५ ।१९८७. शिक्षण–बी.एस्सी. (ॲग्रीकल्चर). व्यवसाय–शॉ वालेस फार्मास्युटिकल कंपनी, फेडको प्रा. लि., हेक्स्ट इंडिया लिमिटेड. इ. कंपन्यांमध्ये नोकरी केली. हेक्स्ट फार्मास्युटीकल कं. तून मॅनेजर म्हणून निवृत्त झाले. फिरतीच्या नोकरीमुळे सर्व देशभर प्रवास झाला. सार्वजनिक कार्याची आवड असल्यामुळे अनेक मंडळींशी परिचय होता. लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले, उत्कर्ष मंडळ, विलेपार्ले, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मुंबई या संस्थांशी निकटचा संबंध होता. महाराष्ट्र सरकारच्या विश्वकोश प्रकाशनामध्ये त्यांनी 'तणनाशके' या विषयावर लिहिलेले टिपण प्रसिद्ध झाले आहे. महाराष्ट्र सरकारच्या कमिटी फॉर डेव्हलपमेन्ट ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन्स या समितीमध्ये ते सदस्य होते. कन्याकुमारी येथील विवेकानंद शिला–स्मारक या प्रकल्पाशी अगदी सुरुवातीपासून संबंध होता. निवृत्तीनंतर भारतीय किसान संघ, या संस्थेच्या कार्यास वाहून घेतले. रा. स्व. संघाचे ते तृतीय वर्ष शिक्षित स्वयंसेवक होते.
भार्या : **शोभना**–माहेर–सुमन रामकृष्ण जोशी. पिता–डॉ. रामकृष्ण रघुनाथ जोशी, सातारा.

२६७/९ **रवींद्र हरि**–जन्म १३ ।५ ।१९५१. शिक्षण–बी.एस्सी. व बिझनेस मॅनेजमेंटचा डिप्लोमा, मटेरियल मॅनेजमेंटचा डिप्लोमा, फ्रेंच भाषेचा डिप्लोमा. व्यवसाय–किर्लोस्कर न्यूमॅटिक कं. लि. हडपसर, पुणे येथे नोकरी. वास्तव्य–'गंगावतरण', २०६५ सदाशिव पेठ, पुणे–३०.
भार्या :**वैजयंती**–माहेर–पुष्पा शंकर कुलकर्णी. रा. सौख्यदा, पर्वती दर्शन, पुणे–९. पुत्र–**विश्वास (अभिराम)** –जन्म २६ ।१० ।१९८६.

२६८/८ **रामचंद्र नीळकंठ**–जन्म २६ ।६ ।१९४५ मृत्यू १० ।६ ।१९८३ शिक्षण–एम्.ए., ए. बी.टी.आय. (असोसिएट ब्रिटिश ट्युटोरिअल्स् इन्स्टिट्यूट), लंडन. व्यवसाय–विमा एजंट, पत्रकार, लेखक. सकाळ, केसरी, किर्लोस्कर, रोहिणी इ. मासिके आणि वर्तमान पत्रातून स्फुट लेखन. दृष्टिहीन झाल्यावर सुध्दा लखपति विमा एजंट म्हणून गौरव झाला होता. वास्तव्य–२०६५ सदाशिव पेठ, पुणे–३०.

भार्या : **विजया**–माहेर–शकुंतला महादेव जोग. रास्ता पेठ. एज्युकेशन सोसायटीच्या प्रशालेमध्ये शिक्षिका. रक्ताच्या कर्करोगाने मृत्यु. पिता–कै. महादेव गोपाळ जोग. सांगली/मुंबई. मृत.

२६९/९ **जयंत रामचंद्र**–जन्म ३१ ।३ ।१९५८. शिक्षण–एम्.डी., पॅथॉलॉजी. व्यवसाय–पुणे येथे पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी आहे. वास्तव्य–२०६५, सदाशिव पेठ, पुणे ३०.

भार्या : **रत्नमाला**–जन्म १९६१. शिक्षण–बी.एस्सी. माहेर–रत्नमाला ना. करकरे. पिता–ना. स. करकरे . मुंबई/पुणे.

कन्या : **नीना**–जन्म १ ।११ ।१९८९.

२७०/६ **रघुनाथशास्त्री महादेव**–जन्म १८६१. मृत्यू १९४८. शिक्षण–शास्त्री पंडित. घरच्या पाठशाळेत पं. रामशास्त्री गोडबोले यांच्यापाशी शिक्षण झाले. त्यांनी बंधू वासुदेव शास्त्री यांचेबरोबर संपूर्ण व्याकरण शास्त्राचे व इतरही काही शास्त्रांचे अध्ययन एकाचवेळी पूर्ण केले. व्यवसाय–सातारा येथील शास्त्री पंडित पाठशाळेत मुख्याध्यापक, रोजचे आन्हिक, होमहवन, जप इ. नित्य नैमित्तिक धार्मिक आचरण मोठ्या कष्टाने पाळीत असत. रोज संध्याकाळी ओंकारेश्वराच्या देवळात अव्याहतपणे एकादशनी करीत असत. ३/४ वेळा त्यांनी रुद्रस्वाहाकार केला होता. मृत्यूपूर्वी दोनच महिने महारुद्र स्वाहाकार व शतचंडीचे हवन केले होते. विद्वत्ता, अध्यापन, निष्ठा, नैतिक धर्माचरण शांत स्वभाव, त्यागवृत्ती इ. गुणांमुळे केवळ त्यांच्या शिष्यांसच नव्हे तर साताऱ्यातील सर्वच लोकांस त्यांच्याविषयी अत्यंत पूज्यभाव वाटे. त्यांच्या शिष्यांपैकी वे.मू. दत्तूशास्त्री वैद्य व गोपाळशास्त्री करंबेळकर हे सातारा येथे वे. मू. गणेश शास्त्री जोशी व वे.मू.सदाशिवशास्त्री काशीकर हे पुणे येथे आणि वे.मू.सखाराम शास्त्री घळसासी हे कराड येथे वैदिक आणि अध्यापन कार्यात प्रख्यात झाले. भाद्रपद कृष्ण द्वितीया २ शके १८७० रोजी सप्तशतीचा जप करीत असतानाच त्यांचे देहावसान झाले.

भार्या : १) प्रथम विवाह १८७७ साली झाला. पत्नी निवर्तल्यानंतर थोड्याच दिवसांनी द्वितीय विवाह केला.

२) **सीताबाई**–माहेर–विठामाई. वाईचे सुप्रसिद्ध घराणे लेले शास्त्री.

२७१/७ **गोविंदशास्त्री रघुनाथ**–जन्म १८९६ मृत्यू २४ ।२ ।१९६८. शिक्षण–फलज्योतिषशास्त्राचा उत्तम अभ्यास. व्यवसाय–भिक्षुकी व भविष्य कथन अचूक करीत. वास्तव्य–६६ चिमणपुरा पेठ, गारेच्या गणपतिजवळ, सातारा.

भार्या : **सावित्रीबाई**–१९१३ साली विवाह. माहेर–रंगूबाई अनंत करंदीकर नाशिक. ३ पुत्र व ५ कन्या.

कन्या :

१) **चंद्रा**–सासर–मालती बाजीराव सहस्रबुध्दे, पुणे.

२) **हिरा**–सासर–उर्मिला लक्ष्मणराव आपटे, पुणे.

३) **मालती**–सासर–सुशीला श्रीपादराव जोशी, अहमदनगर.

४) **नलिनी**–सासर–नलिनी भास्कर घैसास. पुणे.

५) **कामाक्षी**–सासर–स्नेहा शरद बेहेरे. मुंबई

२७२/८ **पांडुरंग गोविंद**–जन्म१५ ।८ ।१९२३ सातारा येथे. शिक्षण–इ. १० वी. व्यवसाय–भिक्षुकी व ज्योतिष. गायनाची आवड. संगीत विशारद. वास्तव्य–६६, चिमणपुरा पेठ, गारेच्या गणपतिजवळ, सातारा. सातारा येथील घरात शंकराचे देऊळ आहे व दररोज एकही दिवस खंड न पडता रुद्राची एकादशनी चौथ्या पिढीतही चालू आहे.

भार्या : **मंगला**–माहेर–कमल लक्ष्मण भिडे, महागाव, सातारा.

कन्या :

१) **उत्तरा**–जन्म ३ ।३ ।१९७३. सासर–शीला विजयानंद केतकर, चिपळूण.

२) **भूषणा**–सासर–भूषणा घनःश्याम सोमण. बोरिवली.

३) **विशाखा**–जन्म २८ ।४ ।६४. सासर–विशाखा मोहन भिडे, रत्नागिरी.

२७३/९ **संतोषकुमार पांडुरंग–जन्म** २२ ।१२ ।५४.
शिक्षण–बी.कॉम्. व्यवसाय–बँकेत नोकरी.
वास्तव्य–सातारा.
भार्या : **मधुरा**–माहेर–रोहिणी रामचंद्र जोशी, चिपळूण.
कन्या : **प्रवरा**–
२७४/१० **पुष्कराज संतोषकुमार–जन्म** २५ ।९ ।८२.
विद्यार्थी.
२७५/८ **योगेश्वर गोविंदशास्त्री–जन्म** ९ ।३ ।१९३०.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–ऑर्डिनन्स फॅक्टरी खमारिया, जबलपूर येथून फोरमन म्हणून निवृत्त.
वास्तव्य–घोषाल कॉम्प्लेक्स, सुभाषनगर, मानेगाव, पो-खमारिया, जबलपूर.
भार्या : **सुनिति**–माहेर–मंदाकिनी सखाराम सहस्रबुध्दे, पुणे.
कन्या :
१) **कालिंदी**–जन्म १९६८. शिक्षण एम्.ए.
२) **नीलांबरी**–सासर–स्नेहा सुधीर जोशी, आडिवरें.
३) **अर्चना**–जन्म १९७१. शिक्षण–बी.ए. दुसरे वर्ष. पुत्र : **संजय**–जन्म १० ।९ ।१९६४ एम्. कॉम्. मार्केटिंग मॅनेजमेंटचा कोर्स पास, कॉम्प्युटरचा प्रगत कोर्स पूर्ण.
२७६/८ **भार्गव गोविंदशास्त्री–जन्म** २२ ।१२ ।१९३८. शिक्षण–बी.ए. व्यवसाय–पुणे येथे कंट्रोलर ऑफ डिफेन्स् अकौंटस् मध्ये ऑडिटरची नोकरी. **वास्तव्य–बी** ।१ ।९ रक्षालेखा सोसायटी, गजेंद्रनगर, दत्तवाडी, पुणे–३०.
भार्या : **यामिनी**–माहेर–आशा परशुराम कर्वे. रा. वाई. शिक्षण–एस्.एस्.सी.
कन्या : **मंजिरी**–जन्म १९६९. शिक्षण इलेक्ट्रिकल इंजिनीयर. डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन.
२७७/९ **जितेंद्र भार्गव**–जन्म २ ।१२ ।१९७०.
शिक्षण–बी.एस्सी. ला शिकत आहे.
वास्तव्य–**बी** ।१ ।९ रक्षालेखा सोसायटी, गजेंद्रनगर, दत्तवाडी, पुणे–३०.
२७८/७ **दिगंबर रघुनाथशास्त्री**– जन्म ३० ।३ ।१९०८. सातारा येथे. शिक्षण–बी.एस्सी., बी.टी. व्यवसाय–मुंबईच्या शिक्षण खात्यात नोकरी–१९३४ ते १९४८ कराची येथे, १९४८-५२ धुळे, १९५३ ते १९६० रत्नागिरी, १९६० ते १९६३ बसमतनगर, १९६३–६५ रत्नागिरी १९६५ साली सांगली येथून एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून निवृत्त.
वास्तव्य–४२५/५६, टिळक विद्यापीठ नगर, पुणे–३७.
भार्या : **मनोरमा**–माहेर–इंदिरा दिगंबर आगाशे, पुणे.
कन्या :
१) **शालिनी**–जन्म ३० ।९ ।१९३३ सासर–शालिनी माधव गोडबोले, पुणे. शिक्षण बी.ए,बी.टी.
२) **अनुराधा**–जन्म २४ ।१ ।१९४९. सासर–अनुराधा चंद्रकांत वैशंपायन, पुणे. शिक्षण–बी.ए.
२७९/८ **सुरेश दिगंबर**–जन्म १३ ।९ ।१९३७.
शिक्षण–एम्.ए., बी.एड्. व्यवसाय–भावे स्कूल पुणे येथे शिक्षक. वास्तव्य–४२५/५६, टिळक विद्यापीठ नगर, पुणे–३७.
भार्या : **उषा**–शिक्षण–बी.एस्सी., एम्. एड्. नोकरी. माहेर–उषा विष्णुपंत केळकर.
कन्या :
१) **चित्रा**–जन्म १९६६. शिक्षण–एम्. एस्सी. नोकरी ए.आर.डी.इ. पाषाण.
२) **वर्षा**–जन्म १९६९. शिक्षण–बी.ए. उत्तीर्ण. सासर–म्हसकर, अहमदनगर.
२८०/८ **रमेश दिगंबर**–जन्म ३० ।९ ।१९३५.
शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–सरकारी नोकरी.
वास्तव्य–सर्व्हे नं. ५८५, 'आकाशदर्शन' सोसा. प्लॉट नं. ३१, मार्केट यार्ड पाठीमागे पुणे–१.
भार्या : **सुनंदा**–माहेर–विजया श्रीनिवास गोखले सांगली. शिक्षण–एम्.ए., पी.एच्.डी. जन्म १९४०.
२८१/९ **श्रीकांत रमेश**–जन्म १ ।३ ।१९६४.
शिक्षण–बी. कॉम्., एल्.एल्.बी. व्यवसाय–बजाज ऑटोमध्ये नोकरी, पुणे,
२८२/९ **प्रमोद रमेश**–जन्म १८ ।६ ।१९६६.
शिक्षण–बी.एस्सी. व्यवसाय–डेक्कन कॉलेज, पुणे येथे नोकरी.
२८३/८ **अरविंद दिगंबर**–जन्म १९ ।७ ।१९४०.
शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–वृत्तपत्र वितरकाचा पुणे येथे व्यवसाय आहे. अविवाहित. वास्तव्य–पुणे.
२८४/६ **वासुदेवशास्त्री महादेव**–जन्म अधिक श्रावण कृष्ण ६ शके १७८५ म्हणजेच ४ ।८ ।१८६३ रोजी सातारा येथे. मृत्यू १४ ।१० ।१९४२. शिक्षण–संस्कृत

पंडित. व्यवसाय—अध्ययन व अध्यापन. (१८९२ मधे फर्ग्युसन कॉलेजात शास्त्री म्हणून नेमणूक) वडील दीड वर्षाचे असताना निवर्तल्यामुळे त्यांचे आजोबा पंडित भास्करशास्त्री यांचे देखरेखीखाली त्यांचे शिक्षण झाले. त्यांचे पश्चात् त्यांचे शिक्षण गुरुवर्य महर्षि रामशास्त्री गोडबोले यांचेपाशी झाले. अपूर्व स्मरणशक्ती, गाढ व्यासंग व लेखन त्यामुळे १९२१ मधे ब्रिटिश सरकारकडून महामहोपाध्याय हा किताब मिळाला. ते प्रसिद्ध वैय्याकरणी होते. त्यांचे वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा मोठा सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी व्याकरण महाभाष्याचा मराठी अनुवाद प्रसिद्ध करून तो डेक्कन एज्युकेशन सोसायटीस अर्पण केला. मोपल्यांचे शुद्धिकरणाबाबत धर्मवीर डॉ.बा.शि.मुंजे यांना शास्त्राधार काढून दिला होता तो त्यांना मान्य झाला होता.

भार्या : **उमाबाई**–जन्म १८७०. मृत्यू १९४२.
माहेर—गोदुताई गोडबोले, सातारा. पति—डॉ. शरद विश्वनाथ आपटे, पुणे. वास्तव्य—प्रथम सातारा येथे. नंतर अभ्यंकरवाडा लक्ष्मी रस्ता पुणे २.

२८५/७ **काशीनाथशास्त्री (बापूसाहेब) वासुदेवशास्त्री**–जन्म श्रावण वद्य अष्टमी (गोकुळाष्टमी रात्री १२ ॥ वाजता) म्हणजेच दि. ८ ऑगस्ट १८९०. मृत्यू १ ।१२ ।१९७६. शिक्षण—एम्.ए. शालेय शिक्षणाबरोबर संस्कृत पाठाध्ययनही केले. उपनयनापूर्वीच रुपावली, अमरकोष यांचे शिक्षण वडिलांचे शिष्यवर्गाकडून मिळाले. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून १९०७ साली पहिली जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवून मोठा बहुमान संपादन केला. त्यानंतर त्यांचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमधे झाले. शाळा व कॉलेजमधील सर्व बक्षिसे विशेषत: संस्कृत विषयात सतत प्रथम क्रमांक मिळवून सर्व शिष्यवृत्त्या आणि पारितोषिके मिळविण्याचे अद्वितीय यश संपादन केले. व्यवसाय—१९१३ साली गुजराथ कॉलेज, अहमदाबाद येथे संस्कृतचे उपप्राध्यापक आणि १९१९ साली संस्कृतचे मुख्य प्राध्यापक म्हणून नेमणूक. तेथून १९४६ साली निवृत्त झाले. एम्.ए. व पी.एच्.डी. च्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. निवृत्तीनंतरही पुणे येथे डॉ. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरात मार्गदर्शनाचे कार्य सातत्याने आमरण केले. परंतु दुर्दैव असे की अशा या थोर विद्वान गृहस्थाचा व त्यांच्या पत्नी नातू धनंजय व नात जाई इ. ५ व्यक्तिंचा खून दि. १ ।१२ ।१९७६ रोजी त्यांच्या राहत्या घरी पुणे येथे झाला. अखेर चारही आरोपींना फाशीची शिक्षा झाली. वास्तव्य—'स्मृति' बंगला, डॉ. भांडारकर रोड, एरंडवणे, पुणे.

भार्या : १) विवाह १९०६ मृत्यू १९१२. २) **इंदिराबाई**–विवाह १९१३. लाटे वकील खानदेश यांची कन्या. यांना २ पुत्र व २ कन्या.

कन्या :

१) **ताराबाई**–जन्म २५ ।१२ ।१९२१.
शिक्षण—मॅट्रिकपर्यंत. शालेय जीवनात सेवासदन हायस्कूलमधे सतत पहिला क्रमांक असे. धार्मिक वृत्ती, परोपकारी स्वभाव व सामाजिक कार्याची आवड.
सासर—कमलाबाई अनंत गाडगीळ, सांगली.
पति—अनंत गणेश उर्फ दाजीसाहेब गाडगीळ, सराफ.
वास्तव्य—कौस्तुभ, विजयनगर कॉलनी, पुणे—३०.

२) **सरला**–जन्म १९३५. शिक्षण—एम्.ए. विवाह १९५७. सासर—सरला शरद आपटे. पति—डॉ. शरद विश्वनाथ आपटे, पुणे. व्यवसाय—डॉक्टर, डायरेक्टर इन्स्टिट्यूट ऑफ हेमेटॉलॉजी.

२८६/८ **गजानन काशीनाथ**–जन्म १९१७.
शिक्षण—एम्.एस्सी, आय.ए.ए.एस्. व्यवसाय—भारत सरकार अर्थ खाते, अतिरिक्त सचिव, एफ्.ए.मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स् पदावरून १९७५ मध्ये निवृत्त.
वास्तव्य—१ श्रीमान् अपार्टमेन्ट, भांडारकर रोड, पुणे ४.
भार्या : **हिरा**–माहेर—हिरा आपटे, रा. धुळे.

कन्या :

१) **जाई**–हत्याकांडात मृत.

२) **जुई**–आजारपणात मृत.

३) **शीला**–सासर—फडके, पुणे पति—सुनिल फडके, व्यवसाय—संगणकाच्या तंत्रज्ञानाचा.

२८७/९ **धनंजय गजानन**–जन्म २५ ।४ ।१९५७.
शिक्षण—मेडिकल कॉलेज मध्ये शिकत असताना हत्याकांडात मृत्यू पावला.

२८८/८ **मोरेश्वर काशीनाथ**–जन्म २५ ।१२ ।१९२६.
शिक्षण—एम.आय.ई.आर.ई. व्यवसाय—वायुसेने मध्ये

अधिकारी २६ वर्षाचे सेवेनंतर विंग कमांडर म्हणून निवृत्त. वास्तव्य—टिळक महाराष्ट्र विद्यापीठ कॉलनी, पुणे—३७.
भार्या : विजया—जन्म १९२९ माहेर—विजया सदाशिव फाळके, नाशिक. शिक्षण—बी.ए.
कन्या : **ज्योती**—जन्म १८ ।२ ।१९५८ शिक्षण—एम्.ए. एम्.फिल्. बी.जे.. इंग्रजी भाषेत प्रविण, फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे लेक्चरर, नृत्यकला विशारद. नृत्य विद्येची पदवीधर, सासर—ज्योती विकास मोघे, पुणे.
पति—विकास केशव मोघे. पायलट, इंडियन एअर लाईन्समध्ये.
२८९/९ **राजेंद्र मोरेश्वर**—जन्म १४ ।९ ।१९६२. शिक्षण—एम्.एस्. (यू.एस्.ए.) इलेक्ट्रॉनिक्स् इंजिनिअर. इंटर कॉर्पोरेशन यू.एस्.ए. मध्ये डिझाईन इंजिनिअर मायक्रो प्रोसेसर.
२९०/९ **शैलेंद्र मोरेश्वर**—जन्म १० ।२ ।१९६४. शिक्षण—एम्.इ. इंजिनिअर (कॉम्प्युटर)
व्यवसाय—दिल्ली सी.डी.ओ.टी. येथे डिझाइन इंजिनीयर.
२९१/७ **गंगाधर वासुदेव**—जन्म १८९६. मृत्यु २९ ।७ ।१९५६. शिक्षण—१९१३ मध्ये मॅट्रिक., एम्.ए. संस्कृत, गणित. व्यवसाय—शिक्षण खात्यात नोकरी. वास्तव्य—'वासुदेव स्मृति' १३१०, शिवाजीनगर, पुणे—५.
भार्या : कमलाबाई—माहेर—सुंदराबाई थत्ते. पुणे.
कन्या : **सुशीला**—जन्म १९२९. अविवाहित. मृत्यू २९ ।४ ।१९६५. शिक्षण—बी.ए., बी.टी.
२९२/८ **महेश्वर गंगाधर**—जन्म १९२५. मृत्यु २७ ।३ ।१९८५. शिक्षण—बी.एस्सी.
व्यवसाय—फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे अकौंटंट ची नोकरी. वास्तव्य—'वासुदेव स्मृति', १३१०, शिवाजीनगर पुणे—५.
भार्या : **प्रभा**—माहेर—मालती लक्ष्मण रास्ते.
पिता—लक्ष्मण गणेश रास्ते, वकील. वाई.
कन्या :
१) **जयश्री**—जन्म १९५५. सासर—शुभांगी दत्तात्रय शेजवलकर.
२) **अंजली**—जन्म १९६०. सासर—अंजली राजीव कानिटकर.
२९३/९ **श्रीपाद महेश्वर**—जन्म २० ।१ ।१९५७. शिक्षण—बी.एस्सी. व्यवसाय—नोकरी.
वास्तव्य—वासुदेव स्मृति, १३१०,शिवाजी नगर, पुणे—५.
भार्या : उमा—जन्म १९६२. शिक्षण—बी.कॉम्. माहेर—कांचन गोपाळ गद्रे, धुळे
२९४/१० **अमेय श्रीपाद**—जन्म २८ ।४ ।१९८५.
२९५/८ **केशव गंगाधर**—जन्म १८ ।१२ ।१९२८. पुणे येथे. शिक्षण—बी.एस्सी. (ऑनर्स). व्यवसाय—डिफेन्स खात्यात पुणे, अंबरनाथ येथे नोकरी. वास्तव्य—६४, मेधा अपार्टमेंट, तुळशीबागवाले कॉलनी, सहकार नगर, पुणे—९. ब्रिज व गायनाची आवड, १९७० मध्ये स्वीडनला नोकरीनिमित्त अडीच महिन्यांचे वास्तव्य.
भार्या : **रजनी**—माहेर—तारा मराठे.
कन्या : **विदुला**—शिक्षण—एम्.एस्सी. (मॅथ्स्.). सासर—विदुला गोरे, वास्तव्य—अमेरिकेत.
२९६/९ **सतीश केशव**—जन्म ९ ।४ ।१९५७. शिक्षण—बी.इ.मेकॅनिकल. व्यवसाय—थरमॅक्स कंपनीत असिस्टंट सुपरिटेन्डंट पदावर नोकरी. वास्तव्य—पुणे.
भार्या : **समिधा**—माहेर—समिधा आठल्ये.
कन्या : **मानसी**—जन्म २१ ।१२ ।१९८२.
२९७/८ **माधव गंगाधर**—जन्म १२ ।१ ।१९४३ पुणे येथे. शिक्षण—एम. कॉम. व्यवसाय—वरिष्ठ लिपिक, डेक्कन कॉलेज, पुणे. वास्तव्य—'वासुदेव स्मृति',१३१०, शिवाजीनगर, पुणे—५.
भार्या : **अर्चना**—माहेर—सुनीति नीळकंठ साने, मुंबई.
२९८/९ **मयुरेश माधव**—जन्म २२ ।१ ।१९७१. शिक्षण—इ. १२ वीत शिकत आहे. तबला वादनाचे शिक्षण चालू.
२९९/९ **शंतनू माधव**—जन्म २७ ।८ ।१९५८. इ. ५ वी मध्ये शिकत आहे. पेटीवादन व गायनाचे शिक्षण.
३००/५ **वैजनाथ भास्कर**—हे वैदिक होते. पुत्र अपत्य नाही.

मालगुंड घराणे क्र.. १

वंशावळी क्र. ३

मालगुंड–वाई–पुणे–मुंबई

३०१/३ **बाळकृष्ण रामचंद्र–** #

३०२/४ **मोरेश्वर बाळकृष्ण–** #

३०३/५ **वासुदेव मोरेश्वर–** #

३०४/६ **अनंत वासुदेव–** #

३०५/७ **महादेव अनंत–** #

३०६/८ **हरि महादेव–** #

३०७/८ **गोविंद महादेव–** #

३०८/९ **कृष्ण गोविंद**–जन्म १९०० सातारा येथे. मृत्यू २३ ।२ ।१९६६. मुंबई येथे.

मालगुंड घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक ३

मालगुंड--वाई--पुणे--मुंबई



भार्या : **राधाबाई**–माहेर–किसाबाई अनंत आपटे. मृत्यू २६ ।५ ।१९८०.
कन्या : १) **तारा**–मृत.
३०९/१० **शंकर कृष्णाजी**–जन्म १९ ।५ ।१९३४, सातारा येथे. शिक्षण–संगीत अलंकार.
व्यवसाय–श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महाविद्यालयात (एस्.एन्.डी.टी.) संगीत विभागात प्राध्यापक. प्रसिद्ध सतारवादक. आकाशवाणी, दूरदर्शन आणि विविध संगीत समारोहातून सतार वादनाचे स्वतंत्र कार्यक्रम करतात. त्या निमित्ताने सिंगापूर येथे दोन वेळा दौरा केला. शास्त्रीय कंठ संगीतातही प्राविण्य.
बंदीशकार म्हणून प्रसिद्ध. स्वरचित्त बंदिशींचे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर. वास्तव्य–सी–९ गणेश भुवन, सेनापती बापट मार्ग, माहिम, मुंबई–१६.
भार्या : **कमल**–माहेर–कमल कृष्ण मराठे. जन्म १५ ।१२ ।१९३८, आचरे येथे.
शिक्षण–एम्.ए.पी.एच.डी. व्यवसाय–श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठात, संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका. रंजन कथामाला, संस्कृत रचना इ. काही पुस्तकें प्रकाशित. मराठी व संस्कृत कवि संमेलनात सहभाग, आकाशवाणी व दूरदर्शन वरील कार्यक्रमात सहभाग, संगीताची विशेष आवड.
३१०/११ **रवींद्र शंकर**–जन्म २३ ।१ ।१९६२, मुंबई येथे. शिक्षण–पूर्व–माध्यमिक शिष्यवृत्ति धारक–बृहन्मुंबईत चौथा–माध्यमिक शिष्यवृत्ति धारक–एस्.एस्.सी. गुणवत्ता यादीत २२ व्या क्रमांकाने उत्तीर्ण, बी. कॉम. प्रथम वर्गात पास. चार्टर्ड अकौटंट, रशियन भाषेत प्राविण्य, रशियन भाषेच्या प्रगत अध्ययनासाठी रशियामध्ये एक वर्ष वास्तव्य. युरोप मध्ये, इंग्लंड, पोलंड, ऑस्ट्रिया इ. देशांना भेटी, भारतात रशियन महोत्सवात कार्य केले.
३११/११ **मुकुल शंकर**–जन्म १३ ।१२ ।१९६८ मुंबई येथे. शिक्षण–माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त. सेंट झेविअर्स महाविद्यालयात बी.ए. च्या शेवटच्या वर्षाला. वक्तृत्व, संगीत नाटक इ. मध्ये अनेक बक्षिसें प्राप्त फोटोग्राफीची आवड व प्राविण्य. अनेक स्पर्धात पारितोषिके मिळवली. 'विवेक नेचर क्लब' नावाची संस्था स्वत: स्थापन करून त्यातर्फे मनाली येथे मुलांचे शिबीर भरविले.
३१२/१० **चिंतामणी (चिमण) कृष्णाजी**–जन्म ९ ।६ ।१९४२ सातारा येथे. व्यवसाय–सतार वादन वास्तव्य–मुंबई.
३१३/११ **अभिजित चिंतामणी**– #
३१४/८ **अनंत महादेव**– #
कन्या : **शशिकला**–सासर–माधुरी अनंत केळकर, पुणे
३१५/६ **बाळकृष्ण वासुदेव**– #
३१६/७ **रामचंद्र बाळकृष्ण**– #
३१७/८ **नारायण रामचंद्र**– #
कन्या : **अन्नपूर्णा**–जन्म १९०८. मृत्यू १९८४. सासर–कुमठेकर, सातारा.
३१८/९ **धोंडोपंत (धुंडिराज) नारायण**–जन्म १९०५. मृत्यू ३० ।४ ।१९८७. शिक्षण–व्ह. फा.
व्यवसाय–जिल्हा लोकल बोर्डात शिक्षक त्यामुळे सातारा व इतर ठिकाणी बदल्यांमुळे वास्तव्य होते.
वास्तव्य–प्रथम वाई, नंतर ३१२ नारायण पेठ, पुणे.
भार्या : **गंगाबाई**–माहेर–द्वारका नारायण जोशी. वास्तव्य–चिंधवली. रा. वाई. जि. सातारा.
कन्या : **सिंधू**–जन्म १९४०. शिक्षण–एस्.एस्.सी. सासर–शारदा शरदचंद्र बर्वे, भोपाळ.
३१९/१० **मोरेश्वर धोंडोपंत**–जन्म १२ ।७ ।१९३० चिंधवली. येथे. शिक्षण–मॅट्रिक. आर.एस्.डब्ल्यू. रेडिओ कोर्स पूर्ण. व्यवसाय–पोलिस निरिक्षक, वायरलेस विभाग, महाराष्ट्र शासनाच्या नोकरी मधून १९८८ ला निवृत्त. वास्तव्य–६१५ नवी बिल्डींग, शास्त्री हॉल, ग्रँटरोड, मुंबई. ७.
भार्या :**सरोजिनी**–माहेर–कमल विष्णू करंदीकर, सोमवार पेठ–सातारा.हार्मोनिअमचे क्लासेस चालवितात.
कन्या :
(१) **मंदाकिनी**–जन्म २५ ।३ ।१९५८.
शिक्षण–बी.कॉम्. सासर–मेघना मुकुंदराव मराठे, १४२१, सदाशिव पेठ, नरसिंह मंदिरा जवळ, पुणे-३०. बँक ऑफ महाराष्ट्र येथे नोकरी.
(२) **पद्मावती**–जन्म २७ ।११ ।१९६३
शिक्षण–एम्.कॉम. सासर–प्रभावती सतीश जोशी रा. ८/६२, उन्नत नगर, गोरेगाव (प) मुंबई भारत पेट्रोलियम,

मुंबई येथे नोकरी.
३२०/११ **चिंतामणी मोरेश्वर–जन्म** १४ ।४ ।१९५६ शिक्षण–एम्.कॉम., आय.सी.डब्ल्यू.ए., सी.ए. व्यवसाय –सी.ए. चा स्वत:चा मुंबई येथे व्यवसाय.
भार्या : **अनुराधा**–माहेर–अनुराधा माधव आठवले एम. एस्. सी. कर्नल आठवले, पुणे यांची कन्या.
कन्या : **अनिता–जन्म** १४ ।११ ।१९८७.
पुत्र–**अमित–जन्म** २१ ।२ ।१९८६
३२१/११ **उदय मोरेश्वर–जन्म** २८ ।२ ।१९६२ शिक्षण. बी.ई. (इलेक्ट्रिकल) व्यवसाय–पैठण येथे स्वत:चा कारखाना. वास्तव्य–६ विद्यानिकेतन कॉलनी. जालनारोड, औरंगाबाद.
भार्या :**आरती**–माहेर–मोहना दत्तात्रय जोशी. बडोदे.
३२२/१० **श्रीराम धोंडोपंत–जन्म** १९३३. शिक्षण–एल्.इ.इ.हैद्राबाद. व्यवसाय–रेडिओ टेक्निशिअन, कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरींग दापोडी, पुणे येथे नोकरी. वास्तव्य–३१२, नारायण पेठ, लिमयेवाडा, पुणे.
भार्या :**शकुंतला**–माहेर–शकुंतला जोशी, सातारा.
कन्या :
१) **सुमीता**–वय २४ वर्षे. शिक्षण–एम्.कॉम. पुणे येथे नोकरी.
२) **सुहास**–वय २२ वर्षे. शिक्षण–बी.एस्सी. त शिकत आहे. पुत्र–**सुधींद्र**–वय १५ वर्षे. शिक्षण–एस्.एस्.सी. पास.
३२३/१० **दत्तात्रय धोंडोपंत**–जन्म १९३५. मृत्यू १८ ।१ ।१९८७ शिक्षण–बी.ए. व्यवसाय–बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये नोकरी. वास्तव्य–हिंदुस्तान अँटिबायोटिक्स कॉलनी, ब्लॉक नं I/१०२ पिंपरी, पुणे.
भार्या :**मंगला**–माहेर–प्रमिला करमरकर, पुणे. पिंपरीच्या हिंदुस्तान अँटिबायोटिक्समध्ये नोकरी.
कन्या : **गौरी–जन्म** १९७०. शिक्षण–डिप्लोमा इन रेडिओ इंजिनिअरींग (डी.आर.इ.) टेल्को, पुणे येथे नोकरी. पुत्र–**श्रीपाद**–जन्म १९७५. एस्.एस्.सी. मध्ये शिकत आहे.
३२४/९ **वासुदेव नारायण–जन्म** ९११४. मृत्यू १९४२. शिक्षण–मराठी चौथी. व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–वाई, सातारा.
भार्या : **इंदिरा**–माहेर–भागिरथी चिपळूणकर, वाई, गृहिणी.
कन्या : **सुमन**–सासर–सुमन श्रीनिवास देपोलकर हॅबिब कॉटेज, काजूपाडा, बोरिवली (पूर्व) मु.६६.
३२५/१० **रामकृष्ण वासुदेव–जन्म** २६ ।९ ।१९३८. शिक्षण–एस्.एस्.सी. पास. व्यवसाय–पोस्ट खात्यात आर.एम्.एस्. मध्ये नोकरी. वास्तव्य–४५/५, पुष्पा पार्क, मालाड (पू.) मुंबई-६७.
भार्या : **सुभदा**–माहेर–शकुंतला श्रीपाद पाटणकर, सांगली.
कन्या :
(१) **अपर्णा–जन्म** १५ ।९ ।१९७२. शिक्षण–इ. ११ वीत शिकत आहे.
(२) **मेघना**–जन्म ७ ।१२ ।१९७४. शिक्षण–इ. ९ वीत शिकत आहे.
३२६/११ **राजेंद्र रामकृष्ण–जन्म** ५ ।३ ।१९७७. शिक्षण–इ. ७ वीत शिकत आहे.
३२७/८ **शंकर रामचंद्र**–व्यवसाय–भिक्षुकी, पौरोहित्य. वास्तव्य–वाई, जि. सातारा.
भार्या : **दुर्गाबाई**–माहेर–वैद्य. या सुप्रसिद्ध आयुर्वेदिक वैद्य होत्या.

मालगुंड घराणे क्र. १

वंशावळी क्र. ४

मालगुंड–वर्धा–नागपूर–बिलासपूर.

३२८/२ **लक्ष्मण काशीनाथभट्ट**–हा वंश पुढे वऱ्हाडात वाढत गेला असे दिसते. याच्या ६ व्या पिढी नंतरची माहिती सध्या नागपूर जबलपूर येथील हयात व्यक्तींकडून मिळाली ती पुढे दिली आहे. परंतु यांचेपासूनच्या ४ ।५ पिढ्यांची माहिती मिळाली नाही.
३२९/३ **गंगाधर लक्ष्मण–** #
३३०/४ **विश्वनाथ गंगाधर–** #
३३१/५ **गणेश विश्वनाथ–** #

मालगुंड घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक ४

मालगुंड–वर्धा–नागपूर–बिलासपूर



३३२/६ **शिवराम गणेश–** #

३३३/७ **सखाराम शिवराम–**हे मालगुंड येथे होते, त्यांचा पुत्र विश्वनाथ हा मालगुंड सोडून रेल्वेत नोकरीसाठी बाहेर पडला.

३३४/८ **विश्वनाथ सखाराम–**मालगुंड येथील सखाराम अभ्यंकर यांचे चिरंजीव विश्वनाथ सखाराम अभ्यंकर हे

मालगुंडहून बाहेर कधी पडले त्याची माहिती नाही. परंतु ते त्यावेळच्या बंगाल–नागपूर रेल्वेत (सध्याची दक्षिण–पूर्व रेल्वे) ऑडिटर होते. ह्यांना दोन मुलगे व दोन मुली. सध्याच्या बंगाल–नागपूर रेल्वेत ऑडिटर. वास्तव्य माहित नाही.

कन्या :

१) **द्वारका**–हिचा विवाह रावसाहेब ना. वि. जोशी मॅजिस्ट्रेट ह्यांच्याशी झाला.

२) **काशी**–हिचा विवाह बालाघाटचे श्री. चिंतामणराव केळकर ह्यांच्याशी झाला.

३३५/९ **गणेश विश्वनाथ**–वास्तव्य भंडारा (महाराष्ट्र) हे व ह्यांचे बंधु ह्यांचे दुकान, लाकडाचे वर्कशॉप, आणि मोटर–ट्रान्स्पोर्ट (भंडारा ते नागपूर) असे व्यवसाय होते. ह्यांचे घरी भाद्रपदात नवसाच्या म्हणून खड्याच्या गौरीसकट उभ्या महालक्ष्मी, जेष्ठा व कनिष्ठा व त्यांची दोन बाळे अशी मांडण्याची प्रथा होती व ती आजपर्यंत चालू आहे. नागपूरी देशस्थ लोकांसारखी बारश्याची व लग्नाची बोडणे भरण्याचा कुळाचार आहे. यांना तीन मुले व दोन मुली.

कन्या :

१) **सगुण**–हिचा विवाह गिजरे ह्यांच्याशी झाला.

२) **करूण**–हिचा विवाह गोखले ह्यांच्याशी झाला.

३३६/१० **गंगाधर गणेश**–जन्म १० ।१० ।१९१४ भंडारा येथे. साऊथ ईस्टर्न रेल्वेत नोकरी.
शिक्षण–मॅट्रिक. वास्तव्य–प्रसाद ट्रस्ट भवन, रामदास नगर, टिकरापारा बिलासपूर.
भार्या : **कमल**–जन्म १९१८. मृत्यू २३ ।५ ।१९८८.
कन्या : **लता**–हिचा विवाह वैद्य यांच्याशी झाला.
शिक्षण–४ थी इयत्ता माहेरचे नाव–अनुसुया जयराम रानडे. वर्धा.

३३७/११ **वनमाली गंगाधर**–जन्म ६ ।१२ ।१९४० भंडारा येथे. रेल्वेत नोकरी. शिक्षण–मॅट्रिक.
वास्तव्य–टिकरापारा बिलासपूर.
भार्या : **वनमाला**–जन्म ३० ।९ ।१९५२ खडकपूर येथे.
शिक्षण–एम्.ए. माहेरचे नाव–कमल पांडूरंग देशपांडे.
कन्या :

१) **सरोजबाला**–जन्म २६ ।७ ।१९७० बिलासपूर येथे.
शिक्षण–बी.ए. प्रथमवर्ष.

२) **स्मिता**–जन्म १० ।१२ ।१९७३ बिलासपूर.
शिक्षण–मॅट्रिक १० वी.

३३८/१२ **गणेश वनमाळी**–जन्म ३ ।११ ।१९७५ बिलासपूर. शिक्षण–८ वी.

३३९/११ **गजानन गंगाधर**–जन्म १ ।७ ।१९४७ वर्धा येथे. व्यवसाय–भारतीय स्टेट बँकेत नोकरी.
शिक्षण–बी.एस्सी., डी.एच्.बी. वास्तव्य–कोर्बा (बिलासपूर)
भार्या : **शोभा**–जन्म २० ।२ ।१९५१ कोर्बा येथे.
शिक्षण–बी.ए. माहेर–जयश्री जयराम भागवत.
कन्या :

१) **अंजली**–जन्म २२ ।६ ।१९७४ बिलासपूर येथे.
शिक्षण–इयत्ता ९ वीत.

२) **मंजरी**–जन्म १६ ।१० ।१९७५ बिलासपूर येथे.
शिक्षण–इयत्ता ८ वीत.

३४०/१२ **शिशिर गजानन**–जन्म १२ ।१२ ।१९७७ बिलासपूर येथे. शिक्षण–इयत्ता ५ वीत.

३४१/११ **नयन गंगाधर**–जन्म ३ ।११ ।१९४८ बिलासपूर येथे. शिक्षण–बी.ई. (इलेक्ट्रीकल).
व्यवसाय–नोकरी. बाल्को ॲल्युमिनियम कंपनी कोर्बा.
भार्या : **प्रिती**–माहेर–हेमा वसंत लिमये. जन्म १९ ।९ ।१९५५ अमरावती येथे. शिक्षण–एम्.ए.

३४२/१२ **निरंजन नयन**–जन्म ५ ।३ ।१९७७ अमरावती येथे. शिक्षण–इयत्ता ६ वी.

३४३/१२ **प्रणव नयन**–जन्म १५ ।१२ ।१९८२ अमरावती येथे. शिक्षण–इयत्ता १ ली.

३४४/११ **संजय गंगाधर**–जन्म २१ ।१२ ।१९५६ बिलासपूर येथे. शिक्षण–एम्.ए. नोकरी–मध्यप्रदेश इलेक्ट्रिसिटी बोर्ड (एम्.पी.इ.बी.). वास्तव्य–कोर्बा.
भार्या : **स्मृती**–जन्म ३ ।६ ।१९६० वर्धा येथे..
माहेर–अरुंधती प्रभाकर केळकर. शिक्षण–बी.कॉम.
कन्या : **स्नेहा**–जन्म १५ ।१२ ।८७ तिरोडा, चंद्रपूर येथे.

३४५/१२ **श्रीपाद संजय**–जन्म १९ ।७ ।१९८३.

३४६/११ **संतोष गंगाधर**–जन्म २ ।१२ ।१९५८ बिलासपूर येथे. नोकरी युको बँक. शिक्षण–एम्.कॉम.
वास्तव्य–चरोदा(भिलाई).
भार्या : **श्रुती**–जन्म ७ ।९ ।१९६२ बनारस येथे शिक्षण माहेरचे नाव–भार्गवी दत्तात्रय दीक्षित–महाडकर.

३४७/१२ **नारायण संतोष**–जन्म ३० ।४ ।१९८४ बनारस येथे.
३४८/१० **श्रीकृष्ण गणेश**–जन्म १९ ।५ ।१९२० पुणे येथे. व्यवसाय–इमारतीचे कॉन्ट्रॅक्टर, सध्या निवृत्त. शिक्षण–मॅट्रिक. वास्तव्य–६७ शंकरनगर नागपूर.
भार्या : **रमा**–जन्म (१९२६). माहेरचे नाव–कमल मोरेश्वर ओक. नागपूर.
कन्या :
१) **सुरेखा**– #
२) **स्नेहल**– #
३४९/११ **सारंग श्रीकृष्ण**–जन्म १ ।२ ।१९५४ नागपूर येथे. व्यवसाय–नोकरी–विदर्भ विकास महामंडळ, (डी.सी.व्हि.एल्.) नागपूर. शिक्षण–बी. कॉम्. वास्तव्य–निशिगंधा, ६७ शंकरनगर नागपूर–१०.
भार्या :**सायली**–जन्म ३१ ।१० ।५७ इंदोर येथे, शिक्षण–बी.ए. माहेरचे नाव–लता भास्कर लेले, डोंबिवली. पुत्र–**स्वप्नील**–जन्म ९ ।१० ।१९८४ डोंबिवली.
३५०/१० **निर्गुण गणेश**–जन्म २९ ।९ ।१९२४ भंडारा येथे. शिक्षण ३री. व्यवसाय–ब्लॉक मेकर. सध्या निवृत्त व प्रसाद ट्रस्ट भवन यांचा व्यवस्थापक, ब्रम्हचारी.
३५१/९ **प्रभाकर विश्वनाथ**–हे विश्वनाथ सखाराम यांचे दुसरे पुत्र. यांचेविषयी जास्त माहिती मिळाली नाही. यांना १पुत्र व दोन कन्या.
कन्या :
१) **चंद्रप्रभा**–हिचा विवाह नागपूरचे रेल्वेतील श्री. निवृत्ती जोशी यांचेशी झाला.
२) **सूर्यप्रभा**–हिचा विवाह बारामतीचे जोशी यांचेशी झाला.
३५२/१० **प्रभातशंकर प्रभाकर**–जन्म ११ ।५ ।१९३६ भंडारा येथे, शिक्षण–मॅट्रिक. नोकरी–केमिकल फॅक्टरीत. वास्तव्य–इंदूर.
भार्या : **प्रभा**–जन्म १३ ।९ ।४२ जबलपूर येथे. माहेर–मालती जोशी, जबलपूर.
कन्या : **रेणूका**–जन्म १६ ।११ ।१९७४. शिक्षण–१२ वीला आहे.
३५३/७ **बळवंत शिवराम**– #
३५४/८ **नारायण बळवंत**– #

मालगुंड घराणे क्र. २

मालगुंड–ठाणे–मुंबई.

१/१ **परशुराम**–मूळ पुरूष. यांची माहिती मिळाली नाही. त्यामुळे मूळ ग्रामोपाध्ये काशीनाथभट्ट घराण्याशी संबंध दाखविता आला नाही. म्हणून ही माहिती घराणे क्र २ म्हणून वेगळी दिली आहे.
२/२ **शिवराम परशुराम**– #
३/३ **गणेश(परशुराम)** # शिवराम
४/४ **रघुनाथ गणेश**–मृत्यू १८९८ वास्तव्य–मालगुंड
५/५ **शंकर रघुनाथ**–जन्म १८९६ मृत्यू ४.९.१९६३. शिक्षण–नॉनमॅट्रिक व्यवसाय–रिझर्व्ह बँकेची नोकरी. वास्तव्य–आंग्रेवाडी, विठ्ठल भाई पटेल रोड, मुंबई–४.
भार्या :**पार्वतीबाई**–मृत्यू २१ ।३ ।१९७८. माहेर–मथू. गंगाधर शेंड्ये, गणपतीपुळे. जि.रत्नागिरी
कन्या : **शकुंतला**–जन्म १९३३. मृत्यू वयाच्या ६ व्या वर्षी–इ.स.१९३९.
६/६ **गजानन शंकर**–जन्म २९ ।१ ।१९२६. G.P.O
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–~~एल्.आय्.सी.मधून~~ निवृत्त. वास्तव्य–१/८ पार्लेश्वर सोसायटी. विलेपार्ले(पूर्व).
भार्या : **प्रभावती**–माहेर–लीला नारायण वैद्य. उचगांव, तालुका दापोली.
कन्या :
१) **जयश्री**–जन्म २ ।१० ।१९५७. शिक्षण बी.एस्सी. एल्.एल्.बी.
२) **अलकनंदा**–जन्म ३० ।९ ।१९६६. शिक्षण–बी.कॉम.
७/६ **सदाशिव शंकर**–जन्म ३ ।८ ।१९२८ गणपतीपुळे येथे. शिक्षण–बी.ए;बी.टी;डी.पी.एड्. व्यवसाय–आगाशी येथे १९५३ ते १९८५ पर्यंत माध्यमिक शिक्षक. समाजकार्य, शिक्षण, खेळ, काव्य आणि कीर्तन यांची आवड. वास्तव्य–गोखलेवाडी, देवआळी, आगाशी, ता. वसई. जिल्हा–ठाणे.
भार्या : **श्यामला**–माहेर–लीला सदाशिव रानडे, पुणे.

घराणे क्रमांक २

मालगुंड–ठाणे–मुंबई



कन्या : **मंजिरी**–जन्म २१ ।१० ।१९६९.
शिक्षण–आर्किटेक्चरचा कोर्स.

८/७ **नंदकिशोर सदाशिव**–जन्म ९ ।११ ।१९५८.
शिक्षण–बी.टेक्. खरगपूर, आय. आय. टी. मधून एम्.एस्सी., स्पेस इंजिनीअरिंग. सिरॅक्युज युनिव्हर्सिटी, यू.एस्.ए.(अमेरिका). वास्तव्य–१९८० पासून शिक्षणासाठी अमेरिकेत वास्तव्य. आताही अमेरिकेतच स्थाईक. वास्तव्य–१०९, विन्सस् बोरो रोड, मिनू. इन्.वाय. १३११६. यू.एस्.ए.
भार्या :**रोहिणी**–माहेर–रोहिणी वसंत केळकर. नवी दिल्ली.
कन्या : **ललिता**–जन्म २५ ।११ ।१९८७.

९/७ **चंद्रशेखर सदाशिव**–जन्म ३१ ।५ ।१९६५.
शिक्षण–सिव्हिल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा चालू. वास्तव्य–आगाशी.

१०/६ **शिवराम शंकर**–जन्म ८ ।५ ।१९३१.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–रिझर्व्ह बँकेत नोकरी.
वास्तव्य–"अलंकार", रिझर्व्ह बँक कॉलनी नं. २. गावंड पथ, नौपाडा, ठाणे–२.
भार्या : **शैला**–माहेर–प्रभावती मोरेश्वर गोखले. इ/१६ ताराबाग, गिरगांव, मुंबई–४.
कन्या : **संगीता**–जन्म २३ ।१० ।१९६३.
शिक्षण–बी.ए. सासर–संगीता चंद्रकांत लिमये.
स्वानंद–३ अस्मिता बंगला–कल्याण.

११/७ **श्रीकांत शिवराम**–जन्म ५ ।९ ।१९५९.
शिक्षण–बी.कॉम. व्यवसाय–लार्सन ॲण्ड टुब्रो, मुंबई येथे नोकरी.

१२/७ **सुबोध शिवराम**–जन्म ६ ।११ ।१९६५.

शिक्षण—एम्. ए. व्यवसाय—न्यू इंडिया इन्श्युरन्स् कंपनीत नोकरी.
१३/६ **यशवंत शंकर**—जन्म ३० ।१० ।१९३५.
शिक्षण—बी.कॉम. एल् एल्.एम्. सॉलिसिटर्स.
व्यवसाय—सॉलिसिटर्सचा स्वतःचा व्यवसाय.
वास्तव्य—स्नेहधारा सोसायटी, सी—ब्लॉक, अंधेरी (पश्चिम).
भार्या : **निर्मला**—जन्म जुलै १९३८. शिक्षण—बी.एस्सी. व्यवसाय—रिझर्व्ह बँकेत नोकरी. माहेर—लीला भिडे, ब्राह्मणवाडी, माटुंगा(पूर्व), मुंबई.
कन्या : **अनघा**—जन्म १६ ।१ ।१९६४. शिक्षण—बी.ए. व्यवसाय—कॉर्पोरेशन बँकेत, ठाणे येथे नोकरी.
वास्तव्य—ठाकुर्ली. सासर—अनघा जयंत पराडकर.
१४/७ **अभय यशवंत**—जन्म १० ।५ ।१९६८ डोंबिवली (पूर्व). शिक्षण—**इंजिनिअरींगचा** डिप्लोमा पुणे येथे चालू आहे.
भार्या : **अपर्णा**—जन्म १६ ।९ ।१९७०.
शिक्षण—बी.कॉम. शेवटचे वर्ष चालू. खो खो—चॅंपियन युनिव्हर्सिटी कॅप्टन.
१५/६ **भालचंद्र शंकर**—जन्म १९३८. शिक्षण—७ वी. व्यवसाय—काही नाही. वास्तव्य—४०, प्रेरणा, टिळक नगर, गिरगांव, मुंबई—४. अविवाहित.
१६/६ **गंगाधर शंकर**—जन्म जानेवारी १९४६.
शिक्षण—बी.ई. सिव्हिल इंजिनीअरींग, फर्स्ट क्लास.
व्यवसाय—प्रोफेसर—वाशी कॉलेज मुंबई.
वास्तव्य—मुळे बिल्डींग, डी. एल्. वैद्य रोड, दादर, मुंबई—२८.
भार्या :**सुगंधा**—माहेर—सुधा नेने दादर, मुंबई—२८.
शिक्षण—बी.एस्सी. पॅथॉलॉजिस्ट. व्यवसाय—मुंबई महानगर पालिकेच्या हॉस्पिटलमधे भायखळा येथे नोकरी.
कन्या : **सुवर्णा**—जन्म१८ ।२ ।१९७५.
शिक्षण—एस्.एस्.सी. शिकत आहे.
१७/७**श्रीरंग गंगाधर**—जन्म २८ ।१० ।१९८०.
शिक्षण—इयत्ता ४थीत शिकत आहे.
१८/६ **जगन्नाथ शंकर**—जन्म ३० ।५ ।१९४८.
शिक्षण—एस्.एस्.सी. व्यवसाय—मुंबई महानगर पालिकेत, इंदिस गोदी जकात विभागात नोकरी.
वास्तव्य—४० प्रेरणा, वि. प. रोड, गिरगांव, मुंबई—४.
भार्या : **वसुधा**—माहेर—छाया वासुदेव रहाळकर. वसई, जि. ठाणे.
कन्या :
१) **सारंगी**—जन्म ३० ।८ ।१९७८ शिकत आहे.
२) **स्वप्ना**—जन्म १५ ।१ ।१९८० शिकत आहे.
१९/४ **चिंतामण गणेश**— *
कन्या :**अक्का**—मृत्यू १९७५. सासर—जोशी वरवडे, मालगुंड, ता. रत्नागिरी. जिल्हा—रत्नागिरी.
२०/९ **गणेश चिंतामण**—जन्म १९०७. मृत्यू १९७८.
शिक्षण—मराठी ७. व्यवसाय—शेती बागायती.
कन्या : **अंजली**–जन्म ३ ।१२ ।१९७०. १२ वीत आहे.
पुत्र–**प्रशांत**–जन्म २२ ।५ ।१९७२. इयत्ता ११ वीत शिकत आहे.
७/५ **शशिकांत वामन**–जन्म ४ ।८ ।१९४०. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–महाराष्ट्र बँकेत नोकरी. वास्तव्य–८ केदार प्लॉट नं. २१, गुंदेवली व्हिलेज रोड नं. ३, अंधेरी (पूर्व), मुंबई–६९.
भार्या : **शैलजा**–रिझर्व बँकेत नोकरी, मुंबई. माहेर–शोभना बळवंत रिसबूड. रा. आसूद, ता. दापोली. जि. रत्नागिरी.
अमित–जन्म ६ ।९ ।१९७४. इयत्ता १० वीत शिकत आहे.
८/५ **श्रीराम (अनिल) वामन**–जन्म १९४२. शिक्षण–एस्. एस्. सी. वास्तव्य–७१०/३ अनगोळ, बेळगांव.
९/४ **शंकर कृष्णा**–जन्म १ ।११ ।१८९७. मृत्यू १८ ।७ ।१९८०. व्यवसाय–प्राथमिक शिक्षक.
भार्या : **पार्वतीबाई**–माहेर–बनुताई विष्णू डोंगरे.
कन्या : **पुष्पा**–जन्म ऑक्टो. १९३८. सासर–जी. व्ही. जोशी, ५६ ब्राह्मणवाडी, माटुंगा, मुंबई–१९.
१०/५ **गोविंद शंकर**–जन्म १ ।७ ।१९३२. शिक्षण–मॅट्रिक व कंपाऊडरचा कोर्स पूर्ण. व्यवसाय–सेंट्रल गव्हर्नमेंट हेल्थ स्कीम (सी. जी. एच्. एस्.) ऑफीस, मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–दीक्षित चाळ, मांडा, टिटवाळा स्टेशनजवळ, ता. कल्याण, जि. ठाणे.
भार्या : **सुलभा**–माहेर–चंद्रकला कृष्णाजी डोंगरे. रा. आजरा, जि. कोल्हापूर.
कन्या : **सुनिता**– ६ ।६ ।१९६२. सासर–सुजाता भरत आपटे. आनंदी निवास, रानडेवाडा, गांधी चौक, कल्याण.
११/५ **मधुकर शंकर**– #
कन्या :
१) **उषा**–सासर–सोमण.
२) **मनिषा**–सासर–मराठे.
३) **मंगला**–अविवाहित.
१२/६ **महेश मधुकर**–व्यवसाय–फार्मासिस्ट सेन्ट्रल रेल्वे दवाखाना, पुणे.
१३/५ **रामचंद्र शंकर**–व्यवसाय–प्रायमरी हेल्थ सेंटर, दत्तवाड, ता. शिरोळ, जिल्हा–कोल्हापूर.
कन्या :
१) **राजश्री**– #
२) **लता**– #
१४/६ **रमेश रामचंद्र**– #
१५/४ **केशव कृष्णा**–अविवाहित.
१६/४ **गणेश कृष्णा**– #
कन्या : **सुधा**–सासर–कर्वे.
१७/५ **चिंतामणि गणेश**–वास्तव्य–गायकवाड कॉलनी, मरगुबाईचे देऊळ, पांचगाव, जि. कोल्हापूर.
१८/४ **सीताराम कृष्णा**–व्यवसाय–शेती. अविवाहित.
१९/४ **गंगाधर कृष्णा**–जन्म १९०५. नोकरी निमित्त

गुजराथमध्ये आले. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—पोष्ट खात्यात १९२८-१९६८ नोकरी. वास्तव्य—४/अ/७ एलिल ब्रिज म्युनिसीपल स्टाफ क्वार्टर्स, लाल बंगल्याजवळ, अहमदाबाद.
भार्या : **कमलाबाई**–माहेर—सुंदर कृष्णराव परांजपे. मृत २१ ।२ ।१९८३.
कन्या :
१) **शांता**–सासर—पेंडसे.
२) **कुसुम**–सासर—भावे.
२०/५ **यशवंत गंगाधर**–व्यवसाय—अहमदाबाद म्युनिसिपालिटीत हेल्थ सुपरवायझर. वास्तव्य—श्रीकृष्ण सदन, जयंत पार्क सोसा. मणिनगर, अहमदाबाद—८ किंवा ४/अ/७ म्युनिसिपल स्टाफक्वार्टर्स लाल बंगल्याजवळ, अहमदाबाद.
भार्या : **मंगला**–माहेर—छाया कृष्णराव पुरोहित. मोहरि. बुद्रुक, पोष्ट—हतवे, ता. भोर, जि. पुणे.
कन्या :
१) **स्मिता**–जन्म १९७१.
२) **भावना**–जन्म १९७३.
३) **सीमा**–जन्म १९७८.
४) **राजश्री**–जन्म १९८०.
पुत्र भालचंद्र–जन्म १९८१.
२१/५ **विश्वनाथ गंगाधर**–वास्तव्य—अहमदाबाद.
भार्या : **तृप्ती**–माहेर—कुंदा राजाराम कुलकर्णी. रा. अकोळ, जि. बेळगांव.
कन्या :
१) **संध्या**–इतर माहिती नाही.
२) **सीमा**–इतर माहिती नाही.
पुत्र—**आरक**–इतर माहिती नाही.
२२/४ **श्रीपाद कृष्णा**–अविवाहित. इतर माहिती नाही.

कुर्धे खोत घराणे क्रमांक ३

कुर्धे–यवत–मुंबई–पुणे–बडोदे

१/१ **महादेव**–हा या घराण्याचा मूळ पूरुष. कुर्धे येथील खोत घराण्यापैकी. या गावी अभ्यंकर कुटुंबाकडे पुर्वी खोत म्हणून काही वतनदारी असे. आजही त्या गावी अभ्यंकर—खोत म्हणून ओळखले जाणारे कुटुंब रहात आहे. हिस्सेरशीने वंश परंपरेच्या मिळकतीचे वाटप व खोत म्हणून येणाऱ्या मिळकतीत पुढे भाग पडत गेल्याने किंवा अन्य काही कारणाने इतर घराण्यांतील कुटुंबाप्रमाणेच अभ्यंकर खोतांपैकी कुणीतरी स्वतंत्र कमाई करण्यासाठी कुलाबा जिल्ह्यात (हल्लीचा रायगड) वसाहत करण्यास आले. हे बहुत करून नारायण महादेव हे हुमगा व वैजनाथ, तालुका कर्जत, जिल्हा कुलाबा येथे आले असावे. तेथे कुळ कायदा येईपर्यंत भातशेतीचे उत्पन्न दरवर्षी आणि जंगल तोडीचे उत्पन्न काही वर्षांनी, आजी म्हणजे त्र्यंबक नारायण यांची पत्नी आणीत असे असें केशव कृष्णाजी यांनी 'अशी ही जीवनयात्रा' या पुस्तकात म्हटले आहे. त्यानंतरही तेथील रहिवाशी श्री. मेहेंदळे वसुली करून भात किंवा काही रोकड रक्कम पाठवित असत. कुलाबा जिल्ह्यातून श्री. बाळाजी विश्वनाथ भट जंजिऱ्याच्या नबाबाच्या छळामुळे बाहेर पडले व पुणे येथे पेशवाई (मराठी राज्य) स्थापन करून राहिले. पेशव्यांच्या काळात त्या घराण्यातील पूर्वज पुणे येथे सदाशिव पेठेत (आताच्या लक्ष्मीरोडवर) बरीच मोठी जागा घेऊन राहिले होते. त्र्यंबक नारायण यांना पेशवाईत नोकरी केल्याचे पेन्शन होते. आणि बंधू गोपाळ नारायण हे फौजदार होते. त्यावेळी चित्रशाळेच्या पिछाडीस बरीच मोठी जागा, विहीर व घोड्यांची पागा वगैरे सर्व होते. नंतर ती जागा विकली गेली व काही वर्षांनी काही भाग अभ्यंकरांकडे परत आला.
२/२ **हरि महादेव**– #
३/३ **नारायण हरि**–कुर्धे येथे भिक्षुक होते. इतर माहिती नाही.
४/४ **त्रिंबक नारायण**–हे त्यांचे तीन बंधू पुण्यास पेशव्याच्या काळात सदाशिव पेठेत आत्ताच्या लक्ष्मीरोडवर बरीच मोठी जागा घेऊन सुस्थिर होऊन संपन्न स्थितीत राहिले असावेत. ते पेशवाईत अधिकारी म्हणून नोकरीस होते. व त्यांना पेशवाईत नोकरी केल्याचे पेन्शन मिळत होते. हे इ. स. १८७० चे सुमारास पुणे येथे मृत्यू पावले.
भार्या : **गिरजा**–माहेर—नेरळ येथील गोखले यांची

कुर्धे खोत घराणे क्र. ३
कुर्धे–यवत–मुंबई–पुणे–बडोदे



कन्या, आऊताई, मृत्यू शके १८४७—वैकुंठ चतुर्दशी यवत येथे.

पुत्र—(२) १) हरि, २) कृष्णाजी. पैंकी मोठे हरि त्रिंबक लहानपणीच मृत.

५/५ **कृष्णाजी त्रिंबक**–हे विद्याभ्यासासाठी मुंबईस अनंत ऋषीच्या वाडीत त्रिंबकशास्त्री घारपुरे यांचेकडे इंग्रजी शिक्षणाकरीता जाऊन राहिले. इ. स. १८९८ चे सुमारास ट्रॅफिक खात्याच्या स्टेशनमास्तरांचा अगदी पहिला संप झाला. त्यावेळी रेल्वेतील नोकरी सोडून हे आपली आई, पत्नी आणि मुले श्री. भास्कर गणेश साठे (मामेसासरे) यांच्याकडे यवत येथे येवून राहिले. त्यांचे आग्रहावरून तेथें शेतजमीन विकत घेऊन वास्तव्य केले.

भार्या : **आनंदीबाई**–मृत्यू १९४२ (शके १८६५ वैशाख शुद्ध द्वादशी) वयाच्या ७३ व्या वर्षी. माहेर—दुर्गा कृष्ण गोडसे, राहणार उकसाण, ता. मावळ, जिल्हा—पुणे.

कन्या : ४, पुत्र : ८.

कन्या : १) **काशी**–जन्म १९०४. मृत जून १९३५ (ज्येष्ठ शु. १५ शके १८५८). सासर— सरस्वतीबाई नरहर बेहेरे.

२) **यमुना**–जन्म १९०९. सासर—सरस्वतीबाई विनायक

कुर्धे खोत घराणे क्र. ३
कुर्धे–यवत–मुंबई–पुणे–बडोदे





श्रीमती मंगला गोपाळ, सौ. शुभांगी दत्तात्रय,
श्रीमती पार्वतीबाई महादेव, सौ. अंजली विजय

करमरकर. ५१ बी, संध्यादीप, परशुराम नगर, बडोदे.

३) **गंगा**–जन्म १९११. सासर–गंगूबाई गोविंद जोशी. मृत इ. स. १९२६.

४) **मनूबाई**–जन्म १९२०. सासर–शोभना भास्कर लिमये, नागपूर.

पुत्र–१) **गणपति कृष्णाजी**–लहानपणीच मृत्यू १९२०.

२) **पांडुरंग कृष्णाजी**–लहानपणीच मृत्यू १९१७.

६/६ **महादेव कृष्णाजी**–जन्म १८९५. मृत्यू १९६४. व्यवसाय–यवत येथे शेती.

भार्या : **पार्वतीबाई**–माहेर–पार्वतीबाई गोविंद धामणकर. वैजनाथ, जि. रायगड.

कन्या :

१) **सुमन**–जन्म ३ ।७ ।१९३३. सासर–सुलभा गोपाळ सोमण, लोणावळा.

२) **विमल**–जन्म १८ ।२ ।१९३८. सासर–विद्या पद्माकर जोशी, सासवड (पुणे).

७/७ **गोपाळ (दादासाहेब) महादेव**–जन्म १९२३. मृत्यू १९८१. शिक्षण– बी. ए. यांचे मामा श्री. डी. जी.



(मागील ओळ) कै. श्री. गोपाळ महादेव, कै. श्री. महादेव कृष्णाजी
श्रीमती पार्वतीबाई महादेव, श्री. दत्तात्रय महादेव
(पुढील ओळ) सौ. विमल, श्री. विजय महादेव, सौ. सुमन

धामणकर यांच्या प्रेरणेने आणि मामेभाऊ एम्. डी. धामणकर यांच्या महत्त्वपूर्ण सक्रीय पाठिंब्याने 'हायको' कंपनीची निर्मिती केली व त्यांतील अत्यंत काळजीपूर्वक जोपासलेल्या संशोधन आणि विकास खात्याने १९६० ते १९८० या कालावधीत खूप प्रगती केली. अतिशय मेहनतीने, तंत्रज्ञान आणि उद्योग या क्षेत्राचा मागोवा घेत पुढे जाण्याची महत्त्वाकांक्षी वृत्ती, दूरदृष्टी आणि त्याचबरोबर सामाजिक बांधिलकीची जाणीव, सार्वजनिक कल्याणाविषयी आस्था, दिलदार व दानशूर वृत्ती यामुळे खूप लोकप्रिय व प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व झाले.

भार्या : **मंगला**–जन्म १५ ।४ ।१९२८. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड. शिक्षण– व्हर्न्याक्यूनल फायनल. माहेर–गणेश कृष्ण कर्वे, यांची कन्या. अतिशय कर्तबगार, दानशूर व हायको कंपनीच्या व्यवस्थापनात डायरेक्टर. प्रवासाची आवड. पतीबरोबर ५ वेळा व त्यानंतर स्वतंत्रपणे ४ वेळा परदेशगमन केले. १९८२ मध्ये कैलास मानस यात्रा केली. भारत सरकार मिनिस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्सतर्फे १९८१ पासून ही यात्रा सुरू झाली. त्यातील १९८२ च्या ८ व्या बॅचमध्ये यांचा सहभाग होता. त्याशिवाय हिमालयातील चारही धाम यात्रा केल्या आहेत. वास्तव्य–७७१ पंडित सातवळेकर मार्ग, माहीम, मुंबई–१६.

८/७ **दत्तात्रय महादेव**–जन्म ३० ।९ ।१९३६. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–इमुलसोल प्रा. लि. हा केमिकल्सचा स्वतंत्र व्यवसाय. वास्तव्य–१६ गुलमोहर सोसायटी, माहीम, मुंबई-१६.

भार्या : **शुभांगी**–जन्म ८ ।४ ।१९४०. माहेर–कुंदा त्रिंबक गुप्ते. रा. दादर, मुंबई.

९/८ **नितीन दत्तात्रय**–जन्म ३० ।५ ।१९६१. शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–स्वतःचा.

भार्या : **निशिगंधा**–जन्म २० ।११ ।१९६३. माहेर–अलका अरविंद पटवर्धन.

कन्या :**केतकी (पूजा)** –जन्म १५ ।१२ ।१९८७.

१०/८ **अविनाश दत्तात्रय**–जन्म ६ ।१२ ।१९६५. शिक्षण–बी. एस्. सी.

११/७ **विजय महादेव**–जन्म १२ ।११ ।१९४४. शिक्षण–बी. एस्. सी., बी. एस्. सी. (टेक). व्यवसाय–'हायको' प्रॉडक्टस् लि. मध्ये एक्झेक्युटीव्ह डायरेक्टर. वास्तव्य–२० युगप्रभात, शितलादेवी मंदिर मार्ग, माहीम, मुंबई–१६.

भार्या : **अंजली**–बी. ए. जन्म ४ ।७ ।१९४५. माहेर–नीला विश्वनाथ गोडसे.

कन्या : **अनघा**–जन्म १८ ।१२ ।१९७०. शिक्षण–ही १९८६ मध्ये शालांत परीक्षेत ९ व्या क्रमांकाने उत्तीर्ण. एफ्. वाय. बी. कॉम्. ला शिकत आहे.

१२/८ **संदीप विजय**–जन्म १३ ।४ ।१९७५. शिक्षण–१० वीत शिकत आहे.

१३/६ **जगन्नाथ कृष्णाजी**–जन्म १८९८. मृत्यू २१ ।४ ।१९७९ (पुणे). शिक्षण–बी. ए. (इंग्लिश) व्यवसाय–गव्हर्न्मेंट प्रिंटींग प्रेस, नागपूर येथे मॅनेजर म्हणून नोकरी. निवृत्त झाल्यावर पुणे येथे. वास्तव्य–१०४ मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे–९.

भार्या : **इंदिराबाई**–मृत १९७१. माहेर–तारा श्रीपाद किल्लेदार, अरणगांव, मंगळवेढे, ता. पंढरपूर. नाथ संप्रदायाच्या व धार्मिक वृत्तीच्या होत्या. कन्या ४, पुत्र २. कन्या :

१) **लीला**–सासर–लीला अच्युत ओगले, कृष्णाई, १९ गरुड कॉलनी, देवपूर, धुळे.

२) **शकुंतला**–सासर–सुलभा श्रीकांत नामजोशी. २१६९, सदाशिव पेठ, पुणे–३०.

३) **प्रमिला**–सासर–प्रतिभा मधुकर वैद्य. पी. एल्. ६ ।१५ ।०–१ सिडको, न्यू पनवेल, सेक्टर-९७, पिन. ४१०२१७.

४) **सुनिला**–सासर–वसुधा वसंत गणपुले. गुरूप्रसाद, २४/२५९ प्राधीकरण, निगडी, पुणे ४४.
१४/७ **दिनकर जगन्नाथ**–जन्म १० ।७ ।१९३७ नागपूर. शिक्षण–एस्. एस्. सी., जी. सी. डी. व्यवसाय—बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी, चिंचवड. वास्तव्य–पारस, तानाजीनगर, चिंचवड, पुणे.
भार्या : **अलका**–माहेर–अलका भालचंद्र घोलप, रा. नाशिक.
१५/८ **सुबोध दिनकर**–जन्म ४ ।२ ।१९८५. शिक्षण–ज्युनि. के. जी.
१६/७ **मनोहर जगन्नाथ**–जन्म १९४४. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय—कंत्राटदार. वास्तव्य–३ मित्र मंडळ सोसायटी, पर्वती, पुणे–९.
भार्या : **कल्याणी**–माहेर–अलका नगरकर, पुणे.
कन्या : **राधिका**–
१७/६ **केशव कृष्णाजी**–जन्म २३ ।४ ।१९०१. (वैशाख शुद्ध पंचमी शके १८२३) मृत्यू १२ ।१ ।१९७४. शिक्षण–नेरळ येथे मराठी. नंतर इंदूर येथे मॅट्रिक पर्यंत शिक्षण झाले. व्यवसाय—प्रथम बी. बी. सी. आय. रेल्वेत तिकीट इन्स्पेक्टरची नोकरी. नंतर लोखंड व बिल्डींग मटेरियलचा व्यवसाय, बडोदे येथे व नंतर मुंबई येथे.
भार्या : **सुशीलाबाई**–मृत–१९८०. माहेर–मित्रविंदा भिकाजी रानडे, बबीना (झांशी). कन्या ३, पुत्र १.
कन्या :
१) **शशिकला**–सुरत येथे. सासर–सुषमा नारायण जोशी, पावस.
२) **मिनाक्षी**–जन्म बडोदे येथे. सासर–नीला दत्तात्रय जोशी. वास्तव्य–बधवार पार्क, रेल्वे कॉलनी, कुलाबा, मुंबई- ४६.
३) **उषा**–जन्म १९४६. मृत्यू १९८६, पुणे येथे. अत्यंत हुशार बुद्धिमान. शिक्षण–बी. ई. (इलेक्ट्रिकल) १९६७ मध्ये काही काळ परदेशी वास्तव्य होते. सासर–उषा श्रीनिवासन् कृष्णस्वामी, पुणे.
१८/७ **अनंत केशव**–जन्म २४ ।४ ।१९४२, बलसाड (गुजरात) येथे. शिक्षण–डी. एम्. ई. व्यवसाय–लोखंड, सिमेंट व इतर बिल्डींग मटेरिअल्सचा व्यापार मुंबई, बडोदे व पुणे येथील इतर बंधूंच्या बरोबर भागीदारीत. वास्तव्य–१३०४ ।१ ।५ शुक्रवार पेठ, ढमढेरे बाग, पुणे–२.
भार्या : **वृंदा**–जन्म २६ ।८ ।१९४४. शिक्षण–बी. कॉम्. माहेर–सुधा मोरेश्वर बेडेकर, मिरज.
कन्या : **शुभांगी**–जन्म ५ ।४ ।१९७०. शिक्षण–टी. वाय. बी. कॉम्. शिकत आहे.
१९/८ **मकरंद अनंत**–जन्म २४ ।१० ।१९६६. शिक्षण–बी. ई. (कॉम्प्युटर सायन्स), डी.ई.ई.
२०/६ **गोविंद कृष्णाजी**–जन्म २५ जून १९०३. मृत्यू १९८०. शिक्षण–इंटर सायन्स. व्यवसाय–बडोदे येथे १९२६ पासून 'विनोद अँड अभ्यंकर' या नावे बिल्डींग मटेरिअल्सचा धंदा सुरू केला. एक अत्यंत धडाडीचे आणि कर्तबगार व्यक्तिमत्व. सर्व अभ्यंकर कुटुंबियांचे उत्कर्षास कारणीभूत. सामाजिक कार्याची आवड. त्यामुळे ब्राह्मण सभा, बडोदे याचे अध्यक्षपद भूषविले. बडोदा एज्यु. सोसायटी प्रणित महाराणी चिमणाबाई हायस्कूल याचेही अध्यक्षपदी होते.
भार्या : १) **रुक्मिणी (वेणू)** –जन्म १९१४. मृत–१९४२. माहेर–वेणूताई सदाशिव घाणेकर, नागपूर. २) **निर्मलाबाई**–जन्म १९२५. माहेर–वत्सला चिंतामण आगाशे, पुणे.
प्रथम पत्नीच्या कन्या :
१) **इंदू**–जन्म १० ।११ ।१९३०. सासर–सुधा वासुदेव पेंडसे. ११/२ मेघाली अपार्ट., दामले पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे ४.
२) **सिंधू**–जन्म ३० ।९ ।१९३२. सासर–सुधा अनंत कान्हेरे. E २ ।१३५, अरोरा कॉलनी, महावीर नगर, भोपाळ.
३) **सुलोचना**–जन्म २१ ।१ ।१९३६. सासर–विजया वासुदेव घाणेकर, भिडे वाडा, शेवडे बोळ, १४३९, शुक्रवार पेठ, पुणे.
४) **मालती**–जन्म २७ ।११ ।१९३८. सासर–मालती यशवंत बर्वे, रामनगर, वर्धा (महाराष्ट्र).
द्वितीय भार्येची मुले–कन्या :
१) **मोहिनी**–जन्म ७ ।११ ।१९४४. शिक्षण–एफ्. वाय. बी. ए. सासर–मोहिनी अनंत आपटे, रामेश्वर नगर, दिल्ली.
२) **संजिवनी**–जन्म ९ ।८ ।१९४६. शिक्षण–एफ्. वाय.

बी. ए. सासर–संजीवनी सुधाकर सोमण. ५ तपोधन सोसायटी, गल्ली नं. १, मुकुंदनगर, पुणे–९.
२१/७ **परशुराम गोविंद**–जन्म १४ ।५ ।१९५०.
शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय– 'विनोद अँड अभ्यंकर' बडोदे, जि.के. अभ्यंकर अँड कं. बडोदे, मेसर्स श्रीलक्ष्मी ट्रेडर्स बडोदे, 'जि. के. अभ्यंकर अँड सन्स पुणे, अभ्यंकर ब्रदर्स. मुबंई, मेसर्स विठ्ठल पुरुषोत्तम आणि क. बडोदे, यामध्ये भागिदार असून सिमेंट, लोखंड इ. बिल्ढींग मटेरियलचे व सॅनेटरीवेअरचे व्यापारी.
वास्तव्य–अभ्यंकर वाडा, प्रताप रोड, रावपुरा, बडोदा (गुजराथ) ३९०००१.
भार्या : **वैजयंती**–शिक्षण–बी. ए. माहेर–वैजयंती श्रीधर म्हसकर, नंदलालपुरा, इंदूर. पुत्र २.
२२/८ **अनुराग परशुराम**–जन्म १५ ।७ ।१९७६.
शिकत आहे.
२३/८ **केदार परशुराम**–जन्म २२ ।११ ।१९७८.
शिकत आहे.
२४/७ **पद्माकर गोविंद**–जन्म ७ ।१२ ।१९५३.
शिक्षण–बी. ए. वास्तव्य–अभ्यंकरवाडा, प्रतापरोड, रावपुरा, बडोदे. व्यवसाय–परशुराम व पद्माकर–'विनोद अँड अभ्यंकर' बडोदे, जि.के. अभ्यंकर अँड कं. बडोदे, मेर्सस श्रीलक्ष्मी ट्रेडर्स बडोदे, 'जि.के. अभ्यंकर अँड सन्स पुणे, अभ्यंकर ब्रदर्स. मुंबई, मेसर्स विठ्ठल पुरुषोत्तम आणि कं बडोदे यामध्ये भागिदार असून सिमेंट, लोखंड इ. बिल्डींग मटेरिअलचे व सॅनेटरीवेअरचे व्यापारी.
भार्या : **उज्वला**–शिक्षण– बी. ए. माहेर–उज्वल शरद मेहेंदळे, सुंदरनगर (मालाड) मुंबई.
कन्या :
१) **शितल**–जन्म २७ ।११ ।१९७९ इ. ४ थीत शिकत आहे.
२) **गौरी (रुपाली)** –जन्म १९ ।७ ।१९८४. ज्युनिअर के. जी. मध्ये.
२५/६ **विष्णू कृष्णाजी**–जन्म ६ ।७ ।१९०७.
मृत्यू–१४ ।७ ।१९७९, मुंबई. शिक्षण–मॅट्रिक.
व्यवसाय—प्रथम बडोदे नंतर मुंबई. लोखंड, सिमेंट इ. बिल्डींग मटेरिअलचा व्यापार. वास्तव्य– गोगटे वाडी, सेनापती बापट मार्ग, माहीम, मुंबई–१६.
भार्या : **लक्ष्मीबाई**–मृत्यू १९८६. माहेर–विमल गोविंद लेले, बडोदे. कन्या ३, पुत्र ३.
कन्या :
१) **नलिनी**–जन्म १९३९. सासर–सुनीति माधव भिडे.
२) **सुधा**–जन्म १९४१. गोगटेवाडी, माहीम, मुंबई. सासर–वसुधा विश्वनाथ साने. गोगटेवाडी, माहीम, मुंबई–४६.
३) **ज्योत्स्ना**–जन्म १९४३. सासर–ज्योत्स्ना प्रकाश ताम्हनकर, हिंदू कॉलनी, दादर (मुंबई).
२६/७ **गुणवंत विष्णू**–जन्म ४ ।५ ।१९३७, बडोदे.
शिक्षण–इंटर कॉमर्स. शास्त्रीय संगीताची आवड.
व्यवसाय—बांधकामाकरता लागणाऱ्या लोखंडाचा व्यवसाय. लोखंड बाजार, मुंबई येथे करणारे एकमेव महाराष्ट्रीयन. वास्तव्य–ए/२६ नवरत्न सोसा., मोगल लेन, माहीम.
भार्या : **वसुमती**–माहेर–वसुमती महादेव वैद्य, ठाणे.
२७/८ **दिलीप गुणवंत**–जन्म १६ ।१० ।१९६३.
शिक्षण–इंटर सायन्स पास. व्यवसाय–मर्चंट नेव्ही मध्ये नोकरी.
२८/८ **आशुतोष गुणवंत**–जन्म १ ।११ ।१९६६.
शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–अभ्यंकर ब्रदर्स मध्ये भागीदार, मुंबई.
२९/७ **जयंत विष्णू**–जन्म २ ।२ ।१९४६. शिक्षण–डी. सी. ई. व्यवसाय—लोखंड व इमारती सामानाचा व्यापार. वास्तव्य–५६० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, अभ्यंकर बिल्डींग, पुणे.
भार्या : **अरुंधती**–शिक्षण– बी. ए. माहेर–शोभा गंगाधर देवल, मिरज.
३०/८ **गिरीश जयंत**–जन्म ७ ।७ ।१९७४.
शिक्षण–१० वीत शिकत आहे.
३१/७ **अरुण विष्णू**–जन्म १९४९. शिक्षण–इंटर कॉमर्स. व्यवसाय—पुणे येथे लोखंडी बिल्डींग सॅनिटरीच्या व्यापारात भागिदारी. वास्तव्य–पुणे.
भार्या : **सुनिती**–माहेर–विभावरी रामचंद्र दामले. रहीमतपूर, जि. सातारा.
३२/६ **गणपती कृष्णाजी**–लहानपणी मृत्यू. स. १९२०.
३३/६ **पांडुरंग कृष्णाजी**–लहानपणी मृत्यू. स. १९१७.
३४/६ **गंगाधर कृष्णाजी**–जन्म ९ ।१२ ।१९१८.

कुर्धे घराणे क्र.४

कुर्धे–जांभुळपाडा--उद्धर–रामेश्वर--पाली घराणे



यवत, ता. बारामती येथे. शिक्षण—एफ्. वाय. पर्यंत. कष्टाळू व परोपकारी वृत्ती. व्यवसाय—१९३५ पासून लोखंड व इतर बिल्डींग मटेरिअल्सचे दुकान, बडोदे येथे. दोनवेळा युरोप व अमेरिकेत प्रवास. शिवाय बिल्डर्स प्रॉपर्टी डेव्हलपर्स आणि कॉंट्रॅक्टर्स चा बडोदे येथे व्यवसाय. वास्तव्य—६ परशुराम नगर, सयाजी गंज, बडोदे— ४. श्री. परशुराम बळवंत गणपुले यांच्या सक्रिय व सर्वतोपरी पाठींब्याने पेढी नावारुपास आली आहे.

भार्या : **रत्नप्रभा**–माहेर—प्रभा वासुदेव केळकर, कऱ्हाड. कन्या २.

कन्या :

१) **लता**–जन्म २३ ।१ ।१९४८. सासर–सीमा सुभाष गांगल. पर्कर्सबर्ग, (वेस्ट व्हर्जिनिया) अमेरिका.
२) **रोहिणी**–जन्म २७ ।१० ।१९५०.
सासर–राजलक्ष्मी विजयसिंह पटवर्धन, जुहू–पार्ले स्किम, मुंबई.
३५/७ **अशोक गंगाधर**–जन्म २० ।८ ।१९४६.
शिक्षण–बी. ई. (सीव्हिल). व्यवसाय––१९६७ पासून इंजिनिअर, बिल्डींग कॉंट्रॅक्टर्स म्हणून प्रथम पुणे येथे ५ वर्षे व नंतर बडोदे येथे अभ्यंकर कन्स्ट्रक्शन्स, अभ्यंकर स्टील फॅब्रिकेटर्स आणि रत्नदीप कार्पोरेशन्स या तीन कंपन्यांत भागीदार. शिवाय बिल्डर्स व पॉपर्टी डेव्हलपर्स म्हणून बडोदे येथे प्रख्यात.
भार्या : **दिपाली**–माहेर–विमल चिंतामणराव पिंपळपुरे, सागर, मध्यप्रदेश.
३६/८ **जयदीप अशोक**–जन्म ९ ।९ ।१९७२
शिक्षण–१० वीत.
३७/५ **जनार्दन त्रिंबक**–लहानपणी मृत.

घराणे क्र.४

कुर्धे–जांभुळपाडा–उध्दर–रामेश्वर–पाली घराणे.

हे घराणे मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील कुर्धे या गावचे. तेथून पूर्वज रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा या खेडेगावी राहण्यास आले. तिथे काही वर्षे वास्तव्य झाल्यानंतर गणेश अभ्यंकर हे सुधागड पाली जवळील 'उध्दर-रामेश्वर' या तीर्थक्षेत्री स्थायिक झाले. तिथेच तीन पिढ्या राहिले. वासुदेव रंगनाथ यांना चार मुलगे व १ कन्या होती. पैकी ३ पुत्र लहान वयातच मृत झाले. त्यामुळे मोरेश्वर वासुदेव यांना आजोळी पाली ता. सुधागड येथे ठेवले. तेव्हापासून त्यांचे वास्तव्य पालीसच आहे.

कुळधर्म–कुळाचार

या घराण्यातील व्यक्ति श्री. व्याडेश्वर व अंबेजोगाईची जोगेश्वरी ही कुलदैवते मानतात. तसेच जांभूळपाडा येथील श्री. वाघोबा उद्धर येथील श्री. रामेश्वर आणि पाली येथील अष्टविनायकांपैकी श्री. बल्लाळेश्वर यांनाही मानतात. या घराण्यात एक वर्षाआड बोडण असते.

१/१ **महादेव**– #
२/२ **गणेश महादेव**– #
३/३ **काशीनाथ गणेश**– #
४/४ **गणेश काशीनाथ**– #
५/५ **श्रीधर गणेश**– #
भार्या : **आऊबाई**–
६/५ **काशीनाथ गणेश**– #
भार्या : **गंगाबाई**–
७/५ **रंगनाथ गणेश**– #
भार्या : **रखमाबाई**–
कन्या :
१) **येसू**–सासर–जोशी, पाली.
२) **नमू**–सासर–शिदोरे, पाच्छापूर.
३) **वेणू**–सासर–जोशी, पाली.
८/६ **शंकर रंगनाथ**– #
भार्या : **पार्वती**–
९/६ **विष्णू रंगनाथ**–मृत्यू १९१७.
भार्या : **लक्ष्मी**–
१०/७ **गजानन विष्णू**–जन्म १९१०. मृत्यू १९८२.
भार्या : **विजया**–माहेर–केतकर.
कन्या :
१) **कुमुद**–जन्म ९ ।४ ।१९४६. सासर–जोशी, अहमदनगर.
२) **लतिका**–जन्म १९५२. सासर–कळके, बदलापूर.
११/६ **वासुदेव रंगनाथ**–मृत्यू १९७१.
भार्या : **सत्यभामा**–मृत्यू १९२६. माहेर–कृष्णाबाई गणेश भावे.
कन्या :**गंगूबाई**–मृत्यू. डिसें. १९८७. सासर–गंगूबाई अनंत भाटे, बोरवाडी.
१२/७ **मोरेश्वर वासुदेव**–जन्म ३१ ।५ ।१९१५. मृत्यू १६ ।५ ।१९८९. शिक्षण–व्ह. फा. पास, इंग्रजी ४ थी पास. व्यवसाय–सहकारी बँक मॅनेजर, सुधागड येथून रिटायर्ड. शिवाय शेती.

वास्तव्य–'मातृछाया' मधली आळी, मु. पो. पाली, ता. सुधागड, जि. रायगड, ४१० २०५.
भार्या : **सुशिला**–माहेर–सुभद्रा शंकर कानडे, करचुंडे.
कन्या :
१) **प्रतिभा**–जन्म १९४६. सासर–प्रतिभा मधूकर भावे, बदलापूर.
२) **मंगला**–जन्म १९४८. सासर–मंगला विनायक वैद्य, महाड.
१३/८ **श्रीपाद (आनंद) मोरेश्वर**–जन्म २० ।१ ।१९५१. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–रायगड जिल्हा मध्य. बँकेत शाखाधिकारी.
वास्तव्य–हनुमान आळी, पाली, ता. सुधागड.
भार्या : **वृंदा**–माहेर–मंगला श्रीधर जोशी, तळेगांव.
१४/९ **कौस्तुभ आनंद**–जन्म ३१ ।३ ।१९७८.
शिक्षण–५ वीत शिकत आहे.
१५/९ **पुष्कर आनंद**–जन्म १४ ।१ ।१९८४.
शिक्षण–बालवाडीत आहे.
१६/८ **दिलीप मोरेश्वर**–जन्म २५ ।२ ।१९५३.
शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–पाटबंधारे खाते, कोलाड, जि. रायगड. वास्तव्य–हनुमान आळी, पाली.
भार्या : **जयश्री**–माहेर–जयश्री श्रीराम कुलकर्णी, पुणे.
कन्या : **सायली**–जन्म ५ ।४ ।१९८८.
१७/९ **मानस दिलीप**–जन्म ३ ।२ ।१९८६.
१८/७ **केशव वासुदेव**–लहानपणी मृत.
१९/७ **दत्तात्रय वासुदेव**–लहानपणी मृत.
२०/७ **काशिनाथ वासुदेव**–लहानपणी मृत.

घराणे क्र. ५

वंशावळी १

कुर्धे – कान्होर – देवास – इंदूर – पुणे – मुंबई

या घराण्यातील मूळ पुरूष नारायण विठ्ठल हे रत्नागिरी जिल्ह्यातील पावस जवळील कुर्धे या गावाहून पहिल्या बाजीरावाबरोबर देशावर आले. नंतर ते १७०० ते १८७० या काळात कान्होर, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे राहिले. नंतर त्यांचे वंशज केशव मोरेश्वर व त्यांचे बंधू १८७० ते १९३० पर्यंत देवास येथे, १९३० ते १९५५ ग्वाल्हेर येथे, १९५५ नंतर पुणे, मुंबई, अमेरिका इ. ठिकाणी व्यवसाय, नोकरी निमित्त वास्तव्यास होते/आहेत.
१/१ **विठ्ठल**–हा ज्ञात मूळ पुरूष.
२/२ **नारायण विठ्ठल**–हे कोकणातून पहिल्या बाजीरावांबरोबर देशावर आले.
३/३ **हरि नारायण**– #
४/४ **नीळकंठ हरि**– #
५/५ **मोरेश्वर नीळकंठ**– #
६/६ **गोविंद मोरेश्वर**– #
७/७ **हरि गोविंद**– #
८/८ **गणेश हरि**–मृत्यू ४ ।२ ।१९७३, इंदूर. व्यवसाय–डेप्युटी रजिस्टार, मध्यभारत हायकोर्ट व सिव्हील जज्ज. वास्तव्य–इंदूर.
भार्या : **मालती**–माहेर–मधुमालती **गणेश** गोखले. पिता–डॉ. गोविंद बाबासाहेब गोखले, पाचोरा व नंतर, ३५१ शुक्रवार पेठ पुणे–२.
९/९ **गोविंद गणेश**–जन्म २१ ।११ ।१९४१, इंदूर. शिक्षण–इंटरमिजिएट सायन्स. नंतर इलेक्ट्रिकल इंजि. चा डिप्लोमा. व्यवसाय–३ ।५ ।६३ ते १० ।२ ।६४, धार (म. प्र) येथे इलेक्ट्रिसिटी बोर्डात नोकरी. १७ ।२ ।१९६४ पासून ऑर्डनन्स फॅक्टरी, भंडारा येथे असिस्टंट फोरमनच्या हुद्यावर नोकरी. ज्योतिषशास्त्र, अंक ज्योतिष, संगीत व काव्यलेखन इ. ची आवड. सामाजिक कार्यात गोडी. श्रीविवेकानंद ग्रंथालय, जवाहरनगरचे संस्थापक सभासद व माजी अध्यक्ष. वास्तव्य–क्वार्टर नं २४/४, जी. टाईप, जवाहरनगर, ऑर्डीनन्स फॅक्टरी, भंडारा.
भार्या : **नलिनी**–विवाह १२ ।५ ।१९६७. शिक्षण–बी. ए. माहेर–नलिनी विश्वनाथ कापरेकर, अमरावती.
कन्या :
प्रतिभा–जन्म ४ ।३ ।१९६८. शिक्षण–बी. एस्सी.
१०/१० **विनय गोविंद**–जन्म २८ ।४ ।१९७१, नागपूर. शिक्षण–सेंट्रल स्कूलमध्ये १२ वीत शिकत

कुर्थे घराणे क्र ५

वंशावळी क्र. १

कुर्थे–कान्होर–देवास–इंदूर–पुणे–मुंबई



आहे.

११/१० **अजय गोविंद**–जन्म ३ ।५ ।१९७६.
शिक्षण–सेंट्रल स्कूल, भंडारा येथे शिकत आहे.

१२/८ **मोरेश्वर हरि**–जन्म १४ ।१२ ।१९२६. मृत्यू २१ ।१२ ।१९८६, मुंबई.
भार्या : **रेखा**–माहेर—लक्ष्मी रघुनाथ फडके, जम्मू.

१३/९ **संजय मोरेश्वर**–जन्म २२ ।१२ ।१९६१.
शिक्षण—मेकॅनिकल इंजि. चा डिप्लोमा.
व्यवसाय—फॉमेक इंजिनिअरींग लिमिटेड, कांजूर, मुंबई

कुर्धे घराणे क्र ५
वंशावळी क्र. १
कुर्धे–कान्होर–देवास–इंदूर–पुणे–मुंबई.



येथे नोकरी. वास्तव्य–७५ ।२९ सोफिया झुबेर रोड, मुंबई. अविवाहीत.

१४/९ **अजय मोरेश्वर**–शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–गोरेगांव येथे अकौंटंट जनरलचे ऑफीसात नोकरी. वास्तव्य–७५/२९ सोफिया झुबेर रोड, मुंबई. अविवाहीत.

१५/६ **केशव मोरेश्वर**–जन्म १८५५. मृत्यू १९२७, इंदूर. हे वयाच्या २० व्या वर्षी म्हणजे १८७५ मध्ये भाऊबंदकीला कंटाळून कान्होर सोडून मध्य प्रदेशात, देवास संस्थानात आले. नंतर त्यांनी आपले वडील मोरेश्वर नीळकंठ व आपले बंधू यांना देवासला आणले. व्यवसाय–त्यांनी स्वतःची एक खाजगी प्राथमिक शाळा स्थापन करून चालविली होती. शिक्षकाचा व भिक्षुकीचा व्यवसाय करीत. देवास महाराज कृष्णाजीराव पवार, यांच्या सहाय्याने देवास येथे स्थायिक झाले. वास्तव्य–कृष्णपुरा, देवास.

भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–साने.

१६/७ **दामोदर केशव**–जन्म १८८९. मृत्यू १९६२. शिक्षण–बी. ए. (अलाहाबाद). व्यवसाय– होळकर संस्थानात शिक्षकाची नोकरी. वास्तव्य–इंदूर.

भार्या : **सारजाबाई**–माहेर–गंगू नारायण रहाळकर.

कन्या :

१) **यमू**–जन्म १९१७. शिक्षण–मॅट्रिक. सासर–पाटणकर, पुणे.

२) **कमल–जन्म** १९२२. शिक्षण–फायनल. सासर–कमल वामन ताम्हनकर, कोटा.

३) **लीला (भागिरथी)** –जन्म १९२६. शिक्षण–मॅट्रिक. सासर–लीला मधुकर फडके.

१७/८ **लक्ष्मण दामोदर**–जन्म १४ ।११ ।१९१४. शिक्षण–बी. एस्. सी; बी. टी. व्यवसाय– १५ ।११ ।१९६९ ला प्राचार्य म्हणून निवृत्त. वास्तव्य–८/२ गौतमपुरा नं १, मोदीका मकान, इंदूर.

भार्या : **निर्मला**–माहेर–वेणूताई गोविंदराव जोशी.

कन्या :

१) **मीनाक्षी**–जन्म १६ ।१० ।१९५६. शिक्षण–एम्. ए., बी. एड्. सासर–मीनाक्षी मकरंद भागवत, इंदूर.

२) **सुलभा–जन्म** १४ ।१२ ।१९६२. शिक्षण–एम्. ए., (सोशिओलॉजी) बी. एड. सासर–सुलभा सुनील काकीर्डे, इंदूर.

१८/९ **अनंत लक्ष्मण**–जन्म १४ ।१२ ।१९५१, खाचरौद, उज्जैन. शिक्षण–मास्टर ऑफ इंजिनिअरींग ही मेकॅनिकल इंजि. मधील पदवी, १९७५ मध्ये संपादन केली. व्यवसाय– हिंदुस्थान फर्टिलायझर कार्पो. लि. दुर्गापूर (प. बंगाल) येथे सिनिअर इंडस्ट्रियल इंजिनिअरच्या हुद्यावर नोकरी. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स ह्या संस्थेच्या मासिकांत दोन टेक्निकल पेपर १९७५ व १९७८ मध्ये प्रकाशित झाले. त्यापैकी एकाला रूडकी येथील अधिवेशनात पारितोषिक मिळाले. वास्तव्य–दुर्गापूर ७/३२/२ जि. बरद्वान, पश्चिम बंगाल.

भार्या : **मृदुला**–माहेर–शैलजा मुरलीधर पाटणकर. वास्तव्य–६९ समर्थनगर, पूर्व, नागपूर.

कन्या : **मनिषा**– २९ ।९ ।१९८४. शिक्षण–के. जी. मध्ये.

पुत्र निखील–जन्म ५ ।११ ।१९८१. शिक्षण–दुसऱ्या वर्गात शिकत आहे.

१९/८ **मधुसुदन दामोदर**–जन्म २१ ।९ ।१९१९, देवास. शिक्षण–एम्. एस्. सी., पीएच्. डी. व्यवसाय–१९४१ ते सप्टेंबर १९७७ पर्यंत शिक्षक, डेमॉन्स्ट्रेटर, व्याख्याता, प्रोफेसर व शेवटी ५ वर्षे मध्य प्रदेशातील महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम केले. यांच्या आजोबांपासून २ ।३ पिढ्या शिक्षकी पेशात होत्या. हे ४६ व्या वर्षी नोकरीत रजा घेऊन सागर विश्व विद्यालयात डॉक्टरेटसाठी (पीएच्. डी.) विद्यार्थी म्हणून राहिले. व फिजिक्समध्ये डॉक्टरेट संपादन केली. सूत कातून जानवी करणे, सुतारकाम व अध्यात्मिक वाचन करण्याची आवड. वास्तव्य–७७ पळशीकर कॉलनी, इंदूर (म. प्र).

भार्या : **सुमति**–माहेर–वेणू उर्फ सिंधू नारायण गोरे, ग्वाल्हेर.

कन्या :

१) **सुनिती**–जन्म २६ ।९ ।१९५१. शिक्षण–एम्. एस्सी. (मॅथ्स्). सासर–अरूंधती अशोक लोकरे. वास्तव्य–११६१ ।२ शिवाजी नगर, पुणे-४.

२) **श्रध्दा**– २४ ।७ ।१९५७. शिक्षण–एम्. एस्सी. बॉटनी, बी. एड्. सासर–श्रध्दा चंद्रकांत भावे.

वास्तव्य—१५ अ वृंदावन सोसायटी, ब्लॉक नं २३, ठाणे.
२०/९ **अविनाश मधुसूदन**–जन्म १४ ।१० ।१९४५, ग्वाल्हेर. शिक्षण—एम्. टेक्. (इलेक्ट्रॉनिक्स), १९६९. व्यवसाय—प्रथम टाटा इलेक्ट्रिकल कंपनी, मुंबई येथे नोकरी. नंतर १९८५ पासून पुणे येथे स्वतंत्र फॅक्टरी व व्यवसाय. बुध्दीबळ, ब्रिज, क्रिकेट व संगीताची आवड. अनेकवेळा व्यवसायानिमित्त युरोप, इ. परदेशात भ्रमण. वास्तव्य—बी—१३ इंद्रायणी, प्रभात रोड, १५ वी गल्ली, पुणे.
भार्या : **अल्पना**–जन्म १९४८. शिक्षण—एम्. एस्सी.(बॉटनी); बी. एड्. माहेर—छाया अनंत साने, आग्रा.
२१/१० **अभिजित् अविनाश**–जन्म ७ ।९ ।१९७२. शिक्षण चालू आहे.
२२/९ **केशव मधुसुदन**–जन्म २९ ।११ ।१९४७, इंदूर. शिक्षण—एम्. एस., पीएच्. डी. (एन्टोमोलॉजी). व्यवसाय—आय. सी. आय. लिमिटेडमध्ये प्रोजेक्ट इंजिनिअरची नोकरी. वास्तव्य— सी/३ तेजाल अपार्टमेंट, कल्याण सह. हौ. सोसायटी, अकोटा, बडोदे. नोकरीनिमित्त सध्या वास्तव्य—१४९, मॉंटीएथ रोड, एगमोर, मद्रास—८.
भार्या : **कमल**–माहेर—कमल कृष्णराव जोशी, बडोदे.
कन्या :
१) **प्राची**–जन्म १३ ।६ ।१९७८. शिकत आहे.
२) **दिप्ती**–जन्म ५ ।७ ।१९८३. शिकत आहे.
२३/९ **संतोष मधुसूदन**–जन्म २४ ।७ ।१९४९.
पुत्र **अनिकेत**– #
२४/९ **रवींद्र मधुसूदन**–जन्म २३ ।८ ।१९५३. शिक्षण—बी. ई. (मेकॉनिकल). व्यवसाय—स्प्रिंग वॉशर तयार करण्याचा. व्यवसाय इंदूर येथे आहे. वादविवाद करणेची आवड. वास्तव्य—७७, पळशीकर कॉलनी, इंदूर. (म. प्र).
भार्या : **मेदिनी**–माहेर—मेदिनी खांडेकर.
कन्या : **शिल्पा**–जन्म ७ ।४ ।१९८३. शिक्षण—इयत्ता पहिलीत शिकत आहे.
पुत्र **आदित्य**–जन्म १४ ।१२ ।१९८८.
२५/८ **कृष्णा दामोदर**–जन्म २१ ।६ ।१९२८. शिक्षण—एम्. एस्सी., पीएच्. डी. व्यवसाय—सेवानिवृत्त प्रोफेसर ऑफ ॲस्ट्रॉनॉमी. उस्मानिया युनि., हैद्राबाद.
२६/७ **विष्णू केशव**– #
भार्या : **आनंदीबाई**–माहेर—किशोरी वामन दातार. नाशिकचे दातारशास्त्री यांची कन्या.
२७/८ **पद्माकर विष्णू**–जन्म ५ ।७ ।१९३३, नाशिक. शिक्षण—बी. एस,एम्. एड्. दोन सुवर्णपदकांचे मानकरी. व्यवसाय—शासकीय शिक्षण खाते, म. प्र. येथे हेडमास्तर. स्वेच्छेने सेवानिवृत्त. पू. पू. नानामहाराजांची सेवा व कीर्तनसेवा यांची आवड. वास्तव्य—१५९ टिळक पथ, मल्हाराश्रमा समोर, इंदूर. (म. प्र).
भार्या : **स्मिता**–माहेर—रजनी केशव फणसे.
कन्या :
ज्योत्स्ना–जन्म ९ ।३ ।१९६१. शिक्षण—एम्. एस्. सी. सासर—ज्योत्स्ना जोशी, इंदूर.
२८/९ **विकास पद्माकर**–जन्म ७ ।११ ।१९६३. शिक्षण—बी. ए, बी. एड्. वास्तव्य—इंदूर.
२९/९ **प्रकाश पद्माकर**–जन्म १६ ।११ ।१९६४. शिक्षण—बी. एस्सी., ए. एम्. आय. ई. व्यवसाय—दिल्ली येथे नोकरी.
३०/७ **शंकर केशव**–जन्म ४ ।४ ।१९०४ **देवास**. मृत्यू २० ।११ ।१९८५, इंदूर. शिक्षण—इंदूर येथून बी. एस्सी. डिग्री. नंतर १९२७ ते २८ एम्. एस्सी. (मॅथ) ची डिग्री नागपूरच्या सायन्स कॉलेजामधून संपादन केली व सुवर्णपदक मिळविले. व्यवसाय—बेतूल, चांदा, वर्धा, जबलपूर येथे प्रथम शिक्षक होते नंतर १९२८ ते १९६० पर्यंत लेक्चरर. प्रोफेसर व शेवटी प्रिन्सिपॉल (१९५४ ते १९५९) म्हणून सरकारी कॉलेज, ग्वाल्हेर येथे नोकरीस होते. गणिताचे उत्तम शिक्षक म्हणून नावलौकीक मिळविला. तीन पुस्तके लिहिली. वास्तव्य—ग्वाल्हेर.
भार्या : **उमाबाई**– माहेर—गोदावरी गोविंद ताम्हनकर, बऱ्हाणपूर.
कन्या :
१) **सुलोचना**–सासर—सुलोचना के. करमरकर, पुणे. पती—डॉ. के. आर करमरकर. प्राध्यापक. जगप्रसिध्द गणिती नरेंद्र करमरकर यांची माता. वास्तव्य—भारती निवास सोसायटी. कर्वे रोड, पुणे.
२) **पुष्पा**–शिक्षण—एम्. ए. संस्कृत, आध्यात्मिक जीवन, श्री. रामकृष्ण शारदाश्रमाची भक्त. अविवाहित.

३१/८ **श्रीराम शंकर**–जन्म २२ ।७ ।१९३०, उज्जैन (आषाढ कृष्ण १२). शिक्षण–व्हिक्टोरीया कॉलेज ग्वाल्हेर मधून इंटर १९४९, नंतर बी. एस्सी. १९५१ मध्ये रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स्, मुंबई येथून नंतर ए. एम्. १९५२ व पीएच्. डी. १९५४ हार्वर्ड युनिव्हर्सिटी अमेरिकामधून. व्यवसाय–प्रोफेसर गणित, इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग व कॉम्प्युटर सायन्स, १९६३ पासून पर्डू युनिव्हर्सिटी, १९५५–६३ कोलंबिया, कार्मेल, प्रिन्सटन, हारवर्ड, नॉन्स, हॅडपकिन्स इ. युनिव्हर्सिटीत जागतिक कीर्तीचे प्रतिभावान् गणिततज्ञ. १९५१ मध्ये मुंबई विद्यापीठांतून बी. एस. झाल्यावर उच्च. शिक्षणासाठी ते अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठात गेले. १९५५ मध्ये पीएच्. डी. मिळविल्यावर कोलंबिया, जॉन्स, हॅपकिन्स अशा नामवंत विद्यापीठांत संशोधन अध्यापनाकरतां १९६३ मध्ये अवघ्या ३३ व्या वर्षी पर्डू विद्यापीठांत संशोधक प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. व अवघ्या ४ वर्षांत आधुनिक गणित क्षेत्रातील त्यांच्या अपूर्व कामगिरीमुळे डिस्टींगविशड् प्रोफेसर पद त्यांना बहाल केले गेले. अलजिब्राइक जॉमेंट्री, कॉम्प्युटेटीव्ह अलजिब्रा, फंक्शन थिअरी, क्वाटम इलेक्टट्रॉडायनॉमिक्स इ. गणितातील आधाडीच्या शाखांत मूलगामी संशोधन करून गणित क्षेत्रात त्यांनी जागतिक कीर्ती संपादन केली. नाना देशातील गणित संस्थांचे सन्मान्य सदस्त्व अनेक पारितोषिके त्यांच्याकडे चालत आली. त्यांनी संशोधिलेल्या गणित शाखांवर स्वतंत्र राष्ट्रीय परिषदा होऊ लागल्या. मे १९७६ मध्ये त्यांनी पुण्यात भास्कराचार्य प्रतिष्ठान स्थापन केले, गणिती प्रतिभा असलेले विद्यार्थी निवडून त्यांना मार्गदर्शन सुरू केले. गणिताचा अभ्यास, मोरोपंत, वामनपंडित वगैरे जुन्या मराठी कवींचे काव्यवाचन व महाभारत, रामायण वाचन, योगाभ्यास व गणित विद्येचा प्रचार इ. आवड. गणित विद्येची ही दीक्षा त्यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाली. १९५१ पासून अमेरिकेत वास्तव्य. वास्तव्य–१११ वाल्ड्रन्स स्ट्रीट, वेस्ट लाफायेट, इंडियाना, ४७९०६, यु. एस्. ए. अमेरिका.
भार्या : **उषा**–जन्म ५ ।६ ।१९३६ उटरेश हॉलंड येथे. माहेर–इव्हॉन मार्गिन क्राफ्ट.

कन्या : **काशी**–जन्म १२ ।५ ।१९७३.
शिक्षण–लाफायेट इंडियाना यु. एस्. ए. हायस्कूलमध्ये ११ वी त शिकत आहे.
३२/९ **हरि श्रीराम**–जन्म २२ ।४ ।१९७०.
शिक्षण–लाफायेट इंडियाना यु. एस्. ए. कॉलेजात २ रे वर्ष शिकत आहे.
३३/८ **श्रीधर शंकर**–जन्म २८ ।३ ।१९३२.
शिक्षण–एम्. एस्सी.(फिजिक्स); पीएच्. डी. व्यवसाय–होळकर सायन्स कॉलेज, इंदूर येथे फिजिक्सचे प्राध्यापक. १९५९ पासून मध्यप्रदेश सरकारचे महाविद्यालयात प्राध्यापक. भौतिकशास्त्र व गणित शिकवतात. शास्त्रीय संगीत व टेबलटेनिस या खेळांची आवड. १९७२ ते ७४ मध्ये मोठे बंधू डॉ. श्रीराम शंकर यांचेकडे अमेरिकेत काही दिवस वास्तव्य होते. वास्तव्य–१२१ पळशीकर कॉलनी, इंदूर–४.
भार्या : **कुसुम**–विवाह–२५ ।१२ ।१९५९.
माहेर–कुसुम धुंडिराज देवधर, लखनौ. डॉ. धुंडिराज देवधर (प्राध्यापक–फिजीक्स) लखनौ विश्वविद्यालय यांची कन्या.
३४/९ **आनंद श्रीधर**–जन्म २९ ।१ ।१९६१.
शिक्षण–बी. एस्सी.
३५/९ **योगेंद्र श्रीधर**–जन्म १२ ।१ ।१९६३.
शिक्षण–एम्. एस्सी.
३६/८ **श्रीनिवास शंकर**–वास्तव्य–४७ बन्सीलाल नगर, सिमटम कन्स्ट्रक्शन हाऊस, औरंगाबाद.
३७/८ **शरद् (पितांबरानंद) शंकर**–जन्म १ ।९ ।१९३७, ग्वाल्हेर. शिक्षण–एम्. एस. (मॅथ.) १९मार्च १९५९ रोजीं श्रीरामकृष्ण संघात प्रवेश केला. १९७२ साली संन्यास दीक्षा मिळाली. नांव स्वामी पितांबरानंद. आत्मिक उन्नतीचा प्रयत्न, लोकहिताची कार्ये करण्याची आवड. वास्तव्य–रामकृष्ण मिशन स्टूडंटस हाऊस, मैलापूर, मद्रास–४.
३८/६ **परशुराम मोरेश्वर**–मृत्यू १९३५.
व्यवसाय–प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक, भिक्षुकी व किर्तन, भजन.
भार्या : **जानकी**–मृत्यू १९२७. माहेर–सहस्रबुद्धे.
३९/७ **द्वारकानाथ परशुराम**–जन्म १८९९, देवास. मृत्यू ३१ ।७ ।१९६३. व्यवसाय– मुख्य व्यवसाय

विमा एजंट. पेटी वाजवून साथ करीत असत. स्वतःचे दुकान होते शिवाय निरनिराळ्या एजन्सीज होत्या.
भार्या : **सावित्रीबाई**–हेर–घारूताई गणेश काणे, अमरावती. वडील–गणेश रामचंद्र काणे.
कन्या :
१) **आशा**–सर–केळकर.
२) **शालिनी**–सासर–परांजपे, देवास.
३) **नलिनी**–सासर–जोशी, रतलाम.
४०/८ **दत्तात्रय द्वारकानाथ**–जन्म १४ ।५ ।१९२५, अमरावती येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– केंद्र सरकारमधून निवृत्त. सध्या पेन्शनर. वास्तव्य–२३ कृष्णपुरा, देवास (म. प्र.) ४५५ ००१.
भार्या : **शैलजा**–माहेर–प्रमिला प्रभाकर गोडबोले, यावल, जि. जळगांव.
कन्या :**सुलभा**–सासर–सुलभा मदन जोगळेकर. पती–मदन रामचंद्र जोगळेकर, अभियंता. वास्तव्य–३७७, शंकर नगर, नागपूर.
४१/९ **विवेक दत्तात्रय**–जन्म १९५६. शिक्षण–बी. कॉम्., सी. ए. व्यवसाय–सी. ए. ची प्रॅक्टीस, स्वतःचा व्यवसाय, औरंगाबाद. वास्तव्य–फ्लॅट नं. ५ अभिषेक अपार्टमेंट., अहिंसानगर, आकाशवाणीसमोर, औरंगाबाद.

भार्या : **स्नेहल**–
कन्या :**अस्मा**–वय वर्षे ५.
पुत्र **असिम**–वय वर्षे ४.
४२/८ **बळवंत द्वारकानाथ**–जन्म २ ।२ ।१९३८, देवास येथे. शिक्षण–स्थापत्य शास्त्राचा डिप्लोमा. व्यवसाय–उत्तर रेल्वेच्या इंजिनिअरींग विभागात रेल पथ निरीक्षक. बडोदा हाऊस, नवी दिल्ली, प्रधान कार्यालयामध्ये. वास्तव्य–रेल्वे क्वार्टर नं. टी–३ बी, स्टेशनरोड, गाझियाबाद (यु. पी.).
भार्या : **सुधा**–माहेर–सुधा फडके, भुसावळ.
कन्या :
१) **ज्योति**–जन्म २९ ।१० ।१९६४. शिक्षण–बी. ए. सासर–ज्योति नंदकिशोर पुराणिक, बडोदे.
२) **शीला**–जन्म २९ ।४ ।१९६७. शिक्षण– एम्. ए. (गायन).
४३/९ **शशांक बळवंत**–जन्म ५ ।४ ।१९७३. शिक्षण–इ. बारावीत आहे.
४४/७ **मुकुंद परशुराम**–जन्म देवास येथे. मृत्यू १९६६. व्यवसाय– भिक्षुकी. दुकानातही काम करतात. वास्तव्य–देवास.
भार्या : **रमा**– मृत्यू चैत्र वद्य एकादशी. सन १९४९. माहेर–दुर्गाबाई वझे, उज्जैन (म. प्र.)
४५/८ **प्रभाकर मुकुंद**–जन्म १३ ।७ ।१९३२, उज्जैन येथे. शिक्षण–इंटर सायन्स. व्यवसाय– १९५४ पासून रेल्वेत नोकरी. १९६१ पासून अजमेर (राजस्थान) येथे वायरलेस–ट्रॅफिक इन्स्पेक्टरच्या हुद्यावर. वास्तव्य–३८२/बी रेल्वे कॉलनी, तोपदडा, अजमेर.
भार्या : **उषा**–माहेर–मीरा लक्ष्मण रानडे, मुंबई.
कन्या :
१) **रेखा**–जन्म २४ ।९ ।१९६१. शिक्षण–बी. ए. सासर–दिपीका अनंत मराठे, बडोदे.
२) **अलका**–जन्म ४ ।६ ।१९६३. शिक्षण–बी. एस्सी. सासर–अलका मुकुंद सोहोनी, ब्यावर राजस्थान.
३) **सुषमा**–जन्म १ ।४ ।१९७२. शिक्षण–एस्. एस्. सी.
४६/९ **रवींद्र कुमार प्रभाकर**–जन्म २४ ।७ ।१९६७. शिक्षण–बी. एस्सी.
४७/९ **अविनाश प्रभाकर**–जन्म ३ ।७ ।१९७६. शिक्षण–इयत्ता ६ वीत शिकत आहे.
४८/८ **अरुण मुकुंद**–व्यवसाय–असिस्टंट स्टेशन मास्तर, मध्य रेल्वेत, बेतूल येथे. वास्तव्य–द्वारा, के. के. जालनपुरीस् हाऊस, नियर ताप्ते रेल्वे. बेतूल (म. प्र.)
४९/८ **दिनकर मुकुंद**–व्यवसाय–एफ्. सी. आय. मध्ये नोकरी. वास्तव्य–द्वारा, आर. एस्. एस्. डी/५४–१५५–४६ श्रीनगर कॉलनी, वाराणसी (यु.पी.).
५०/७ **यशवंत परशुराम**–जन्म २७ ।३ ।१९०७. मृत्यू १८ ।११ ।१९७४. वास्तव्य–देवास.
भार्या : **इंदिराबाई**–माहेर–इंदिराबाई दामले, इंदूर.
कन्या :
१) **विजया**–वय ४५ वर्षे. सासर–विजया अनिल दामले, वडगांव, जि. जळगांव. व्यवसाय–शिक्षिका.
२) **पुष्पा**–वय ४० वर्षे. व्यवसाय–राधाबाई हायर सेकं. स्कूल, देवास येथे शिक्षिका. सासर–पुष्पा गोविंदराव इंगळे.
५१/८ **अनिल यशवंत**–जन्म ६ ।२ ।१९५५ देवास

येथे. शिक्षण—एम्. एस्सी. (रसायन). व्यवसाय— केंद्र सरकारच्या बँक नोट प्रेस, देवास येथे नोकरी. वास्तव्य—यशवंत निवास, २५ लक्ष्मीबाई मार्ग, देवास (म.प्र.).

भार्या : **दिपाई**–माहेर—दिपाई मराठे, ठाणे.

पुत्र—अमोल—**जन्म** २९ ।३ ।१९८०. शिक्षण—इयत्ता ४ थी मध्ये.

५२/८ **रामचंद्र यशवंत**– #

५३/७ **वासुदेव परशुराम**–जन्म १९१२, देवास येथे. शिक्षण—बी. एस्सी. व्यवसाय—बडोदे संस्थान, मुंबई राज्य, गुजराथ राज्य, शिक्षण खात्यातून पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक म्हणून निवृत्त. वास्तव्य—३० प्रोफेसर्स कॉलनी, सेंट झेविअर हायस्कूल रोड, नवरंगपूरा, अहमदाबाद—९

भार्या : **कमल**–माहेर—ललिता शंकर डोंगरे, बडोदे.

५४/८ **नरेंद्रकुमार वासुदेव**–शिक्षण—एम्. एस्. (जनरल सर्जरी). व्यवसाय— स्वतःचे अहमदाबाद येथे नर्सिंग होम आहे. अहमदाबाद नगरपालिकेच्या इस्पितळात मानद डॉक्टर व वैद्यकिय महाविद्यालयांत प्राध्यापक. पॅथॉलॉजीत सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

भार्या : **कल्पना**–माहेर—अहमदाबाद येथे. व्यवसाय—एम्. डी. स्त्रीरोगतज्ञ.

कन्या :

जन्म १९८७.

पुत्र—**दुष्यंत**–जन्म १९८४.

५५/७ **नारायण परशुराम**–जन्म १५ ।७ ।१९२१. शिक्षण—सिव्हिल इंजिनिअरचा डिप्लोमा. व्यवसाय—बडोदे संस्थान, जुने मुंबई राज्य, महाराष्ट्र राज्य. कार्यकारी अभियंता म्हणून १ ।८ ।१९७९ पासून सेवानिवृत्त. **वास्तव्य**—इ/१२०/७ श्रीरंग सोसायटी, ठाणे.

भार्या : **निर्मला**–माहेर—कमल मोरेश्वर कुंटे. मृत.

कन्या :**प्रज्ञा**–जन्म १९ ।११ ।१९५९.

सासर—पती—अनिल वसंत बाळ, डोंबिवली.

५६/८ **प्रशांत नारायण**–जन्म ४ ।८ ।१९५३. शिक्षण—बी. एस्सी. मुंबई, बी. एस्सी. (टेक.) यु डी. सी. टी. मधून पी. एच्. डी. (टेक्सस्ट्राईल केमेस्ट्री). व्यवसाय—फेबु. १९८३ ते जून १९८६ पर्यंत. पर्डू युनिव्हर्सिटीत संशोधन कार्य केले. नंतर डिसेंबर १९८६ पासून जॉन्सन आणि जॉन्सन, भांडूप येथे पर्सनल प्रॉडक्ट डिव्हीजनमध्ये अधिकारी. वास्तव्य—श्रीरंग सोसायटी, ठाणे.

भार्या : **विशाखा**–माहेर—पिता—गोविंद गणेश जोगळेकर, विलेपार्ले.

कन्या :

१) **शचि**–जन्म २२ ।९ ।१९८५.

२) **श्रुती**–जन्म १८ ।१२ ।१९८७.

५७/६ **चिंतामणी (सोन्याबापू) मोरेश्वर**–मृत्यू १९३४. व्यवसाय—पोलीस खात्यात नोकरी व भिक्षुकी. अविवाहित होते.

५८/४ **नारायण हरि**– #

५९/५ **पांडुरंग नारायण**– #

६०/६ **त्र्यंबक पांडुरंग**–

भार्या : **पार्वतीबाई**–माहेर—बापये.

६१/७ **अनंत त्र्यंबक**–जन्म ७ ।९ ।१९११. कान्हूर, ता. पारनेर. जि. अहमदनगर. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—मुंबई महानगरपालिकेत अकौंटस् खात्यात नोकरी. वास्तव्य—२/२ चंद्रशेखर सोसायटी, सहार रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई—६९.

भार्या : **विमल**–माहेर—विमल वामन गद्रे, कल्याण.

कन्या :**भारती**–जन्म २५ ।६ ।१९५५. शिक्षण—एस्. एस्. सी. डी. एड्. व्यवसाय—मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षिका. सासर—भारती हरि वझे. वास्तव्य—मनोरमा ब्राह्मणसोसायटी, नौपाडा, ठाणे—२.

६२/८ **सुरेश अनंत**–जन्म १५ ।१ ।१९३७. शिक्षण—एस्. एस्. सी. आर्किटेक्ट. व्यवसाय—आर्किटेक्टचा व्यवसाय.

६३/८ **मुकुंद अनंत**–जन्म १० ।५ ।१९४१. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—मंत्रालयात नोकरी.

६४/८ **नरेंद्र अनंत**–जन्म २७ ।१० ।१९४५. शिक्षण—एस्. एस्. सी. आय. टी. आय. चा डिप्लोमा. व्यवसाय—लार्सन अँड टुर्बो मध्ये नोकरी.

६५/८ **रवींद्र अनंत**–जन्म २० ।४ ।१९४७. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—टेल्को पुणे येथे स्कील्ड वर्कर म्हणून नोकरी.

६६/८ **जयंत अनंत**–जन्म ४ ।७ ।१९५२.

शिक्षण—एस्. एस्. सी. इलेक्ट्रिशियन. व्यवसाय—विजय सिंथेटिक मध्ये नोकरी.
६७/७ **श्रीकृष्ण त्र्यंबक**—मृत्यू १८ ।६ ।१९७२.
६८/७ **सखाराम त्र्यंबक**—वास्तव्य—दुर्गाभूषण, प्रशांतनगर, नवीपेठ, पुणे—४०००३०.
६९/७ **वसंत त्र्यंबक**—वास्तव्य—तिवारी चाळ, नाहूर रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई.

घराणे क्र. ५

वंशावळी क्र. २

कुर्धे–देवास–इंदूर–हैद्राबाद–औरंगाबाद

७०/३ **लक्ष्मण नारायण**– #
७१/४ **महादेव लक्ष्मण**– #
७२/५ **दिनकर महादेव**—मृत्यू १९३०.
व्यवसाय—प्राथमिक शिक्षक, खामगांव, जि. अकोला येथे.
कन्या :
१) **इंदिरा**—जन्म १९०३. (हयात), सासर—उकिडवे, पुणे.
२) **पार्वती**—मृत्यू १९६०. सासर—गाडगीळ.
३) **रमाबाई**—मृत्यू १९४०. सासर—भोगले, औरंगाबाद.
७३/६ **जगन्नाथ दिनकर**—जन्म १ ।६ ।१९०९.
शिक्षण—एल्. सी. पी. ओ. एस्., १९३०, औरंगाबाद व पुणे येथे. व्यवसाय—निजामाबाद येथे १९३० ते १९७० पर्यंत प्रॅक्टिस केली. वास्तव्य—हॅपी होम अपार्टमेंट. ३ ।४ ।४८२ लिंगमपल्ली, हैद्राबाद—५०००२७.
भार्या : **लक्ष्मीबाई**—मृत्यू एप्रिल १९८३.
माहेर—मथुराबाई गाडगीळ, हैद्राबाद. कन्या :
१) **शकुंतला**—जन्म मार्च १९३२, टिळकनगर. शिक्षण—बी. एस्सी., बी. एड्., सासर —शकुंतला वसंतराव पारगावकर, हैद्राबाद.
२) **विनया**—जन्म मार्च १९३६. शिक्षण—मॅट्रिक. सासर—विनया भास्कर जोशी, शिकागो.
३) **निर्मला**—जन्म ७ ।५ ।१९४१. शिक्षण—जी. डी. आर्ट. व्यवसाय—फॅनिली प्लॅनिंग डिपा. हैद्राबाद येथे आर्टिस्ट ची नोकरी. वास्तव—हैद्राबाद. अविवाहित.
७४/७ **अशोक जगन्नाथ**—जन्म १९ ।१२ ।१९३९. शिक्षण—डिप्लोमा इन ऑटोमोबॉईल इंजि. बी. एस्. (मेक.). व्यवसाय—ट्रॅव्हल एजन्सी, अमेरिका. वास्तव्य—१६९, न्यू हायडी. पार्क, ग्रीनवे, न्यूयॉर्क, ११०४०.
भार्या : **वासंती**—माहेर—वासंती देवधर.
कन्या :
१) **मनाली**—जन्म १९७२. अमेरिकेत शिकत आहे.
२) **नीहा**—जन्म १९७५. अमेरिकेत शिकत आहे.
७५/६ **दत्तात्रय दिनकर**—जन्म १९०३. मृत्यू १३ ।३ ।१९४७. शिक्षण—बी. ए.बी. एड्. व्यवसाय—हैद्राबाद संस्थानात नॉर्मल स्कूलमध्ये प्रिन्सिपॉल होते.
भार्या : **आनंदीबाई**—माहेर—सिताबाई त्रिंबक लेले.
कन्या :**मंगला**—सासर—मंगला सुरेश ख्रिस्ती—जोशी, पुणे.
७६/७ **गणेश दत्तात्रय**—जन्म जून १९२१. मृत्यू जून १९६०. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय— पशुवैद्यक खात्यात पुणे येथे कारकून.
भार्या : **विजयाबाई**– (हयात). माहेर—द्वारका बाजीराव जोशी.
कन्या :**जयश्री**—जन्म १४ ।९ ।१९५२. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे नोकरी. सासर—जोगळेकर.
७७/८ **अरविंद गणेश**—जन्म ऑगस्ट १९४८. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे नोकरी.
भार्या : **आरती**—माहेर—निलीमा केशव बोडस.
कन्या :
१) **पूर्वा**—जन्म १४ ।४ ।१९८०.
२) **चैत्राली**—जन्म ६ ।५ ।१९८३.
पुत्र **यतिन**—जन्म २३ ।२ ।१९८७.
७८/८ **मिलींद गणेश**—जन्म ७ ।४ ।१९५७.
शिक्षण—एम्. कॉम्. एल् एल्. बी., सी. ए. आय. आय. बी; आय. सी. डब्ल्यू ए; स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये नोकरी. वास्तव्य—जवाहरलाल नेहरू कॉलेज समोर,

घराणे क्र. ५

वंशावळी क्र. २

कुर्धे–देवास–इंदूर–हैद्राबाद--औरंगाबाद



नारळीबाग औरंगाबाद ४३१००१.
भार्या : **संध्या**–माहेर–संध्या मनोहर वझे.
कन्या :**मधूरा**–जन्म ९ ।१ ।१९८८.

७९/७ **महादेव दत्तात्रय**–जन्म १३ ।७ ।१९२५.
शिक्षण–बी. एस्सी. ॲग्रीकल्चर पर्यंत. व्यवसाय–स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये १९४७ पासून १९८५ पर्यंत नोकरी. वास्तव्य–सातोणा, ता. पडतूर, जि. जालना.
भार्या : **निर्मला**–माहेर–कुसूम दत्तात्रय कानडे.
कन्या :
१) **शोभना**–जन्म २९ ।९ ।१९५२. शिक्षण–एम्. कॉम्. सासर–शोभना विजयकुमार देवधर, पैठण.
२) **किशोरी**–जन्म २८ ।१० ।१९६१. शिक्षण–बी. एफ्. ए. सासर–किशोरी प्रशांत भालेराव, औरंगाबाद.

८०/८ **विनायक महादेव**–जन्म १२ ।८ ।१९५३.
शिक्षण–बी. कॉम्. नोकरी–स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे.
भार्या : **स्नेहल**–शिक्षण–बी. ए. माहेर–प्रफुल्लता विठ्ठल देशपांडे. पुत्र –१) **अमोल**–जन्म २९ ।१० ।१९८३. २) **आश्विन**–जन्म १४ ।९ ।१९७९.

८१/८ **धनंजय महादेव**–जन्म ३० ।१० ।१९५९.
शिक्षण–बी. एस्सी. ॲग्रीकल्चर. नोकरी–स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये. वास्तव्य–अन्वी, ता. सिल्लोड
भार्या : **मृदुला**–शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–डीबीएम् एल्. आय्. सी. च्या डिव्हीजन ऑफिसमध्ये क्लार्क. माहेर–मृदुला सदाशिव खरे.
पुत्र–आदित्य–जन्म ३ ।३ ।१९८८.

८२/८ **शशिधर महादेव**–जन्म १९ ।८ ।१९६३.

शिक्षण—बी. एस्सी. नोकरी—पांथकी प्रा. लि. मध्ये, औरंगाबाद अविवाहित.

८३/७ **शिवराम दत्तात्रय**–जन्म १९२९. मृत्यू मे १९६१.

भार्या : **सुनेत्रा**–जन्म १९३३. माहेर—कुसूम कोठावळे. सरस्वती भुवन हायस्कूल, बिडकीन येथे शिक्षिका.

कन्या :

१) **सविता**–जन्म जून १९६०. शिक्षण—बी. ए, सासर—सविता बाळकृष्ण जोगळेकर, डोंबिवली.

२) **अंजली**–जन्म जून १९६२. शिक्षण—मॅट्रिक. सासर—अंजली पाटील, औरंगाबाद.

८४/७ **नरहर दत्तात्रय**–जन्म १९३१. इंडियन एअर फोर्समध्ये नोकरी.

८५/५ **विनायक महादेव**–अंध होते. वास्तव्य—कान्हूर पठार, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

८६/६ **विश्वेश्वर विनायक**–मृत्यू जून १९७२ अविवाहित. वास्तव्य—कान्हूर पठार, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

८७/६ **त्रिपुरांतक विनायक**–मृत्यू डिसें. १९६०. अहमदनगर येथे नगरपालिकेच्या शाळेत शिक्षक.

भार्या : **सुशीलाबाई**–मृत्यू १९८३. माहेर—गोदावेरी गोडबोले. अपत्य नाही.

घराणे क्रमांक ६

कुर्धे–मेरवी–सावकार घराणे

कुर्धे–मेरवी–डोंबिवली

१/१ **नारायण**–ज्ञात मूळ पुरुष

२/२ **भिकाजी नारायण**– #

३/३ **विसाजी भिकाजी**– #

४/४ **विश्वनाथ विसाजी**– #

५/५ **नारायण विश्वनाथ**–कुर्धे येथे सावकारी करत म्हणून सावकार अभ्यंकर म्हणून ओळखले जाऊ लागले.

भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर—देशमुख, पावस.

कन्या :

१) **बाया**–सासर—जोशी.

२) **ताई**–सासर—नरवणे.

३) **बाळूताई**–सासर—फडके.

६/६ **गोविंद नारायण**–जन्म १८५०. मृत्यू १९२०. शिक्षण—मराठी ७ वी. व्यवसाय— शेती. वास्तव्य—कुर्धे.

भार्या : **राधाबाई**–माहेर—जनार्दन जोशी यांची कन्या.

कन्या :

१) **चंद्रिका**–(मृत १९४३) सासर—पुरुषोत्तम दीक्षित,-लिमये, आडिवरे.

२) **पिलू**–सासर शंकर नरवणे, नाखरे, पावसजवळ. मृत १९५०.

३) **गोदावरी**–सासर—इंदिरा भास्कर जोशी. मृत १९८७.

४) **नर्मदा**–सासर—शांताबाई गंगाधर केळकर, केळशी (हयात)

७/७ **विष्णू (दादा) गोविंद**–जन्म जून १९१४ कुर्धे. शिक्षण—मराठी ७ वी फायनल. व्यवसाय— शेती बागायती. आजोबांचा सावकारीचा धंदा वडिलांच्या कारकीर्दीपासून बंद. कुर्धे येथे स्वकष्टाचे घर आहे.

भार्या : **सुशिला** –माहेर—मुक्ताबाई यशवंत जोगळेकर रा, कोतवडे ता. रत्नागिरी.

कन्या :

१) **सुधा**–जन्म इ.स. १९४८. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर—सुजाता सुरेश जोशी, कुवेशी.

२) **सुलभा**–जन्म इ.स. १९५०. मृत इ.स. १९८१. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर— निलम नंदकुमार पाटणकर, विलेपार्ले हल्ली, पुणे.

३) **सुनीता**–जन्म इ.स. १९५१. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर—मिनल शांताराम मुसळे, शिवाजीनगर, रत्नागिरी.

४) **शोभा**–जन्म इ.स. १९५६. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर मीता नंदकुमार जोशी, रत्नागिरी, बँकेत नोकरी करते.

८/८ **सुरेश विष्णू**–जन्म २ ।११ ।१९४६. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—शेती. वास्तव्य—कुर्धे.

भार्या : **वैशाली**–माहेर—वासंती भास्कर परांजपे, जांसी

घराणे क्र. ६

कुर्धे–मेरवी–सावकार घराणे

कुर्धे--मेरवी--डोंबिवली



ता. राजापूर.
कन्या :
१) **मंजिरी–जन्म** १९७२. एस्. एस्. सी.
२) **पल्लवी–जन्म** १९७६. इ. ६ वी.
३) **श्रद्धा**-जन्म १९८२. इ. १ ली.

९/८ **रामचंद्र विष्णू–जन्म** २६ ।२ ।१९६१.
शिक्षण–एस्. एस्. सी. इलेक्ट्रीशिअनचा कोर्स पूर्ण.
व्यवसाय–एम्.एस्.इबी. मध्ये नोकरी करीत आहे.
वास्तव्य–**चाफा**, तालुका व जिल्हा रत्नागिरी.
भार्या : **संध्या**–माहेर–संध्या राजाराम भिडे, गणपतीपुळे.

१०/७ **वामन गोविंद**–जन्म १८९९. मृत १९३९.
व्यवसाय–शेती. **वास्तव्य**–कुर्धे.
भार्या : **गंगाबाई**– माहेर–गंगाबाई धोंडो गोडबोले. पावस. हयात.

११/७ **माधव गोविंद**–जन्म १९१५. मृत्यू १९३५. लहानपणी मृत.

१२/६ **केशव नारायण**–मृत्यू १९४९, डोंबिवली येथे.
शिक्षण–मराठी ७ वी. **व्यवसाय**– शेती–सावकारी.

वास्तव्य–कुर्धे.
भार्या : **रमा**–माहेर–द्रौपदी बळवंत जोशी, बसणी, रत्नागिरी.
१३/७ **यशवंत केशव**–जन्म १९१६. मृत्यू १९६९ रत्नागिरी येथे. शिक्षण– नॉनमॅट्रिक. आयुर्वेदीक कोर्स. व्यवसाय–कंपौंडर ज्युबिलीमध्ये. नंतर स्वतंत्र वैद्यकीय व्यवसाय पावस. वास्तव्य–प्रथम मुंबई, डोंबिवली, नंतर कुर्धे मेरवी.
भार्या : **इंदिराबाई**–जन्म १९२५. माहेर–चंपूताई रामचंद्र आगाशे.
कन्या :
१) **शैलजा** –सासर–शैलजा आनंद केळकर–कोळंबे, हल्ली कळवा ठाणे.
२) **मिनाक्षी**–सासर–मिनाक्षी मोहन कर्वे. डोंबिवली.
३) **शालिनी**–सासर–शालिनी अरूण जमेनीस. शिवाजीनगर, सडा, रत्नागिरी.
१४/८ **भालचंद्र यशवंत**–जन्म १२ ।१ ।१९४४ कोळंबे येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– स्टेट बँक ऑफ इंडिया त नोकरी. धार्मिक पुस्तके वाचनाची आवड. वास्तव्य–५, निशिगंधा, स्टेट बँक सोसायटी, पंडित दिनदयाळ पथ शास्त्रीनगर, डोंबिवली (पश्चिम).
भार्या : **सुनंदा**–माहेर–प्रमोदिनी दत्तात्रय सांगलीकर. वास्तव्य–१६ ।१९ एवरेस्ट, डोंबिवली. (प.)
कन्या : **माधवी**–जन्म ७ ।७ ।१९७०. नृत्यकला पदवीधर बी.एस्.ए. नालंदा नृत्यकला केंद्र, मुंबई.
१५/९ **प्रसाद भालचंद्र**–जन्म १५ ।३ ।१९७६. ९ वीत शिकत आहे.
१६/८ **प्रकाश यशवंत**–जन्म १९४९. शिक्षण–बी. ए., एस्.एफ्. आयुर्वेदिक डॉक्टर. व्यवसाय– डॉक्टर पावस येथे. वास्तव्य–मेरवी कुर्धे.
भार्या : **प्राची**–माहेर–भावे, वेतोशी.
कन्या : **प्रांजली**–जन्म १९८०. पुत्र–**प्रणव**–जन्म १९८२.
१७/८ **सुहास यशवंत**–जन्म १९५३. शिक्षण–८ वी मराठी. व्यवसाय–शेती. वास्तव्य– कुर्धे मेरवी.
भार्या : **सीमा**–माहेर–माधुरी पांडुरंग रानडे.
कन्या :
१) **संगीता**–जन्म १९८२. देवगड.
२) **वेदांता**–जन्म १९८६.
१८/८ **पुरुषोत्तम यशवंत**–जन्म १९६२. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–स्टेट ट्रान्सपोर्ट मध्ये कंडक्टर. वास्तव्य–मेरवी, कुर्धे.
भार्या : **पूजा**–माहेर–पूजा खांडेकर, घाटीवळे.
पुत्र–ओंकार जन्म १९८९.
१९/७ **श्रीधर केशव**–जन्म ३० ।३ ।१९१९ कुर्धे येथे. शिक्षण–मॅट्रिक पर्यंत नंतर संगीत अलंकार ही पदवी. व्यवसाय–आकाशवाणी कलाकार. ऑल इंडिया रेडिओ मुंबई, सर्व्हिसमधून निवृत्त, ज्योतिष, अध्यात्मज्ञान. आयुर्वेद, शास्त्रीय संगीत यांची आवड, गायनाच्या मैफिली, संगीत नाटकातून प्रमुख भूमिका केल्या. तसेच रेडिओवरून ७०० चे वर संगीताचे कार्यक्रम झाले. वास्तव्य–पटवर्धन वाडा, म. गांधी रोड, विष्णूनगर, डोंबीवली. (प.)
भार्या : **आवडी**–माहेर–आवडी भास्कर फडके, गणेशगुळे, रत्नागिरी.
कन्या :
१) **प्रमिला**–जन्म ७ ।७ ।१९५०. **बी. एस्. सी., बी.** एड्. सासर–वैशाली प्रकाश जोशी, एवरेस्ट सोसायटी डोंबिवली. (प.)
२) **मंगला**–जन्म १६ ।७ ।१९५३. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–संगीता श्रीपाद भाटे. ३१८ शिवप्रसाद सो. नवीपेठ पुणे–३०.
३) **शशिकला**–जन्म १५ ।८ ।१९५८. शिक्षण–एस्. एस्. सी. डी. ऐड. सासर–पूर्वा धनंजय फडके, आमराई, विष्णूनगर, ठाणे.
२०/८ **शरदचंद्र श्रीधर**–जन्म २४ ।२ ।१९४८. शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–कॅनरा बँकेत नोकरी. वास्तव्य–उषा अपार्टमेंट, म. गांधी रोड, विष्णूनगर, डोबिवली.
भार्या : **शुभदा**–माहेर–शैला, बावोशीचे रघुनाथ गोविंद रहाळकर यांची कन्या.
कन्या : **सोनाली**–जन्म ६ ।१ ।१९७१.
पुत्र–**समीर**–जन्म २१ ।५ ।१९८०.
२१/८ **अनिरुद्ध श्रीधर**–जन्म ३ ।२ ।१९६६. शिक्षण–एस्.वाय.आर्टस्. स्टेनोग्राफरची परिक्षा उत्तीर्ण. वास्तव्य–पटवर्धनवाडा, म. गांधी रोड, डोंबिवली. (प.)

२२/६ **दामोदर नारायण**–जन्म १८९३. मृत्यू १९४८.
शिक्षण–मराठी ७ वी. व्यवसाय– शेती. वास्तव्य–कुर्धे.
भार्या : **सावित्री**–माहेर–पालकर. पावस येथे.
कन्या :
१) **रेणू**–जन्म १९३३. सासर–लक्ष्मीबाई मधुसूदन बर्वे, गावखडी.
२) **यमू**–जन्म १९३५. सासर–अपर्णा महादेव काळे. नांदीवडे. रत्नागिरी.
२३/७ **विश्वनाथ दामोदर**–जन्म १३ ।८ ।१९४०.
शिक्षण–७ वी पास. व्यवसाय–शेती, बागायती कुर्धे येथे. शिकारी आणि हस्तव्यवसाय यांची आवड, २२ ।५ ।१९८१ पासून गावचा पोलीस पाटील.
वास्तव्य–कुर्धे.
भार्या : **शुभदा**–माहेर–शालिनी केशव देवधर, राजापूर.
पुत्र–**आशुतोष**–दत्तक घेतला.

घराणे क्र. ७

कुर्धे–भजू घराणे

१/१ **शिवराम**–ज्ञात मूळ पुरुष.
२/२ **भास्कर शिवराम**– #
३/३ **भिकाजी शिवराम**– #
४/४ **गणेश भिकाजी**– जन्म १८८१. मृत्यू १९४४.
व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–कुर्धे. २ पूत्र, ४ कन्या.
भार्या : **रूक्मिणीबाई**–माहेर–वेणू नारायण जोशी, पावस.
कन्या :
१) **शांती** –सासर–सुमती श्रीधर फडके, मुलूंड.
२) **विमल**–सासर–सुनंदा मनोहर परांजपे, ठाणे.
३) **हेमलता**–सासर–सुमित्रा मधुसूदन गोरे.
४) **कमल**–जन्म १९३२. अविवाहित.
५/५ **विनायक गणेश**–जन्म ३० ।१ ।१९३८.
शिक्षण–८ वी पास. व्यवसाय–शेती. उसाचे घाण्यात वयाचे ८ व्या वर्षी डावा हात सापडल्याने कोपरापासून

घराणे क्र. ७

कुर्धे–भजू घराणे



हात तुटला.
भार्या : **सरिता**–माहेर–मंदा शंकर कुलकर्णी, सांगली.
कन्या :
१) **भारती**–जन्म २ ।७ ।१९७३. इ. १० वी शिकत आहे.
२) **मीनाक्षी** –जन्म १७ ।११ ।१९७५. इ. ८ वी शिकत आहे.
३) **नीला**–जन्म १८ ।२ ।१९८०. इ. ४ थी शिकत आहे.
६/६ **जयंत विनायक**–जन्म २४ ।१० ।१९७७. इ. ६ वीत शिकत आहे. शिवाय भिक्षुकीसाठी वेदाभ्यास करत आहे, कुर्धे येथे वेदपाठशाळेत शिकत आहे. अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ रत्नागिरीहून शिष्यवृत्ती मिळते.
७/५ **दत्तात्रय गणेश**–जन्म १९२६. मृत १९८१.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–सचिवालयात नोकरी होती.
वास्तव्य–गिरगांव, मुंबई.
भार्या : **सरला**–माहेर–सरला गानू, रा. वाशी ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी. पुत्र१ व कन्या ३.
कन्या :
१) **शशिकला**–सासर–सोमण, चिपळूण.
२) **शकुंतला**–सासर–दाबके.
३) **शुभांगी**–सासर–कोल्हटकर.
८/६ **विकास दत्तात्रय**–जन्म १९६०. शिक्षण–बी.कॉम्. व्यवसाय–खाजगी नोकरी.
भार्या : **मीना**–माहेर–मीना कर्वे, दापोली.
वास्तव्य–एव्हरग्रीन अपार्टमेंट, गुजराथी मंडळ, क्रॉस रोड, राजपुनिया हॉल जवळ, विलेपार्ले (पूर्व) मुंबई.
कन्या १ व पुत्र १.

घराणे क्र. ८

कुर्धे–मोरोपंत घराणे

कुर्धे–पुणे

१/१ **बल्लाळ**–वास्तव्य कुर्धे येथे होते. इतर माहिती उपलब्ध झाली नाही.
२/२ **दाजी बल्लाळ**–वास्तव्य–कुर्धे येथे होते.
३/३ **मोरेश्वर दाजी**–वास्तव्य–कुर्धे येथे होते.
४/४ **लक्ष्मण मोरेश्वर**–जन्म १८७२. मृत्यू १९५१.
व्यवसाय–भिक्षुकी व बागायती. वास्तव्य–कुर्धे.
भार्या : **राधाबाई**–माहेर–फडके-भूतनीस, कुर्धे.
कन्या :
१) **येसू**–मृत्यू १९८६. सासर–सावित्री विनायक लेले, गोळप.
२) **भागिरथी**–जन्म १९२०. सासर–कमला अनंत जोशी, पावस.
३) **रंगू**–जन्म १९२८. सासर–इंदिरा दत्तात्रय घैसास, रत्नागिरी.
५/५ **शंकर लक्ष्मण**–जन्म १९२४. शिक्षण–मराठी ६ वी. व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य– १९४ शुक्रवार पेठ, काळ्या हौदाजवळ, पुणे - २.
भार्या : **नलिनी**–माहेर–मालती वासुदेव आगाशे, रत्नागिरी.
कन्या :
५३/७ **पुरुषोत्तम शिवराम**–जन्म १९०७. मृत्यू ७ ।७ ।१९८५. वासिंद येथे रेल्वेत स्टेशन मास्तर म्हणून निवृत्त. वास्तव्य–शिवराम भुवन, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, मु. पो. वासिंद, जि. ठाणे.
भार्या : **लक्ष्मीबाई**–जन्म १९१३. माहेर—गोदावरी रामचंद्र कर्वे. पळस्पे, ता. पनवेल जि. रायगड.
कन्या :
१) **शंकुतला**–सासर–शंकुतला अच्युत पाटणकर. वय ५७.
२) **नलिनी**–सासर–नलिनी वासुदेव जोशी. वय ५४.
३) **रत्नप्रभा**–सासर–सुधा रामचंद्र गोडबोले. वासिंद. वय ५१.
४) **रोहिणी**–जन्म १९४९. सासर–अनुराधा वामन भिडे. घाटकोपर.
५) **मोहिनी**–जन्म १९५५. सासर–वंदना काशीराव वासनकर. कल्याण.
५४/८ **मोरेश्वर पुरुषोत्तम**–जन्म ४ ।६ ।१९५२.
शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–एन्. सी. टी. व्ही. टी. ॲप्रेंटीस म्हणून जी. के. डब्ल्यू. भांडूप येथे नोकरी. नंतर १४ वर्षे तिथेच मशीन सेटर म्हणून नोकरीस आहे.
वास्तव्य–शिवराम भुवन, स्वा. वीर सावरकर नगर, मु. पो. वासिंद, जि. ठाणे.
भार्या : **मृणालिनी**–माहेर–अंजनी अनंत जोग. सुप्रसिध्द व्हायोलिनवादक व्हि. जी. जोग यांची नात.
कन्या :
१) **कविता**–जन्म २२ ।१२ ।१९७८. इ. ६ वी त शिकत आहे.
२) **तृप्ती**–जन्म २७ ।५ ।१९८१. इ. ४ थी त शिकत आहे.
३) **आरती**–जन्म २ ।१२ ।१९८७.
५५/७ **मधुकर शिवराम–** #
५६/७ **पद्मनाभ शिवराम**–सेंट्रल रेल्वेत स्टेशनमास्तर होते.
५७/८ **हरि पद्मनाभ–** #
५८/८ **राजाभाऊ पद्मनाभ–** #
५९/७ **विठ्ठल शिवराम–** #
भार्या : **रुक्मिणी**–माहेर–वेणू रामचंद्र जोशी. पालगड.
कन्या :
१) **दुर्गा**–सासर–सकळकळे. नागपूर.
२) **कुंदा**–सासर–परांजपे. नागपूर.
६०/८ **अनंत विठ्ठल**–जन्म ८ ।५ ।१९३१.
शिक्षण–बी. एस्सी. बी. टी.
व्यवसाय–उपशिक्षणाधिकारी म्हणून निवृत्त.
वास्तव्य–सपना एंटरप्रायजेस्, रणपिसेनगर, अकोला.
भार्या : **शालिनी**–माहेर–कमल गणेश घांग्रेकर. नागपूर.
६१/९ **दिलीप अनंत**–जन्म ७ ।७ ।१९६०.
शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–बँक ऑफ इंडियामध्ये लिपिक.
भार्या : **भाग्यश्री**–शिक्षण–एम्. कॉम.; एम्. फिल्. सेलू, जि. वर्धा.
कन्या : **अश्विनी**–जन्म १९८६.
६२/९ **रवींद्र अनंत**–जन्म ११ ।१० ।१९६१.
शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– टी.व्ही. रिपेअर्सचे दुकान, अकोला येथे. वास्तव्य–रणपिसेनगर अकोला.
६३/८ **दिनकर विठ्ठल**–जन्म १७ ।११ ।१९३४.
शिक्षण–बी. एस्सी; बी. टी
व्यवसाय–मुख्याध्यापक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर. महाराष्ट्र शासनातर्फे पुरस्कार प्राप्त. १९८९.
वास्तव्य–६९,जयप्रकाशनगर, नागपूर.
भार्या : **अलका**–माहेर–शीला गोपाळ पांडे.
कन्या : **मंजुषा**–वय वर्षे २२. शिक्षण–बी. ए, एम्. एस्.
६४/९ **शशांक दिनकर**–वय वर्षे २८.
व्यवसाय–कोराडी पॉवर हाऊसमध्ये नोकरी. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे डेप्यूटेशनवर झिम्बाग्वेला ३ वर्षे वास्तव्य होते.
६५/९ **राजन् दिनकर**–वय वर्षे २४. अपघाती मृत्यू १९८८.
६६/८ **प्रभाकर विठ्ठल**–जन्म ६ ।१ ।१९३७.
शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–रिझर्व बँक, नागपूर येथे अधिकारी. वास्तव्य–प्लॉट नं १७, रिझर्व बँक कॉलनी,

जयप्रकाशनगर, खामला, नागपूर–२५.
भार्या : **आशा**–माहेर–आशा श्रीपाद भिडे.
६७/९ **भाग्येश (मकरंद) प्रभाकर**–जन्म १२ ।१ ।१९७६. शिक्षण–इयत्ता ८ वीत शिकत आहे.
६८/८ **यशवंत विठ्ठल**–जन्म १९४०.
व्यवसाय–जवाहरनगर, ऑर्डनन्स फॅक्टरीत, भंडारा येथे नोकरी. वास्तव्य–भंडारा.
कन्या : **सरिता**–वय १० वर्षे.
६९/९ **संजय यशवंत**–वय २० वर्षे.
७०/९ **संदीप यशवंत**–वय १६ वर्षे.
७१/८ **अविनाश विठ्ठल**जन्म २० ।८ ।१९४१.
शिक्षण–डी. ई. ई., टी. टी. टी. सी. (टेक्निकल टीचर्स–ट्रेनिंग कोर्स. व्यवसाय–लेक्चरर-इलेक्ट्रिकल इंजि. सरकारी तंत्रनिकेतन (पॉलीटेक्निक) नागपूर.
वास्तव्य– प्लॉट नं. २१, रिझर्व बँक कॉलनी, जयप्रकाशनगर, खामला, नागपूर–४४००२५.
भार्या : **प्रतिभा**–माहेर–विद्या कृष्णराव सरंजामे. नागपूर.
कन्या : **गौरी**–जन्म २० ।६ ।१९७१. शिक्षण–सेकंड ईयर, डिप्लोमा, कॉम्प्युटर.
७२/८ **विजय विठ्ठल**–जन्म १९४८.
व्यवसाय–खामगांव येथे लेक्चरर.
क**अनुराधा**–वय ४ वर्षे.
७३/९ **आशिष विजय**–वय ८ वर्षे.
७४/७ **त्रिंबक शिवराम**–जन्म १९००. मृत्यू ३० ।६ ।१९७२. व्यवसाय–सुरवातीला मिलीटरीत व व्हॉलंटरी रिटायरमेंट नंतर गिरणीत, वऱ्हाडात नोकरी.
वास्तव्य–अकोला.
भार्या : **उमाबाई**–
कन्या :
१) **प्रमिला**–सासर–प्रमिला अनंत लिमये. सीताबर्डी, नागपूर.
२) **सुशिला**–सासर–विजया यशवंत जोशी. नागपूर.
३) **सरल**–सासर–वसुधा वसंत परांजपे, नागपूर.
७५/८ **श्रीकृष्ण (तात्यासाहेब) त्रिंबक**–शिक्षण–बी. ए. व्यवसाय–इनकमटॅक्स खात्या मधून निवृत्त.
वास्तव्य–निरंजन, इनकमटॅक्स ले ऑऊट, प्रतापनगर, नागपूर.
भार्या : माहेर–वझे, अकोला.
७६/९ **निरंजन श्रीकृष्ण**–वय १८ वर्षे.
७७/८ **अरविंद त्रिंबक**–जन्म २५ ।२ ।१९३५ परतवाडा येथे. शिक्षण–एम्. ए. (इंग्रजी) एम्. ए. (इतिहास) व्यवसाय–देऊळगाव राजा येथें श्री वेंकटेश कला व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य.
वास्तव्य–३५, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर.
भार्या : **अनुराधा**–माहेर–दामले, यवतमाळ.
कन्या : **उत्पला**–जन्म १९६९.
७८/९ **आनंद अरविंद**–जन्म १९६९.
७९/९ **प्रसाद अरविंद**–जन्म १९७६.
८०/८ **रमेश त्रिंबक**–मृत १९८१. अविवाहित होते.
८१/६ **गंगाधर दिनकर**–हे शाळामास्तर होते. परंतु त्यांची अधिक माहिती मिळाली नाही.
८२/७ **रामचंद्र गंगाधर**–जन्म १८९३ मृत्यू १९४८.
व्यवसाय–भिक्षुकी व पावस येथे दुकानात खाजगी नोकरी.
भार्या : **जानकी**–जन्म १८९५. माहेर–पालकर. ही वयाच्या ८८ व्या वर्षी इ.स. १९८३ मध्ये पावस येथे मृत्यू पावली.
कन्या :
१) **मनी**–सासर–पति–श्री. भास्कर भावे. वास्तव्य–जून (कोतवडे).
२) **यमुनाबाई**–सासर–आनंदी नरहर दामले. कोंळंबे. मृत्यू १९८४.
८३/८ **नारायण रामचंद्र**–जन्म १९११. मृत्यू २३ ।५ ।१९७७. व्यवसाय–फिनिक्स मिल, मुंबई येथे नोकरी.
भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–चंपूताई रामचंद्र केळकर. कोळंबे, रत्नागिरी. सध्या वास्तव्य–३७ गोपाळ भुवन, खेड गल्ली, प्रभादेवी, मुंबई–२५.
कन्या : १) **कमल**–सासर–उर्मिला श्रीकृष्ण दीक्षित. व्यवसाय–मुंबई महानगरपालिकेत शिक्षिका.
वास्तव्य–मुलुंड.
२) **शकुंतला (बेबी)** –सासर–मीनल सतीश मराठे.
वास्तव्य–कुर्ला.
८४/९ **विजय नारायण**–जन्म ७ ।४ ।१९४५.

शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—फिनिक्स मिल मध्ये १२ वर्षे नोकरी. प्रवास व क्रिकेटची आवड.
वास्तव्य—३७ गोपाळभुवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, प्रभादेवी, मुंबई—२५.
भार्या : **वनिता**–माहेर—मंदाकिनी नारायण फडके. रा. कुर्धे. नंतर सांताक्रूझ, मुंबई.
कन्या : अलका–जन्म २५ ।१ ।१९७७. इ. ७ वीत शिकत आहे.
८५/१० **अतुल विजय**–जन्म ९ ।६ ।१९७५.
शिक्षण—एस्. एस्. सी.
८६/९ **यशवंत नारायण**–जन्म २० ।१ ।१९५१.
शिक्षण—मेकॅनिकल ड्राफ्ट्समन. व्यवसाय—ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक कंपनी, ठाणे येथे नोकरी. चित्रकला व प्रवासाची आवड. कानावर जन्मल्यापासून असलेली **चामखिळाची खूण** १९६८ मध्ये ऑपरेशनने काढून टाकली. वास्तव्य— साईनाथ प्रसाद, खोली नं. ५, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **वैशाली**–माहेर—रत्नप्रभा प्रभाकर पेंडसे, ठाणे.
पुत्र–**संदीप**–जन्म १९८०.
८७/९ **विनायक नारायण**–जन्म १९४७. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—ऑटोमॅटीक कंपनी, वागळे इस्टेट, ठाणे येथे नोकरी. वास्तव्य—शशिकला को-ऑप. हौसि. सो. टिळकनगर, डोंबिवली (पूर्व).
भार्या : प्राची–माहेर—संध्या गजानन काळे. पुणे.
कन्या : **मुग्धा**–जन्म १२ ।१२ ।१९८०. शाळेत शिकत आहे.
८८/१० **आल्हाद विनायक**–जन्म ३ ।५ ।१९७८. शिकत आहे.
८९/८ **कृष्णाजी रामचंद्र**–जन्म १९२४. मृत्यू १९७४. यांनी लाकडाची सॉ मिल व पिठाची गिरणी इ. व्यवसाय पावस येथे सुरू केले.
भार्या : **सुशिलाबाई**–माहेर—सीताबाई सखाराम खाडिलकर.
कन्या :
१) **संध्या**–अविवाहित. मृत.
२) **सुमन**–सासर—बर्वे. वास्तव्य—गंगामाधव भुवन, ब्राह्मणवाडी, माटुंगा (पूर्व), मध्य रेल्वे. मुंबई—१९.
९०/९ **शशिकांत कृष्णाजी**–व्यवसाय—पावस येथे ट्रक ट्रान्सपोर्टचा व्यवसाय.
भार्या : **वृंदा**–माहेर—सुमीता पद्माकर आगाशे. रा. चरंद माखझन.
कन्या :
१) **लीना**–जन्म १४ ।४ ।१९८३. शिकत आहे.
२) **रूपाली**–जन्म ७ ।५ ।१९८४. शिकत आहे.
३) **मंजिरी**–जन्म ११ ।१० ।१९८६. शिकत आहे.
९१/९ **सुधीर कृष्णाजी**–व्यवसाय—पावस येथे ट्रक ट्रान्सपोर्टचा व्यवसाय.
भार्या : **वर्षा**–माहेर—सुजाता गंगाधर बापट. माटुंगा.
पुत्र—**मंदार**–जन्म १९ ।८ ।१९८७.
९२/८ **रघुनाथ रामचंद्र**– #
९३/८ **गोविंद रामचंद्र**–जन्म २ ।५ ।१९३२.
शिक्षण—मराठी ७ वी, इंग्रजी ५ वी पास.
व्यवसाय—मुंबईत कापड दुकानात नोकरी. नंतर १९७८ पासून पावस येथे सॉ मिल व गिरणीचा व्यवसाय.
वास्तव्य—पावस ता. जि. रत्नागिरी.
भार्या : **निर्मला**–माहेर—कमल राजाराम जोगळेकर. खर्डी, दापोली.
कन्या : **लता**–जन्म १९६४. शिक्षण—१२ वी पास. सासर—लता पांडुरंग नेने, अलिबाग. सध्याचे वास्तव्य—विजयनगर कॉलनी, अंधेरी (पू.) मुंबई.
९४/९ **शेखर गोविंद**–जन्म १९६६. व्यवसाय—पावस येथे ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करतो.
९५/८ **गणेश (गजानन) रामचंद्र**–जन्म २६ ।१२ ।१९३८. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—पश्चिम रेल्वेत चीफ ट्रॅक्शन फोरमन. वास्तव्य—बी/५, झपूर्झा सहकारी सोसायटी, जुना नागरदास क्रॉस रोड, अंधेरी (पू.) मुंबई.
भार्या : **सरिता**–जन्म २२ ।१० ।१९४५. माहेर—उषा हरिभाऊ गोखले, बेळगांव. मुंबई महानगरपालिकेत शिक्षिकेची नोकरी.
कन्या :
१) **चित्रा**–जन्म ८ ।९ ।१९७१. एफ. वाय. बी. एस. शिकत आहे.
२) **उत्तरा**–जन्म २४ ।४ ।१९७४. इ. १० वी त शिकत आहे.
९६/९ **विवेक गजानन**–जन्म २ ।१ ।१९७७. इ. ७ वी

त शिकत आहे.
९७/५ **कृष्णा केशवभट–** #
९८/६ **जनार्दन कृष्णा–** #
९९/५ **हरि केशवभट–** #
१००/६ **वामन हरि–** #
१०१/६ **गोविंद हरि**–मृत्यू १९०६ मुंबई येथे. व्यवसाय–मुंबई येथे सरकारी नोकरीत होते.
भार्या : **लक्ष्मीबाई–**
कन्या :
१) **कृष्णाबाई**–सासर–पाटणकर.
२) **अंबूताई**–सासर–लक्ष्मीबाई नरहर जोग.
१०२/७ **नरहर (भाऊराव) गोविंद**–जन्म १४ ।९ ।१९०४. मृत्यू १३ ।७ ।१९८२. शिक्षण–बी. ए, एल. एल्. बी. व्यवसाय–वकील पुणे येथे. हे भाऊराव अभ्यंकर म्हणून ओळखले जात होते. ते तीन वर्षाचे असतानाच त्यांचे वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांची आई मुलांसह त्यांचे मामेभाऊ गोखले यांचेकडे पुण्यास रहावयास आली. बालपण कष्टात गेले. मॅट्रिक परीक्षेनंतर पुणे नगरपालिकेमध्ये नोकरी धरली व नोकरी सांभाळून शिक्षण पूर्ण केले व वकीली सुरू केली. त्यांचा पिंड जात्याच संघटकाचा व समाजसेवेचा होता. त्यामुळे ते हिंदुमहासभेच्या कार्यात पडले. नंतर सन १९३५ पासून राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्यात भाग घेऊ लागले. त्यांचा डॉ. हेगडेवार आणि स्वा. सावरकर यांचेशी घनिष्ठ संबंध येऊन त्या दोघांचेही ते निष्ठावान व कट्टर अनुयायी आणि पुढे विश्वासू सहकारी बनले. भाऊराव स्वा. सावरकरांचे कायदेशीर सल्लागारही होते. हिंदुमहासभेच्या संघटनेत पुणे जिल्हा हिंदुसभेचे अध्यक्ष म्हणून तर रा. स्व. संघाचे प्रथम पुणे शहर, नंतर पुणे जिल्हा संचालक म्हणून भाऊरावानी कार्य केले. वरील दोन्ही संघटनांच्या कार्याच्या संदर्भात त्याना पाच वेळा कारावास भोगावा लागला. पुण्याच्या सोन्या मारुती सत्याग्रह, १९४८–४९ मध्ये संघबंदीचे काळात विरोधी सत्याग्रहांत अशी एकूण पांच वर्षाहून अधिक काळ तुरुंगात खितपत पडावे लागले. १९३८ ते १९४५ या काळात लोकशाही स्वराज्य पक्षातर्फे ते २ वेळा पुणे नगरपालिकेवर निवडून गेले होते. या दोन संघटना व्यतिरिक्त भाऊराव हे इतर सामाजिक कार्यातही अग्रभागी होते. पुणे शिक्षण प्रसारक मंडळी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यांत ते पदाधिकारी होते. तसेच पुणे नगरवाचन मंदिर, पुणे मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे सार्वजानिक सभा, पुणे अनाथ महिलाश्रम प्राथमिक शिक्षण संस्था इ. विविध संस्थामधून त्यानी पदाधिकारी म्हणून कार्य केले. वास्तव्य–१२०६/बी१, शिवाजीनगर, डेक्कन जिमखाना, पुणे–४.
भार्या : **जानकीबाई**–माहेर–जानकी दत्तात्रय आठवले. चिंचली, व जि. धारवाड. मृत्यू १९७६.
१०३/८ **बळवंत नरहर**–जन्म १९५६. मृत्यू १९७६.
भार्या : **अनुराधा–**
कन्या : **आसावरी–**
१०४/८ **विनायक नरहर**–जन्म २३ ।७ ।१९५९. शिक्षण–बी. ए, एल. एल्. बी. व्यवसाय–वकील पुणे येथे. वास्तव्य–७५९/११९ प्रभात रस्ता, गल्ली नं. २, पुणे–४.
भार्या : **मेघना**–माहेर–जयश्री केशव भांबुरकर, नागपूर. शिक्षण–बी. ए. चालू आहे.
कन्या : **देवयानी**–जन्म ११ ।११ ।७९. शिक्षण–इ. ५ वी त शिकत आहे.
१०५/५ **पांडुरंग केशवभट–** #
१०६/४ **काशीनाथ रामचंद्रपंत**–अपत्य नाही.
१०७/४ **विठ्ठल रामचंद्रपंत**–अपत्य नाही.

कुर्धे–पावस–तिरडे–अभ्यंकर घराणे क्रमांक १७

वंशावळी क्रमांक २

कुर्धे–पावस–पुणे–मुंबई

#

पावस मूळगाव म्हणून सांगणारे आणखी एक-दोन कुटुंबे आढळली परंतु त्यानी दिलेल्या माहितीवरून त्यांच्या वंशावळीतील पूर्वजांचा नाते-संबंध मूळ पावस घराण्यातील वंशावळीशी जोडता आलेला नाही. त्याचे मुख्य कारण त्यांच्या पूर्वजांची व्यक्तिगत माहिती अपुरी

कुर्वे--पावस--तिरडे--अभ्यंकर घराणे क्रमांक १७

वंशावळी क्रमांक २

कुर्वे--पावस-पुणे-मुंबई



हे होय. अशा एका वंशावळीस पावस–पुणे–मुंबई असे संबोधून ती वंशावळी आणि व्यक्तिपरिचय पुढे दिला आहे.

१०८/३ **लक्ष्मण महादेव–** #
१०९/४ **पांडुरंग लक्ष्मण–** #
११०/५ **काशीनाथ पांडुरंग–** #
१११/६ **रघुनाथ काशीनाथ**–मृत्यू २३ ।१२ ।१९४४, पुणे येथें.
भार्या : **जानकीबाई**–माहेर–मैनाबाई गंगाधर काळे. बुधवार पेठ, पुणे.
कन्या :
१) **यमुना**–सासर–सरस्वती लवाटे. घंटाळी, ठाणे. हयात.
२) **कमल–सासर**–ओगले. श्रीरामपूर. मृत.
३) **अंबू**–सासर–केळकर. मृत.
४) **कुसुम**–सासर–करंदीकर.

११२/७ **गणेश (बाळू) रघुनाथ**–मृत्यू डिसेंबर, १९८८.
भार्या : **नलिनी**–माहेर–गोरे.
कन्या : **आशा**–सासर–खडकीकर. पुणे.

११३/७ **राजाराम रघुनाथ**–जन्म १४ ।११ ।१९१५, चिकोडी. शिक्षण–आर्किटेक्ट. व्यवसाय– स्वत:चा आर्किटेक्टचा धंदा. वास्तव्य–सी ९/१३ जीवन विमानगर, रस्ता क्र. ४. बोरीवली (पश्चिम) मुंबई–१०३.
भार्या : **तारामती**–माहेर–तारामती गणेश शिंत्रे. नागपूर.
श्रीकांत टाईपरायटींग व शॉर्टहॅंड संस्था स्वत: बोरिवली येथे चालवतात.
कन्या : **सुनंदा**–जन्म २७ ।८ ।१९४७. शिक्षण–बी. ए.

एल्. एल्. बी. व्यवसाय—स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये ऑफिसर. सासर—नीना शंकर छत्रे.
११४/८ **श्रीकांत राजाराम**–जन्म १५ ।४ ।१९४९. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—मुंबई विद्यापीठांत नोकरी. वास्तव्य—सी ९/१३ जीवन विमानगर, बोरिवली (प) मुंबई—१०३.
भार्या : **छाया**–शिक्षण—बी. ए. माहेर—छाया अनंत गोरे.
कन्या :
१) **गौरी**–जन्म-सप्टेंबर, १९८०.
२) **पद्मावती**–जन्म २७ ।६ ।१९८४.
११५/७ **पांडुरंग रघुनाथ**–जन्म १ ।३ ।१९२४, पंढरपूर. शिक्षण—बी. इ. (मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल), मुंबई विद्यापीठ. व्यवसाय—स्वत:च्या खालील कारखान्यांत काम करतात. १) क्यूएस् इंजिनियररींग प्रायव्हेट लिमिटेड. २) बोऊडेटस् प्रोसेसर प्रायव्हेट लिमिटेड ३) पुणे फीन टुल्स प्रायव्हेट लिमिटेड. व्यवसायानिमित्त युरोप, अमेरिका येथे प्रवास. हायेस्ट नॅशनल इनव्हेनशन ॲवार्ड १९७५ चे प्राप्त. वास्तव्य—३९/५५ एरंडवणे, कचरेवाडी, प्रभात गल्ली नं ९ ब, शाम बंगला. पुणे—४.
भार्या : **विजया**–माहेर—शरयू गणेश शिंत्रे. नागपूर. टीप—राजाराम व पांडुरंग रघुनाथ यांच्या भार्या सख्ख्या बहिणी आहेत.
कन्या :
१) **भारती**–जन्म ६ ।३ ।१९५३. शिक्षण—एम्. एस. सासर—भारती विनायक जोशी. पति—विनायक विष्णू जोशी. मालाड, मुंबई—६४.
२) **संपदा**–जन्म २५ ।९ ।१९५७. शिक्षण—एम्. डी. एस् सासर—संपदा श्रीराम कानिटकर. सांगली—४१६४१६. पति- श्रीराम गोपाळ कानिटकर. चंद्रमणी, विश्रामबाग, सांगली.
११६/८ **सुमधुर पांडुरंग**–जन्म २२ ।४ ।१९६२. शिक्षण—बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स) ए. एम्. आय. ई.
११७/७ **हरि रघुनाथ**–शिक्षण—बी. ई. (मॅकेनिकल). व्यवसाय—प्रथम व्होल्टाज इंडिया, ठाणे येथे वर्क्स मॅनेजर नंतर स्वत:चा कन्सल्टन्सीचा व्यवसाय. वास्तव्य—विकास, पॅराडाईज सिनेमा लेन, माहीम. मुंबई—१६.
भार्या : **नर्मदा**–माहेर—नर्मदा गोडसे, वरसई.
कन्या : **ललिता**–जन्म ९ ।१ ।१९६२. सासर—लेले.
११८/८ **सुनिल हरि**–जन्म १९ ।४ ।१९५८. शिक्षण—एम्. डी. (पेडिऑट्रिक). वास्तव्य—सध्या अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी वास्तव्य.
भार्या : **नीता**–माहेर—पाध्ये. पुणे.

घराणे क्रमांक १८

कुर्धे–पावस–उज्जैन

१/१ **रघुनाथ**–हा ज्ञात मूळ पुरुष.
२/२ **धोंडो रघुनाथ**– #
३/३ **गोविंद धोंडो**–वास्तव्य—उज्जैन.
कन्या :
१) **कुसुम**–जन्म १९३०. सासर—कुसुम मधुसूदन थत्ते. वास्तव्य—ओएॅसीस, फ्लॅट नं. २२. जयभवानीमाता रोड. अंधेरी (प.), अंबोली, याज्ञिकनगर, मुंबई—५८.
२) **सुमन**–जन्म १९२५. सासर—सुमन धोंडोपंत केळकर. रा. बडवाणी (म. प्र.).
४/४ **रघुनाथ गोविंद**–जन्म १९१३ शिवपुरी येथे. मृत्यू ७ ।५ ।१९७२ उज्जैन येथे.
वास्तव्य—उज्जैन.(म. प्र.)
भार्या : **लीला**–जन्म १९२५. मृत्यू ७ ।४ ।१९६८. माहेर—लीला नीळकंठ लोंढे. इंदूर. (म. प्र)
कन्या : **शीला**–जन्म १८ ।१० ।१९५२. शिक्षण—एम्. ए. (व्होकल क्लासिकल म्युझिक.) सासर—शीला श्रीराम बापट. व्यवसाय—संगीत शिक्षण वर्ग. वास्तव्य—जी. २८ अलेंबिक कॉलनी, बडोदे—३.
५/५ **अनिल रघुनाथ**–जन्म २१ ।५ ।१९४७. शिक्षण—बी. एस्सी. व्यवसाय—पब्लिक वर्कस् डिपार्टमेंटच्या सॉईल टेस्टिंग लॅबोरेटरींत रीसर्च असिस्टंट म्हणून नोकरी. संगीत गायक. वास्तव्य—१२५ दशहरा मैदान, मोतीलाल नेहरू नगर, उज्जैन (म. प्र.).
भार्या : **माणिक**–माहेर—माणिक भालचंद्र आपटे. महू (म. प्र.).
कन्या : **मीनल**–जन्म २२ ।३ ।१९८०. इ. ५ वी त

घराणे क्र. १८

कुर्धे--पावस-उज्जैन



शिकत आहे.

६/६ मनिष अनिल–जन्म २३ ।९ ।१९७७. इ. ८ वीत शिकत आहे.

७/५ **चिंतामण रघुनाथ**–जन्म ३१ ।१ ।१९५५. उज्जैन. शिक्षण–बी. एस्सी; बी. एस्सी (टेक); डी. एम्. एम्. व्यवसाय–बॉम्बे डाईंग ग्रुप मध्ये टेक्निकल सर्व्हिसचे प्रमुख, मुंबई. कंपनीतर्फे स्पेन, हॉलंड, जर्मनी व अमेरिका येथे प्रवास केला. वास्तव्य–ए /१३, बसवेश्वर कृपा, पंचायत बिहिरीजवळ, डोंबिवली (पूर्व).

भार्या : **पद्मजा**–माहेर–पद्मजा विक्रम ओक. इंदूर.

कन्या : **आरोही**–जन्म ३० ।७ ।१९८८.

८/६ **प्रतिक चिंतामण**–जन्म १९ ।९ ।१९८१. शिकत आहे.

९/४ दत्तात्रय गोविंद– #

१०/४ शंकर गोविंद–जन्म १९२०.

वास्तव्य–महांकाळ कॉलनी. उज्जैन (म. प्र.).

भार्या : **सुमन**–माहेर–सुमन भोगले. तुपटाकळी.

कन्या : **सुलेखा**–सासर–सुलेखा गिरीश काणे. इंदूर.

११/५ **सुधीर शंकर**–जन्म २० ।१२ ।१९५३.

शिक्षण–बी. एस्सी., डी. इ. आर. इ. व्यवसाय–कॉम्प्युटर इंजिनियरचा स्वत:चा व्यवसाय आहे.

वास्तव्य–३०२ अ/शांता ज्योत शॉपिंग सेंटर, स्टेशन रोड, वसई, जि. ठाणे.

भार्या : **सविता**–शिक्षण–एम्. एस्सी. माहेर–सविता रामचंद्र करंदीकर. व्यवसाय–स्टेट बँकेत नोकरी.

कन्या :

१) **सुरभी**–जन्म २२ ।८ ।१९८२. इ. ३ रीत शिकत आहे.

२) **संपदा**–जन्म २ ।६ ।१९८६. ज्यू. के. जी.

१२/५ **मोहन शंकर**–जन्म १९६४. शिक्षण–एस्. एस्. सी.

१३/४ **गंगाधर गोविंद**–वास्तव्य–कर्नाटक हायस्कूलच्या मागे, डेक्कन जिमखाना, पुणे.

१३/४ **गंगाधर गोविंद**–वास्तव्य–कर्नाटक हायस्कूलच्या मागे, डेक्कन जिमखाना, पुणे.
भार्या : **विद्या**–
कन्या :
१) **मीना**–सासर–केतकर. विलेपार्ले.
२) **माधुरी**–सासर–केळकर. पुणे.
१४/५ **अजित गंगाधर**–जन्म १९७७. इ. ८ वीत शिकत आहे.
१५/३ **बळवंत धोंडो**– #
१६/४ **रामचंद्र बळवंत**– #

गावडे आंबेरे घराणे

गावडे आंबेरे हे गांव रत्नागिरीपासून २६ कि.मी वर रत्नागिरी—भडे या रस्त्यावर आणि पावस पासून ६ कि. मी. वर आहे. मावळंगे जवळील नदीला पावसात पूर येत असल्याकारणाने व नदीवर पूल नसल्याकारणाने बसने जाणारी वाहतूक पावसात काही काळ खंडित होते. गावडे आंबेरे या ठिकाणी १२ वाड्या असून एकूण लोकवस्ती २००० चे आसपास आहे पाटाच्या बाजूने काळथर दगडांनी सडक बांधलेली असून दोन्ही बाजूला घरे आहेत. हे गांव अंदाजे १२०० वर्षांपूर्वी वसविलेले होते असे म्हणतात. या ठिकाणची प्राथमिक शाळा इ.स. १८७५ साली स्थापन झाली व तिथून ती हल्लीच्या जागी इ.स. १९७५ मध्ये बांधण्यात आली. पाटाच्या वरच्या बाजूस अभ्यंकरांची तीन घरे असून पाटाच्या खालच्या बाजूस विश्वेश्वर मंदिराजवळ तीन घरे आहेत. पैकी सध्या वास्तव्य फक्त एकाच घरात आहे. व्यवसाय मुख्यत्वे शेती, बागायती व भिक्षुकी आहे. अभ्यंकरांप्रमाणेच केळकर, फडके, इ. ब्राम्हण कुटुंबे रहातात. कुर्धे या गावी ज्या वेळेस वस्ती अभ्यंकर—खोत यांनी केली, त्याच सुमारास गावडे—आंबेरे येथेही अभ्यंकर कुटुंबे रहावयास आली असावी असे दिसते. सध्या अस्तित्वात असलेली घरे व वास्तव्य करीत असलेल्यांची नावे पुढीलप्रमाणे :—

१) डॉ. भालचंद्र रामचंद्र अभ्यंकर, पुणे यांची मातोश्री सीताबाई रामचंद्र अभ्यंकर, वय ८० २) जगन्नाथ सखाराम अभ्यंकर ३) महादेव गंगाधर अभ्यंकर ४) मधुसूदन दामोदर व दत्तात्रय दामोदर अभ्यंकर यांचे घर—घरात वास्तव्य नाही. ५) शंकर गोविंद अभ्यंकर (कंत्राणे) उपाध्ये. ६) शंकर अनंत अभ्यंकर — वास्तव्य नाही — मृत १९८७. ७) नारो बाबजी अभ्यंकर — नगरकर यांचे घरात वस्ती नाही.

तथापि गावडे आंबेरे हे आपले मूळगांव आहे असें सांगून माहिती देणाऱ्या बंधूचे शक्यतो त्या त्या घराण्यात अंतर्भाव करून वंशावळीतील बंधूंच्या स्थलांतरानुसार घराण्यांचे क्रमांक खालीलप्रमाणे दिले आहेत.

कुलधर्म व कुलाचार –गावडे आंबेरे येथील सर्व अभ्यंकर कुटुंबांत गुहागरचा व्याडेश्वर कुलदेव व अंबेजोगाईची योगेश्वरी कुलदेवता मानतात. कुलधर्म म्हणून मार्गशीर्ष महिन्यात बोडण घालण्याची पद्धत आहे. नवरात्रांत देवीचा उत्सव असतो. महालक्ष्मीची पूजा करण्याची प्रथा आहे. त्याशिवाय ग्रामदेवता म्हणून जाखाई, जुखाई व काशी विश्वेश्वराची पूजा करतात.

गावडे आंबेरे घराणे क्रमांक १

गावडे आंबेरे–नाखरे–मुंबई–पुणे.

१/१ **वामन–** # ज्ञात मूळपुरूष
२/२ **रघुनाथ वामन–** #
कन्या :
१) **जिऊ बाई**–इतर माहिती मिळाली नाही.
२) **येसू बाई**–इतर माहिती मिळाली नाही.
३) **वाराणशी**–इतर माहिती मिळाली नाही.
४) **भीमा**–इतर माहिती मिळाली नाही.
५) **दुर्गा**–इतर माहिती मिळाली नाही.
३/३ **वामन रघुनाथ**–अपत्य नाही.
४/३ **सदाशिव रघुनाथ–** # यांना ५ पुत्र व १ कन्या.
कन्या : **वेणू**–इतर माहिती मिळाली नाही.
५/४ **सीताराम सदाशिव–** #
६/४ **विश्वनाथ सदाशिव**–जन्म १८७०. मृत्यू १९४३.
भार्या : **भागिरथी उर्फ सगुणा–**
कन्या : **लीलावती–**
७/५ **विद्याधर विश्वनाथ**–जन्म २ ।२ ।१९१४. कराची येथे. मृत्यू १९ ।१ ।१९८५. दादर मुंबई.
भार्या : **इंदुमती**–सासर—इंदुमती जनार्दन गोखले. जन्म १९२३. हयात.
कन्या : **नलिनी**–जन्म १९४१.सासर—प्रभावती श्रीधर जोगळेकर.
८/६ **प्रभाकर विद्याधर**–जन्म २७ ।७ ।१९४१, मुंबई येथे. शिक्षण—बी. एस्सी., डी. ई. आर. ई., डी. ओ. आर.

गावडे आंबेरे घराणे क्रमांक १

गावडे आंबेरे–नाखरे–मुबंई–पुणे



एम्. नोकरी–निर्मल रोलर बेअरिंग कं. (एन्.आर.बी.) ठाणे येथे. कंपनीतर्फे फ्रान्सला काही काळ वास्तव्य होते.
वास्तव्य–२६/ब, सुमंगल सोसायटी, ईस्टर्न एक्सप्रेस हायवेजवळ, चुनाभट्टी, मुंबई–२२.
भार्या : **मृणालिनी** –माहेर–वासंती दत्तात्रय साने. चिपळूण.

९/७ **मनमोहन प्रभाकर**–जन्म २ ।६ ।१९७०.
शिक्षण–बी.कॉम्. द्वितीय वर्ष शिकत आहे.
१०/७ **मयुरेश प्रभाकर**–जन्म १६ ।३ ।१९७५. इयत्ता १० वीत शिकत आहे.
११/६ **मकरंद विद्याधर**–जन्म १९६४.
शिक्षण–बी.ए.एम्.एस्. उत्तीर्ण.

१२/४ **गोविंद सदाशिव–** #
भार्या : **गंगा–**
कन्या : **भीमाताई–**
१३/४ **चिंतामणी सदाशिव–** #
१४/४ **दिनकर सदाशिव**–वयाचे ६५ व्या वर्षी मृत्यू. व्यवसाय–पोष्टखात्यात नोकरी. वास्तव्य–केशवजी नाईक चाळ, गिरगांव, मुंबई.
भार्या : **गौरी**–माहेर–यांना ४ पुत्र.
१५/५ **रघुनाथ दिनकर**–शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–पोष्टात नोकरी.
भार्या : **गौरीबाई–**
कन्या :
१) **भाग्यश्री**–सासर–बर्वे.
२) **इंदू**–सासर–केळकर.
३) **मनुताई–**
१६/६ **भास्कर रघुनाथ**–जन्म माहित नाही. मृत्यू २३ ।६ ।१९८३. गिरगांव येथील विठोबाशेठ अभ्यंकर यांची टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट चालवावयास इ.स. १९८० मध्ये घेतली.
भार्या : **प्रभावती**–माहेर–कमल दत्तात्रय काळे. बडोदे. वास्तव्य–९३ ।११५, कोळ्याची चाळ, फणस वाडी, मुंबई.
कन्या :
१) **मंगल**–जन्म १९५१. सासर–साठे. दिल्ली.
२) **शरयू**–जन्म १९४५. सासर–गणपुले. दादर.
१७/७ **अशोक भास्कर**–जन्म १४ ।१ ।१९४८. मुंबई. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– वडिलांनी घेतलेली टाईपरायटिंग संस्था–अभ्यंकर्स शॉर्टहँड अँड टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट, १७८, प्रार्थना समाज, गिरगाव, मुंबई–४. ही संस्था नावारुपास आणण्यासाठी खूप धडपड. लेसर बीमने टाईप सेटींगचे आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून इंग्रजी, हिंदी, मराठी व गुजराथी भाषांमध्ये तिथें कामे केली जातात. दिलदार व हुरहुन्नरी स्वभाव. त्यामुळे लोकप्रिय. गाणे, यंत्र दुरुस्ती, पोहणे, योगासने इ. ची आवड, १९८१/८२ मध्ये बँकॉक, सिंगापूर येथे परदेशगमन. फोटो कॉपीअर व इलेक्ट्रॉनिक टाईपरायटरचे व्यावसायिक शिक्षण अवगत. वास्तव्य – ९३ ।११५ कोळ्याची चाळ, फणसवाडी, मुंबई–२.
भार्या : **विद्यागौरी**–माहेर–विद्या दत्तात्रय साने. पुणे.
कन्या :
१) **लिना**–जन्म २४ ।२ ।१९७७. इयत्ता ६ वी त शिकत आहे.
२) **हेमांगी**–जन्म ५ ।१ ।१९८१. इयत्ता २ रीत शिकत आहे.
१८/७ **अरुण भास्कर**–जन्म १९५४. कॉम्प्युटर व टाईपरायटिंगचे व्यावसायिक शिक्षण – टाईपरायटिंग इन्स्टि. मध्ये भागीदार. वास्तव्य–९३/११५, कोळ्याची चाळ, फणसवाडी, मुंबई–२.
भार्या : **ज्योत्स्ना**–माहेर–जोशी.
१९/८ **आशुतोष अरुण**–जन्म ४ ।१२ ।१९८५.
२०/५ **गणेश दिनकर**–नोकरी नाही. धंदा होता.
भार्या : **सारजा (शारदाबाई)** –माहेर–वारुणी लेले, गोळप. ता. रत्नागिरी.
२१/५ **विनायक दिनकर**–जन्म १९००. मृत्यू २८ ।५ ।१९५३. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– मुंबई येथे म्युनिसिपालिटीत नोकरी. वास्तव्य–मांगलवाडी गिरगांव, मुंबई–४.
भार्या : **इंद्रिराबाई (उमा काकू)** –माहेर–कृष्णाबाई काशीनाथ सोहनी. जन्म १९१२. मृत.
कन्या : **सुनंदा**–जन्म ४ ।३ ।१९३६. सासर–सुनिती दत्तात्रय आगाशे, शुक्रवार पेठ, पुणे. हल्ली वास्तव्य–युनायटेड वेस्टर्न बँकेवर, दामलेवाडा, बाजीप्रभू चौक, फडके रस्ता, डोंबिवली. (पूर्व).
२२/६ **श्रीधर विनायक**–जन्म १५ ।४ ।१९२८. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमधून निवृत्त. वास्तव्य–१८४/ब विष्णुपद्म सोसायटी, शनिवार पेठ, पुणे–३०.
भार्या : **सुशिला**–जन्म २१ ।८ ।१९३९. माहेर–सुशिला डोंगरे, मळेवाड, ता. सावंतवाडी.
कन्या :
१) **सुरेखा**–जन्म २० ।७ ।१९६३. सासर–सुप्रिया शिरीष सोवनी. गोखले इन्स्टिट्यूट, पुणे येथे नोकरी. पति–शिरीष घनःश्याम सोवनी, डोंबिवली.
२) **सुगंधा**–जन्म १९ ।५ ।१९६८.
२३/६ **वामन विनायक**–जन्म ५ ।८ ।१९३०.

शिक्षण–बी. ए. व्यवसाय–लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये नोकरी. वास्तव्य–जीवनसुधा सोसायटी. जुहूलेन, अंधेरी (प.)
भार्या : **सुनीता–जन्म** १५ ।२ ।१९४१. शिक्षण–बी. ए., बी. एड्. शिक्षिका. माहेर–मालती मराठे, कुर्धे.
कन्या :
१) **मेधा–जन्म** २ ।४ ।१९६६. शिक्षण–बी. ई. (केमिस्ट्री) एम्. एस्सी.
२) **मनीषा–जन्म** ८ ।६ ।१९६८. शिक्षण–एस्. एस्सी.

२४/६ **माधव विनायक–जन्म** ७ ।९ ।१९३८. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये अकौंट्स् ऑफिसर.
भार्या : **शीला**–माहेर–शीला जोगळेकर. गोरेगांवकर चाळ, गिरगांव, मुंबई–४.
कन्या : **शिल्पा–जन्म** १८ ।११ ।१९७६.

२५/६ **विजय विनायक–जन्म** १६ ।९ ।१९३३ शिक्षण–बी. ए. व्यवसाय–नॅशनल व ग्रिंडलेज बँकेत नोकरी.
भार्या : **सरला**–माहेर–सरला मनसुखानी. शिक्षण–बी. एस्सी. ग्रिंडलेज बँकेत नोकरी.
कन्या : **दीपिका–जन्म** २८ ।१२ ।१९७७.
पुत्र–**पवन–जन्म** १८ ।१२ ।१९७३.

२६/६ **दत्तात्रय विनायक–जन्म** ११ ।७ ।१९४७. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–जी. के. डब्ल्यू. भांडूप येथे ऑपरेटर म्हणून नोकरी. वास्तव्य–१२/२, मंजुळा सोसायटी, घनःश्याम गुप्ते रोड, डोंबिवली (पश्चिम).
भार्या : **सुवर्णा**–माहेर–कुमुद त्रिंबक सोहनी, म्हसेळें. ता. श्रीवर्धन. वय–५६. अपत्य नाही.

२७/५ **रामचंद्र दिनकर**–जन्म गावडे आंबेरे येथे. मृत्यू २१ ।३ ।१९३५. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–जी. आय. पी. रेल्वेमध्ये १९३१ पर्यंत नोकरी.
भार्या : १) **सीताबाई**–माहेर–दारशेतकर, गोरेगांव. (रायगड). २) **रमाबाई**–माहेर–देवधर ३) **सीताबाई**–जन्म १९१३. माहेर–काशी हरिभाऊ केळकर. वास्तव्य–गावडे आंबेरे, हयात.

२८/६ **शंकर रामचंद्र–जन्म** १९२३. शिक्षण–मराठी ४ थी व वेदविद्या. व्यवसाय–पौरोहित्य. वास्तव्य–कर्जत.
कन्या : **अलका**–सासर–अलका श्रीकृष्ण जोशी, एस्. एस्. सी. नोकरी–ऑल इंडिया रेडिओ, मुंबई. वास्तव्य–द्वारा श्री. के. जोशी अय्यंगार वाडा, विठ्ठल नगर, (गोगटे पोहा मिलजवळ) कर्जत. जि. रायगड.

२९/६ **भालचंद्र रामचंद्र**–जन्म २२ ।७ ।१९३०. शिक्षण–आयुर्वेद विशारद. व्यवसाय–सन १९५८ ते १९६८, पर्यंत चिकित्सक वैद्य म्हणून संजीवन औषधालय पुणे येथे नोकरी. शिवाय पार्ट टाईम स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय. सन १९६८ ते १९८४ – आयुर्वेद रसशाळा, कर्वे रोड, पुणे – ४ या आयुर्वेदीय औषध निर्मिती कारखान्यात प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून नोकरी. सन १९८५ पासून स्वतःचा औषध निर्मिती उद्योग 'शारंगधर फार्मासिटिकल्स्' ९१/१ पर्वती, पुणे – ९ येथे चालू वैद्यकीय व्यवसाय 'शारंगधर औषधालय', ११६८, बुधवार पुणे येथे आहे.
भार्या : **सुमती**–माहेर–सुमन रामचंद्र गोडबोले, नाशिक. जन्म १९३१. शिक्षण–बी. ए. एस्. एफ्. व्यवसाय–१९५८ ते ७२ वाडीया हॉस्पिटल पुणे येथे आर. एम्. ओ. ची नोकरी १९७२ नंतर स्वतःचा व्यवसाय.

३०/७ **मुकुंद भालचंद्र**–जन्म १८ ।८ ।१९६१. पुणे. शिक्षण–सी. ए. व्यवसाय–चार्टर्ड अकौंटंट.
भार्या : **स्वाती**–शिक्षण–बी. कॉम. माहेर–स्वाती केशव पेंडसे, सातारा.

३१/८ **श्रीरंग मुकुंद–जन्म** ३० ।१ ।१९८८.

३२/७ **जयंत भालचंद्र**–जन्म २१ ।५ ।१९६३. पुणे. शिक्षण–बी. एस्सी.; डी .ई. आर. ई व आयुर्वेदाचा बी. ए. एम्. एस्. कोर्स चालू.

३३/३ **पद्माकर रघुनाथ– #**

३४/४ **सखाराम पद्माकर**–शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–शेती, गायन आणि पेटी व तबला वादनाची आवड.
कन्या :
१) **नर्मदा**–सासर–सरस्वती नारायण गोखले, सोमेश्वर, ता. रत्नागिरी.
२) **वेणू**–सासर–लीला जगन्नाथ फडके, कुर्धे.

३५/५ **नरहर सखाराम**–व्यवसाय–भिक्षुकी शेतीसाठी गावडे आंबेरे येथून नाखरे येथे आले.

भार्या : **रमाबाई**–माहेर–द्वारका सदाशिव ताम्हनकर, कुवेशी. ता. राजापूर.
कन्या :
१) **सुमती**–जन्म १९३९. सासर–सुधा पांडुरंग पाटणकर, रत्नागिरी.
२) **इंदुमती**–जन्म १९४५. सासर–सुषमा शरद जोशी ता. कसबे जि. संगमेश्वर.
३) **भारती**–जन्म १९४९. सासर–शैलजा अशोक सरदेसाई, शिक्षण–बी. ए. वास्तव्य–कसबे, ता. संगमेश्वर.
३६/६ **यशवंत नरहर** –जन्म २ ।४ ।१९४०. नाखरे येथे. शिक्षण–मॅट्रिकपर्यंत, वायरमन, ऑईल इंजिन कोर्स पूर्ण महाराष्ट्र शासनाच्या कृषि खात्यात मेंटेनन्स, फिटर.
भार्या : **माधुरी**–माहेर–प्रभावती दामोदर केळकर–मावडे आंबेरे जन्म १५ ।३ ।१९५१. शिक्षण–एस्. एस्. सी.
कन्या : **प्रीती**–जन्म २४ ।३ ।१९७८. शिक्षण–६ वीत शिकत आहे. गायन, खेळ, पोहण्याची आवड.
३७/७ **प्रदीप यशवंत**–जन्म २७ ।९ ।१९७३. दापोली, शिक्षण–११ वी सायन्स, ड्रॉईंग २ री परीक्षा, हिंदी ३ री परीक्षा उत्तीर्ण.
३८/३ **महादेव रघुनाथ**– #

गावडे आंबेरे–धोंडभट घराणे क्रमांक २.

गावडे आंबेरे–शिरपुर–कल्याण–मुंबई

१/१ **धोंडदेव**–हा या घराण्याचा ज्ञात मूळ पुरूष त्याची अधिक माहिती मिळाली नाही.
२/२ **हरि धोंडदेव**– #
३/३ **बल्लाळ हरि**– #
४/४ **रामचंद्र बल्लाळ**– #
५/५ **गणेश रामचंद्र**– #
६/६ **बल्लाळ गणेश**– #
७/७ **नारायण बल्लाळ**– #
८/८ **काशीनाथ नारायण**–व्यवसाय–पोलीस खात्यात नोकरी. वास्तव्य–शिरपूर येथे.
भार्या : **लक्ष्मी**–माहेर–बर्वे. गांवखडी.
कन्या : **नर्मदा**–सासर–जोशी. पालघर.
९/९ **दामोदर काशीनाथ**–मृत्यू १९४६. व्यवसाय–किराणा सामानाचे दुकान. वास्तव्य– पालघर जि. ठाणे.
भार्या : **कुसुम**–माहेर–मोडक.
कन्या : **रजनी**–सासर–रजनी रामचंद्र गोखले. वास्तव्य–पुष्पमिलन सोसायटी, संत रामदास रोड, मुलुंड (पूर्व.) व्यवसाय–मुंबई नगरपालिकेत लिपिकची नोकरी.
१०/१० **श्रीकांत दामोदर**–अंदाजे वय ४०. वास्तव्य–जव्हार जि. ठाणे. व्यवसाय–शेती.
११/९ **जनार्दन काशीनाथ**–मृत्यू १९४५. व्यवसाय–नाशिक येथे किराणा मालाचे दुकान. वास्तव्य–नाशिक अविवाहित.
१२/८ **प्रभाकर नारायण**–जन्म पावस येथे. परंतु वास्तव्यासाठी शिरपुर येथे होते. अधिक माहिती नाही अपत्य नाही.
१३/८ **विष्णू नारायण**–जन्म १९ ।२ ।१८८६. मृत्यू १९५६. शिक्षण–मराठी ७ वी थर्ड इयर ट्रेन्ड. व्यवसाय–शिक्षकाची लोकलबोर्डात नोकरी होती. वास्तव्य–नंदूरबार जि. धुळे.
भार्या : **रमाबाई**–माहेर–लक्ष्मीबाई केशव जोशी, जबलपूर.
कन्या :
१) **लीला**–जन्म १९१८. सासर–कमला विष्णू पिंपळखरे, पुणे.
२) **काशी**–जन्म १९३०. सासर–मालती विष्णू जोशी, पार्लेश्वर सोसायटी, विलेपार्ले (पूर्व). मुंबई–५७.
३) **विमल**–जन्म १९४०. सासर–विमल माधव निजसुरे. पुणे.
१४/९ **विश्वनाथ विष्णू**–जन्म १० ।११ ।१९१९ शिरपूर जि. धुळे येथे. शिक्षण–पूर्वीची इंग्रजी ४ थी. व्यवसाय–१९४३ ते १९६४ पर्यंत मिरज येथे बुक बाँड चहा कंपनीत गोडाऊन कीपर णून व १९६४ ते १९८० पर्यंत हैद्राबाद येथे बुक बाँड चहा कंपनीत स्टोअर कीपर म्हणून काम केले. वास्तव्य–शिधये वाडा, ब्राह्मणपुरी, मिरज, जि. सांगली.

गावडे आंबेरे-धोंडभट घराणे क्रमांक २

गावडे आंबेरे-शिरपुर-कल्याण-मुबंई



भार्या : **कुमुदिनी**–जन्म १९२६. माहेर–लीला विनायक बर्वे, इचलकरंजी.
कन्या :
१) **वासंती**–जन्म ३० ।३ ।१९५०. शिक्षण–बी. ए. कोल्हापूर. सासर–अनुराधा अरविंद रानडे, ठाकूरद्वार मुंबई–२.
२) **विजया**–जन्म ४ ।८ ।१९५१. शिक्षण–एम. ए. कोल्हापूर. सासर–प्रतिभा प्रमोदराव ताम्हनकर, सांगली.
३) **चित्रा**–जन्म ११ ।२ ।१९५५. इचलकरंजी येथे. शिक्षण– बी. ए., कोल्हापूर. सासर–मृणाल शरद आपटे, जमखिंडी (कर्नाटक राज्य.).
४) **रेखा**–जन्म ६ ।१० ।१९५७. शिक्षण–बी.कॉम्. कोल्हापूर. सासर–रेखा सतीश खरे, सटाणे (ता. बांगलाण)
१५/१० **विलास विश्वनाथ**–जन्म १४ ।१० ।१९४५. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–सांगली बँक, मिरज, पंढरीची ६ वेळा चालत वारी केली. वास्तव्य–सिद्धये वाडा, ब्राह्मणपुरी, मिरज ४१६४१०.
भार्या : **अपर्णा**–माहेर–मंदाकिनी भिकाजी केतकर.
कन्या :
१) **अश्विनी**–वय वर्षे ११. शाळेत शिकत आहेत.
२) **मयुरा**–वय वर्षे ६. शिकत आहे. पुत्र–**विक्रम**–वय ५ वर्षे.
१६/९ **जगन्नाथ विष्णू**–जन्म १९२२ शिरपूर येथे. शिक्षण–मॅट्रिकपर्यंत. व्यवसाय–साऊथ सेंट्रल रेल्वेत इलेक्ट्रिकल चार्जमन. वास्तव्य–द्वारा 'रमा–विष्णू', गणेश हौ. सो. ब्लॉक नं. ७, गोपाळवाडी रोड, दौंड, जि. पुणे.
भार्या : **सरोजिनी**–माहेर–नलिनी सदाशिव सहस्रबुद्धे, मिरज मृत्यू १९८८.
कन्या :
१) **जयश्री**–जन्म १७ ।३ ।१९५३. मॅट्रिक, डी. एड्. सासर–जयश्री सुधाकर जोगळेकर.
२) **ज्योत्स्ना**–जन्म २२ ।९ ।१९५४. सासर–ज्योत्स्ना श्रीधर वैशंपायन.
१७/१० **जयवंत जगन्नाथ**–जन्म १० ।१० ।१९५६. इंजिनियर.
भार्या : **चारुशीला**–माहेर–चारु दिगंबर गाडगीळ.
कन्या : **नेहा**–जन्म नोव्हेंबर १९८९. पुत्र–**चेतन**–जन्म १९८३.
१८/८ **शिवराम (धारूकाका) नारायण**–मृत्यू १९५०. व्यवसाय–शेती. वास्तव्य–गावडे आंबेरे.
भार्या : **आनंदी**–माहेर–द्वारका देशमुख. पावस. मृत अपत्य नाही.
१९/७ **वासुदेव बल्लाळ**–कन्या–५.
कन्या :
१) **भागी**–माहिती मिळाली नाही.
२) **ठकी**–सासर–भिडे. वास्तव्य–विलेपार्ले.
३) **चंद्री**–सासर–परांजपे, वा. मालाड.
४) व ५) नावे माहित झाली नाहीत.
२०/८ **सखाराम वासुदेव**–जन्म १८९३. मृत्यू १९७६. शिक्षण–मराठी चौथी व्यवसाय– सुरुवातीला बोटीवर रत्नागिरी येथे पाणी भरण्याचे काम, नंतर मुंबईला म्युनिसिपालिटीमध्ये नोकरी. गांवच्या महाशिवरात्री उत्सवात हिरीरिने भाग घेत. श्रीशंकरभक्त व मांत्रिक विद्या अवगत त्यामुळे लोकप्रिय होते. नाटकात स्त्री पार्ट करण्याची आवड. वास्तव्य–अहमदसेलर बिल्डिंग, नायगांव, दादर मुंबई–१४.
भार्या : **रखमाबाई**–जन्म १९०५. माहेर–द्वारका रामचंद्र पालकर, पावस. मृत्यू १८ ।८ ।१९९०.
२१/९ **मुकुंद सखाराम**–जन्म २२ ।१ ।१९२५ मृत्यू २७ ।१२ ।१९८०. शिक्षण–मराठी ७ वी पास व्यवसाय–शेती. वास्तव्य–गोळेवाडी, बदलापूर, जि. ठाणे.
भार्या : **मालती**–जन्म १८ ।७ ।१९३०. माहेर–कुसुम शिवराम जोशी, कोळंबे. शिक्षण–मराठी ७ वी. वास्तव्य–नौपाडा, ठाणे.
कन्या :
१) **कमल**–जन्म १९६४. सासर–विजया नारायण कोल्हटकर.
२) **विनया**–जन्म १९६१. सासर–मनीषा दामोदर गाडगीळ.
३) **चंद्रकला**–जन्म १९६४. सासर–स्वाती चंद्रकांत जोशी.
२२/१० **भास्कर मुकुंद**–जन्म १९५०. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–स्टेट बँक, चिपळूण येथे

नोकरी. वास्तव्य—मु. पो. गावडे आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
कन्या : **भक्ति**– पुत्र—**कपिल**–
२३/१० **सुरेश मुकुंद**–जन्म १३ ।८ ।१९५६. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—प्राव्हिडंट फंड ऑफिस ठाणे येथे कारकून. वास्तव्य—गोळेचाळ, रूम नं. २, बदलापूर, जि. ठाणे.
भार्या : **सुखदा**–जन्म १७ ।८ ।१९५९. माहेर—सुरेखा बर्वे, सोनगाव ता. चिपळूण, शिक्षण—एस्. एस्. सी. गृहिणी.
२४/१० **वासुदेव मुकुंद**–जन्म १८ ।७ ।१९५८. शिक्षण—बी.कॉम. व्यवसाय—नोकरी, वास्तव्य—गोळेचाळ, बदलापूर, जि. ठाणे. अविवाहित.
२५/९ **वसंत सखाराम**–जन्म २ ।१० ।१९३१. शिक्षण—एस्. एस्. सी. पर्यंत. व्यवसाय— के. ई. एम. हॉस्पिटल, परेल येथे नोकरी. वास्तव्य—सत्यनारायण पांड्ये चाळ, रूम नं. ४, सुभाषनगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई. हल्ली वास्तव्य—गावडे आंबेरे.
भार्या : **वसुधा**–जन्म १९३४. माहेर—कावेरी विश्वनाथ गोडबोले, पावस. शिक्षण—मराठी ७ वी पास.
कन्या :
१) **शोभना**–जन्म २१ ।७ ।१९५८. शिक्षण—११ वी पास. सासर—शोभना सदानंद फडके. हल्ली वास्तव्य—कांदिवली, मुंबई.
२) **लीला**–जन्म ९ ।६ ।१९६२. शिक्षण—१० वी पास. सासर—स्मिता श्रीकांत जोशी, वायंगणी. हल्ली वास्तव्य—जोगेश्वरी, मुंबई.
३) **रेखा**–जन्म ८ ।६ ।१९६६ शिक्षण—१० वी. सासर—शलाका सदानंद जोशी. कोतवडे, रत्नागिरी.
४) **आशा**–जन्म २४ ।१२ ।१९६८. शिक्षण—१० पास. सासर—वीणा वसंत जोशी. वास्तव्य—अंधेरी, मुंबई.
५) **चित्रा**–जन्म १९ ।३ ।१९७१ शिक्षण—१० वी पास.
२६/१० **उदय वसंत**–जन्म ३० ।१२ ।१९७२. शिक्षण—चालू आहे. वास्तव्य—जोगेश्वरी, मुंबई.
२७/९ **मधुकर सखाराम**–जन्म १ ।१ ।१९३७ शिक्षण—एस्. एस्. सी. पर्यंत (डिप्लोमा इन ऑप्थलमॉलॉजी) व्यवसाय—के. ई. एम. हॉस्पिटल मध्ये नोकरी. वास्तव्य—सत्यनारायण पांडे चाळ, रु. नं. ४, सुभाषनगर, जोगेश्वरी पूर्व, मुंबई—६०.
भार्या : **मंगला**–जन्म १ ।१० ।१९४२. माहेर—नलिनी महादेव देसाई, मिठगवाणे, ता. राजापूर. शिक्षण—पी. एस्. सी. गृहिणी.
कन्या :
१) **भारती**–जन्म १९६६. सासर—भारती भरत मोघे, मालाड, मुंबई.
२) **अंजनी**–जन्म १९६९.
२८/१० **बल्लाळ मधुकर**–जन्म १ ।६ ।१९६३. शिक्षण—१२ वी (सायन्स) पास. व्यवसाय— भिक्षुकी व शेती. वास्तव्य—गावडे आंबेरे.
२९/१० **रमेश मधुकर**–जन्म ७ ।८ ।१९६७. शिक्षण—९ वी पर्यंत. व्यवसाय—पोस्टमन, शेती, भिक्षुकी. वास्तव्य—गावडे आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
३०/९ **जगन्नाथ सखाराम**–जन्म २२ ।६ ।१९४०. शिक्षण—फायनल ७ वी. व्यवसाय—शेती. वास्तव्य—गावडे—आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
भार्या : **रोहिणी**–जन्म २६ ।२ ।१९४७. माहेर—सुलभा केशव जोशी, देवरुख, जि. रत्नागिरी.
३१/१० **प्रल्हाद जगन्नाथ**–जन्म २६ ।१ ।१९६८. शिक्षण—एस्. एस्. सी पर्यंत.
३२/१० **पुरुषोत्तम जगन्नाथ**–जन्म ६ ।६ ।१९७२. शिक्षण—एस्. एस्. सी.
३३/८ **यशवंत वासुदेव**–लहानपणी मृत.
३४/८ **शंकर वासुदेव**–लहानपणी मृत.
३५/८ **महादेव वासुदेव**– #
कन्या :
१) **तारी**–सासर—मालती दामोदर जोशी, पावसजवळ (नाखरे). मृत.
२) **शांती**–सासर—रमाबाऊ शंकर रानडे, मृत.
३६/८ **मोरेश्वर वासुदेव**–मृत्यू १३ ।१ ।१९६१. शिक्षण—व्ह. फा. व्यवसाय—खानदेशमध्ये शिक्षकाची नोकरी. नंतर पालघर येथे श्री. रघुनाथराव दांडेकर यांचेकडे कारकून म्हणून नोकरी.
भार्या : १) **यमुना**–माहेर—दांडेकर.
कन्या :
१) **इंदू**–सासर—यशवंत त्रिंबक विद्वांस, भिवंडी. यांची

पत्नी.
२) **सुशिला**–सासर–कुलकर्णी, सांताक्रूझ. मुंबई.
३७/९ **विनायक मोरेश्वर**–जन्म १५ ।७ ।१९१५. मृत्यू ८ ।८ ।१९८६. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–पर्सनल इस्पेक्टर, वेस्टन रेल्वे, लोअर परेल येथे नोकरी.
भार्या : **मालती**–माहेर–मालती चिंतामणी जोशी, पुणे.
कन्या :
१) **नलिनी**–जन्म १९४२. शिक्षण–बी. ए. हिंदी पंडित. सासर–सुमन मोरेश्वर चक्रदेव, विलेपार्ले, मुंबई.
२) **ललिता**–जन्म १९४९. शिक्षण–बी. ए. बी. ए. सासर–सिमंतिनी सदाविजय करंदीकर, बोरिवली, मुंबई.
३) **नीलीमा**–जन्म १९५५. शिक्षण–बी. एस्सी. सासर–अंजली सुरेश भिडे, ठाणे.
३८/१० **रामकृष्ण विनायक**–जन्म २९ ।११ ।१९५०. शिक्षण–बी. एस्सी. (ऑनर्स). व्यवसाय–खाजगी नोकरी. वास्तव्य–२ ।४६ भक्तियोग सोसायटी, परांजपे नगर, वझीरा नाका, लो. टिळक रोड, बोरिवली (प.) मुंबई.
भार्या : **स्मिता**–बी. ए. बी. एड्. माहेर–लतिका मोरेश्वर जोशी, पुणे.
कन्या : **सुषमा**–जन्म ७ ।२ ।१९७९ शिकत आहे.
पुत्र–**स्वानंद**–जन्म १२ ।४ ।१९८५ शिकत आहे.
३९/१० **दिलीप विनायक**–जन्म १९४५. मृत्यू १९४९.
४०/६ **धोंडोपंत गणेश**–जन्म अंदाजे १८८६. मृत्यू ८ ।११ ।१९४६. शिक्षण–व्ह. फा. व्यवसाय–श्री. देवधर वकीलांकडे कारकुनाची नोकरी. वास्तव्य–मु. पो. शिरपूर जिल्हा – धुळे (पूर्वीचा पश्चिम खानदेश).
भार्या : **राधाबाई**–मृत्यू १९६६. माहेर–मनुताई प्रभाकर जोशी. मधली आळी, रत्नागिरी.
कन्या : **इंदुमती**–सासर–देवधर, मु. पडेल. ता. देवगड.
४१/७ **रघुनाथ धोंडोपंत**–जन्म ३० ।१२ ।१९२१, शिरपूर. शिक्षण–पूर्वीची मॅट्रिक नापास. व्यवसाय–सरकारी नोकरी. वरळी डेअरीमधून १ जानेवारी १९८० रोजी सेवानिवृत्त. सामाजिक कार्यात रस. १) जेष्ठ नागरिक संघ, कल्याण, खजिनदार २) ब्राह्मण सभा, कल्याण, कार्यकारी मंडळात सदस्य ३) गणपती मंदिर, बाजारपेठ देवस्थान येथे विश्वस्त. नेपाळ, संपूर्ण भारत व अंदमान येथे प्रवास केला.



श्री. रघुनाथ धोंडो व सौ. नलिनी रघुनाथ

वास्तव्य–राम मारूती रोड, डॉ. सुरेश फडके वाडा, आळी नं. २, घर नं. २६, दिवाण बावडी जवळ, कल्याण ४२१३०१.
भार्या : **नलिनी**–जन्म ६ ।९ ।१९२८. विवाह २८ ।२ ।१९४६. माहेर–शांताबाई सीताराम गोडबोले. मु. खोल ता. देवगड, सिंधुदुर्ग शिवणकाम, भरतकाम व इतर कलांच्या सर्व परीक्षा उत्तीर्ण. तसेच रेगझीनच्या बॅग्ज बनविणे इत्यादि व्यवसाय. अपत्य नाही.
४२/७ **बाळकृष्ण धोंडोपंत**–जन्म २५ ।९ ।१९२५ शिरपूर येथे. शिक्षण–नॉन मॅट्रिक. व्यवसाय– वेस्टर्न इंडिया मिलमध्ये नोकरी. आता सेवानिवृत्त. सेवानिवृत्तीनंतर बदलापूर येथे चालविण्यात येणाऱ्या वृद्धाश्रमात व्यवस्थापक म्हणून काम बघत होते. वास्तव्य–डॉ. सुरेश फडके वाडा, आळी नं. २ घर नं. २६, दिवाण बावडी जवळ, राम मारूती रोड, कल्याण–४२१३०१.
भार्या : **सुमति**–माहेर–छबुताई महादेव दाबके, आगाशी. मृत्यू १९६६.
कन्या : **धनश्री**–जन्म १४ ।९ ।१९५७. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–बॉम्बे पोर्ट ट्रस्ट. मध्ये नोकरी. सासर–धनश्री सुरेश जोशी. पळनीटकर वाडा, आगलावे आळी, कल्याण.
४३/८ **श्रीराम बाळकृष्ण**–जन्म २२ ।३ ।१९६३. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– प्रथम गारलीक इंजि. कंपनीत नोकरी. नंतर मध्य रेल्वेत नोकरी. शरीर सौष्ठव स्पर्धेत प्राविण्य दाखवून भारतात दुसरा–रौप्य पदक

गावडे आंबेरे घराणे क्रमांक ३

गावडे आंबेरे–महू–पुणे



प्राप्त. पश्चिम भारत स्पर्धेत द्वितीय क्रमांक–रौप्य पदक प्राप्त अशी अनेक पदके पटकावली.
भार्या : **संपदा**–माहेर–कवें. पालघर जि. ठाणे.
४४/७ **सदानंद धोंडो**–जन्म २२ ।७ ।१९२९.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–पश्चिम रेल्वेत पर्सनल डिपार्ट. मधून सेवानिवृत्त. वास्तव्य– डॉ. सू.य. फडके वाडा, आळी नं. २, घर नं. २६, दिवाण बावडी जवळ, राम मारूती रोड, कल्याण.
भार्या : **शैलजा**–माहेर–लीला विनायक आपटे, जोगळेकरवाडा, सिद्धेश्वर आळी, कल्याण. निवृत्त शिक्षिका.
४५/८ **संजीव सदानंद**–जन्म १८ ।१ ।१९५६.
शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–सारस्वत को. ऑप. बँकेत नोकरी.
भार्या : १) **मुग्धा**–नोकरी बडोदा बँक, फोर्ट, मुंबई येथे. माहेर–उज्ज्वला गजानन दामले, दाभोळ ता. दापोली.
कन्या : **दिप्ती**–जन्म २ ।९ ।१९८६.
४६/६ **हरि गणेश**–मुंज होऊन लहानपणीच वारले.

गावडे आंबेरे घराणे क्रमांक ३

गावडे आंबेरे–महू–पुणे.

१/१ **विठ्ठल**– #
कन्या :
१) **नर्मदा**– #
२) **गंगू**– #
२/२ **मोरेश्वर विठ्ठल**– #
३/३ **विश्वनाथ मोरेश्वर**–मृत्यू १९७२.
व्यवसाय–टेलिफोन एक्सचेंजमध्ये मॉनिटर. वास्तव्य–महू (म.प्र.)
भार्या :**लीलावती**–माहेर–लीलावती गोविंद गोखले.
कन्या :
१) **कुसुम**–सासर–कुसुम पुरुषोत्तम ठिपसे. वास्तव्य–१५ ए, गौतमनगर, भोपाळ.
२) **जयश्री**–सासर–जयश्री श्रीपाद नवरे. वास्तव्य–१७,

शास्त्रीनगर, भंडारा, महाराष्ट्र.
३) **ललिता**–सासर–ललिता सुनिल मोघे.
शिक्षण–एम्. ए. बी. एड्. व्यवसाय–शिक्षिका.
वास्तव्य–सरस्वती कॉलनी, देवपूर, धुळे.
४) **माधुरी**–शिक्षण–बी. ए. सासर–माधुरी बाळकृष्ण सोहनी. पति–आर्मीत लेफ्टनंट कर्नल. वास्तव्य–२६ ए, एम्. आय. जी. कॉलनी, इंदिरानगर, रतलाम. (म.प्र.)
४/४ **मोहन विश्वनाथ**–जन्म १० ।११ ।।१९४९, महू.
शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–स्टेट बँक ऑफ इंदूर, महू (म.प्र.). वास्तव्य–२३१६, महाराष्ट्र समाज पथ, लुनियापुरा, महू (म.प्र.). स्वत:चे घर आहे.
भार्या : **कुमुद**–माहेर–कुमुद कुलकर्णी, इंदूर.
५/५ **अभिजित मोहन**–जन्म ५ ।४ ।१९८०. विद्यार्थी.
६/४ **सुरेश विश्वनाथ**–जन्म २० ।८ ।१९४४.
शिक्षण–एम्. ए. एल्एल्. बी. व्यवसाय–रेल्वेत हेड बुकिंग क्लार्क, इंदूर. वास्तव्य–राजेंद्रनगर, इंदूर.
भार्या : **हेमा**–माहेर–हेमा भाटे, जुनी इंदूर (म.प्र.)
७/५ **सौरभ सुरेश**–जन्म १४ ।६ ।१९७४.
शिक्षण–इयत्ता १० वीत शिकत आहे.
८/५ **स्वप्नील सुरेश**–जन्म १९ ।८ ।१९७६ शिकत आहे.
९/४ **जयंत विश्वनाथ**–जन्म १७ ।६ ।१९५२.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–इंदूर परस्पर सह. बँक लि. इंदूर येथे नोकरी. वास्तव्य–२३१६ महाराष्ट्र समाज पथ, महू, मध्य प्रदेश.
भार्या : **उज्ज्वला**–माहेर–उज्ज्वला गोखले.
कन्या : **हर्षदा**–जन्म १९८८.
१०/४ **विकास विश्वनाथ**–जन्म ८ ।७ ।१९६५.
शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–न्यू इंडिया अॅशुरन्स कं. इंदूर येथे नोकरी. तबला वाजवण्याची आवड.
वास्तव्य–विमानगर, इंदूर.
११/३ **काशीनाथ मोरेश्वर**–मृत्यू ऑक्टोबर १९८८.
व्यवसाय–खाजगी एजन्सी. वास्तव्य–तांबे बोळ, नारायण पेठ, पुणे.
कन्या : **हेमा**–सासर–हेमा सुभाष लेले. २८४ शनवार पेठ, पुणे. नाटकांत काम करणे, दिग्दर्शन, लेख लिहिणे इ. ची आवड व ब्यूटी पार्लर.
१२/२ **गंगाधर विठ्ठल**–जन्म १९०१. मृत्यू १९७० कुर्धे येथे. शिक्षण–शालेय शिक्षण महू येथे झाले. नंतर गावडे आंबेरे येथे आले. व्यवसाय–दुकानात नोकरी.
वास्तव्य–गावडे आंबेरे. जि. रत्नागिरी.
भार्या : **उमाबाई**–माहेर–भागिरथी काळे–महाजन गावखडी, रत्नागिरी.
कन्या :
१) **आवडी**–वय ६८. सासर–मनोरमा मोरेश्वर पाटणकर, रत्नागिरी.
२) **काशी**–वय ६२. सासर–वसुंधरा राजाराम करंदीकर मिरजोळे, रत्नागिरी.
३) **नमू**–वय ६०. सासर–सुधा मोरेश्वर रिसबूड कांदेवाडी, गिरगांव. मुंबई–४.
१३/३ **माधव गंगाधर**–जन्म ३ ।३ ।१९३९. गावडे आंबेरे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– डी.एस्.पी. ऑफिस, रत्नागिरी येथे नोकरी. वास्तव्य–३००१ टिळक आळी, रत्नागिरी.
भार्या : **मीनाक्षी**–माहेर–चंपाकळी नारायण पेठे, मोंड, ता. देवगड.
१४/४ **संदिप माधव**–जन्म ८ ।४ ।१९७६.
शिक्षण–इयत्ता ८ वीत शिकत आहे.
१५/४ **मनोज माधव**–जन्म २ ।४ ।१९७७.
शिक्षण–इयत्ता ७ वीत शिकत आहे.
१६/३ **महादेव (बापू) गंगाधर**–जन्म १९३५.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–स्टेट ट्रान्सपोर्टच्या राजापूर डेपो येथे नोकरी. वास्तव्य–मु.पो. गावडे आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
भार्या : **विजया**–माहेर–शारदा आत्माराम जोशी, बसणी, रत्नागिरी.
कन्या :
१) **निर्मला**–जन्म १२ ।४ ।१९६८. शिक्षण–बी.कॉम. सासर–निर्मला नागेश केळकर, रत्नागिरी.
२) **मंगला**–जन्म ३० ।६ ।१९७०. शिक्षण–१२ वीत शिकत आहे.
१७/४ **प्रदिपकुमार महादेव**–जन्म ९ ।२ ।१९६६.
शिक्षण–बी. कॉम.
१८/२ **गजानन विठ्ठल**– #
१९/२ **गणेश विठ्ठल**– #

घराणे क्रमांक ४
वंशावळी क्रमांक १
गावडे आंबेरे–नेऊरगाव–औरंगाबाद



घराणे क्रमांक ४

वंशावळी क्रमांक-१

गावडे आंबेरे–नेऊरगाव–औरंगाबाद



गावडे आंबेरे घराणे क्रमांक ४

वंशावळी क्रमांक १

गावडे आंबेरे–नेऊरगाव–औरंगाबाद

१/१ **शंकर**–हा या घराण्याचा ज्ञात मूळ पुरुष.
२/२ **बाबदेव शंकर**– #
३/३ **मोरेश्वर बाबदेव**– #
४/४ **बल्लाळ मोरेश्वर**– #
५/५ **नारायण बल्लाळ**–जन्म १८५९ राधापूर येथे. मृत्यू–१९५८.

भार्या : **सावित्रीबाई**–माहेर–मथूताई देशमुख. पावस, जि. रत्नागिरी.
कन्या :
१) **सखूताई**–सासर–कुशाताई गोपाळ फडके.
२) **कुसुमताई**–सासर–सखूताई केशवराव जोशी.
३) **सोनूताई**–सासर–दामले.
६/६ **दत्तात्रय नारायण**–जन्म १८८०. मृत्यू १९३२.
भार्या : **रखमाबाई**–माहेर–जोशी पिंपरीकर.
कन्या : **मैनाताई**–सासर–दामले.
७/७ **गजानन दत्तात्रय**–जन्म १९१७. मृत्यू १९५६. व्यवसाय–शेती. नेऊरगाव शिवाय देवळाली येथे कॅन्टीनचा व्यवसाय होता.
भार्या : **सुलभा**–जन्म १९२६. माहेर–सुंदर विश्वनाथ

आठवले, नागांव, ता. अलिबाग शिक्षण—५ वी (मराठी) वास्तव्य—पाठक निवास, श्रीनिकेतन, औरंगाबाद.
कन्या :
१) **कोमला**—जन्म १९४७. शिक्षण—मॅट्रिक.
सासर—वर्षा अनिल जोशी, बदलापूर.
२) **आशा**—जन्म १९५२. शिक्षण—मॅट्रिक
सासर—आशा अरूण नेने, नाशिक.
८/८ **सुहास गजानन**—जन्म १९४५. शिक्षण—बी.ए. व्यवसाय—शेती.
भार्या : **संजीवनी**—माहेर—शालिनी गोविंद डोंगरे, पुणे. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—नोकरी.
कन्या :
१) **प्राजक्ता**—जन्म १ ।५ ।१९७६. शिकत आहे.
२) **प्राची**—जन्म १९७९. शिकत आहे.
९/९ **आशिष सुहास**—जन्म १९७९. शिकत आहे.
१०/८ **प्रकाश गजानन**—जन्म १९४९. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—कॉन्ट्रॅक्टर.
भार्या : **प्रिया**—माहेर—निर्मला टंडण.
कन्या : **पल्लवी**—जन्म १९७७.
११/९ **प्रसाद प्रकाश**—जन्म १९८०. विद्यार्थी.
१२/७ **प्रभाकर दत्तात्रय**—लहानपणी मृत्यू.
१३/७ **अनंत दत्तात्रय**—जन्म ७ ।१ ।१९२२. मृत्यू २६ ।६ ।१९७८. शिक्षण—मराठी ७ वी. व्यवसाय—शेती.
भार्या : **प्रभावती**—जन्म १९२७. माहेर—प्रभा हरी कानडे, औरंगाबाद. वास्तव्य—वैद्य वाडा, सरस्वती कॉलनी, औरंगाबाद ४३१००१.
कन्या :
१) **निशा**—जन्म २७ ।५ ।१९५२. शिक्षण—बी.ए.
सासर—हेमलता दिलीप मोडक, औरंगाबाद.
२) **शैला**—जन्म १९ ।१ ।१९५६. सासर—दीपा प्रदिप ओक. मुंबई.
३) **छाया**—जन्म २६ ।१ ।१९५८. शिक्षण—बी.कॉम्.
सासर—छाया विजय काळे, हैद्राबाद.
४) **सीमा**—जन्म २८ ।१ ।१९६५. शिक्षण—एम्.कॉम्. व्यवसाय—नोकरी.
१४/८ **विश्वास अनंत**—जन्म १९५४. मृत्यू १९५६.
१५/७ **दिवाकर दत्तात्रय**—जन्म २२ ।८ ।१९३०. शिक्षण—बी. एस्सी. (ॲग्रिकल्चर) व्यवसाय—शेती सल्लागार विनायक सहकारी साखर कारखाना लि. मधें विकास अधिकारी. वास्तव्य—२२७, समर्थनगर, औरंगाबाद.



कै. सौ. शुभदा दिवाकर

भार्या : **शुभदा**—माहेर—विजया नारायण फडके, पुणे. मृत्यू ८ ।२ ।१९९०.
कन्या : **संध्या**—जन्म १९५९. मृत्यू १९८४.
१६/८ **मकरंद दिवाकर**—जन्म २५ ।९ ।१९६०. शिक्षण—बी.कॉम. व्यवसाय—हैद्राबाद येथें दूध डेअरी चालवितात.
भार्या : **सुनिती**—माहेर—सुनिती वसंत वझे. टे. टेनिस चॅपियन. चार महिने अमेरिकेत वास्तव्य. अ-५ उषाकिरण, लल्लूभाई पार्क समोर, अंधेरी (प.) मुंबई.
कन्या : **कल्पिता**—जन्म १६ ।३ ।१९८९.
१७/८ **मिलींद दिवाकर**—जन्म २३ ।३ ।१९६४. शिक्षण—१२ वी पास. व्यवसाय—औरंगाबाद येथें हॉटेल बांधकाम व इमारत बांधकामाचा व्यवसाय. वास्तव्य—सत्यकृपा, ३ शिवाजी कॉलनी त्रिवेणी प्रोव्हिजन व जनरल स्टोअर्सचे वर, क्रांती चौक पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद—१.
१८/६ **मोरेश्वर नारायण**—लहानपणी मृत्यू.

१९/६ **सीताराम नारायण–** #
भार्या : **जानकीबाई**–माहेर–धारप.
कन्या :
१) **सोनूताई**–सासर–वझे, बीड.
२) **काशीताई**–सासर–ठोसर, अलिबाग.
२०/७ **पुरुषोत्तम सीताराम**–अविवाहित.
२१/७ **कमलाकर सीताराम–** #



श्री. प्रल्हाद सीताराम व सौ. सुशीला प्रल्हाद

२२/७ **प्रल्हाद सीताराम**–जन्म १९१९ नेऊर गांव येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून तरुण वयात कामास सुरुवात केली. उपजिविकेचे साधन म्हणून गिरगांव, मुंबई येथील श्री. विठोबा शेठ अभ्यंकर यांची टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट कांही वर्षे चालवावयास घेतली. पुढे हैद्राबाद संस्थानातील रझाकार चळवळीत भाग. त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. रा.स्व.संघाच्या बंदी काळांतही तुरूंगवास पत्करावा लागला. १९८० ते १९८८ पर्यंत रा.स्व.संघाचे महाराष्ट्र प्रांत संघचालक होते. नंतर सहं–प्रांत संघचालक म्हणून काम करतात. इंग्रजी लघुलिपीवर एक पुस्तक लिहिले.
वास्तव्य–'स्वागत', नवीन उस्मानपुरा, औरंगाबाद.
भार्या : **सुशीला**–जन्म १९ ।१० ।१९२९.
शिक्षण–बी.ए; बी.एड्. रेल्वेच्या को. ऑ. क्रेडिट सोसायटीत नोकरी. १९७५ ते १९८७ पर्यंत औरंगाबाद येथे शिक्षिका. माहेर–विजया श्रीधर साठे, वाई.
कन्या :
१) **बिंदा**–जन्म ३० ।८ ।१९५९. शिक्षण–बी.कॉम्. सासर–प्रज्ञा गजानन साठे. औरंगाबाद.
२) **वृंदा**–जन्म २० ।८ ।१९६४. शिक्षण–एम्.एस्सी. सासर–वृंदा गिरीश (यशवंत) टिळक. १२ साईकृपा, चौधरी हॉस्पिटलसमोर, घन:श्याम गुप्ते रोड, डोंबिवली (प.).
२३/८ **जयंत प्रल्हाद**–जन्म रंगपंचमी २६ मार्च १९५१. शिक्षण–बी.एस्सी., एल्एल्.बी. व्यवसाय–सारस्वत को. ऑप. बँकेत अकाऊंटंट. वास्तव्य–'स्वागत' न्यु उस्मानपूरा, डार्लिंग हॉटेलच्या मागे, अन्नपूर्णाजवळ, औरंगाबाद ४३१००५५.
भार्या : **मंजिरी**–माहेर–चित्रा श्रीराम आघारकर, कल्याण.
कन्या : **माधवी**–जन्म ५ ।५ ।१९८२. शिकत आहे.
पुत्र–**अनिरुद्ध**–जन्म ३ ।५ ।१९८९.
२४/८ **अजय प्रल्हाद**–जन्म ३ ।५ ।१९५३.
शिक्षण–बी.ए. व्यवसाय–प्रथम साबणाचा कारखाना होता. वडिलांच्या तुरूंगवासाचे काळांत शेतीकडे लक्ष दिले. सध्या औरंगाबाद येथे जनरल स्टोअर्सचे दुकान व शेती. वास्तव्य–नेऊरगाव.
भार्या : **अनुराधा**–माहेर–हेमलता मोडक. माधवनगर, सांगली.
कन्या :
१) **अनुया**–जन्म १९ ।१२ ।१९८३.
२) **अस्मिता**–जन्म ३१ ।१० ।१९८७.
२५/६ **लक्ष्मण नारायण**–जन्म १२ ।१२ ।१९१२ नेऊरगांव येथे. शिक्षण – बी.ए. व्यवसाय–इमारती, रस्ते, धरणे, कालवे, लष्करी विमानतळ, लाकडी फर्निचर इ. चे कंत्राटदार आणि वंशपरंपरागत शेती. सतत कामात व्यग्र रहाणे आणि आध्यात्मिक वाचनाची आवड. सामाजिक कार्यात खूप रस व सहभाग. विवेक वर्धिनी शिक्षण संस्था, हैद्राबाद या संस्थेत अनेक वर्षे खजिनदार व कार्यकारी मंडळ सदस्य, महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद आणि मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद येथे आजीव सभासद व अनेक वर्षे कार्यकारी मंडळ सदस्य. विवेक वर्धिनी शिक्षण संस्थेच्या कॉलेज स्थापनेत महत्वाचा सहभाग. सन १९६२ ते १९६५ या काळात श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेचे अध्यक्षपद सांभाळले. त्याशिवाय भारत मुद्रक,

प्रकाशक, औरंगाबाद या संस्थेचे बरीच वर्षे कार्यकारी मंडळ सदस्य व काही काळ अध्यक्ष. मराठवाडा या पत्राचे संस्थापकांपैकी एक कै. आ. कृ. वाघमारे यांचे विश्वसनीय सहकारी व त्यांच्या विश्वस्त मंडळाचे बरीच वर्षे सदस्य व अध्यक्ष. कै. आ. कृ. वाघमारे साहेब आणि कै. रामानंद तीर्थ यांचे विश्वसनीय सहकारी आणि त्यामुळे स्वातंत्र्यचळवळीशी अतिशय जवळचा संबंध. काँग्रेससह सर्व राजकीय पक्ष व कार्यकर्ते याना सक्रीय सहकार्य. आर्थिक सहाय्य. स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्याचा किंवा संबंधाचा पुढील आयुष्यात मनाच्या विशिष्ट ठेवणीमुळे कधीही उपयोग करून घेतला नाही. कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता चालत आलेले मानपत्र आणि स्वातंत्र्य सैनिक वेतन नाकारले. वास्तव्य — प्लॅट नं. ३, मीरा निकेतन, ८३५/२ कुतबीगुडा, हैद्राबाद (आंध्र प्रदेश) पिन — ५०० ०२७.

भार्या : १) **रमाबाई**–माहेर—पळनीटकर. २) **रमाबाई**–माहेर—मीराबाई शिवराम सहस्त्रबुध्दे ५६३, शनिवार पेठ, पुणे—३०.

कन्या :

१) **रजनी**–जन्म अनंतचतुर्दशी, सन १९४२. शिक्षण—बी.ए. सासर— मृणालिनी न. भिडे. श्रीरामपूर.

२) **श्यामला**–जन्म १९४६. शिक्षण—बी.एस्सी. सासर—शैलजा स. वैद्य. बीड.

२६/७ **अरविंद लक्ष्मण**– जन्म ३.१०.१९४०. शिक्षण—बी.ए. व्यवसाय—वडिलांचा बिल्डरचा व कंत्राटदारीचा धंदा. वास्तव्य—मीरा निकेतन ३ ।३ ।८३५ ।२ कुतबीगुडा. हैद्राबाद. (आंध्रप्रदेश). भार्या : **अनघा**–शिक्षण—बी.ए. माहेर—नीला भालचंद्र करमरकर मु. पो. हरेगांव (बोलापूर साखर कारखाना) रा. श्रीरामपूर. हल्ली माहेरचे ठिकाण, कर्वेरोड, पुणे.

कन्या :

१) **गीतांजली**–जन्म १९७३. इ. १२ वीत शिकत आहे.

२) **अबोली**–जन्म १९७६. इ. ९ वीत शिकत आहे.

२७/८ **अभिजित अरविंद**–जन्म १९८२. शिकत आहे.

२८/५ **दिनकर बल्लाळ**–मृत्यू १९४०.

कन्या :

१) **वारणा**–सासर—गोखले.

२) **चिमा**–सासर—बर्वे.

२९/६ **गणपत दिनकर**–जन्म १८९७. मृत्यू १९७७. व्यवसास—शेती.

भार्या : १) **सरस्वती**–माहेर—सहस्त्रबुध्दे. २) **शांता**–माहेर—नामजोशी.

कन्या :

१) **मंगल**–सासर—दामले, अलिबाग.

२) **लीला**–सासर—नेने, पार्ले, मुंबई.

३) **पुष्पा**–सासर—केळकर, बदलापूर.

४) **तारा**–सासर—नातू.

५) **प्रमिला**–लहानपणी मृत्यू.

३०/७ **सुधीर गणपत**–जन्म आश्विन शुध्द प्रतिपदा सन १९४५. शिक्षण—एस्.एस्.सी. व्यवसाय—शेती. वास्तव्य—'कल्पित' ८ राधामोहन कॉलनी, औरंगाबाद. उत्कृष्ट नकलाकार, नाटकात कामे करतात.

भार्या : **सुषमा**–माहेर—शैलजा श्रीधर बापट, म्हैसमाळ.

कन्या :

१) **जयंती**–जन्म ३ ।२ ।१९७१. इ. १२ वीत शिकत आहे.

२) **योगिनी**–जन्म २३ ।११ ।१९७३. इ. ९ वीत शिकत आहे.

३१/६ **शंकर दिनकर**– जन्म १९०५. मृत्यू १६ ।९ ।१९८६. व्यवसाय—शेती.

भार्या : **उमाबाई**–माहेर—सुंदर शंकर कानिटकर.

कन्या :

१) **प्रमोदिनी**–सासर—उषा विनायक जोशी, चौल.

२) **कुंदा**–सासर—मेघना चंद्रकांत कुंटे, उरण.

३) **सुशीला**–लहानपणी मृत्यू.

३२/७ **मधुकर शंकर**–जन्म २६ ।११ ।१९३४ नेऊरगांव. शिक्षण—९ वी पास. व्यवसाय—एम्.एस्.आर.टी.सी. (स्टेट ट्रान्सपोर्ट) मध्ये नोकरी. वास्तव्य—सारंग सोसायटी, शुभम् बंगला, गजानन महाराज मंदिराजवळ, गारखेडा, औरंगाबाद.

भार्या : **निर्मला**–माहेर—कुसुम विनायकराव परचुरे.

कन्या :

१) **माधुरी**–वय वर्षे ३१. सासर—माधुरी विनायक लेले.

२) **मोहिनी**–वय २७ वर्षे. सासर—मनिषा अजित भिडे, हडपसर.

३) **मालती**–वय २६ वर्षे. सासर–श्रध्दा उल्हास जोशी, पुणे.
३३/८ **श्रीधर मधुकर**–जन्म १९६६.
सांगली म्युनिसिपालटीचे नियुक्त अध्यक्ष व सांगलीचे सरकारी वकील म्हणून नियुक्ती. १९२२ मध्ये या दोन्ही पदांचा राजीनामा दिला व संस्थानी प्रजा परिषद चळवळीत संपूर्ण वेळ अध्यक्ष होते. सांगली संस्थान प्रजा परिषद यामध्ये भाग घेतला. हे पुणे लॉ कॉलेजच्या सात संस्थापका पैकी एक होते व अखिल भारतीय संस्थान प्रजापरिषद स्थापनेत अग्रणी होते. नंतर लॉ कॉलेज मध्ये १९२६ ते १९३५ या काळात प्रोफेसर होते. याच काळात १९३१ मध्ये राऊंडटेबल कॉन्फरन्स साठी महात्मा गांधींचे संस्थानी प्रश्नांचे सल्लागार म्हणून लंडनला भेट दिली.

भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर—कृष्णाबाई लक्ष्मण देशमुख. लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांचे सहावे चिरंजीव रावबहादुर लक्ष्मण गोपाळ देशमुख यांची कन्या. विविधज्ञानविस्तारच्या (१९०२ ते १९४६) काळातील लेखिका व कवियित्री होत्या.

घराणे क्रमांक १
वंशावळी क्रमांक ४, पुढे चालू
पुणे--मुंबई--डोंबिवली



कन्या :
१) **गंगूताई**–सासर–पेंडसे.
२) **सोनूताई**–सासर–काळे.
३) **विमला**–सासर–जोगळेकर.
४) **कमल**–सासर–तुळजापूरकर.

१०३/९ **कल्याण गणेश**–जन्म १९१०. मृत्यू १९६७. शिक्षण–बी. ए., एल्. एल्. बी. व्यवसाय–एम्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये अधिकारी. वास्तव्य–३६ वेलणकर नगर, पर्वती, पुणे–९.
भार्या : **कालिंदी**–माहेर–शांता यशवंत कोल्हटकर. रामदुर्ग, संस्थानच्या दिवाणांची ही कन्या. हयात.
कन्या :
१) **विजया**–जन्म १४ ।९ ।१९३६. सासर–विजया शरद वाडेगावकर, गृहिणी. रा. कलकत्ता. यांना ३ कन्या.
२) **मंगला**–जन्म २८ ।२ ।१९३८. बी.ए., बी.एड्. गृहिणी. सासर–मंगला श्रीराम काळे. पुणे. पति–आर्मीमध्ये ब्रिगेडीयर.

१०४/१० **अश्विनकुमार कल्याण**–जन्म ३० ।९ ।१९५२. व्यवसाय–मर्चंट नेव्हीत कॅप्टनच्या हुद्यावर, मास्टर मरीनर. वास्तव्य–३६ वेलणकर नगर, पर्वती, पुणे–९.
भार्या : **मीनल**–एम्. ए. माहेर–मीनल कृष्णराव जोगळेकर. मुंबई.
पुत्र–**नरेंद्र**–जन्म मार्च १९८९.

१०५/९ **दामोदर गणेश**–४ ।१२ ।१९१० सांगली येथे. मृत्यू. १ ।८ ।१९९० शिक्षण–एल्.सी.पी.एस्. व्यवसाय–डॉक्टरीचा. सांगली हॉस्पिटलात नोकरी. नाटकांत अभिनय करण्याची आवड. सांगली येथे

वृध्दाश्रम स्थापन करून चालविला. २० वर्षे सांगलीत एक नाट्य संस्थाही चालविली. वास्तव्य—बी—१४, प्लॉट नं. २ बिल्डिंग नं. १४ लक्ष्मीनारायण नगर, पुणे—४.

भार्या : **निर्मला**—माहेर—तारा शंभुराव गाडगीळ. नागपूर.

१०६/१० **रवींद्र दामोदर**— जन्म २९ ।३ ।१९४९. शिक्षण—बी. ए; एम्. अँड. एस्. व्यवसाय— डॉक्टरीचा पुणे येथे. वास्तव्य—१४/२ लक्ष्मीनारायण नगर, पुणे ४११००४.

भार्या : **अनघा**—शिक्षण—बी. ए, एम्. अँड एस्., व्यवसाय—वैद्यकीय.

कन्या :

१) **दर्शना**—जन्म ४ ।४ ।१९८१.

२) **पूजा**—जन्म ८ ।७ ।१९८३.

१०७/९ **नरहर गणेश**—जन्म ११ ।२ ।१९१४ सांगली येथे. मृत्यू २५ ।२ ।१९८९. शिक्षण—बी. ए. (ऑनर्स) मुंबई. फर्स्ट क्लास व इकॉनॉमिक्समध्ये मुंबई विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. गॅबडेन क्लबचे सुवर्णपदक प्राप्त. एम्. एस्. सी. (इकॉनॉमिक्स) लंडन. व्यवसाय—आय. ए. एस्. अधिकारी म्हणून १९७२ मध्ये निवृत्त. टाईम सोसा. ७६ बी, मित्तल टॉवर, ७ वा मजला, नरिमन पॉईंट मुंबई २१ येथे कार्यकारी संचालक. गेल्या ५० वर्षातील अर्थशास्त्रज्ञ व नावाजलेले प्रशासक म्हणून प्रसिध्द. त्यांनी सन १९४७ ते १९६७ पर्यंत अतिशय वरिष्ठ दर्जाच्या हुद्यांवर शासनामध्ये आणि युनायटेड नेशनस् मध्ये अनेक पदे भूषविली. ते पुण्याचे आणि जळगाव जिल्ह्याचे १९५० ते १९५२ मध्ये कलेक्टर होते. नंतर ते मुंबई येथे कलेक्टर होते. १९५९ ते १९६२ पर्यन्त मुंबई विभागाचे रेव्हेन्यू कमिशनर होते. १९६७ ते १९७२ निवृत्त होईपर्यन्त त्यांनी महाराष्ट्र शासनात डेव्हलपमेंट कमिशनर, सेक्रेटरी, जनरल ॲडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंट ही पदे भूषविली.

भार्या : **वत्सला**—जन्म १९१५. माहेर—बळवंत नारायण साठ्ये यांची कन्या. शिक्षण—बी. ए. (ऑनर्स)., आय सी ॲन्ड ए.एस्.असोसिऐशनच्या मानद खजिनदार, वनिता मंडळ, कुलाबा मध्ये कमिट्यावर कामगिरी केली.

१०८/१० **अरुण नरहर**—जन्म २५ ।८ ।१९३९. शिक्षण—बी. ए (फर्स्ट क्लास ऑनर्स) (कोलंबिया) एम्. ए (कोलंबिया). व्यवसाय—भारतीय दूतावासात नोकरी.



श्री. अरुण नरहर

आय. एफ्. एस्.

भार्या : **नयना**—माहेर—नयना सु. कुलकर्णी.

कन्या :

१) **अंजली**—जन्म १९७१.

२) **उमा**—जन्म १९७५.



श्री. उदय नरहर

१०९/१० **उदय नरहर**–जन्म २१ ।११ ।१९४३. शिक्षण–एम्. ए. (कॅन्टॅब). व्यवसाय–इंडियन फॉरेन सर्व्हिस. सध्या युनोच्या नोकरीत. वास्तव्य–सध्या रोम येथे.
भार्या : **गीता**–माहेर–गीता केवलसिंग, दिल्ली. शिक्षण–बी. ए. फर्स्ट क्लास (मास्को)
कन्या :**अनिता**– पुत्र–**विक्रम**–



लेफ्टनंट कर्नल डॉ. मधुकर गणेश

११०/९ **मधुकर गणेश**–जन्म १७ ।१२ ।१९१६. सांगली. शिक्षण–बी. ए. (ऑनर्स) सांगली येथे. व्यवसाय–१९४२ मध्ये भारतीय लष्करात अधिकारी. भारतीय संरक्षणावर सर्वांगीण लिखाण करण्याची आवड. ब्रम्हदेश - १९४३ लढाई निमित्त कॉंगो (झैरे) आफ्रिका - आंतरराष्ट्रीय शांती सेवेत १९६२-६४ अधिकारी. ब्रम्हदेशच्या लढाईत असताना जखमी झाले. १९७२ ते १९८५ पर्यंत कुंझरू सेंटरचे संस्थापक-संचालक. पुणे विद्यापीठाच्या संरक्षणशास्त्र या विषया करता पी. एच्. डी. साठी मान्य मार्गदर्शक. आजपर्यंत दोन विद्यार्थ्यांना डॉक्टरेट मिळाली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे संरक्षण शास्त्र या विषयावरील सल्लागार. १९४७–४८ काश्मीर युद्धात भाग. १९६५–७१ भारत–पाक युद्धात आघाडीवर. १९६९ मध्ये निवृत्त. १९०३–०७ पुणे विद्यापीठाच्या संरक्षण शास्त्र विभागाचे प्रमुख व प्राध्यापक. १९०८ कुंझरू सेंटर ऑफ डिफेन्स स्टडीज अँड रीसर्च, पुणे या संस्थेचे मानद संचालक. १९८८ मध्ये ऑरिझोना (यू. एस्. ए.) येथील जागतिक विद्यापिठाकडून "बॅटल फिल्ड ऑफ पीस" या इंग्रजी ग्रंथाबद्दल डॉक्टरेट (पीएच्. डी.) प्राप्त. दुसऱ्या महायुद्धापासून आजतागायतच्या सर्व लढायांचे इंग्रजीमधून १८ ग्रंथ प्रकाशित. त्याशिवाय खालील दोन मराठी ग्रंथ प्रकाशित– १) भारतीय सशस्त्र सेना उगम आणि विकास. २) संरक्षण शास्त्र आणि संघटना. वास्तव्य–'नर्मदा',११ वी गल्ली, प्रभात रोड, पुणे-४.
भार्या : **उषा**–माहेर–उषा श्रीपाद बेलवलकर. डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर यांची कनिष्ठ कन्या.
कन्या : **रंजना**–जन्म १९५१. सासर–रंजना कौल. आय. ए. एस्. गृहमंत्रालय, नवी दिल्ली येथे.



श्री. राजेंद्र मधुकर

१११/१० **राजेंद्र मधुकर**–जन्म १९४५. शिक्षण–इंडियन फॉरेन सर्व्हिस (आय.एफ्.एस्.) मध्ये अधिकारी. सध्या निकोशिया, सायप्रस येथे भारतीय दूतावासात उच्च आयुक्त.
११२/१० **सुरेंद्र मधुकर**–जन्म १९४८. व्यवसाय–इंडियन नेव्हीत. सध्या नं.१ बटालियन कमांडर, राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनी. (एन्.डी.ए.) खडकवासला येथे.
११३/९ **हनुमान गणेश**–जन्म ६ ।४ ।१९२१ सांगली. शिक्षण–बी. ए. (ऑनर्स), एल. एल. बी.; पी एच्. डी. व्यवसाय–इंडियन पोलीस सर्व्हिस मधे अधिकारी. १९७९ मधे निवृत्त. वास्तव्य–३, आनंद आश्रम



कॅप्टन सुरेंद्र मधुकर

सोसायटी, ४२२/१—ब चतुःश्रृंगी रस्ता, पुणे १६.
भार्या : **शैलजा**—माहेर—चंद्रकला गोपाळ दिवेकर, सोलापूर. नंतर पंजाबात वास्तव्य. पाकशास्त्रावरील चार पुस्तके प्रसिद्ध, शिवाय ब्युटीपार्लर चालवितात.
कन्या : **अनिता**—जन्म २१ ।११ ।१९५३.
सासर—अनिता विजय गोरे. पति—मंत्रालय सेक्रेटरी अधिकारी, कर्नाटक राज्य.
११४/१० **अभय हनुमान**—जन्म १० ।१० ।१९५१.
व्यवसाय—आय. ए. एस्. अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
वास्तव्य—यशोधन, दिनशा वाच्छा रोड, फोर्ट, मुंबई—२१.
भार्या : **पूनम**—माहेर—पूनम शिवानंद नाडकर्णी. पुणे. जेट एअरमध्ये नोकरी.
कन्या : **पौनमी**—जन्म २१ ।४ ।१९८४.
पुत्र—**अभिर**—जन्म १५ ।७ ।१९८०.
११५/१० **अजित हनुमान**—जन्म २१ ।११ ।१९५३.
व्यवसाय—स्वतःचा धंदा. वास्तव्य—पुणे.
भार्या : **चारुशीला**—माहेर—चारुशीला रवींद्र कुलकर्णी. मुंबई. ब्युटी पार्लरचा व्यवसाय.
पुत्र— १) **अमेय**—जन्म १६ ।१० ।१९८०. २) आशय—जन्म१० ।७ ।१९८४.
११६/८ **रामचंद्र रघुनाथ**—जन्म १८८०. मृत्यू १९४२. पूर्वीच्या मध्यप्रदेशांत सरकारी नोकरीत होते. एक्झीक्युटिव्ह इंजिनियर या पदावरून निवृत्त झाले. चार बंधूपैकी हे प्रथम त्यावेळचे विदर्भात आले व त्यानी आपल्या दोन लहान बंधूनाही (दत्तात्रय व लक्ष्मण) तिकडे नेले. याना अप्पासाहेब म्हणत.
भार्या : १) **सीताबाई**—माहेर—आपटे, कोल्हापूर. मृत १९३३. २) **बकुळा**—माहेर—देशपांडे, शिक्षिका.
११७/९ **माधव रामचंद्र**—प्रथम पत्नीचा हा एकुलता एक पुत्र-लग्नानंतर पुढील शिक्षणासाठी विलायतेला पाठविले असता पॅरिस येथे राहिला व १९५० चे सुमारास तिकडेच मृत्यु पावला. अधिक माहिती उपलब्ध झाली नाही.
भार्या : **शांताबाई**—जन्म १९०९. माहेर—पुण्याच्या बाबूकाका तथा अ. वा. रानडे यांची कन्या शांताबाई हिचेशी इ.स.१९२० मधे विवाह. हयात. वय ८१.
११८/८ **दत्तात्रय रघुनाथ**—जन्म १८८३. मृत्यू १९ ऑगस्ट १९४३. शिक्षण—सिव्हिल इंजिनियर. व्यवसाय—सिव्हिल इंजिनियर, अमरावती. त्यावेळचे मध्यप्रदेश, वऱ्हाड येथे नोकरी. वास्तव्य—अमरावती.
भार्या :
१) **काशीबाई**—माहेर—जोग, पुणे. मृत.
२) **आनंदी**—
३) **शांताबाई**—माहेर—करमरकर, जव्हार.
११९/९ **काशीनाथ दत्तात्रय**—जन्म १५ ।५ ।१९२७ पुणे. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—ऑटो इंजिनिअरिंग कं. तून चीफ् इन्स्पेक्टरच्या पदावरून स्वेच्छा निवृत्त. ३ खाजगी कंपन्यातून निवृत्त. वास्तव्य—ए-१२ सोहम्, राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **निर्मला**—माहेर—निर्मला प्रभाकर मनोहर, पेण.
कन्या :
१. **स्वरूप**—जन्म १९५७.
२. **प्रणौती**—जन्म १९६५. शिक्षण—बी.ए (ऑनर्स), एल्. एल्.बी. करत आहे.
३. **स्वाती**—जन्म १९६९. शिक्षण—बी.कॉम्.
१२०/१० **शैलेंद्र काशीनाथ**—जन्म १८ ।१० ।१९५५. शिक्षण—इंटर. व्यवसाय—बांधकामाच्या मालाच्या विक्रीचा व्यवसाय, खोपोली इथे आहे.
भार्या : **बीना**—माहेर—नीता पांडुरंग कुलकर्णी, पोरबंदर.
१२१/९ **मेघःश्याम दत्तात्रय**—जन्म १५ ।७ ।१९३४. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—प्रथम वैद्य आणि कं. ठाणे येथे नोकरी. नंतर खोपोली येथे बिल्डिंग मटेरियल विक्रीचा धंदा. वास्तव्य—६०१ रामतीर्थ, राममारुती रोड, नौपाडा, ठाणे.,

भार्या : **उषा**–माहेर–कुंदा श्रीराम मुळ्ये. ओझरखोळ, देवरूखजवळ, ता. संगमेश्वर.
कन्या : **अनघा**–जन्म २९ ।७ ।१९६५.
शिक्षण–इंटरपर्यंत. सासर–अनघा धनंजय गद्रे.
सासर–६०३ रामतीर्थ, राममारुती रोड, ठाणे. गृहिणी.
१२२/१० **संजय मेघःश्याम**–जन्म ३१ ।१० ।१९६८.
कॉम्प्युटर इंजिनियरिंग, वाशी येथे शिकत आहे.
१२३/९ **हेमचंद्र दत्तात्रय**–जन्म १२ ।९ ।१९३६ अमरावती. शिक्षण–इंटर आर्टस्. व्यवसाय–खोपोली येथे इमारती मालाच्या विक्रीचा व्यवसाय. १९६७ मध्ये चालू केला. अभ्यंकर ब्रदर्स (१९६८) व दत्तात्रय सन्स (१९७२) या फर्मचे संस्थापक. शिवाय पुणे येथे बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर. वास्तव्य–३ श्रीमान् सोसायटी, ७९३ भांडारकर रोड, पुणे व खोपोली.
भार्या : १)**शकुंतला** –माहेर–जोशी, पेण. मृत्यू १९७४.
कन्या : **वृंदा**–जन्म १९६८. पुत्र–**राहुल**–जन्म १९७३. याचा अपघाती मृत्यू १९७४.
भार्या : २) **अनुराधा**–माहेर–सुषमा सावाई, कोल्हापूर-४.
कन्या : **मनीषा**–जन्म १ ।१० ।१९७८. शिकत आहे.
१२४/१० **समीर हेमचंद्र**–जन्म २६ ।९ ।१९८१. शिकत आहे.
१२५/९ **श्रीकृष्ण दत्तात्रय**–जन्म १९३०. मृत्यू १९४५.
१२६/८ **लक्ष्मण रघुनाथ**–जन्म १८८९. मृत्यू २० ।१० ।१९५६. व्यवसाय–यवतमाळ येथे वकिली. यांना नानासाहेब असे म्हणत. त्यांच्या वाडवडिलांचे मूळ गांव लक्ष्मेश्वर (कर्नाटक) हे होते. हे कुटुंब वडील मामलेदार असल्यामुळे शिरहट्टी येथे काही वर्षापूर्वी गेले. श्री. नानासाहेबांच्या जन्मानंतर त्यांचे आईवडिल थोड्याच वर्षात निवर्तले. त्यामुळे सर्वात वडिलबंधू गणपतराव यांनी मोठ्या कष्टाने व दिमतीने आपल्या तिन्ही भावंडांना शिक्षण देऊन पुढे आणले. नानासाहेबांचे शिक्षण सांगली, पुणे, व मुबंई येथे झाले. वकिलीची परिक्षा झाल्यानंतर त्यांचा विवाह झाला. संसाराची जबाबदारी सुरू झाल्याने नुकतीच ब्रिटिश कारकीर्द कायदेशीर रीतीने वऱ्हाडात अंमलात आल्यामुळे त्यांनी मुन्सिफ या जागेची नोकरी पत्करली. वरोडा येथे १९०५ पासून दोन-अडीच वर्षे नोकरी केल्यावर त्यांनी स्वतंत्रपणे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. व फौजदारी मुकदम्यात ते एकदम पुढे आले. त्यावेळी काही वकील धडाधडीने राजकारणात भाग घेत तर काही आपला व्यवसाय सांभाळून उरलेल्या.वेळांत इतर समाजकार्य करीत. श्री. नानासाहेब हे दुसऱ्या वर्गात मोडत. त्यामुळे अशिलांना नानासाहेबांच्या हातात एकदा मुकदमा दिला की ते निकालाबद्दल निर्धास्त असत; कारण आपल्यासाठी शक्य ते सर्व केले जाईल असा विश्वास अशिलांना वाटे. काही दिवस यवतमाळ नगरपालिकेचे ते अध्यक्षही होते. त्यावेळी यवतमाळ मध्ये स्त्री-शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था नाव्हती. ही अडचण लक्षात घेऊन त्यांनी स्वत:ला स्त्री-शिक्षणाला वाहून घेतले. आणि त्यांच्या डोळ्यादेखत एक उत्तम, सर्व जिल्ह्याला आदर्शभूत होईल अशी, शैक्षणिक संस्था चालू केली आणि आपल्या कर्तबगारीचे स्मारक गावात उभे केले. त्यांचा स्वभाव अतिशय प्रेमळ होता. तरीही कुटुंबातील सर्वांनी शिस्तित वागावे, अवास्तव खर्च करू नये व चांगल्या सवयी लावून पुढे यावे असा त्यांचा कटाक्ष असे. हे एक अनुकरणीय व्यक्तिमत्व होते.
भार्या : **राधाबाई**–माहेर–गंगूबाई आबाजी कोल्हटकर.
कन्या :
१) **मीनाक्षी**–सासर–शांता गोखले, पुणे.
२) **संजीवनी**–सासर–कृष्णाबाई काकतकर. सैफी मंझिल, केनेडी ब्रिज, गिरगांव, मुंबई ४.



श्री. नारायण लक्ष्मण

१२७/९ **नारायण लक्ष्मण**–जन्म ३० ।११ ।१९०७ यवतमाळ. शिक्षण–बी. ए.; एल् एल् बी. व्यवसाय–पहिल्याने १९६० पर्यन्त वकिली. नंतर मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ति. वाचन, तिकिटे जमविणे इ. छंद. शैक्षणिक क्षेत्रात कार्य करतात. १९६६ मध्ये युरोप व इंग्लंड येथे प्रवास व १९६८ साली रशिया येथे प्रवास केला. सार्वजनिक कार्यात रस. अभ्यंकर कुलवृत्तांतासाठी पत्रव्यवहाराने माहिती जमविणे व अन्य तऱ्हेने बराच सहभाग. वास्तव्य–विनायक अपार्टमेंटस्, धनतोली, नागपूर. आणि समाधान अपार्टमेंट, डॉ. भांडारकर रोड, डेक्कन जिमखामा, पुणे.
भार्या : **मनकर्णिका**–माहेर–मनुताई विनायक काळे. मृत्यू १९८६. अपत्य नाही.
१२८/९ **शरदचंद्र लक्ष्मण**–जन्म १२ ।९ ।१९१२. शिक्षण–एम्.बी.बी.एस्. व्यवसाय– सिव्हिल सर्जन म्हणून निवृत्त. वास्तव्य–सध्या मधुमती, ७६८/७/१८ डेक्कन जिमखाना, पुणे-४. दुसऱ्या महायुद्धांत कमिशन घेऊन लढाईवर गेले होते. इटलीत युद्ध कैदी म्हणून बरेच दिवस होते. १९४३ मधे सुटका झाली.
भार्या : **नलिनी**–विवाह–१९३७. माहेर–नलिनी नागेश लेले. रावबहादुर लेले यांची कन्या, पुणे.
कन्या : **सुषमा**–सासर–सुषमा शरद् गुर्जर. कोल्हापूर.
१२९/१० **आनंद शरदचंद्र**–जन्म ११ ।३ ।१९३८ इंदूर येथे. शिक्षण–बी. डी. एस्. (डेन्टल सर्जरी), एम्. डी. एस्. (ऑरथॉडेन्टीज्). व्यवसाय–१९६५ पासून नागपूर येथे दवाखाना. वास्तव्य–शिरीष फ्लॅट्स, ६६, रामदास पेठ, नागपूर-१०.
भार्या : **शैला**–माहेर–शैला हरि गोखले. नागपूर.
१३०/११ **अश्विन आनंद**–जन्म १९६८. शिकत आहे.
१३१/११ **सचिन आनंद**–जन्म १९७१. शिकत आहे.
१३२/१० **दिलीप शरदचंद्र**–पोलिओचे विकारामुळे अधू.
१३३/९ **हेमचंद्र लक्ष्मण**–जन्म ११ ।६ ।१९१६ यवतमाळ येथे. शिक्षण–बी.ए. व्यवसाय–फिल्म डिव्हिजनच्या केंद्र सरकारच्या खात्यात ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर म्हणून १९७४ मध्ये निवृत्त. १९८५ मध्ये युरोप व इंग्लंड येथे प्रवास. वास्तव्य–१६२, आंबेडकर रोड, जानकी निवास, दादर, मुंबई-१४.
भार्या : **सिमंतिनी**–माहेर–मनोरमा भार्गव परांजपे. रत्नागिरी. पिता–श्री. भार्गव परशुराम परांजपे.
१३४/१० **जयंत हेमचंद्र**–जन्म २३ ।३ ।१९४४. शिक्षण–एम्. एस. (प्लायमाउथ) यू. के. व्यवसाय–डेप्युटी डायरेक्टर इंटरनॅशनल मेरीटाईम ब्यूरो, लंडन.
भार्या : **रेखा**–माहेर–रेखा जनार्दन तांबे. मुंबई.
कन्या : **राधिका**–जन्म ५ ।७ ।१९७७. इ. ४ वर्गात. इंग्लंडमध्ये जन्म झाल्यामुळे ब्रिटिश नागरिक.
१३५/१० **सुधीर हेमचंद्र**–जन्म १५ ।१२ ।१९४८. शिक्षण–पेपर टेक्नॉलॉजिस्ट. व्यवसाय–जनरल मॅनेजर (प्रोजेक्ट) मे. जॉली बोर्ड, मुंबई. नंतर सौदी अरेबियांत जेड्डा येथे कागद कारखान्यात प्रोजेक्ट डायरेक्टर. वास्तव्य–सध्या जेड्डा, सौदी अरेबिया.
भार्या : **सरोजा**–माहेर–सरोज अरविंद महाजनी. सागर (म. प्र.).
कन्या : **सौरभी**–जन्म ८ ।१२ ।१९८२ सागर (म. प्र.) येथे. नागपूर येथे वास्तव्य.
१३६/१० **प्रदीप हेमचंद्र**–जन्म २५ ।३ ।१९५१. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–कापडाचा व्यापार, डेक्कन जिमखाना, पुणे येथे.
भार्या : **मीरा**–माहेर–मीरा गोविंद रानडे, मुंबई.
पुत्र–**अमेय**–जन्म ७ ।१२ ।१९८३ मुंबई.
१३७/७ **अंताजी हरि**– #
१३८/८ **गोपाळ अंताजी**– #
१३९/९ **दत्तात्रय गोपाळ**– #
१४०/८ **बाळू (महादेव) अंताजी**– #
१४१/६ **पांडुरंग दिनकर**–यानी नारिंग्रे येथे समाधी घेतली.
१४२/७ **मोरेश्वर पांडुरंग**–शिक्षणाची आवड असल्यामुळे वाहनांची सोय नसतानाही नारिंग्रे येथून पायीं व घोड्यावरून कर्नाटकातील हावेरी जिल्हा-धारवाड येथे गेले. प्रतिकूल आर्थिक परिस्थितींत हायकोर्ट प्लीडरची पदवी संपादन करून वकीलीचा व्यवसाय केला. गावात स्वतःची भव्य वास्तू बांधली. स्थानिक नगरपालिकेत अध्यक्षपद भूषविले. जुन्या मुंबई प्रांतात वकीली व्यवसायात प्रसिद्धी मिळविली. आपल्या तीन मुलांपैकी एकाने तरी वकील व्हावे अशी फार इच्छा होती. परंतु असफल ठरली. म्हणून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आपल्या घरी ठेवून विनामूल्य राहणे-जेवण

व शिक्षण यांची मदत केली. असे अनेक विद्यार्थी शिकून आपापल्या व्यवसायाला लागले. वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकालाने निधन. पुत्र ३.

१४३/८ **गोविंद मोरेश्वर**–वडिलोपार्जित संपत्तीवर गुजराण.

१४४/९ **दामोदर गोविंद**–अपुरे शिक्षण. मंदबुद्धी, वडिलोपार्जित संपत्तीवर गुजराण. वयाच्या ४५ व्या वर्षी अल्प आजाराने मृत्यु. पुत्र एक पण तोही २० व्या वर्षाचे आत मृत. वंश खुंटला.

१४५/८ **मल्हार मोरेश्वर**–जन्म १९०५. मृत १५ ।१ ।१९७०. विशेष कर्तबगारी नाही. वडिलोपार्जित संपत्तीवर गुजराण.

भार्या : **गंगा**–माहेर–दुर्गाबाई भास्कर जोग, रा. हावनूर.

१४६/९ **जनार्दन मल्हार**–जन्म २० ।५ ।१९३१. मृत डिसेंबर १९८९ हावनूर येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. वयाच्या १८ व्या वर्षी भारतीय विमानदलात इ.स. १९५१ ते १९६० व इ.स. १९६२ ते १९६६ अशी १२ वर्षे नोकरी. १९६० पासून बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी. १९६९ पासून बँकेत अधिकारी.

वास्तव्य–मोहोर, ब्लॉक नं. ७, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व).

भार्या : **विजया**–माहेर–प्रमिला नारायण वेलणकर, रा. गुर्लहोसूर, जि. बेळगांव.

कन्या :

१) **अलका**–जन्म ८ ।५ ।१९५८. सासर–अपर्णा श्रीनिवास जोग, रा. स्वरगंधा, मेघना सोसायटी, सहकारनगर, पुणे–९.

२) **अंजली**–जन्म १९ ।९ ।१९६४.

१४७/१० **अभिजित जनार्दन**–जन्म ९ ।३ ।१९७१. कॉलेज शिक्षण चालू आहे.

१४८/९ **वामन मल्हारराव**–जन्म २६ ।९ ।१९३४ हावेरी येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–स्टेट बँक ऑफ इंडियात अधिकारी. वास्तव्य–विसावा, स्टेट बँक ऑफ इंडिया सोसायटी, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व).

भार्या : **विनया**–माहेर–वासंती कृष्ण वैद्य, रा. हुबळी.

कन्या :

१) **वंदना**–जन्म २ ।१० ।१९६३. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–वृंदा दिलीप गद्रे, रा. लिंबगोवा (सातारा).

२) **उमा**–जन्म २६ ।८ ।१९६८. शिक्षण–एस्. वाय. बी. एस.

३) **दीपा**–जन्म २४ ।८ ।१९७२. शिक्षण–१० वी पास.

१४९/१० **अजित वामन**–जन्म २१ ।९ ।१९६१. शिक्षण–बी. ई. (मेकॅनिकल). व्यवसाय–गॅब्रियल इंडियामध्ये नोकरी. संगीताची आवड. "स्वरांकन" या नावाने मित्रांसमवेत संगीताचे कार्यक्रम करतो.

१५०/९ **प्रकाश मल्हारराव**–व्यवसाय–इन्कमटॅक्स ऑफिस, इचलकरंजी येथे नोकरी. अविवाहित.

१५१/९ **अविनाश मल्हारराव**–शिक्षण–बी. ई. (मेकॅनिकल) बॉम्बे पोर्ट ट्रस्ट मुंबई येथे नोकरी. अविवाहित.

१५२/९ **मधुकर मल्हारराव**–शिक्षण–नॉनमॅट्रीक. व्यवसाय–हावेरी येथे टपाल खात्यात नोकरी.

१५३/८ **श्रीपाद मोरेश्वर**–अविवाहित. लहानपणी मृत.

लक्ष्मेश्वर घराणे

१५४/६ **विनायक दिनकर**– #

१५५/७ **वासुदेव विनायक**– #

१५६/८ **विष्णू वासुदेव**–जन्म १९०२. मृत्यू २७ ।११ ।१९८३, पुणे येथे. व्यवसाय–हेडमास्तर. वास्तव्य–लक्ष्मेश्वर.

भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–गोदूताई देवधर. रा. जमखिंडी.

कन्या :

१) **इंदूताई**–सासर–प्रभावती शंकर फडके. ४०० नारायण पेठ, पुणे–३०.

२) **सुधाताई**–सासर–उषा रामचंद्र जोशी. पौडरोड, पुणे.

३) **मंगलाताई**–सासर–सुनिता नारायण घाणेकर. रा. श्रीधर, हिंदवाडी, बेळगांव.

१५७/९ **विनायक विष्णू**–जन्म १९३० लक्ष्मेश्वर येथे. शिक्षण–बी. एस्.सी; बी. ई. व्यवसाय–चीफ इंजिनियर. वास्तव्य–टी-११० रिजरोड, जबलपूर (म. प्र.).

कन्या : **मेधा**–एम्. एस्.सी; एम्. बी. ए. सासर–मेधा जय क्षिरसागर, दिल्ली.

पुत्र–१) **रणजित**–बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स).

२) **धनंजय**–१२ वीत शिकत आहे.

१५८/९ **दत्तात्रय विष्णू**–जन्म ४ ।६ ।१९३८ लक्ष्मेश्वर येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–नोकरी. वास्तव्य–पुणे.

भार्या : **माधुरी**–माहेर–पुष्पा आत्माराम गोरे. रा. ४२९, नारायणपेठ, पुणे–३०.

कन्या :
१) **वैशाली**–बी. कॉम्.
२) **सुप्रिया**–इ. १२ वीत शिकत आहे.
३) **स्वप्ना**–इ. ९ वीत शिकत आहे.
४) **पल्लवी**–इ. ५ वीत शिकत आहे.

१५९/७ **बापूकाका (हनुमंतराव) विनायक**– #
१६०/८ **कृष्णराव बापूराव**–मृत्यू २७ ।७ ।१९७३ लक्ष्मेश्वर येथे जि. धारवाड. व्यवसाय–वकील. वास्तव्य–लक्ष्मेश्वर.
भार्या : **राधाबाई**–माहेर–चंपाबाई नारायण भिडे, रा. विजापूर (कर्नाटक).
कन्या :
१) **विमल**–सासर–विमल भाऊराव लागू. शिवम अपार्टमेंट, शिवमंदिर रोड, योगेश डेअरी समोर, डोंबिवली (पूर्व).
२) **मंदाकिनी**–सासर–मीना मुकुंदराव आठवले. नवा ३१ नारायणपेठ, पुणे–३०.
३) **शुभा**–सासर–पद्मावती मुकुंदराव भावे. दामले वाडा, मु. पो. खानापूर. जि. बेळगाव.

१६१/९ **वसंत कृष्णाजी**–जन्म १९३४. शिक्षण–बी. एस्.सी. व्यवसाय–गणिताचे क्लासेस चालवतात. वास्तव्य–गोडबोले मळा, विजापूर, कर्नाटक राज्य. अविवाहित.

१६२/९ **दिनकर कृष्णराव**–जन्म २८ ।८ ।१९३७ लक्ष्मेश्वर येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळात सहायक लेखापाल म्हणून औरंगाबाद विभाग २ मध्ये नोकरी. वास्तव्य–३२, कृष्णकुंज, विद्युत्कॉलनी, संभाजीनगर, औरंगाबाद–१. आध्यात्मिक विषयांची आवड.
भार्या : **सुषमा**–माहेर–शैलजा कृष्णाजी काळे. रा. नरेगल.
कन्या : **मनिषा**–जन्म १ ।८ ।१९६८. शिक्षण–१२ वी. सासर–सुहास वासुदेव पानसे. सुयोग बंगला, विद्युत् कॉलनी, संभाजीनगर, औरंगाबाद येथे.

१६३/१० **विश्वनाथ दिनकर**–जन्म १९ ।४ ।१९६५. शिक्षण–बी. कॉम्., स्टेनोटायपिस्ट (आय. टी. आय.) व्यवसाय–कॉम्प्युटर प्रोग्रामिंग, बजाज कं. त नोकरी औरंगाबाद येथे.

१६४/९ **मोहन कृष्णाजी**–जन्म १९४०. शिक्षण–बी. एच्. एम्. एस्. कर्नाटक राज्य. व्यवसाय–रेल्वेत गार्ड. वास्तव्य–गजानन कृपा, गायत्री पार्क, हरिसिद्धी नगरासमोर, स्टेशनरोड, सुरेंद्रनगर (गुजराथ).
भार्या : **माधवी**–जन्म १९४८.
कन्या : **रोहिणी**–जन्म १९७३. शिकत आहे.

१६५/१० **उदय मोहन**–जन्म १९७५. शिकत आहे.

१६६/९ **दिवाकर कृष्णाजी**–जन्म १९४८. शिक्षण–एम्. कॉम्., एल् एल्. बी.; डी. बी. एम्. व्यवसाय–चीफ ऑडिटर. वास्तव्य–४४/६९४ लोकमान्य नगर, पुणे–३०.
भार्या : **दीपा**–जन्म १९५३. माहेर–डॉ. भडभडे. लक्ष्मेश्वर, कर्नाटक राज्य.
कन्या : **भारती**–जन्म १९७७. शिकत आहे.

१६७/१० **योगेश दिवाकर**–जन्म १९७५. शिकत आहे.

१६८/९ **प्रकाश कृष्णाजी**–जन्म १९५०. शिक्षण–डी. सी. ई. व्यवसाय–रोड प्रोजेक्टस् सब डिव्हीजनमध्ये, प्रोजेक्ट इंजिनियर. वास्तव्य–मु. पो. दापोली, जि. रत्नागिरी.
भार्या : **प्रिती**–जन्म १९५३.
कन्या : **प्रगति**–जन्म १९७६. शिकत आहे.

१६९/१० **प्रसाद प्रकाश**–जन्म १९७७. शिकत आहे.

१७०/१० **प्रसन्न प्रकाश**–जन्म १९७९. शिकत आहे.

१७१/८ **रामचंद्र बापूराव**–जन्म १९०२. मृत्यू ऑक्टो. १९७६. व्यवसाय–वकील. वास्तव्य–लक्ष्मेश्वर.

१७२/९ **मधुकर रामचंद्र**–वास्तव्य–५४३, नारायण पेठ, अकल्पित बिल्डिंग, माती गणपतीजवळ, पुणे-३०.

१७३/१० **श्रीकांत मधुकर**– #

१७४/९ **प्रभाकर रामचंद्र**–व्यवसाय–असि. इंजिनियर, को. ॲक्सल डिपार्टमेंट, टेंबली नाका, कोल्हापूर. वास्तव्य–कोल्हापूर.

१७५/१० **मकरंद प्रभाकर**– #

१७६/१० **मिलिंद प्रभाकर**– #

१७७/९ **सुरेश रामचंद्र**– #

१७८/९ **यशवंत रामचंद्र**–जन्म २४ ।१२ ।१९३७ लक्ष्मेश्वर ता. शिरहट्टी जि. धारवाड येथे. शिक्षण–इंटर सायन्स, इलेक्ट्रीशिअनचा डिप्लोमा पास. व्यवसाय–म. रा. वि. म. मध्ये १९६१ पासून नोकरी. सध्या डेप्युटी; एक्झीक्युटीव्ह इंजिनियर या पदावर. पंतमहाराज बाळेकुंद्री यांची पणजोबापासूनची उपासना चालू आहे. वास्तव्य–द्वारा डॉ. बी. आर्. अभ्यंकर, स्टेशनरोड, मिरज

भार्या : **सुनंदा**–माहेर–सुनंदा दामोदर शिदोरे, अक्कलकोट. जि. सोलापूर.
कन्या :
१) **अरुंधती**–जन्म १५ ।८ ।१९६६. शिक्षण–बी. ए. एम्. एस्.–४ थे वर्ष.
२) **अनुराधा**–जन्म १३ ।१२ ।१९६७. शिक्षण–एम्. बी. ए. करत आहे.
१७९/१० **अनिरूद्ध यशवंत**–जन्म १ ।७ ।१९६९. शिक्षण–बी. ई. (इलेक्ट्रीकल) दुसरे वर्ष.
१८०/९ **भास्कर रामचंद्र**– #
१८१/९ **रमेश रामचंद्र**–लहानपणी मृत.
१८२/९ **शरद रामचंद्र**–लहानपणी मृत.
१८३/८ **काशीनाथ बापूराव**–व्यवसाय–शाळामास्तर. वास्तव्य–बेळगांव.
१८४/९ **अनिल काशिनाथ**–पुणे येथे स्वत:चा व्यवसाय. पुणे येथे वास्तव्य.
१८५/१० **अरुण अनिल**– #
१८६/९ **विनोद काशीनाथ**– #
१८७/६ **काशीनाथ दिनकर**– #
भार्या : **गंगा**–
१८८/७ **नरहर काशीनाथ**– #
भार्या : **गोपिकाबाई**–माहेर–संतुबाई सदाशिव काळे, जमखिंडी. पुत्र ६,कन्या १.
कन्या : **कृष्णाबाई**–मृत.
१८९/८ **लक्ष्मण नरहर**–जन्म २६ ।१२ ।१९१२ कुंदगोळ येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–सेवानिवृत्त. वास्तव्य–द्वारा गंगाधर लक्ष्मण अभ्यंकर. ४ ए, शांतादुर्गा, ४१/५, कर्वे रोड, पुणे–३८.
भार्या : **कमलाबाई**–
१९०/९ **काशीनाथ लक्ष्मण**–जन्म ३ ।९ ।१९४७. शिक्षण–एस्.एस्.सी.; आय.टी.आय. कोर्स पूर्ण. वास्तव्य–चिंचवड. जि. पुणे.
भार्या : **उज्ज्वला**–
कन्या : **मीनल**–जन्म ६ ।५ ।१९८०.
१९१/१० **राहूल काशीनाथ**–जन्म ५ ।५ ।१९७८.
१९२/९ **गंगाधर (रवि) लक्ष्मण**–जन्म १ ।६ ।१९४९. शिक्षण–बी. ई. (सिव्हील). वास्तव्य–४ए शांतादुर्गा, ४१ ।५ कर्वे रोड, पुणे–३८.
भार्या : **अपर्णा**– कन्या : **दिप्ती**–जन्म २६ ।४ ।१९८१.
१९३/१० **सागर गंगाधर**–जन्म २२ ।९ ।१९८५.
१९४/९ **भालचंद्र (शिरिष) लक्ष्मण**–जन्म ३१ ।३ ।१९५१. शिक्षण–एम्. ए. व्यवसाय–बी. ए. एस्. एफ. कं. वरळी येथे नोकरी. वास्तव्य–अंधेरी.
भार्या : **आशा**–बँकेत नोकरी. अपत्य नाही.
१९५/८ **दत्तात्रय नरहर**–जन्म २० ।११ ।१९१५. शिक्षण–४ वर्षाचा व्ही. जे. टी. आय.चा इलेक्ट्रीकल इंजिनीयर कोर्स, १ वर्षाचा रेडिओ इंजि. कोर्स., पी. डब्ल्यू. डी. वायरमनचा कोर्स पूर्ण. व्यवसाय–३१ वर्षे एलफिन्स्टन टेक्निकल हायस्कूलमध्ये नोकरी. वास्तव्य–बी-६ वसंतविहार सोसा. कर्वे रोड, कोथरुड, पुणे.
भार्या : **सुशिला**–माहेर–इंदुमती बापूराव देवधर, विजापूर. मृत्यू २६ ।१० ।१९७१.
कन्या :
१) **कालिंदी (कृष्णा)** –जन्म १९४३. सासर–सुनिता सदाशिव जोग. वास्तव्य–नीळकंठ-आशिष सोसायटी, टिळक सिनेमाजवळ, डोंबिवली (पूर्व). हयात.
२) **प्रमिला**–जन्म १९४५. सासर–नीता भालचंद्र भट. वास्तव्य–बी १७, एच् ए, एम्प्लॉइज को. हौ. सोसायटी, पौडफाटा, कर्वे रोड, पुणे. हयात.
३) **शोभा**–जन्म १९४८. सासर–स्मिता श्रीनिवास कानडे. वास्तव्य–आशादिप कुमेदान फालीआ, राजमहल रोड, बडोदे. हयात.
४) **हेमा**–जन्म १९४९. सासर–अंजली अशोक वर्तक. वास्तव्य–सी-३४ रिझर्व बँक कॉलनी, नॉर्थ ॲव्हेन्यू रोड, सांताक्रुझ (प.), मुंबई. हयात.
५) **प्रभा**–जन्म १९५२. सासर–स्मिता श्रीकांत जोशी. वास्तव्य–सुधाकुंज, ब्राह्मण सभेसमोर, डोंबिवली (पूर्व). हयात.
१९६/९ **शशिकांत दत्तात्रय**–जन्म १३ ।७ ।१९४७. शिक्षण–विजापूर येथे एस्. एस्. सी. इलेक्ट्रीकल सुपरवायझर. व्यवसाय–टेक्निकल शाळेत इलेक्ट्रीशियनची नोकरी व खाजगी वायरमनचा व्यवसाय. वास्तव्य–३ बाळ को. हौ. सोसायटी, दाजी रामचंद्र रस्ता, चरई, ठाणे १.
भार्या : **आसावरी**–जन्म १४ ।१२ ।१९४९. आयकर खात्यात नोकरी. माहेर–इंदुमती रघुनाथ वैद्य, (वरसई). नंतर पार्वती सदन, ठाणे.

कन्या : **स्वाती**–जन्म ३० ।१० ।१९७९. इ. ६ वीत शिकत आहे.
पुत्र–**सचिन**–जन्म ८ ।१ ।१९७३. एस्. एस्. सी. होऊन फर्स्ट इयर कॉमर्स शिकत आहे.
१९७/९ **आनंद दत्तात्रय**–जन्म १९५५. शिक्षण–एस्. एस्. सी. व आय. टी. आयचा कोर्स पूर्ण.
व्यवसाय–टेल्को कंपनीत नोकरी. वास्तव्य–बी-६, वसंत विहार, कर्वे रोड, कोथरूड, पुणे.
भार्या : **अर्चना**–माहेर–डोंबिवली.
पुत्र–१) **आशिष**–इ. ४थीत शिकत आहे. २) **आदित्य**–जन्म १९८९.
१९८/८ **दिगंबर नरहर**–जन्म २२ ।२ ।१९२०
कुंदगोळ येथे. शिक्षण–एस्. एस्. सी.
व्यवसाय–रेल्वेमधून सेवानिवृत्त. नंतर डॉक्टरकडे खाजगी नोकरी. शिवणकामाची आवड. मिलिटरीत असताना इंग्लंड, ब्रह्मदेश व जपान येथे काही दिवस वास्तव्य होते. वास्तव्य–रेल्वे मित्रमंडळ को. हौ. सोसायटी, बी २१/२ जुना बैलबाजार रोड, कल्याण.
भार्या : **शालिनी**–माहेर–बाबी नारायण करमरकर.
कन्या :
१) **उषा**–पति–विद्याधर वामन भागवत, ठाणे.
२) **आशा**–मृत.
१९९/९ **नरहर दिगंबर**–जन्म २२ ।३ ।१९४८ पेण येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. नंतर पी. डब्ल्यू. डी. वायरमनचा कोर्स पूर्ण. व्यवसाय–मेसर्स अडवानी ऑर्लीकॉन्स कंपनीत भांडूप मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–लवाटेचाळ, सानेवाडी, कुळगाव, बदलापूर.
भार्या : **जयश्री**–माहेर–जयश्री गणेश सोमण. पारनाका, कल्याण.
२००/१० **कौस्तुभ नरहर**–शिक्षण–१२ वीत शिकत आहे.
२०१/९ **जगन्नाथ दिगंबर**–जन्म १६ ।५ ।१९५०
जमखिंडी येथे. शिक्षण–एस्. एस्. सी.
व्यवसाय–महानगर टेलीफोन निगम मध्ये नोकरी. क्रिकेटसंबंधी माहिती जमवण्याचा छंद.
वास्तव्य–बी/२९ इंद्रवदन सोसायटी, बाई पद्माबाई ठक्कर रोड, माहिम, मुंबई–१६.
भार्या : **सुधा**–माहेर–सुधा पांडुरंग केळकर (कल्याण).
कन्या : **निलम**–
२०२/९ **गणपती (शरद) दिगंबर**–जन्म १९ ।३ ।१९५२ कुंदगोळ येथे. शिक्षण–६वी पास.
व्यवसाय–महाजन प्रोसेस लि. विक्रोळी येथे नोकरी.
वास्तव्य–२/२१ रेल्वे मित्र मंडळ सोसायटी, जोकर टॉकीज मागे, कल्याण, जि. ठाणे.
भार्या : **माया**–माहेर–माया सदाशीव कुलकर्णी. कल्याण.
कन्या : **शलाका**–
२०३/८ **विनायक नरहर**–जन्म २३ ।५ ।१९२२
कुंदगोळ येथे. व्यवसाय–पोस्ट खात्यातून निवृत्त.
वास्तव्य–४१/२ब मालकंस सह. सोसायटी, एच्. ए. एल्. कॉलनीजवळ, पौडफाटा, पुणे–२९.
भार्या :**शारदाबाई**–जन्म २१ ।२ ।१९३१.
माहेर–विजया बाळकृष्ण जोशी, विजापूर.
२०४/९ **सुरेश (श्रीपाद) विनायक**–जन्म २१ ।१ ।१९५०. शिक्षण–बी.एस्सी.
भार्या :**मेघना**–शिक्षण–बी.ए.
कन्या :**अनघा**–जन्म १९७८. पुत्र :**निखील**–जन्म १९८४.
२०५/९ **रमेश (अनंत) विनायक**–जन्म १८ ।९ ।१९५१ विजापूर येथे. बँक ऑफ महाराष्ट्र मध्यें नोकरी. वास्तव्य-विश्वेश सोसायटी, ३८ ।२ गुजरात कॉलनी, कोथरूड, पुणे-२९
भार्या :**अंजली**–जन्म ११ ।७ ।५७. माहेर–शीला गणेश आगाशे.
पुत्र :**आनंद**–जन्म २८ ।७ ।१९८१.
२०६/९ **सतीश विनायक**–जन्म १८ ।१० ।१९५४.
शिक्षण–बी.कॉम
भार्या :**ज्योत्स्ना**–शिक्षण–बी.ए.
पुत्र :**निकेत**
२०७/८ **सदाशिव नरहर**–जन्म २० ।५ ।१९२५
जमखिंडी. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–पोस्टल सुपरवायझर म्हणून निवृत्त. वास्तव्य–८/६७ कांजुर को. हौ. सोसायटी, दातार कॉलनी, भांडूप (पूर्व), मुंबई-७८.
भार्या : **शैलजा**–माहेर–सिंधू नारायण गोखले. डोंबिवली.
कन्या : **विद्या**–जन्म २४ ।११ ।१९५८. सासर–पल्लवी महेश दामले. पती–महेश श्रीपाद दामले, रा. पुणे.
२०८/९ **सुधीर सदाशिव**–जन्म २१ ।१ ।१९५२.
शिक्षण–बी. एस्. सी.; डी. ई. आर. ई.; ए. एम्. आय. ई.
व्यवसाय–फिलीप्स इंडिया लि. वरळी येथे विक्री अधिकारी.

भार्या : **गौरी**–बी. एस्. सी., जी. सी. डी. मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण खात्यात हेड क्लार्क, विलेपार्ले (पूर्व).
कन्या : **कस्तुरी**–जन्म १७ ।८ ।१९८१. शिकत आहे.
२०९/१० **अमृत सुधीर**–जन्म ३ ।१ ।१९८५. शिकत आहे.
२१०/८ **विठ्ठल नरहर**– (द. गे.) श्री. सखाराम काळे मामांना दत्तक गेले.

(ड) वंशावळी क्रमांक ५

नारिंग्रे–मुंबई

२११/२ **काशीनाथभट कृष्णंभट**–फटफट उर्फ कृष्णंभट यांचा चौथा पुत्र, याचाही वंश फारसा वाढलेला दिसत नाही. यांस अपत्य नव्हते म्हणून त्याने बंधू बापूभट याचा मुलगा वासुदेव यांस दत्तक घेतले.
२१२/३ **वासुदेव काशीनाथ**– (द.आ.) हे शके १६५२ इ.स. १७३० मध्ये हयात होते.
२१३/४ **लक्ष्मण वासुदेव**–याना पुत्रसंतती नाही.
२१४/४ **नारायण वासुदेव**– #
२१५/५ **चिमणाजी नारायण**–हेच महादेव नारायण असावे कारण सध्या हयात व्यक्तींकडून आलेल्या माहितीनुसार परशुरामाचे वडील महादेव अशी माहिती देण्यात आली आहे. यांना पुत्र अपत्य नव्हते, म्हणून त्यांनी आपला चुलतबंधू विसाजी यांचा पुत्र परशुराम यास दत्तक घेतले.
२१६/६ **परशुराम चिमणाजी**– (द.आ.) #
२१७/७ **गोपाळ परशुराम**– #.
२१८/८ **वासुदेव गोपाळ**– #
भार्या : **यमुना**–माहेर–ओगले, दाभोळे.
२१९/९ **कृष्णा (बाबुराव) वासुदेव**–हे नारिंग्रे येथे राहात होते. हे उत्तम तऱ्हेने पेटी (हार्मोनियम) वाजवीत. मृत १९७३.
भार्या : **सत्यभामा**–माहेर–भीमाबाई खाडिलकर, हयात. सध्या वय वर्षे ८४.
कन्या :
१) **अंबूबाई**–जन्म १९२५. सासर–वेलणकर. वास्तव्य–नाडण ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
२) **बनुताई**–जन्म १९२८. सासर–गोविंद रानडे, रा. डोंबिवली.
३) **सोनुबाई**–जन्म १९३२. सासर–कमल वसंत वैद्य, शिक्षिका, वास्तव्य–चरई, ठाणे.
४) **कमल**–जन्म १९३५. सासर–आठवले. वास्तव्य–घटप्रभा, कर्नाटक.
५) **लीला**–जन्म २२ ।५ ।१९४२. सासर–मंदा मराठे. शिक्षण–एम्. ए., मुख्याध्यापिका, ज्ञान प्रसारिणी विद्यालय, कळवा, ठाणे. वास्तव्य–चंद्रलोक, वीर सावरकर पथ, टेंभीनाका, ठाणे.
२२०/९ **राघू वासुदेव**– #
२२१/९ **भित्या (श्रीपाद) वासुदेव**–हे उत्तम तबलजी होते, बहिरे होते, व अविवाहित होते.
२२२/९ **हरि (राऊ) वासुदेव**– #
२२३/८ **लक्ष्मण गोपाळ**–जन्म १८६८. मृत्यू १९३२. व्यवसाय–मुंबई महानगरपालिकेत शिक्षक, नंतर मुख्याध्यापक. वास्तव्य–मुंबई.
भार्या : **जानकी**–माहेर–जानकी वासुदेव वझे, रा. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.
कन्या : **कृष्णा**–जन्म १९२०. मृत्यू मे १९८१. सासर–नलिनी करमरकर. शिक्षण–मॅट्रिक. गृहकाम आणि सामाजिक सेवा यांची आवड होती.
२२४/९ **पुरुषोत्तम लक्ष्मण**–जन्म १९०४. मृत्यू १९७५. शिक्षण–इंग्रजी ६वी. व्यवसाय–सॉलिसिटरकडे टंकलिपिकाची नोकरी. वास्तव्य–मुंबई.
भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर–शांताबाई मोरेश्वर लिमये. नागाव, जि. रायगड.
कन्या : **निर्मला**–जन्म १९३७. शिक्षण–एस्.एस्.सी., एस्.टी.सी. सासर–निर्मला माधव वेलणकर. वास्तव्य–मेघदूत सोसायटी, ठाणे (पूर्व).
२२५/१० **नारायण पुरुषोत्तम**–जन्म १ एप्रिल १९४१ मुंबई. शिक्षण–आर्किटेक्ट. व्यवसाय–आर्किटेक्टचा स्वतंत्र व्यवसाय. वास्तव्य–बेडेकर सदन५, खो. नं. १२, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई ४.
भार्या : **वृंदा**–माहेर–वासंती मोरेश्वर गोखले, मुंबई.
कन्या : **वैशाली**–जन्म १३ ।७ ।१९७७. शिक्षण–माध्यमिक शाळेत.
२२६/११ **संतोष नारायण**–जन्म १० ।१० ।१९७४.

नारिंग्रे घराणे क्रमांक १
वंशावळी क्रमांक ५ (पुढे चालू)
(ड) काशीनाथभट घराणे
नारिंग्रे--मुंबई



शिक्षण—माध्यमिक शाळेत शिकत आहे.

२२७/९ **परशुराम लक्ष्मण**–जन्म १९०६. मृत्यू १९५३.
शिक्षण—मॅट्रिक पर्यन्त. व्यवसाय—रेल्वेमध्ये नोकरी.
भार्या : **सीताबाई**–माहेर—करंदीकर. पालगड, जि. रत्नागिरी. मृत १९७८.

२२८/१० **सुधाकर परशुराम**–जन्म १९४९.
शिक्षण—बी. कॉम. बायर इंडिया कंपनीत लेखा अधिकारी.
भार्या : **सुजाता**–माहेर—जयश्री वर्तक, विलेपार्ले, मुंबई.
कन्या : **मानसी**–६ वर्षे.

पुत्र :**सचिन**–वय १० वर्षे.
२२९/९ **रामचंद्र लक्ष्मण**– #
२३०/९ **गोपाळ लक्ष्मण**–जन्म १९१०. मृत्यू १९४५. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–मुंबई महानगरपालिकेत नोकरी.
भार्या : **सुशिला**–माहेर–भाटे, बोरवाडी, पुणे.
कन्या : **सुमती**–जन्म १९४०. एस्. एस्. सी. व्यवसाय–गृहकाम. सासर–शालिनी गोखले. वास्तव्य–विलेपार्ले, मुंबई. पुत्र १, कन्या २.
२३१/९ **शंकर लक्ष्मण**–जन्म १९१२. एस्. एस्. सी. मृत्यू १९८५. व्यवसाय–विल्सन महाविद्यालयामध्ये कार्यालयीन अधिक्षक.
भार्या : **सुधा**–माहेर–नर्मदा गोविंद मेहेंदळे, कर्जत, हयात.
२३२/१० **लिलाधर शंकर**–जन्म १० ।८ ।१९५५ मुंबई येथे. शिक्षण–बी. कॉम., एल. एल. बी., व्यवसाय–एस्. एस्. मीरांडा, कंपनी कांदिवली (पूर्व) येथे नोकरी. वास्तव्य–७४/८४, मोती बिल्डींग, खाडीलकर रोड, मुंबई ४.
भार्या : **संपदा**–माहेर–सुमेधा दिगंबर जोशी, मुंबई.
पुत्र :**यशोधन**–जन्म ५ ।११ ।१९८६.
२३३/९ **गणपती लक्ष्मण**–जन्म ८ ।९ ।१९२३. शिक्षण–एम. ए. (अर्थशास्त्र) मुंबई विद्यापीठ. व्यवसाय–प्राध्यापक, सिडहॅम वाणिज्य महाविद्यालय १९४७ ते १९८१ पर्यन्त. जून १९५६ ते सप्टें. १९५७ पर्यन्त दिल्ली अर्थशास्त्र संस्थेत पी. एच्. डी. पदवीसाठी विद्यार्थी म्हणून व नंतर ऑक्टो. १९५७ ते एप्रिल १९५९ पर्यन्त गुजराथ कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक. डिसे. १९७५ मध्ये सिडहॅम कॉलेजमध्ये प्राचार्य. मुंबई विद्यापीठात २५ वर्षे अभ्यास मंडळाचा सभासद किंवा अध्यक्ष, वाणिज्य फॅकल्टीचा सभासद व एकदा डीन, कार्यकारी परिषदेचा सदस्य, विदवत परिषदेचा सदस्य, विधी सभेचा सदस्य वगैरे निरनिराळ्या पदांवर कार्य केले.राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यापीठ स्तरावर समन्वय अधिकारी म्हणून १९७२ ते १९७५ आणि त्यानंतर आजतागायत त्या योजनेच्या मार्गदर्शन मंडळावर कार्य. १९७३ पासून बालसहाय्य संस्था (चिल्ड्रेन एड सोसायटी) याच्या नियामक मंडळावर सदस्य. १९८२ पासून कुलपतींचा प्रतिनिधी म्हणून विधी सभेचा, हिशेब समितीचा मुंबई विद्यापिठात सदस्य. १९८२ ते ८५ कार्यकारी परिषदेचा सदस्य. १९८३ ते १९८६ भारतीय विद्या भवनच्या श्रियांसप्रसाद जैन व्यवस्थापन व संशोधन संस्थेत संचालक.
मुंबई विद्यापिठात तसेच ना. दा. ठा. महिला विद्यापिठात अनेक समित्यांवर सदस्य म्हणून कार्य.
मुंबई विद्यापिठात प्र. कुलगुरु होते. शैक्षणिक व सामाजिक कार्याची आवड. तसेच वाचन आणि विद्यार्थी उपक्रम यांची आवड. वास्तव्य–मुंबई.
भार्या : **सुशिला**–माहेर–सुशिला महादेव कोल्हटकर, बडोदे. अपत्य नाही.
२३४/८ **कृष्णा गोपाळ**– #
२३५/८ **हरि गोपाळ**– #

(इ) वंशावळी क्रमांक ६

नारिंग्रे–चिपळूण–मसुरें–मुंबई

२३६/२ **रामभट कृष्णंभट**–याना पुत्र अपत्य नव्हते, म्हणून वडीलबंधू बापूभट यांचा मुलगा दत्तक घेतला.
२३७/३ **मच्छिद्रभट रामभट**– #
२३८/४ **जनार्दन मच्छिद्रभट**– #
२३९/४ **हरि मच्छिद्रभट**– #
२४०/५ **कृष्णाजी हरि**– #
२४१/५ **आबा हरि**– #
२४२/६ **येसु आबा**– #
२४३/५ **गणू हरि**– #
२४४/५ **भास्कर हरि**– #
२४५/४ **विसाजी (विश्वनाथ) मच्छिद्रभट**–अंदाजे २०० वर्षापूर्वी याना वैद्यकी व्यवसाय करण्यासाठी श्री. प्रभूगांवकर यानी मसुरे येथे आणले. व तिथेच स्थायिक झाले.
२४६/५ **बाळाजी विश्वनाथ**– #
भार्या : **गंगा**–माहेरचे नांव–सखू. इतर माहिती नाही.
२४७/६ **सखाराम बाळाजी**– #
२४८/७ **जनार्दन सखाराम**–हे मसुरे येथे होते.
२४९/७ **यशवंत सखाराम**– #
२५०/६ **गोपाळ बाळाजी**–(द. गे.) हे नारिंग्रे येथे राहात

घराणे क्रमांक १
वंशावळी क्रमांक ६
(इ) रामभट घराणे
नारिंग्रे-चिपळूण-मसुरे-मुंबई



होते व दत्तक दिले होते.

२५१/६ **नारायण बाळाजी– #**

२५२/७ **दत्तात्रय नारायण**–व्यवसाय–पोस्ट खात्यात नोकरी होती. पोस्टमास्तर म्हणून चिपळूण येथे निवृत्त झाले. वास्तव्य–चिपळूण.

भार्या : **अन्नपूर्णाबाई**–माहेर–मनूताई नारायण बर्वे, रा. वारखंड, ता. पेडणे, गोवा. हयात. सध्या वय ८५.

कन्या :

१) **लीला**–जन्म ११ ।११ ।१९३२. सासर–पद्मजा अरविंद वैद्य. रा. १३०७, सदाशिव पेठ, पुणे–३०.
२) **मंदाकिनी**–जन्म १६ ।११ ।१९३६. सासर–नलिनी वासुदेव वझे. रा. १०९४, सदाशिव पेठ, पुणे–३०.
३) **प्रभावती**–जन्म ५ ।५ ।१९३८. सासर–मनीषा अनंत दामले. रा. १८१४, सदाशिव पेठ, पुणे–३०.
४) **लता**–जन्म १६ ।३ ।१९४२. सासर–आशा शशांक घैसास. रा. १२७२, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे–४.

२५३/८ **नारायण दत्तात्रय**–जन्म १० ।४ ।१९३० चिपळूण येथे. शिक्षण–मॅट्रीक. व्यवसाय–पोस्ट खात्यांत नोकरी. सब-पोस्ट मास्तर म्हणून एप्रिल १९८८ मध्ये निवृत्त. वास्तव्य–खरे चाळ, चिंचनाका, चिपळूण, जि. रत्नागिरी.
भार्या : **सुनंदा**–माहेर–विजया पळनीटकर, रा. हैद्राबाद.

२५४/९ **सुनिल नारायण**–जन्म ५ ।८ ।१९६३. शिक्षण–एन्. सी. टी. व्ही. टी. वास्तव्य–सिंहगड रस्ता, पुणे.
भार्या : **शुभदा**–माहेर–शुभदा यशवंत वैद्य, बदलापूर.
कन्या : **तन्वी**–जन्म २३ ।६ ।१९९०.

२५५/९ **सुरेंद्र नारायण**–जन्म १५ ।४ ।१९६५. शिक्षण–बी. ई.(इलेक्ट्रॉनिक्स).

२५६/८ **वसंत दत्तात्रय**–मृत्यू १३ ।३ ।१९८०. व्यवसाय–पोस्ट खात्यांत नोकरी. वास्तव्य–४५ युसुफ बिल्डींग, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई–१४.
भार्या : **निर्मला**–माहेर–काशीबाई जनार्दन दामले, गुहागर. हयात वय ७६ वर्षे.
कन्या :
१) **प्रमिला**–जन्म १९३९. सासर–प्रमिला आनंद जोशी, गिरगांव.
२) **वासंती**–जन्म १९४९. सासर–निलिमा श्रीकृष्ण काळे, पनवेल.

२५७/९ **अरुण वसंत**–जन्म १२ ।८ ।१९४७ मुंबई. शिक्षण–बी. एस्सी. (ऑनर्स). व्यवसाय– ईस्ट इंडिया फार्मास्युटिकल वर्कस् लि. मध्ये मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून. नोकरी नंतर मेयर्स फार्मास्युटिकल प्रा. लि. मध्ये डिस्ट्रिक्ट मॅनेजर म्हणून नोकरी. सध्या वोखार्ड फार्मास्युटिकल कंपनीत रीजनल मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. ॲक्युपंक्चरचा कोर्स पूर्ण. नाटकांत काम करण्याची आवड. वास्तव्य–४५, युसूफ बिल्डिंग, दादर, मुंबई–१४.
भार्या : **अवंतिका**–माहेर–अलका गोपाल मेहेंदळे, ताराबाग इस्टेट, गिरगांव, मुंबई–४.
कन्या : **चारूता**–जन्म २२ ।८ ।१९७८ इ. ११ वीत शिकत आहे.
पुत्र :**योगेश**–जन्म २९ ।४ ।१९७५ इ. ८ वीत शिकत आहे

२५८/८ **विश्वनाथ दत्तात्रय**–जन्म १६ ।११ ।१९३४ चिपळूण येथे. शिक्षण–बी. ए., एस्. टी. सी. व्यवसाय–माध्यमिक शिक्षक, रत्नागिरी जिल्हा शिक्षकेतर संघाचा कार्याध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा तीन वर्षांसाठी निवड. वास्तव्य–अस्मिता, गणेशवाडी, मुंबई-गोवा महामार्ग, चिपळूण, जि. रत्नागिरी.
भार्या : **इंद्रायणी**–माहेर–मीना बाळकृष्ण जोशी.

२५९/९ **राजीव विश्वनाथ**–जन्म १९६२ पुणे येथे शास्त्र शाखेत १२ वीत शिक्षण घेत आहे.

२६०/७ **दादा नारायण**– #

२६१/६ **महादेव बाळाजी (द. गे.)** –नारिंग्रे येथे दत्तक गेले.

२६२/६ **रामचंद्र बाळाजी**–व्यवसाय–पुणे येथील प्रसिद्ध सराफ. श्री. पु. ना. गाडगीळ यांचे पेढीवर नोकरीस होते. वास्तव्य–पुणे.

२६३/६ **सीताराम बाळाजी**–जन्म २५ ।३ ।१८६१. मृत्यू १९४१. व्यवसाय–प्राथमिक शिक्षक; शेती व वैद्यकी. वास्तव्य–मसुरे–देऊळवाडा, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
भार्या : **सावित्री**–माहेर–गोदावरी वझे रा. मसुरे, खेरबंद.

२६४/७ **बळवंत सीताराम**–जन्म २६ ।३ ।१८९०. मृत्यू २८ ।६ ।१९६९. शिक्षण–मराठी ४ थी. व्यवसाय–शेती, वैद्यकी. ह्या भागात प्रसिद्ध वैद्य गणले जात.
भार्या : १) **पार्वती**–माहेर–साने, हिंदळे. मृत. अपत्य नाही. २) **गंगाबाई**–माहेर–आपटे, रा. त्रिंबक, ता. मालवण, मृत. अपत्य नाही. ३) **गंगाबाई**–माहेर–काशी गणेश जोशी. पिता–गणेश वासुदेव जोशी. रा. आजरे, ता. जि. कोल्हापूर.

२६५/८ **नारायण बळवंत**–जन्म ६ ।२ ।१९३१. शिक्षण–इ. ६ वी.

२६६/९ **विवेक नारायण–** #
२६७/८ **मच्छिंद्र बळवंत**–जन्म ७ ।१ ।१९३५.
शिक्षण–एस्. एस्. सी. ट्रेन्ड शिक्षक, होराभूषण, राष्ट्रभाषा प्रविण. व्यवसाय–मसुरे येथे प्राथमिक शिक्षक, ज्योतिष, शेती इ. वास्तव्य–मसुरे–देऊळवाडा, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
भार्या : **माया**–जन्म १९४९. मराठी ७ वी पास.
माहेर–उषा नारायण सिद्ध्ये. रा. तळकट ता. सावंतवाडी.
कन्या :
१) **मंगला**–जन्म १५ ।२ ।१९६६. ७ वी पास.
२) **नयना**–जन्म ३१ ।१२ ।१९७४. १० वीत शिकत आहे.
२६८/९ **सच्चिदानंद मच्छिंद्र**–जन्म ३० ।७ ।१९६४.
शिक्षण–एस्. एस्. सी., डी. एड्. व्यवसाय–शिक्षक.
वास्तव्य–पन्हाळजे पाटील, ता. खेड, जि. रत्नागिरी.
२६९/९ **सीताराम मच्छिंद्र**–जन्म ३ ।४ ।१९६७.
शिक्षण–बी. कॉम. पास, १९८७.
२७०/९ **बळवंत मच्छिंद्र**–जन्म २२ ।१२ ।१९७१.
शिक्षण–१२ वी सायन्स पास.
२७१/८ **दत्तात्रय बळवंत**–जन्म १३ ।२ ।१९४४.
शिक्षण–३ री. अविवाहित आहेत.
२७२/५ **परशुराम विसाजी–** #

घराणे क्रमांक २

नारिंग्रे–सांगली

१/१ **फटेश्वर**–इ.स. १७४३ मध्ये खून झाला.
भार्या : **यशोदा–**
२/२**विष्णू फटेश्वर–** #
भार्या : **सावित्री–**
३/३**रामकृष्ण विष्णू–** #
भार्या : **भागीरथी–**
४/४ **विष्णू रामकृष्ण** #
भार्या : **लक्ष्मी–**
५/४ **गणेश रामकृष्ण–** #
भार्या : **मालती–**
६/४ **लक्ष्मण रामकृष्ण–** #
भार्या : **राधा–**
कन्या : **कमल–**
७/५ **मोरेश्वर लक्ष्मण–** #
भार्या : **सुधा–**
८/५ **यशवंत लक्ष्मण–** #
कन्या : **मीनाक्षी–**
९/६ **हेरंब यशवंत–** #
१०/४ **दत्तात्रय रामकृष्ण–** #
भार्या : **आनंदीबाई**–माहेर–अंबूताई सदाशिव आठवले.
कन्या :
१) **वासंती–**
२) **मंदा–**
११/५ **वसंत दत्तात्रय**–जन्म २४ ।४ ।१९३९ सांगली येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–खाजगी नोकरी.
वास्तव्य–१२३२ सदाशिव पेठ, कोपरकर वाडा, पुणे ३०.
भार्या : **शैलजा**–माहेर–लीला दत्तात्रय देशपांडे, पुणे.
कन्या : **वैशाली**–जन्म १२ ।६ ।१९६८. इ. १२ वीत शिक्षण चालू आहे.
१२/६ **रवींद्र वसंत**–जन्म २८ ।१२ ।१९६९.
शिक्षण–इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग शिकत आहे.
१३/६ **जितेंद्र वसंत**–जन्म २१ ।८ ।१९७२. इयत्ता ९ वीत.
१४/६ **शैलेंद्र वसंत**–जन्म ८ ।१० ।१९७४. इयत्ता ८ वीत.
१५/५ **विनय दत्तात्रय**–जन्म १९४८. शिक्षण–९ वी पर्यन्त. व्यवसाय–सांगली महानगरपालिकेत नोकरी.
भार्या : **वंदना**–माहेर–सुलभा पटवर्धन.
कन्या :
१) **वृषाली**–जन्म १९८१.
२) **विदुला**–जन्म १९८६.
१६/६ **विपुल विनय**–जन्म १९८४.
१७/५ **दिलीप दत्तात्रय**–जन्म १९५४. शिक्षण–इयत्ता ८ वी. व्यवसाय–खाजगी नोकरी.
भार्या : **संपदा**–जन्म १९५९. शिक्षण–१० वी पर्यन्त.
माहेर–मोहिनी नाना वाळवेकर, रा. तासगाव.
कन्या : **समृद्धी**–जन्म १ ।९ ।१९८९.
१८/५ **अरुण दत्तात्रय**–जन्म १९५९. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–सरकारी नोकरी.

नारिंग्र घराणे क्रमांक-२
अभ्यंकर--महाजन घराणे
नारिंग्रे--सांगली



भार्या : **अनघा**–जन्म १९६६. एस्. वाय. बी. कॉम. माहेर—सीमा दत्तात्रय दामले. पिता—दत्तात्रय पांडुरंग दामले, रा. अलिबाग.

१९/४ **श्रीपाद रामकृष्ण**–मृत्यू १० ।१ ।१९८१.

भार्या : **इंदिरा**–माहेर—कमल मराठे, माधवनगर, सांगली.

२०/५ **पुरुषोत्तम श्रीपाद**–जन्म १९४९. शिक्षण—१० वी पास. व्यवसाय—हॉटेल रत्ना इंटरनॅशनल सांगली येथे नोकरी.

भार्या : **प्रमोदिनी**–जन्म १९५४. शिक्षण—१२ वी पास. माहेर—मनोरमा शास्त्री, धर्म स्थळ-कर्नाटक राज्य.

पुत्र—**ओंकार.** वय १ ॥ वर्ष.

२१/५ **गणेश श्रीपाद**–जन्म ६ ।११ ।१९५३ अक्कलकोट येथे. शिक्षण—एस्. एस्. सी. व आय. टी. आय. व्यवसाय—बजाज ऑटो कं. त आकुर्डी येथे नोकरी. वास्तव्य—१ ।२६ यमुनानगर, श्री विनायक हौ. सोसायटी स्कीम नं. ११, सेक्टर २१, निगडी, पुणे-४४.

भार्या : **वीणा**–माहेर—मीना मोरेश्वर जोशी, रा. हिंदळे.

कन्या : **दिप्ती**–जन्म १ ।१२ ।१९८४.

२२/५ **श्रीकांत श्रीपाद**–व्यवसाय—जे. बी. भराडीया कन्सल्टंट, सांगली यांचेकडे नोकरी.

भार्या : **मंजिरी**–

कन्या : **सोनाली**–

२३/५ **नारायण श्रीपाद**–जन्म १९६१. शिक्षण—१० वी पर्यन्त. वास्तव्य—सांगली. अविवाहित.

घराणे क्रमांक–३

नारिंग्रे–धनोडी–नागपूर

हे घराणे मूळ (पूर्वीच्या रत्नागिरी जिल्ह्यातील) नारिंग्रे (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) या ठिकाणचे. नारिंग्रे घराण्यातील काही पुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महाराजांच्या लष्करात होते. नंतर राजाराम महाराजांच्या काळात बऱ्याच मोठ्या हुद्यावर होते. यापैकी रामचंद्र सखाराम हा एक असावा. त्यांचा मुलगा सखारामबापू ऊर्फ बापूसाहेब अभ्यंकर हा विदर्भात प्रथम येणारा अभ्यंकर घराण्याचा मूळ पुरुष असावा. कारण हे घराणे प्रथम भोसल्यांच्या बरोबर जे विदर्भात आले ते अकोला जिल्ह्यात अकोल्यापासून सुमारे ३० मैल दूर असलेल्या सुभेदार परांजपे यांच्या पातूर—नंदापूर या गावी स्थायिक झाले. तिथे या घराण्याचे मोडकळीस आलेले घर अजूनही आहे. त्याचा उपयोग धर्मशाळेप्रमाणे करण्यात येतो. या गावी अभ्यंकर घराण्याची काही शेतीवाडी होती. ही शेतीवाडी व घर सोडून नागपुरास अप्पाजीराव भोसल्यांच्या पदरी नोकरी करणारा पुरूष म्हंणजे रामचंद्र सखारामपंत अभ्यंकर. याचा मुलगा सखारामबापू ऊर्फ बापूसाहेब हा पराक्रमात बापसे बेटा सवाई होता. तो अप्पाजीराव भोसल्यांच्या पदरी सरदार होता. पण त्याची सरदारकी फारच अल्पकाळ ठरली. भोसल्यांना इंग्रजांनी लुटले तेव्हा सरदार सखारामबापू हे इंग्रजांच्या विरुध्द निकराने लढले. परंतु भोसल्यांचा पराभव झाल्यामुळे व परकियांचे दास्य नको म्हणून सखारामबापूंनी सरदारकीचा स्वतःहूनच त्याग केला. परंतु पुढे लौकरच सरदार सखाराम बापूचा नागपुरात खून झाला. सरदार सखाराम बापूंना तीन मुले होती. १) कृष्णराव ऊर्फ तात्याबाबा २) नारायणराव ऊर्फ नानाजी ३) गोविंदराव हे सावत्र बंधु. रजपूत महिलेच्या पोटी जन्मास आले. सखाराम बापूंच्या मृत्यूनंतर कृष्णरावांनी पातूर-नंदापूर येथील शेती दान केली व ते आपल्या दोन्ही धाकट्या बंधूसमवेत धनोडी-बहाद्दरपूर या गावी येऊन राहिले. तेव्हापासून अभ्यंकर घराणे हे धनोडी-बहाद्दरपूर घराणे म्हणवले जाऊ लागले. धनोडी हे गांव पुलगाव पासून १३—१४ मैलावरती असून ते आर्वी तालुक्यात (जि. वर्धा) येते. तिथे आजही अभ्यंकर, घराण्याच्या तीनही शाखा म्हणजे कृष्णरावांचे, नारायणरावांचे व गोविंदरावांचे वंशज आहेत. तिथे त्यांची शेतीवाडी, घरेदारेही आहेत.

१/१ **सखाराम– #**

२/२ **रामचंद्र सखारामपंत**–हा या घराण्याचा मूळ पुरुष. फारच पराक्रमी. पातूर—नंदापूर येथे सुभेदार परांजपे यांच्या पदरी रीसालदार होता. बंगाल मधील स्वारीत पराक्रम गाजविला, त्यामुळे त्यांना अप्पाजीराव भोसल्यांच्या लष्करात नोकरी लागली. त्यांच्या शौर्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजीव सखाराम बापू यांना सरदारकी मिळाली असावी.

३/३ **सरदार सखारामबापू (बापूसाहेब) रामचंद्र–** १८५३—५४ साली भोसल्यांचे राज्य खालसा झाले. त्यावेळी हे इंग्रजांच्या विरूध्द निकराने लढले. परंतु भोसल्यांच्या पराभवानंतर इंग्रजांचे दास्यत्व नको म्हणून त्यांनी सरदारकीचा त्याग केला. अभ्यंकर घराण्याने धनोडीला ज्यावेळी वस्ती केली त्यावेळी धनोडी हे गाव फुशे घराण्याच्या मालकीचे होते. अभ्यंकरांचे फुशांवर कर्ज होते. व त्यातच हे गाव अभ्यंकरांना गहाण करून दिले होते. ही कर्जफेड न झाल्यामुळे हे गाव कर्जाच्या मोबदल्यात अभ्यंकरांना मिळाले. १८५७ सालच्या स्वातंत्र्य युध्दानंतर अभ्यंकरांनी धनोडी मुक्कामी काही जमीन विकत घेतली. १८६० सालच्या मिसल बंदोबस्तात धनोडी बहाद्दरपूर येथे काही शेती अभ्यंकरांच्या मालकीची असल्याचा उल्लेख आहे. यांना ३ पुत्र व १ कन्या.

कन्या : **झिंगुबाई**–सासर—सहस्त्रबुध्दे.

४/४ **कृष्णराव (तात्याबाबा) सखाराम**–हे धर्मशास्त्रसंपन्न होते. तसेच वैद्यकीय शास्त्रातही निपुण होते. पुढे जमनादास महाराजांकडून दीक्षा घेऊन ते साधू पुरूषही झाले. स्वभावाने मानी आणि तापट होते. औषधोपचारामुळे पंचक्रोशीमध्ये प्रसिध्द होते. त्यामुळे मोठमोठ्या घराण्यांशी संबंध येऊ लागला आणि काही शेती देणगी म्हणूनही मिळाली. पुढे त्यांच्या औदार्यामुळे अभ्यंकर घराण्याच्या मालमत्तेवर कर्ज वाढू लागले व त्यांचे पुत्र वासुदेवराव ऊर्फ दादासाहेब आणि त्यांची सून सौ. यमुनाबाई यांच्याशी पटेनासे झाले. म्हणून

नारिंग्र घराणे क्रमांक-३
नारिंग्रे-धनोडी-नागपूर घराणे (पुढे चालू)
नारिंग्रे--धनोडी--नागपूर



बापलेकात वाटण्या होऊन त्यांनी घर सोडले. व ते एकटेच राहू लागले. त्यांनी मुलाशी वाटणी करण्यापूर्वी भादोड गावाची मालगुजारी आणि त्याच गावातील सर्व जमीन त्यांचा पुतण्या रघुनाथराव ऊर्फ अण्णासाहेब यांच्या नावाने बक्षिस करून दिली.

५/५ **वासुदेवराव (दादासाहेब) कृष्णराव**–यांचे शिक्षण फारसे झाले नव्हते. तरी त्यांचा तत्कालीन विद्वान लोकांशी घनिष्ठ संबंध होता. त्यामुळे त्यांची राहणी सुसंस्कृत होती. ते सुधारक वृत्तीचे होते. पंडित व सुशिक्षित लोकांच्या सान्निध्याने त्यांना अनेक विषयांची तोंडओळख होती. म्हणून शिक्षणाचे महत्व त्यांना पटले होते. आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे पहाणी करण्याचे व

नारिंग्रे घराणे क्रमांक-३
नारिंग्रे-धनोडी-नागपूर घराणे
नारिंग्रे-धनोडी-नागपूर



त्यांना वळण लावण्याचे काम त्यांनी अण्णासाहेबांकडे सोपविले होते. हे मालमत्तेचा कारभार पहात असताना धनोडी जवळील पिपरी नावाचे गांव त्यांनी आपल्या मालमत्तेस जोडले. यांनी त्या गावावर होणारे बलूची लोकांचे डाके मोठ्या शौर्यनि आणि हिकमतीने बंद पाडले. ते शूर व उदार होते.

भार्या :**यमुनाबाई**–माहेर—वैशंपायन. या नरकेसरींच्या मातोश्री पुलगावपासून ८—९ मैल दूर असलेल्या नागझरी गावातील पेशकार घराण्यातील होत्या. हे घराणे चितपावन घराणेच. पण पेशकार हा भोसल्यांच्या काळातील त्या घराण्याचा हुद्दा होय. म्हणून त्या घराण्याला पेशकार म्हणत. या अतिशय जिद्दी व करारी

स्वभावाच्या होत्या. तितक्याच त्या मनस्वी पण होत्या. अभ्यंकर घराण्यात उंच, मोठ्या हाडाचे आणि धिप्पाड शरीराचे जे स्त्री–पुरूष दिसतात ती सौ. यमुनाबाई यांची देणगी होय.

कन्या :

१) **कृष्णाबाई**–सासर–जोशी.

२) **गुणाबाई**–सासर–माई गोखले.

६/६ **रामचंद्रराव (रामभाऊ) वासुदेवराव**– हे वासुदेवरावांचे ज्येष्ठ पुत्र आणि नरकेसरींचे मोठे बंधू. भाऊसाहेबांनी मालमत्तेचा कारभार हाती घेतल्यानंतर त्यांचे धाकटे बंधू मोरोपंत यांच्या पालनात एकदम बदल घडून आला. भाऊसाहेबांचे आपल्या दोन्ही बंधूवर म्हणजे मोरोपंत व डॉ.बळवंत यांच्यावर अतिशय प्रेम होते व त्यानी त्यांचा पित्याप्रमाणे संभाळ केला. त्यांचा स्वभाव प्रेमळ होता. त्यांनी त्यांच्या इच्छेमुळेच हे आपल्या काका (अण्णासाहेबां) चा विरोध सहन करून कर्ज काढून मोरोपंतांचा शिक्षणाकरता विलायतेला जाण्याचा हट्ट पूर्ण केला. तसेच दुसरे बंधु बळवंतराव यांनाही डॉक्टर बनविण्यात त्यांचा आग्रह होता. हे मार्च १९२६ मध्ये वयाच्या ४८ व्या वर्षी निधन पावले.

भार्या : **जानकी**–माहेर–सहस्रबुद्धे, नरसिंहपूर.

कन्या :

१) **अक्का**–वय ८६ वर्षे. सासर–ताराबाई लिमये, आर्वी, भोपाळ.

२) **चंद्राबाई**–सासर–जानकीबाई मनोहर, नागपूर. वय ८३ वर्षे.

३) **सुमती**–सासर–नरवणे. मृत्यू १९८५.

४) **प्रेमाबाई**–सासर–जोशी, मृत्यू १९६८.

५) **नलिनीबाई**–सासर–दाभोळकर, अक्कोलकोट जि. अहमदनगर. वय ६३ वर्षे.

७/७ **सदाशिव (दादासाहेब) रामचंद्र**–जन्म १९०१. मृत्यू १९७२. व्यवसाय–शेती. वास्तव्य–पिपरी, ता. आर्वी, जि. वर्धा.

भार्या : १) अपत्य नाही. २) **सिंधु**–माहेर–शोभा माधवराव दीक्षित, अकोला.

कन्या : **उषा**–सासर–उषा काशीनाथ करमरकर, जन्म १९१७ नागपूर.

८/७ **नीलकंठ (नानासाहेब) रामचंद्र**–जन्म १९१४. मृत्यू १९८५. व्यवसाय–शेती, राजकारण, सावकारी. वास्तव्य–धनोडी, ता. आर्वी.

भार्या : **इंदुमती**–माहेर–वत्सला मंगेश सोमपूरकर, नागपूर.

कन्या : **ज्योती**–जन्म १९४६. शिक्षण–एम्. ए;. बी. एड्. अविवाहित. व्यवसाय–श्रीमती अन्नपूर्णाबाई देशमुख कन्याशाळा, नागपूर येथे शिक्षिका.

९/८ **अनिलकुमार (बाबा) नीलकंठ**–जन्म १९४०. शिक्षण–बी. ए;. विदर्भ क्रिकेट असोसिएशन, रणजी ट्रॉफी क्रिकेटीयर. अविवाहित. वास्तव्य–द्वारा श्री भाऊ सोमपूरकर, मोहाडिया भवन, जेल रोड, धनतोली, नागपूर.

१०/८ **सुभाष नीलकंठ**–जन्म १९४१. मृत्यू १६ ।१० ।१९८८ (हार्टफेल) व्यवसाय–एल्. आय. सी. मध्ये नोकरी होती.

भार्या : **सुजाता**–माहेर–लता अदालतवाले.

कन्या : **संपदा**–वय वर्षे १४. शिकत आहे.

११/९ **सौरभ सुभाष**–वय वर्षे ९ शिकत आहे.

१२/८ **श्रीरंग नीळकंठ**–जन्म १९४३ पिपरी. ता. आर्वी. शिक्षण–बी. एस्सी.; एल् एल्. बी. व्यवसाय–ऑर्डीनन्स फॅक्टरी, वाडी, येथे सुपरवायझर. कॅरम, बॅटबिंटन व रणजी ट्रॉफी चॅपियन. चेसमध्ये ऑफिसतर्फे पदके मिळाली आहेत. वास्तव्य–द्वारा भाऊ सोमपूरकर, मोहाडीया भवन, जेल रोड, धनतोली, नागपूर.

भार्या : **माधुरी**–माहेर–माधुरी गोविंदराव कापरे. शिक्षण–एम्. ए.

कन्या : **मिनल**–जन्म १९७५. शिकत आहे.

१३/९ **हर्षद श्रीरंग**–जन्म १९८०. शिकत आहे.

१४/७ **भालचंद्र (बाबासाहेब) रामचंद्र**–जन्म १९१८. शिक्षण–एम्. ए (इंग्लिश) व्यवसाय–शिक्षक.

भार्या : **सुहास**–माहेर–बर्वे. पुत्र ४ आणि कन्या २.

कन्या :

१) **अलका**–इतर माहिती नाही.

२) **अरुणा**–इतर माहिती नाही.

१५/८ **अभय भालचंद्र**– #

१६/८ **मधुकर भालचंद्र**– #

१७/८ **अविनाश भालचंद्र**– #

१८/८ **अनिरुध्द भालचंद्र**– #

१९/७ **शरदचंद्र रामचंद्र**–जन्म १९२१. मृत्यू १९७३.

भार्या : **रजनीबाई**–माहेर–शकुन गोविंदराव काणे.

कन्या :

१) **लता**–सासर–रोहिणी हरकारे.
२) **जयश्री**–सासर–एकबोटे.
३) **उज्ज्वला**–सासर–काणे.
४) **कुंदा**–सासर–कुलकर्णी.
५) **मीना**–मुकी आहे. सासर–आवळे.

भार्या : **संजिवनी**–माहेर–विजया गणेश लिमये, मुंबई.
व्यवसाय–नोकरी. अपत्य नाही.
७३/८ **प्रभाकर माधव**–व्यवसाय–शिक्षक.
वास्तव्य–२/२६ म्युनि. क्वार्टर्स, एस. व्ही. रोड, टाटा कंपाऊंड, अंधेरी, मुंबई.
७४/८ **अजित माधव**–जन्म ९ ।१२ ।१९५०.

सासवणे घराणे क्रमांक ३
सासवणे–पनवेल–पुणे–मुंबई



शिक्षण–बी. कॉम; डी. बी. ए. व्यवसाय–छपाई व्यवसाय, शेती व बागकाम. वास्तव्य–९/२७६ महाराष्ट्र हौ. बोर्ड, कॉलनी, न्यू सुंदरनगर, कालीना, सांताक्रूझ (पूर्व) ४०००९८.
भार्या : **कल्याणी**–माहेर–शोभा शरद साठे, शिरवळ. जन्म ५ ।१० ।१९५७. खाजगी नोकरी करतात.
७५/९ **अनिरुध्द अजित**–जन्म ३० ।११ ।१९८४.

घराणे क्रमांक ३

सासवणे–पनवेल–पुणे–मुंबई–इन्दौर

१/१ **रामचंद्र**– #
२/२ **नारायण रामचंद्र**–मृत्यू १९०७. वास्तव्य–ठाणे. व्यवसाय–जंगल खात्यात उरण येथे नोकरीला होते.
३/३ **भास्कर नारायण**–मृत्यू १९४७. हे बाँबे प्राविसेस म्हणजे आजचे महाराष्ट्र सहकारी बँकेत मुंबई येथे नोकरीस होते. वास्तव्य–ठाणे.
भार्या : **सावित्री**–माहेर–माई काळे, अलिबाग.
कन्या :
१) **काशी**–जन्म १९१०. हयात सासर–पति दत्तात्रय लक्ष्मण जोग, ठाणे.
२) **यमुना**–जन्म १९१३. मृत्यू १९८४. सासर–यमुना बाळकृष्ण गोखले, अलिबाग, जि. रायगड.
४/४ **दत्तात्रय भास्कर**–जन्म ९ ।९ ।१९२०, अलिबाग. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह बँक येथून १९७८ मध्ये निवृत्त. वास्तव्य–अ ।८ सुयोग को. ऑप.हौ. सोसायटी, संत ज्ञानेश्वर रोड, मुलूंड (पूर्व) मुंबई ४०००८१.
भार्या : **मंगला**–माहेर–गंगू भिकाजी केळकर, वाडा पडेल, ता. देवगड.
५/५ **अरुण दत्तात्रय**–जन्म १८ ।८ ।१९५३.

शिक्षण—बी.ई. (सीव्हिल) व्यवसाय—नोकरी इंदूर येथे काही वर्षां नंतर स्वतंत्र व्यवसाय. वास्तव्य—५ ।ई राजेंद्रनगर इंदोर (म. प्र.)—४५२०१२.
भार्या : **रेखा**–जन्म नोव्हें. १९५४. माहेर—रेखा शंकर महाडदळकर.
कन्या :
१) **स्वाती**–जन्म २८ ।१० ।१९७८. शिकत आहे.
पुत्र—**समीर**–जन्म २५ ।४ ।१९८१. शिकत आहे.
६/५ **किरण दत्तात्रय**–जन्म १ ।६ ।१९५७.
शिक्षण—बी. कॉम. व्यवसाय—महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बॅंक मध्ये नोकरी. तबला वादनाची आवड.
भार्या : **कांचन**–जन्म १९ ।११ ।१९६१. शिक्षण—बी. ए. माहेर—चारुशिला धुंडीराज देव, पेण.
पुत्र—**सौरभ**–जन्म २७ ।८ ।१९८६.
७/४ **विष्णु भास्कर**–जन्म १९१६.
शिक्षण—नॉन—मॅट्रिक. व्यवसाय—बॅंक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी. वास्तव्य—हिमरेखा सोसायटी, ब्लॉक नं. ३, रामचंद्र नगर, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **उषा**–माहेर—पाटणकर, त्रिंबकेश्वर, जि. नाशिक.
कन्या :
१) **वासंती**–सासर—जोगळेकर, पुणे.
२) **कुंदा**–सासर—माधवी मनोहर केतकर, डोंबिवली.
८/५ **अशोक विष्णु**–जन्म १९५६. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—बॅंक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी. मुंबई, वास्तव्य—हिमरेखा सोसायटी, रामचंद्र नगर, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **अंजली**–शिक्षण—१२ वी. माहेर—अंजली सोमण, कल्याण. जि. ठाणे.
कन्या : **प्राची**–जन्म २८ ।१० ।१९८६.
९/४ **गणेश (विवेक) भास्कर**–जन्म २७ ।२ ।१९१८. मृत्यू ९ ।६ ।१९८८, पुणे येथे. सिनेनट "विवेक" या नावाने मराठी नाटक व सिनेमा मध्ये अनेक भूमिका केल्या. चित्रकलेची आवड. वास्तव्य—खोडे भुवन, जोगेश्वरी देवळासमोर, बुधवार पेठ, पुणे ३०.
भार्या : **लीला**–माहेर—लीला गंगाधर मुळे, जांभळी नाका, ठाणे.
कन्या :
१) **रंजना**–जन्म १९४७. सासर—अय्यर, पुणे.
२) **रेखा**–सासर—रेखा चंद्रकांत काळे, पुणे.
३) **रेश्मा**–सासर—मंजिरी मदन आठवले, लुईसवाडी हायवेजवळ, ठाणे.
१०/४ **अनंत भास्कर**–जन्म २५ ।४ ।१९२४. नॅशनल मशिनरी मॅन्युफॅक्चरिंग कं. कळवा, ठाणे येथे नोकरी, १९८४ मध्ये निवृत्त. वास्तव्य—म्हात्रे चाळ, रेशन ऑफीस जवळ, डोंबिवली (पश्चिम).
भार्या : **साधना**–माहेर—कमल विष्णू रिसबूड, तळे, (माणगांव), जि. रायगड.
११/५ **सतीश अनंत**–जन्म ८ ।७ ।१९६३.
शिक्षण—बी. कॉम., नाटकात काम करतो. व्यवसाय—डोंबिवली नागरी सहकारी बॅंकेत नोकरी.
१२/३ **विश्वनाथ नारायण**–जन्म १८८१. मृत्यू ५ ।११ ।१९६८. शिक्षण—नॉन मॅट्रिक.
व्यवसाय—रेल्वेत नोकरी काही वर्षे दिल्ली—मुंबई येथे. वास्तव्य—वाडेकर चाळ, सदाशिव पेठ, पुणे —३०.
भार्या : **पार्वतीबाई**–जन्म श्रावण चतुर्दशी इ. स. १९००. माहेर—येसूबाई विनायक देवधर (ढमढेरे) पुणे.
कन्या :
१) **दुर्गा**–जन्म जून १९१८. मृत्यू १९४७.
सासर—शशीकला रघुनाथ दामले, भाईंदर जि. ठाणे.
२) **शांता**–जन्म २१ ।१ ।१९२१. सासर—शांताबाई पुरूषोत्तम बाम, पेण. वास्तव्य—विश्वेश्वराचे वाकण , गादी कारखाना, पेण, जि. रायगड, ४०२१०७.
३) **तारा**–जन्म १९२३. मृत्यू १९८६. सासर—रजनी भास्कर वैशंपायन, नाशिक.
४) **कमल**–सासर—मंदा नारायण मराठे. हरिनिकेतन, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे.
१३/४ **प्रभाकर विश्वनाथ**–जन्म ९ ।२ ।१९३०. पुणे.
शिक्षण—बी. कॉम. व्यवसाय—स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन मध्ये अकाऊंटस् ऑफिसर, नंतर सी.टी.आय़. भोसरी येथून २९ ।२ ।१९८८ पासून निवृत्त. वास्तव्य—१००१ सदाशिव पेठ, ब्राह्मण कार्यालयाजवळ, पुणे —३०.
भार्या : **लीला**–माहेर—लीला पाटणकर, भोर.
कन्या :
१) **झेलम्**–जन्म १० ।११ ।१९५५.
शिक्षण—एम्.एस्सी. (मायक्रो) सासर—प्रतिभा दिलीप

सासवणे घराणे क्रमांक ४
सासवणे–मुंबई



कान्हेरे, पुणे. २) हिमानी–जन्म ३० ।३ ।१९६६ शिक्षण–बी. कॉम, एल्. एल्. बी. सासर–हिमानी आनंद परांजपे, दादर, मुंबई.

१४/५ **हृषिकेश प्रभाकर**–जन्म ५ ।३ ।१९५९. शिक्षण–बी.टेक. व्यवसाय–युनियन कार्बाइड मध्ये नोकरी. वास्तव्य–जलाराम अपार्टमेंट, वैशंपायन वाडी, खारकर आळी, ठाणे.

भार्या : **आरती**–शिक्षण–सिव्हिल इंजिनियर. माहेर–आरती अरविंद कोल्हटकर, वाशीम, अकोला, ठाणे येथे इंजिनियरिंग कॉलेज मध्ये लेक्चरर. पुत्र–१ **राजस्**–वय २ वर्षे.

१५/४ **रत्नाकर विश्वनाथ**–जन्म ९ ।६ ।१९३२, पुणे. शिक्षण–इंटर पास. व्यवसाय–रेल्वेत नोकरी भुसावळ येथे, सध्या डी.आर.एम्. ऑफीस मध्ये हेडक्लार्क. वास्तव्य–४७७५ कन्हैयालाल प्लॉट, फाळक बिल्डिंग, भुसावळ.

भार्या : **सुमती**–माहेर–शालिनी नारायण शेवडे (आपटे), पुणे.

कन्या :

१) **चित्रा**–जन्म ६ ।७ ।१९६३. पुणे. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–बँक ऑफ इंडियात नोकरी, पेण शाखा. सासर–चित्रा किरण भावे. पति–किरण काशीनाथ भावे प्रभात प्रिंटींग वर्क, ४६८, गुलटेकडी, पुणे.

२) **वर्षा**–जन्म ५ ।६ ।१९६६. शिक्षण–बी. कॉम. सासर–वर्षा आनंद पळनीटकर, चिंचवड, पुणे.

१६/५ **विनायक रत्नाकर**–जन्म १८ ।११ ।१९६८. शिक्षण–एफ्.वाय्.बी.कॉम्.

घराणे क्रमांक ४

सासवणे–मुंबई

१/१ **सदाशिव**– #

२/२ **बापूजी सदाशिव**– #

३/३ **श्रीधर बापूजी**–जन्म १८६४. मृत्यू १९३९. व्यवसाय–शेती.

भार्या : **भागीरथी**–माहेर–माई पांडुरंग करमरकर. वास्तव्य–सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड. कन्या–२, पुत्र-२.

कन्या :

१) **चंद्रभागा**–सासर–कानडे, पेण मृत्यू १९३८.

२) **सुंदराबाई**–सासर–गाडगीळ, डोंबिवली.

सासवणे घराणे क्रमांक ५
सासवणे–अलिबाग–पनवेल–डोंबिवली



४/४ **अच्युत श्रीधर**–जन्म १८ ।८ ।१९१६, सासवणे येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–शेती व आवास येथे नाझरे हायस्कूल मध्ये ३३ वर्षे शिक्षकाची नोकरी. १९७६ मध्ये निवृत्त. वास्तव्य–सासवणे.
भार्या : १) **सुनिता**–माहेर–फडके, रा. झिराड ता. अलिबाग. मृत्यू १९७४. २) **निर्मला**–माहेर–लीला देशमुख, रा. उळशी, मंडणगड, जि. रत्नागिरी.
कन्या :
१) **वसुमति**–जन्म १९४०. सासर–वसुधा मधुसूदन फाटक, शास्त्री हॉल, ग्रँटरोड, मुंबई –७.
२) **विजया**–जन्म १९४३. शिक्षण–एस्.एस्.सी. सासर–विद्या श्रीकृष्ण घैसास, जोगेश्वरी, मुंबई.
३) **शैलजा**–जन्म १९४७. शिक्षण–एस्.एस्.सी. सासर–साठे, दादर, मुंबई.
४) **पद्मजा**–जन्म १९५२. शिक्षण–बी.ए. सासर–अनुराधा काळे, दादर, वरळी, मुंबई.
५/४ **दिगंबर श्रीधर**–जन्मानंतर १९ ।२० वर्षांनी टॉयफाईडने मृत.

घराणे क्रमांक ५

सासवणे–अलिबाग–पनवेल–डोंबिवली

१/१ **अनंत**– #
२/२ **लक्ष्मण अनंत**– #
३/३ **सदाशिव लक्ष्मण**– #
४/४ **शंकर सदाशिव**–जन्म १८९१. मृत्यू १९६६. नवाकाळ वर्तमानपत्राचे कचेरीत ब्लॉकमेकरची नोकरी, वास्तव्य–मुंबई नंतर सासवणे.
भार्या : **यमुनाबाई**–माहेर–यमुना भिकाजी घाणेकर, रा, आवास, ता. अलिबाग.
५/५ **अच्युत शंकर**–जन्म २७ ।९ ।१९२८. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिकल

सासवणे घराणे क्रमांक ६
सासवणे–अलिबाग–पनवेल–डोंबीवली



सप्लाय कं. लि. मध्ये नोकरी. सप्टेंबर १९८८ मध्ये निवृत्त. व्यापाराची आवड.
भार्या : **कमल**–जन्म १० ।२ ।१९३५. माहेर–कमल दत्तात्रय काणे, रा. आंजर्ले, जि. रत्नागिरी.
वास्तव्य–सासवणे.

६/६ **प्रसाद अच्युत**–जन्म १२ ।१० ।१९७१.
आय.टी.आय. पनवेल येथे इलेक्ट्रिशियनचा कोर्स चालू.

७/५ **यशवंत शंकर**–जन्म १९३५.
शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–पंजाब नॅशनल बँकेत नोकरी. वास्तव्य–बी –९० रिझर्व बँक कॉलनी, मराठा मंदिर मागे, बॉम्बे सेंट्रल.
भार्या : **संध्या**–माहेर–मनू पंत, नागपूर मुंबई येथे रिझर्व्ह बँकेत नोकरी.

८/६ **अनिरुध्द यशवंत**–वय २१ वर्षे. व्यवसाय–मर्चंट नेव्ही मध्ये रेडियो ऑफिसरची नोकरी.

९/६ **विश्राम यशवंत**–वय १८ वर्षे. १२ वीत शिकत आहे.

१०/४ **विष्णु (अण्पा) सदाशिव**–वय ७८ वर्षे. हयात. अविवाहित.

११/४ **कृष्णाजी सदाशिव**–जन्म १९०७. मृत्यू २० ।३ ।१९८७. इतर माहिती नाही.
भार्या : **कमल**–माहेर–कमल दामले, पाली. ता. सुधागड. अपत्य नाही.

१२/४ **सीताराम सदाशिव**–मृत्यू १९८४. अविवाहित.

घराणे क्रमांक ६

सासवणे–अलिबाग–पनवेल–डोंबिवली

१/१ **भिकाजी**– #
२/२ **पांडुरंग भिकाजी**– #
३/३ **भालचंद्र पांडुरंग**–जन्म १९०१. मृत्यू २ ।७ ।१९५०. व्यवसाय–शिक्षक वास्तव्य– आवास, अलिबाग. जि. रायगड.
भार्या : **राधाबाई**–माहेर–गोदावरी रामचंद्र कुंटे, ता. अलिबाग मृत्यू ४.३.१९८७.

कन्या :
१) **ताराबाई**–जन्म १९३८. सासर–सुलभा मनोहर जोशी, शांती निकेतन, नामदेव पथ, डोंबिवली (पूर्व).
२) **लीला**–जन्म १९४५. सासर–शामला सिताराम गांगल, रा. जांभिवली, ता. कर्जत. पति–सीताराम महादेव गांगल, जांभिवली पोष्ट–गौरकामथ, ता. कर्जत.
४/४ **महादेव भालचंद्र**–जन्म ३१ ।३ ।१९३१, थळ. शिक्षण–एस्.एस्.सी. पास व्यवसाय– १ ।७ ।१९४९ पासून पोलिस अधिक्षक कार्यालयांत अलिबाग येथे स्टेनोग्राफर (पी. ए.) ची नोकरी. वास्तव्य–८ मारूती नाका, महाराष्ट्र कोलडेपोसमोर, अलिबाग.
भार्या : **रोहिणी**–माहेर–सुमन रामकृष्ण दीक्षीत.
कन्या :
१) **कालिंदी**–जन्म ८ ।११ ।१९६७. शिक्षण–बी. ए, सासर–भागवत, बडोदे.
५/५ **किरण महादेव**–जन्म १८ ।८ ।१९६२. शिक्षण–१२ वी पास. व्यवसाय–सरकारी नोकरी–पोलीस खाते, अलिबाग येथे कारकून.
६/५ **संजय महादेव**–जन्म २१ ।३ ।१९६४. शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–हिंदुस्तान ऑर्ग्यनिक केमिकल्स मध्ये रसायनी येथे नोकरी. वास्तव्य–रसायनी.
७/४ **सदाशिव भालचंद्र**–जन्म १ ।१ ।१९२६. मृत्यू २ ।५ ।१९८१. शिक्षण–व्ह. फा. इंग्रजी ३ पास. व्यवसाय–प्राथमिक शिक्षक, महाड तालुका. वास्तव्य–पनवेल.
भार्या : **कमल**–जन्म १९३७. माहेर–प्रभावती वामन सोमण, चिरनेर. व्ह. फा. खाजगी हॉस्पीटल मध्ये नर्स. सध्या निवृत्त.
८/५ **अरुण सदाशिव**–जन्म २४ ।१२ ।१९५६. शिक्षण–इंटर कॉमर्स. व्यवसाय–प्रगति ट्रान्सपोर्ट पनवेल येथे नोकरी. अविवाहित. भारतभर पदभ्रमण कार्यक्रम केला. वास्तव्य–प्रो. देवधर वाडा, सिटी पोस्टा जवळ, पनवेल. जि. रायगड.
९/५ **सुनिल सदाशिव**–जन्म ९ ।३ ।१९५९. शिक्षण–आय्.टी.आय्. मशिनिस्ट मिलर. व्यवसाय–बजाज ऑटो वाळुंज, औरंगाबाद येथे. वास्तव्य–बेगमपुरा, थत्तेवाडा, औरंगाबाद.
भार्या : **श्रध्दा**–माहेर–रोहिणी गोविंद ताम्हनकर, खरवली.
१०/४ **बाळकृष्ण भालचंद्र**–जन्म १० ।११ ।१९२७. शिक्षण–एस्.एस्.सी. १९४९ मध्ये. व्यवसाय–रेव्हेन्यू खात्यात, सरकारी नोकरी. तहसीलदार म्हणून १९८५ मध्ये निवृत्त. वास्तव्य–सुरेखा भुवन, ३ रा मजला, टिळक नगर, पोस्ट ऑफिस बिल्डींग, राजेंद्र प्रसाद रोड, डोंबिवली, (पूर्व).
भार्या : **शोभना**–माहेर–कमल ज्ञानेश्वर काळे, रा. नांदिवडे, जयगड जवळ, जि. रत्नांगिरी. कन्या ३, पुत्र १.
कन्या :
१) **प्रतिभा**–जन्म ११ ।६ ।१९५६. बी. कॉम. दुसरे वर्ष पास. हायकोर्टात नोकरी. सासर–अनघा सतीश बाळ, कल्याण.
२) **वैजयंती**–जन्म १० ।१ ।१९६०. ११ वी पास. डोंबिवली नगरपालिकेत नोकरी. सासर–वैजयंती अरूण केळुस्कर, डोंबिवली.
३) **मेधा**–जन्म ११ ।१० ।१९६६. बी. कॉम. खाजगी नोकरी, ठाणे येथे आहे. सासर– स्नेहा सुनिल हळदणकर, करी रोड, मुंबई.
११/५ **सुमंगल बाळकृष्ण**–जन्म २८ ।२ ।१९७३. एफ्.वाय. कॉमर्स शिकत आहे.
१२/४ **केशव भालचंद्र**–अविवाहित. १९७४ पासून परागंदा.

घराणे क्रमांक ७

सासवणे–नागपूर

१/१ **एमदेव– #**
२/२ **धोंडदेव एमदेव– #**
३/३ **शिवराम धोंडदेव– #**
४/४ **यशवंत शिवराम**–जन्म सासवने येथे. मृत्यू चंपाषष्ठी इ. स. १९४०.
भार्या : **सावित्रीबाई**–माहेर–यमुनाबाई काशीनाथ आठवले, चौल, रेवदंडा. मृत १९४८.
कन्या : **चंदूताई**–सासर–सरस्वती मोरश्वर परांजपे, बँक

सासवणे घराणे क्रमांक ७

सासवणे–नागपूर



सिल्व्हर कं. महात्मा गांधी रोड विलेपार्ले (पूर्व).

५/५ **गजानन यशवंत**–जन्म ४ ।११ ।१९२५ खांब, ता. रोहा येथे. शिक्षण—व्हा. फा. व इंग्रजी ४ थी पास. व्यवसाय—१९५२ पासून नागपूर येथे टाईपरायटर दुरुस्ती व विक्रीचा धंदा. १९८६ पासून स्वातंत्र्य सैनिक म्हणून पेन्शन मिळते. वास्तव्य—बुटी गाडीखाना, मेन रोड, सीताबर्डी, नागपूर—१२.

भार्या : **मंगला**–माहेर—इंदु महादेवराव सोहोनी, महाल, नागपूर.

कन्या : **नीलिमा**–जन्म २१ ।७ ।१९६१. शिक्षण—१२वी. सासर—धनश्री धनंजय पटवर्धन, अंकलेश्वर (गुजराथ राज्य).

६/६ **अशोक गजानन**–जन्म ३० ।१ ।१९५३. शिक्षण—बी. कॉम. व्यवसाय—बँक ऑफ महाराष्ट्र. नागपूर येथे नोकरी.

भार्या : **जयश्री**–माहेर—पद्मा परशुराम काणे. नागपूर. पुत्र २, कन्या १.

कन्या : **मानसी**–जन्म ६ ।५ ।१९८६. जुळी भावंडे पुत्र १) **संदीप**–जन्म २२ ।१ ।१९८४. २) **मंगेश**–जन्म ६ ।५ ।१९८६.

७/६ **अनंत ऊर्फ निनाद गजानन**–जन्म ९ ।९ ।१९६५. शिक्षण—१२ वी पर्यंत, टाईपरायटर दुरूस्तीचे काम.

८/५ **बाळकृष्ण यशवंत**–जन्म १९२९. पोलीस खात्यात १६ वर्षे अलिबाग येथे नोकरी नंतर वास्तव्य—सासवणे येथे.

भार्या : **लता**–माहेर—परूळेकर, शिक्षिका. मृत्यू १९७४.

९/६ **प्रविण बाळकृष्ण**–वय २२. ड्रायव्हरची खाजगी नोकरी.

१०/६ **विद्याधर बाळकृष्ण**–वय २०. शिक्षण—७ वी.

११/६ **विनोद बाळकृष्ण**–वय १८. शिक्षण—९ वी.

मशीद बंदर येथे पानाची गादी.
१२/५ **दत्तात्रय यशवंत**–वय ५६. शिक्षण–एस्. एस्. सी. पर्यंत पुलगांव येथे सरकारी नोकरी. (अॅम्युनेशन डेपो) टाईपरायटर मेकॅनिकची नोकरी. वास्तव्य–सीएडी रेल्वे क्वार्टर्स ३२/ए पुलगांव (विदर्भ).
भार्या : **माधुरी**–माहेर–चक्रवर्ती, पुलगांव. पुत्र २ कन्या १.
कन्या : **वंदना**–वय २८ शिक्षण–बी. ए.
सासर–गोडबोले.
१३/६ **विवेक दत्तात्रय**–वय ३२.
भार्या : **रत्नप्रभा**–माहेर–माहिती नाही.
१४/६ **विकास दत्तात्रय**–वय ३०. अविवाहित.
१५/५ **मुरलीधर यशवंत**–जन्म १९४०.
व्यवसाय–गव्हर्मेंट स्टेशनरी डेपो, औरंगाबाद येथे टाईपरायटर मेकॅनिकची नोकरी. वास्तव्य–औरंगाबाद.
भार्या : **माधवी**–पुत्र १ कन्या ३.
कन्या :
१) **सीमा**–वय २४. १२ वी पास. सासर–कुलकर्णी.
२) **विनया**–वय २२. शिक्षण–११ वी.
३) **पद्मा**–वय २०. शिक्षण–१० वी.
१६/६ **अनिरुद्ध मुरलीधर**–वय १६. शिक्षण–इ. ९ वी.
१७/६ **मधुकर यशवंत**–जन्म १२ ।९ ।१९४२.
शिक्षण–एस्. एस्. सी. आवास हायस्कूल मधून पास, व्यवसाय–शेती. वास्तव्य–सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड. (वडिलोपार्जित घरी)
भार्या : **विनया**–माहेर–विमल मधुसूदन फाटक. धोकवडे, ता. अलिबाग, अपत्य नाही.

जांभुळपाडा घराणे

जांभुळपाडा हे गाव रायगड जिल्ह्यात (पूर्वीच्या भोर संस्थानात) ठाणे शहरापासून ७० किं मीटर व खोपोलीपासून १० कि. मीटर अंतरावर ठाणे–पाली मार्गावर आहे. गावाजवळच अंबा नदी वहाते. गावांत अभ्यंकर, बोडस, जोशी, लेले, इत्यादींची घरे असून रामेश्वर, हनुमान, दशभुजा सिद्धी विनायक मंदिर, श्रीराम मंदिर, विष्णू मंदिर अशी मंदिरे असून व्याघ्रेश्वर देव हा ग्रामदेव मानतात. गावची वस्ती अंदाजे ५ ।६ हजार आहे. व गेल्या २४ ।२५ जुलै १९८९ रोजी झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे अनेक गुरेढोरे, माणसे वाहून मृत्युमुखी पडली. त्यानंतर गावाचा कायापालट होत आहे.

या ठिकाणी अभ्यंकरांचे एकच रहाते घर असून तिथे श्री. यशवंत त्र्यंबक अभ्यंकर व कुटुंबीय रहातात. त्यांचेकडे इ.स. १९१० पासून पोष्ट ऑफिस आहे. इतर घरे उध्वस्त झाली आहेत. कुर्थे गावाहून हरभट अभ्यंकर जांभुळपाडा येथे १७५० चे सुमारास आले असे त्र्यंबकेश्वरीचे लेखावरून समजते.

जांभुळपाडा मूळ गांव म्हणून सांगणाऱ्या बंधूकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील घराणी दर्शविली आहेत.

घराणे क्रमांक १.

वंशावळी क्रमांक १. जांभुळपाडा – कल्याण – डोंबिवली मुंबई.

वंशावळी क्रमांक २. जांभुळपाडा–सोलापूर.

घराणे क्रमांक २. जांभुळपाडा –ठाणे–मुंबई

घराणे क्रमांक ३. जांभुळपाडा–ठाणे–मुंबई.

घराणे क्रमांक ४. जांभुळपाडा–पेण–ठाणे–मुबंई.

घराणे क्रमांक ५. जांभुळपाडा–मुंबई–कोल्हापूर–पुणे.

घराणे क्रमांक १

जांभुळ पाडा–कल्याण–डोंबिवली–मुंबई.

वंशावळी क्रमांक १

१/१ **हरभट**–हे इ.स. १७५० चे सुमारास कुर्धे (रत्नागिरी) येथून जांभुळपाडा येथे आले असावे. प्रथम त्यांचे वास्तव्य जांभुळपाडा नजिक वऱ्हाड येथे होते. नंतर काही काळाने ते जांभूळ पाडा येथे आले.

२/२ **महादेव हरभट**–व्यवसाय–खोतीचा. जांभुळपाडा हे भोर संस्थानात असताना दशग्रंथी ब्राम्हण म्हणून पंत सचिव राजे यांचे कडून आश्रय मिळाला.

३/३ **गोविंद महादेव**– #

४/४ **कृष्णाजी गोविंद**–हे वेदान्ती दशग्रंथी ब्राह्मण होते.

५/५ **विठ्ठलपंत कृष्णाजीपंत**–वय वर्षे ८५ ला मृत्यू. हे वेदान्ती दशग्रंथी ब्राह्मण होते.

भार्या : **रखमाबाई**–

६/६ **पद्माकर विठ्ठल**– #

७/७ **सदाशिव पद्माकर**– #

८/८ **रामचंद्र सदाशिव**– #

९/७ **रघुनाथ पद्माकर**– # वास्तव्य–'सूर्य' बंगला, मुलूंड (पूर्व) मुंबई–८१.

१०/६ **प्रभाकर विठ्ठल**– #

११/७ **विरेश्वर प्रभाकर**–जन्म १२ ।४ ।१९००. मृत्यू फेब्रूवारी १९८९. शिक्षण–एल. सी. पी. एस. इ. स. १९२८ मध्ये पास. व्यवसाय–बेंगाल केमिकल कंपनीत वैद्यकीय अधिकारी (मेडिकल ऑफिसर) शिवाय स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय होता. वास्तव्य–मुंबई.

भार्या : **स्नेहलता**–शिक्षण–बी.ए. माहेर–द्वारका श्रीधर गोगटे, आजरे, जि. कोल्हापूर. महाराष्ट्र सरकारच्या सिव्हिल सप्लाय खात्यांत नोकरीस होत्या. नंतर खादी आणि ग्रामोद्योग कमिशन मध्ये १९४३ ते १९६२ पर्यंत नोकरी. सध्या वास्तव्य–वृध्दाश्रम, बदलापूर येथे.

घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक १

जांभुळपाडा–कल्याण–डोंबिवली–मुंबई



अपत्य नाही.
१२/६ **शिवराम विठ्ठलपंत**–वयाच्या ८६ वर्षी वारले. शिक्षण–इंग्रजी शिकलेले. व्यवसाय–सातारा हेड ऑफिसमध्ये हेड पोस्ट मास्तर होते. शिस्तप्रिय व करारी बाणा होता.
१३/७ **त्रिंबक शिवराम**–जन्म १८९२. मृत्यू १५ ।१० ।१९७१. वास्तव्य–जांभुळपाडा. हे व पेणचे श्री. रामभाऊ मंडलीक लोकमान्य टिळकांचे कुलाबा जिल्हयातील सहकारी होते. शिवाय भोरच्या राजाचे सल्लागार मंडळात होते.
भार्या : **राधाबाई**–माहेर–सईबाई गणेश जोशी, (फौजदार जोशी). वास्तव्य–सिध्देश्वर आळी, कल्याण.
कन्या :
(१) **मैना**–सासर–मथुरा वासुदेव गांगल. पति– डॉ. वासुदेव रघुनाथ गांगल. वास्तव्य–मुक्काम पोस्ट कर्जत जि. रायगड. कविता करण्याचा छंद.
(२) **निर्मला**–मृत. सासर–प्रभावती भास्कर दीक्षित. पति–भास्कर रंगनाथ दीक्षित (मयत). वास्तव्य–पै बिल्डींग, रामबाग लेन नं.५, कल्याण, जि. ठाणे.
(३) **विठाबाई**–सासर–कमल नरहर पेंडसे. पति–नरहर पुरुषोत्तम पेंडसे. वास्तव्य–नंदादीप सोसायटी, पेंडसेनगर, डोंबिवली (पू).
(४) **तारा**–सासर–सुमन विष्णूपंत कोल्हटकर. पति–विष्णूपंत विनायक कोल्हटकर (मयत). वास्तव्य–८२९ सदाशिव पेठ, चिपळूणकरांचा वाडा, पुणे.
(५) **मालती**–मृत. सासर–मालती माधव पेंडसे पति–माधव शिवराम पेंडसे. वास्तव्य–मु. पो. बिरवाडी, जि. रायगड.
(६) **कुंदा**–सासर–सुमती सुभाष टिळक. पति–सुभाष गोपाळ टिळक वास्तव्य–५/११६ विजयनगर सोसा. अंधेरी (पूर्व) मुंबई.
१४/८ **यशवंत त्रिंबक**–जन्म २१ ।११ ।१९२७, जांभुळपाडा. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– शेती, जंगल कॉन्ट्रॅक्टर. वास्तव्य–मु. पो. जांभुळपाडा, ता सुधागड, जि. रायगड. सामाजिक कार्याची आवड, वनवासी क्षेत्रात काम. वासुदेव बळवंत फडके यांना त्याकाळी रुपये १०००/–देऊन त्यांच्या कार्यास मदत केली.
भार्या : **प्रमिला**–शिक्षण–मॅट्रिक. माहेर–प्रमिला गजानन जोशी.
कन्या :
१) **जान्हवी**–जन्म १८ ।३ ।१९५७. सासर–अरुंधती अशोक चाफेकर वास्तव्य–योगानंद सोसायटी, ८ व, वजीरा नाका, बोरिवली (प). मुंबई.
२) **शरयु**–जन्म १५ ।९ ।१९६९. शिक्षण–बी. कॉम्.
१५/९ **नारायण यशवंत**–जन्म १६ ।६ ।१९५१. शिक्षण–इलेक्ट्रिकचा कोर्स. व्यवसाय– ऑटोमॅट्रिक इलेक्ट्रिक कं. त नोकरी. वास्तव्य–रामकृपा, पेंडसेनगर, रस्ता क्र. ४, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **सुवर्णा**–माहेर–मीना बसंत पुणेकर, डोंबिवली.
कन्या : **गौरी**–शिकत आहे.
१६/१० **गणेश नारायण**– *
१७/९ **वासुदेव यशवंत**–जन्म ३ ।३ ।१९५५. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–जंगल कॉन्ट्रॅक्टरचा खाजगी धंदा. वास्तव्य–जांभुळपाडा.
भार्या : **वसुधा**–माहेर–हेमा दत्तात्रय परांजपे. डोंबिवली.
कन्या : **उमा**–
१८/१० **महेश वासुदेव**– *
१९/९ **विजय यशवंत**–जन्म २६ ।७ ।१९५९ शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–एस्कल इंडस्ट्रीजमध्ये नोकरी. वास्तव्य–जांभुळपाडा.
भार्या : **विद्या**–माहेर–मंगल परशुराम गोरे, पनवेल.
२०/९ **रामकृष्ण यशवंत**–जन्म १३ ।८ ।१९६१. शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–खाजगी धंदा. वास्तव्य–जांभुळपाडा.
२१/९ **माधव यशवंत**–जन्म १ ।११ ।१९६३ (त्रिपुरी पोर्णिमा), कल्याण. शिक्षण–एस्. एस्. सी; ए. टी. डी; जी. डी. आर्ट. व्यवसाय–महाराष्ट्र राज्य दृक–श्रवण शिक्षण संस्था पुणे–३० येथे नोकरी. वास्तव्य–८२९ चिपळूणकर वाडा, सदाशिव पेठ, पुणे. पक्षीनिरीक्षण, निसर्गभ्रमण, रूग्णसेवा, शास्त्रीयसंगीत, गवंडीकाम यांची आवड. राज्य विज्ञान प्रदर्शन १९७९ महाराष्ट्र ग्रामीण विभाग प्रथम पारितोषिक. राज्य कला प्रदर्शन १९८६ महाराष्ट्रात प्रथम. महात्मा फुले म्युझिअम परमनंट आर्ट गॅलरी मध्ये चित्र प्रदर्शित.
२२/९ **दत्तात्रेय यशवंत**–जन्म १७ ।४ ।१९६५. शिक्षण–बी. एस्सी. वास्तव्य– रामकृपा, पेंडसेनगर,

डोंबिवली (पूर्व),
२३/८ **गजानन त्रिंबक**–जन्म ३१ ।१ ।१९४६, जांभुळपाडा. शिक्षण–एस्. एस्. सी
व्यवसाय–ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक लि. मध्ये नोकरी.
वास्तव्य–नंदादीप सोसायटी पेंडसेनगर, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **वृषाली**–माहेर–प्रतिभा नारायण घैसास, कुर्ला.
कन्या : **कांचन**–जन्म २७ ।९ ।१९७२. शिक्षण–एस्. एस्. सी. १९८८. अकरावी सायन्स.
२४/९ **मंदार गजानन**–जन्म १२ ।९ ।१९७६. शिक्षण–इयत्ता ७ वी.
२५/६ **दामोदर विठ्ठलपंत**–
भार्या : **सरस्वती**–माहेर–लेले, जांभुळपाडा.
२६/७ **सीताराम दामोदर**–जन्म १८९४. मृत्यू ३ ।५ ।१९६६, मालाड.
भार्या : **भागिरथी**–माहेर–द्रौपदी गोविंद केळकर.
कन्या :
१) **चंद्रकला**–जन्म १५ ।८ ।१९२४. सासर–उषा अनंत पेंडसे. पुणे.
२) **अनुसूया**–सासर–पुष्पलता गोविंद वैशंपायन (मालाड). मृत्यू १९७४.
३) **सुनंदा**–जन्म २३ ।१ ।१९३७. सासर–सुनंदा प्रभाकर वाड, चुनाभट्टी, मुंबई.
२७/८ **माधव सीताराम**–जन्म ९ ।३ ।१९३१. जांभुळपाडा. शिक्षण–एम्. ए. (अर्थशास्त्र)
व्यवसाय–प्राध्यापक. अर्थशास्त्र विभाग प्रमुख–भवन्स कॉलेज, अंधेरी, मुंबई–५८ वास्तव्य–१ ।८ जयनगर,



(बसलेले, डावीकडून) प्रा. माधव सीताराम व सौ. लीना
(उभे, डावीकडून) चि. अमित व चि. अस्मिता

नेव्ही कॉलनी जवळ, मालाड (प), मुंबई ४०००६४.
भार्या : **लीना**–शिक्षण–बी. ए. (ऑनर्स); जॅर्नलिझमचा कोर्स. माहेर–पुष्पा विश्वनाथ घुले, मुलूंड, मुंबई.
कन्या : **अस्मिता**–जन्म २६ ।३ ।१९७१. एफ्.वाय.बी.ए. च्या वर्गात शिकत आहे.
२८/९ **अमित माधव**–जन्म ४ ।१० ।१९६७.
शिक्षण–इंजिनियरींग कॉलेज पुणे येथून बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स). व्यवसाय–बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी वरळी येथे लेक्चरर.
२९/८ **दत्तात्रय सीताराम**–जन्म १७ ।८ ।१९३३, जांभुळपाडा. शिक्षण–बी. ए, बी. एड्, टी. डी. व्यवसाय–शिक्षण प्रसारक मंडळ मालाडचे उत्कर्ष मंदिर, मालाड हायस्कूल येथे शिक्षक. वास्तव्य–शिवसदन २ रा मजला, खो. क्र. १२, लिबर्टी गार्डन,क्रॉसलेन क्र ३, मालाड (प) मुंबई–६४.
भार्या : **शुभांगी**–माहेर–सुलोचना शंकर आठवले.
३०/९ **राजेश दत्तात्रय**–जन्म २३ ।१ ।१९६७.
शिक्षण–एस्. वाय बी. ए. च्या वर्गात.
३१/९ **विश्वेश दत्तात्रय**–जन्म २५ ।११ ।१९७०.
शिक्षण–टी. वाय. बी. कॉम्. च्या वर्गात.
३२/८ **प्रमोद (भालचंद्र) सीताराम**–जन्म २२ ।७ ।१९४०, पुणे. शिक्षण–इंटर आर्टस्. व्यवसाय–फॉर्वर्ड मार्केटस कमिशन मध्ये १९६० ते १ मे १९८५ पर्यंत नोकरी, नंतर स्वेच्छानिवृत्ती. नकला करण्याचा छंद, काव्य करण्याची आवड.
वास्तव्य–मामलतदार वाडी, २ स्वागत, मालाड (प) मुंबई–६४.
भार्या : **कल्पना**–माहेर–कुंदा बाळकृष्ण वाड.
शिक्षण–बी. ए.
कन्या : **मनिषा**–जन्म २६ ।५ ।१९७२. शिक्षण–एस्. वाय. बी. कॉम्. च्या वर्गात.
३३/९ **मंदार प्रमोद**–जन्म २४ ।३ ।१९७६. शिक्षण–इ. ९ वीत.
३४/८ **भास्कर सीताराम**–जन्म १९३५. मृत्यू ४ ।४ ।१९५९. शिक्षण–इंटर आर्ट पर्यंत.
व्यवसाय–नोकरी.
३५/६ **महादेव विठ्ठल**– #
३६/७ **शंकर महादेव**– #
भार्या : **यशोदा**–माहेर–यशोदा हरि जोशी, कर्जत.
३७/८ **पांडुरंग शंकर**–जन्म ५ ।२ ।१९२९.
शिक्षण–मॅट्रिक, (मुंबई युनिव्हर्सिटी). व्यवसाय–इ. स. १९७२ पासून मागाना प्रॉड. आयुर्वेदिक रिसर्च सेंटर चा स्वत:चा व्यवसाय. वास्तव्य–एफ्/५ इंद्रवदन बाई पद्माबाई ठक्कर रोड, शिवाजी पार्क, कोहिनूर मील जवळ, माहीम, मुंबई ४०००१६. कीर्तनकार व कवी. बुवा म्हणून त्यांना ओळखतात.
भार्या : **विमल**–माहेर–विमल दामोदर दामले, शिरळ. ता. चिपळूण.
कन्या : **नीलिमा**–जन्म ११ ।६ ।१९५७.
शिक्षण–बी.एस्सी; डी.एम्.एल्.टी; सी.ए., आय्.आय्.बी.
व्यवसाय–बँक ऑफ बरोडात नोकरी, मुंबई.
सासर–अनुजा अविनाश बर्वे. वास्तव्य–द्वारा. रा.ज. बर्वे. हनुमान रामानंद सोसा. १/२५ दीक्षित एक्सटेन्शन रोड, विलेपार्ले (पू), मुंबई–५७.

घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक २

जांभुळपाडा–सोलापूर–बडोदे–ठाणे–मुंबई.

या घराण्यातील या दुसऱ्या वंशावळीचा संबंध १ ल्या वंशावळीतील मूळ व्यक्तींशी प्रस्थापित करता आलेला नाही. तथापि हरभट व त्यांचे वंशज यांचा या हरि या मूळपुरुषाशी नाते संबंध असावा असे वाटते.
३८/१ **हरि**– #
३९/२ **काशीनाथ हरि**– #
कन्या : **सुंदराबाई**–
४०/३ **नारायण काशीनाथ**–व्यवसाय–व्यापार (किराणाचे दुकान),
कन्या : **काशी**–
४१/३* **हरि काशीनाथ**–मृत्यू वयाच्या ६० व्या वर्षी.
व्यवसाय–रेल्वे अधिकारी (उच्च).
भार्या : **रखमाबाई**–माहेर–रखमाबाई जगन्नाथ केतकर,

जांभुळपाडा घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक २

जांभुळपाडा–सोलापूर–बडोदे–ठाणे–मुंबई



भिवंडी.
कन्या :
१) **मैनाताई**–सासर–मैनाताई वि. आपटे.
२) **इंदिराबाई**–सासर–इंदिराबाई अ. सहस्रबुध्दे.
३) **सुमित्रा**–सासर–सुमित्राबाई रा. गोखले.
४२/४ **विनायक हरि**–जन्म १९००. मृत. व्यवसाय–बडनेरा येथे रेल्वेमध्ये तारमास्तरची नोकरी.
भार्या : **रमाबाई**–माहेर–मैनाताई विश्वनाथ गोडबोले.
४३/५ **काशीनाथ विनायक**–जन्म १७ ।१० ।१९२७. सोलापूर येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–रेल्वेत ड्रायव्हर म्हणून नोकरी. वास्तव्य–न्यू रेल्वे कॉलनी, लेप्रसी फौडेंशन जवळ, हिंदनगर, वर्धा.
भार्या : **सुलभा**–माहेर–कमल, नासिक.
कन्या :
१) **कल्पना**–शिक्षण–बी. कॉम्. सासर–वंदना विठ्ठल भिडे. वर्धा.
२) **अर्चना**–शिक्षण–१२ वी.
३) **वर्षा**–शिक्षण–११ वी.
४४/६ **धनंजय काशीनाथ**–जन्म २६ ।१० ।१९७३. शिक्षण–१० वी.
४५/५ **प्रकाश विनायक**–व्यवसाय–कलेक्टर ऑफिसमध्यें नोकरी, वास्तव्य–देशबंधू वाचनालय जवळ, वरूड. जि. अमरावती.
४६/५ **श्रीकांत विनायक**–व्यवसाय–पी. डब्ल्यू. डी. मध्ये असि. स्टोअरकीपर. वास्तव्य–अल्लापल्ली, जि. गढचिरोली.
४७/५ **पुरुषोत्तम विनायक**–वास्तव्य–२३/१ स्ट्रँड, पि. डब्ल्यू लाईन, कलकत्ता–२१.
४८/४ **दिगंबर हरि**–जन्म १९०४. वास्तव्य–३९४ कँप, सोलापूर.
भार्या : **अनुताई**–माहेर–अनुताई काशिनाथ गानू. कन्या ५. पुत्र ४.
कन्या :
१) **मीनाक्षी**–वय ५६. सासर–मीनाक्षी वसंत काळे, अक्कलकोट.
२) **ललिता**–वय ५४. सासर–ललिता प्रभाकर जोशी, पुणे.
३) **नलिनी**–वय ४६. सासर–नलिनी संतोष वैद्य, नासिक.
४) **स्मिता**–वय ४६. सासर–स्मिता श्रीकांत आपटे, हैद्राबाद.
५) **मंगल**–वय ४२. सासर–मंगल सुधीर करमरकर, हैद्राबाद.
४९/५ **मधुकर दिगंबर**–वय ५८.
भार्या :**मालती**–वय–५६. सासर–मालती प्रमोद दातार.
कन्या :
(१) **वंदना**–वय २७.
(२) **अर्चना**–वय २१.
५०/६ **आनंद मधुकर**–वय ३०.
भार्या : **रेखा**–वय २६.
कन्या : **सुप्रिया**–वय ८.
५१/७ **सचिन आनंद**–वय १०.
५२/६ **मिलिंद मधुकर**–वय २४.
५३/५ **रामदास दिगंबर**–वय ५२.
भार्या : **राजश्री**–वय–४८.
कन्या :
१) **रोहिणी**–वय–१८.
२) **रंजू**–वय १६.
५४/६ **रणधीर रामदास**–वय १४.
५५/५ **प्रमोद दिगंबर**–वय ४८.
भार्या : **प्रमिला**–वय ४४.
कन्या : **सविता**–वय २०.
५६/६ **राघवेंद्र प्रमोद**–वय १८.
५७/५ **जयंत दिगंबर** –वय ४४.
भार्या : **आशा**–वय ४०.
कन्या : **शुभांगी**–वय ८ शिकत आहे.
५८/६ **संतोष जयंत**–वय १०. शिकत आहे.
५९/६ **अमित जयंत**–वय ६. शिकत आहे.
६०/४ **यशवंत हरि**–जन्म १९११. यवत. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–बुक बाँड कं. तून सेल्समन म्हणून निवृत्त. वास्तव्य–३९४ कँप, सोलापूर ४१३००३.
भार्या : **सुशिला**–कन्या ४.
कन्या :
१) **सुधा**–सासर–वसुधा प्रभाकर ताम्हनकर, अंधेरी.

२) **मंदाकिनी**–सासर्–स्मिता विद्याधर फाटक, डहाणू.
३) **सुवर्णा**–सासर–सुनिला श्रीपाद भावे. विरार.
४) **सुहासिनी**–सासर–अनिता अविनाश कोल्हटकर, मालाड.
६१/५ **विजय यशवंत**–व्यवसाय–को. ऑप. सोसायटीमध्ये गव्हर्मेंट ऑडीटर.
भार्या : **भाग्यश्री**–व्यवसाय–टेलिफोन मध्ये हेडक्लार्क.
६२/५ **दिलीप यशवंत**–व्यवसाय–जनता सहकारी बँकेत नोकरी.
६३/३ **गणेश काशीनाथ**–मृत्यू ४ ।१ ।१९६४. व्यवसाय–व्यापार (किराणा दुकान).
भार्या : **सरस्वती**–माहेर–मराठे.
कन्या : **कुसुम**–जन्म २९ ।५ ।१९२९. सासर–कुसुम रामचंद्र सोहोनी.
६४/४ **गोविंद (नामदेव) गणेश**–जन्म २७ ।२ ।१९०९. सोलापूर येथे वयाच्या चौथ्या वर्षी दोन्ही डोळे गेल्याने अंध. नंतर संगीत शिक्षण घेतले. संगीताचे क्लासेस घेण्याचा व्यवसाय. हयात. वास्तव्य–८ मोतीमहाल, डोंबिवली (पूर्व).
६५/४ **सदाशिव गणेश**–जन्म १७ ।२ ।१९१७, सोलापूर येथे. मृत्यू १३ ।१० ।१९८३.
भार्या : **सरोजिनी**–माहेर–इंदूताई गोपाळ आठवले. तिकोटा जि. धारवाड.
कन्या :
१) **सुनंदा**–शिक्षण–बी. ए, सासर–अंजली विश्वनाथ जोशी. पती–डॉ. विश्वनाथ शंकर जोशी. रा. योगायोग धरमपेठ एक्स्टेंशन, नागपूर.
२) **सरला**–जन्म १९४४. मृत्यू ३ ।१० ।१९७२. शिक्षण–बी. ए, सासर–सरला अरूण भाटे, महाड. (रायगड).
३) **संध्या**–जन्म १९४७. शिक्षण–बी. ए, सासर–संध्या विजय बर्डे, अहमदनगर, हल्ली पुणे.
६६/५ **सुरेश सदाशिव**–जन्म १ ।११ ।१९३९. शिक्षण–डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनियरिंग. व्यवसाय–कार्यकारी अभियंता. महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, पुणे उपविभाग. वास्तव्य–५ केशवलक्ष्मी अपार्ट. अ. आयडियल कॉलनी, पौडरोड, पुणे-२९.
भार्या : **प्रतिभा**–माहेर–प्रतिभा श्रीकृष्ण पटवर्धन. रा. पुणे.
कन्या :
१) **मंजिरी**–जन्म ७ ।६ ।६८. शिक्षण–बी. ए, विवाहित.
२) **सुनेत्रा**–जन्म १२ ।७ ।७०. शिक्षण–१२ वीत शिकत आहे.
६७/६ **मंदार सुरेश**–जन्म १२ ।४ ।१९६६. शिक्षण–बी. कॉम्.
६८/५ **सुधीर सदाशिव**–जन्म २९ ।४ ।१९४२. शिक्षण–सिव्हिल इंजिनीयरींगचा डिप्लोमा, व्यवसाय–महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळांत, उपविभागीय अधिकारी, उपविभाग, ठाणे (पूर्व) येथे. वास्तव्य–बी. ८ मोतीमहाल सोसायटी, घन:श्याम गुप्ते रोड, विष्णुनगर, डोंबिवली (पश्चिम).
भार्या : **कल्पना**–माहेर–प्रभा विश्वनाथ जोशी. शिक्षण–बी. कॉम्. कऱ्हाड.
कन्या : **लीना**–जन्म ६ ।९ ।१९७६. इ. ९ वीत शिकत आहे.
६९/६ **आनंद सुधीर**–जन्म १२ ।७ ।१९७३. १२ वीत कॉमर्स मध्ये शिकत आहे.
७०/५ **सतीश सदाशिव**–जन्म १२ ।३ ।१९५१. शिक्षण–बी. एस्. सी. व्यवसाय–दारूबंदी खात्यात पुणे येथे उप–निरिक्षक.
भार्या : **सविता**–माहेर–संध्या भावे. पुणे.
कन्या : **अनघा**–इ. ४ थीत शिकत आहे.
७१/६ **अजय सतीश**–इ. ८ वीत शिकत आहे.
७२/४ **वसंत गणेश**–जन्म १९२७. इतर माहिती नाही.
७३/५ **विलास वसंत**– #
७४/३ **गोपाळ काशीनाथ**–मृत्यू १० ।३ ।१९५२. व्यवसाय–रेल्वेत उच्च अधिकारी. वास्तव्य–नागपूर.
भार्या : **राधाबाई**–माहेर–राधाबाई शिवराम देवधर.
कन्या : **कुसुम**– #
७५/४ **विठ्ठल गोपाळ**–जन्म १ ।७ ।१९२१. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–सेंट्रल रेल्वेतून कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त. वास्तव्य–प्लॉट नं १६४, ब्लॉक नं एफ्.३ श्री. गणपतराव पांडे ले आऊट, खामला रोड, नागपूर–२५.
भार्या :**तारामती**–माहेर–तारामती भास्कर कोल्हटकर.

भार्या :**तारामती**–माहेर–तारामती भास्कर कोल्हटकर.
कन्या :
१) **कुंदा**–सासर–कुंदा अनिलराव काणेकर, चंद्रपूर.
२) **सुनंदा**–सासर–सुंनदा रामकुमार वडोदकर, नागपूर.
७६/५ **अविनाश विठ्ठल**– #
भार्या :**मीना**–
७७/५ **अनिल विठ्ठल**– #
भार्या : **माया**–
७८/५ **अजित विठ्ठल**– #
भार्या : **मनिषा**–
७९/३ **गंगाधर काशीनाथ**–जन्म १८८५. मृत्यू १९५२. (ललितापंचमी). शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– रेल्वेत टेलिग्राफिस्ट म्हणून उच्च अधिकारी. वास्तव्य–शेवटी स्थायिक सोलापूर.
भार्या : **पार्वतीबाई**–मृत्यू २६ ।६ ।१९७१.
माहेर–सारंगपाणी, कल्याण.
कन्या :
१) **इंदु**–सासर–नलिनी कृष्णाजी जोशी. सोलापूर.
२) **सुमन**–सासर–विजया महादेव जोशी ,सोलांपूर
८०/४ **विश्वनाथ गंगाधर**–जन्म १५ ।१२ ।१९१५. मृत्यू २० ।११ ।७२ विशाखापट्टण येथे.
व्यवसाय–भारतीय नौदलात गॅझेटेड ऑफीसर होते.
वास्तव्य–पवई, मुंबई.
भार्या :**उषा**–जन्म २२ ।५ ।१९१६. माहेर–उषा हरिभाऊ गोडबोले.
कन्या : **आशा**–जन्म १७ ।४ ।१९४३. शिक्षण–बी. ए. बी. एड्. नोकरी–शिक्षिका. सासर–माधवी मनोहर दामले. पवई.
८१/५ **अरुण विश्वनाथ**–जन्म २८ ।२ ।१९४१.
शिक्षण–बी. ए. (ऑनर्स), डी. बी. एम्. व्यवसाय– आय. आय. टी. पवई मध्ये असिस्टंट रजिस्ट्रार. अनेक सामाजिक कार्यात भाग. नाटक रेडिओ व दूरदर्शन यात सहभाग. वास्तव्य–'विश्वसदन' प्लॉट ए/१६ आय. आय. टी. गेटसमोर पवई मुंबई–७६.
भार्या :**अनघा**–जन्म १० ।१० ।४८. व्यवसाय–नोकरी. मुंबई महानगरपालिकेत हेडक्लार्क. माहेर–शोभना पांडुरंग घांगुर्डे. शिक्षण–एम्. ए. (इकॉनॉमिक्स).
कन्या : **आराधना**–जन्म ६ ।१२ ।१९७९. केंद्रिय विद्यालयात इ. ४ थी मध्ये शिकत आहे.
८२/६ **अभिजित अरुण**–जन्म ३१ ।७ ।१९७४. सेंट्रल बोर्ड नवी दिल्लीच्या दहावीच्या परिक्षेला बसला आहे.
८३/५ **अच्युत विश्वनाथ**–जन्म १५ ।८ ।१९४९.
शिक्षण–बी. एस्. सी. पर्यंत. व्यवसाय–टी. आय. एफ्. आर. मध्ये स्टोअर्स डिपार्ट. मध्ये नोकरी. बागकामाची आवड.
भार्या : **संजीवनी**–आय. टी. आय. मध्ये पंच ऑपरेटर.
कन्या : **मेधा**–जन्म ४ ।६ ।१९८७.
८४/६ **अमित अच्युत**–जन्म ३१ ।५ ।१९८०. केंद्रिय विद्यालयात ३ रीत शिकत आहे.
८५/५ **अनिल विश्वनाथ**–जन्म १६ ।८ ।१९५०. इन्टर सायन्सपर्यंत. व्यवसाय–ओटीस मध्ये ॲप्रिंटिस सुपरवायझर. वास्तव्य–'विश्वसदन' प्लॉट नं १. आय. आय. टी गेटसमोर मुंबई–४०० ०७६.
भार्या : **पद्मजा**–शिक्षण–एम्. एस्सी. कॉम्प्युटरचा कोर्स चालू आहे. व्यवसाय–युनियन बँक भांडुप येथे नोकरी.
कन्या :
१) **राधिका**–जन्म ११ ।१ ।१९८०. शिक्षण–३ री.
२) **प्रणोती**–जन्म नोव्हेंबर १९८७.
८६/४ **मोरेश्वर गंगाधर**–जन्म १९ ।१ ।१९२६, वर्धा.
शिक्षण–मॅट्रिक, मुंबई विद्यापीठ. व्यवसाय–मुंबई महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा व जलनि:सारण खात्यात नोकरी. असिस्टंट इंजिनिअर म्हणून निवृत्त.
वास्तव्य–२ रा मजला, छेडा सदन, एन्.सी. केळकर रोड, दादर, मुंबई ४०००२८.
भार्या :**सुधा**–जन्म २५ ।११ ।१९३६. माहेर–सुधा धुंडिराज निजसुरे, आंजर्ले, ता. दापोली, जि. रत्नागिरी. वेस्टर्न रेल्वेत नोकरी. मुंबई.
कन्या : **सुवर्णा**–जन्म ६ ।२ ।१९६६. सासर–प्रियांका अजित नवरे चुनाभट्टी, मुंबई. शिक्षण–बी. कॉम्. डिप्लोमा इन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर टेक्निक (मुंबई विद्यापीठ).
८७/५ **संजय मोरेश्वर**–जन्म ८ ।८ ।१९५६.
शिक्षण–बी. ई. (इले.) ऑनर्स, मास्टर ऑफ मार्केटींग मॅनेजमेंट.
भार्या : **स्नेहा**–शिक्षण–बी. ए; इकॉनॉमिक्स (ऑनर्स), एल्. एल्. बी. माहेर–वैजयंती भालचंद्र जोशी, नौपाडा,



डावीकडून (बसलेले) सौ. मंगला श्रीपाद, श्री. श्रीपाद रामचंद्र, श्री. प्रकाश बेहेरे (नं. २ जावई) , सौ. आरती प्रकाश
(उभे) श्री. दत्तात्रय रामचंद्र, श्री. नरहर रामचंद्र, सौ. कुमुद नरहर, सौ. कमल दत्तात्रय, सौ. संध्या विवेक, श्री. विवेक श्रीपाद

ठाणे. आय. डी. बी. आय. मधे नोकरी. वास्तव्य—दादर, मुंबई.
कन्या : **सानिका (मधुजा)** –जन्म ६ ।४ ।१९८७.
८८/४ **शंकर गंगाधर**–जन्म १ ।९ ।१९२०. मृत्यू १६ ।५ ।१९८९. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—बुक बॉड इंडिया लि. कंपनीतून निवृत्त. वास्तव्य—पेण, जि. रायगड.
भार्या : **रजनी**–माहेर—द्वारका वि. गोडबोले.
कन्या :
१) **भारती**–जन्म ४ ।३ ।१९४५. सासर—उर्मिला सूर्यनाथ सिंह, देवाचा वाडा, देव आळी. पेण, जि. रायगड.
२) **रोहिणी**–जन्म १० ।१० ।११५०. सासर—सुगंधा वंसत शिधये. वास्तव्य—अरूण पाटील यांची चाळ, आग्रा रोड, पेट्रोल पंपाशेजारी, कल्याण.
८९/५ **श्रीराम शंकर**–जन्म १२ ।३ ।१९४७, सोलापूर. शिक्षण—एस्. एस्. सी. इंडियन डेअरी डिप्लोमा. (आय. डी. डी.) व्यवसाय—दुग्धशाला विकास विभाग, सहाय्यक अधिकारी. वास्तव्य—२७/२३४ समता कॉलनी, उस्मानाबाद ४१३५०१,
भार्या : **स्नेहश्री**–माहेर—जयश्री पद्माकर चितळे, चिपळूण.
कन्या :
१) **भाग्यश्री**–जन्म १६ ।१० ।१९७६.
२) **मेघना**–जन्म २१ ।१२ ।१९७९.
३) **अमृता**–जन्म २१ ।११ ।१९८३.
९०/५ **भरत शंकर**–वास्तव्य—श्रीकृपा, श्रीनगर, ड्यूक ऑफ सन्स समोर, भोसरी, पुणे—४११०२६.
भार्या :**उज्ज्वला**–
कन्या : **अमृता**–जन्म तारीख व इतर माहिती मिळाली

नाही.
पुत्र : **अमित–**
९१/४ **सुधाकर गंगाधर–जन्म** १३ ।१२ ।१९३२, इगतपुरी. शिक्षण–डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स–टेलीकम्युनिकेशन इंजिनियरिंग. व्यवसाय–१) एअर फोर्स. २) आय. आय. टी. पवई. ३) कलर केम ठाणे. वास्तव्य–१४ आनंदाश्रम कॉलनी, नौपाडा, ठाणे ४००६०२.
भार्या : **नीला**–माहेर–इंदुमती भास्कर लिमये.
कन्या : **सुचेता**–जन्म २८ ।१२ ।१९६२. शिक्षण–बी. कॉम्. सासर–अश्विनी भास्कर जोशी, ठाणे.
९२/५ **अतुल सुधाकर–जन्म** ३ ।९ ।१९६७. शिक्षण–बी. एच्. एम्. एस्. (होमिओपथी). व्यवसाय–डॉक्टर
९३/४ **प्रभाकर गंगाधर–जन्म** १४ ।१ ।१९२९, वर्धा. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–तार व टपाल खाते, पेन्शनर. वास्तव्य–बी १६ दुर्वांकुर अपार्ट. खारीबाव रोड, रावपुरा, बडोदा.
भार्या : **मंदाकिनी**–माहेर–कुमूद वामनराव बर्वे, बडोदे. प्राथमिक शिक्षिका निवृत्त.
९४/५ **प्रदिप प्रभाकर–जन्म** १० ।८ ।१९५९. शिक्षण–डी. एम्. ई.
भार्या : **संध्या**–शिक्षण–बी.कॉम्. स्टेट बँकेत नोकरी.
९५/६ **सौरभ प्रदिप–जन्म** २० ।४ ।१९८७.
९६/३ **रामचंद्र काशीनाथ–जन्म** १८९३. मृत्यू १९२५, सोलापूर. शिक्षण–मॅट्रिक व्यवसाय–स्टेशनरीचे दुकान. वास्तव्य–४०१ दक्षिण सदरबझार (कँप), सोलापूर.
भार्या : **जानकी**–मृत्यू १९३५. माहेर–येसू काशीनाथ पिंपळखरे, धुळे.
कन्या : **शंकुतला– #**
९७/४ **दत्तात्रय रामचंद्र**–जन्म २१ ।८ ।१९१९, जळगांव. शिक्षण–एल्. एल्. बी. गायन आणि नाटकाची आवड. व्यवसाय–आयकर सल्लागार. वास्तव्य–' निरामय' ४०१ दक्षिण सदर बझार कँप, सोलापूर.
भार्या : **कमल**–माहेर–कमल हरी सोहोनी, सोलापूर.
कन्या : **सुलभा**–लहानपणी मृत.
९८/४ **श्रीपाद रामचंद्र–जन्म** ३० ।६ ।१९२१, सोलापूर येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–१९४४-४६ पर्यंत दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मिलिटरीमध्ये मेकॅनिकल ड्राफ्टमनची नोकरी केली. मुंबई टेलिफोनमधून जून १९७९ मध्ये निवृत्त. संगीत व समाजसेवेची आवड. राष्ट्रीय स्वंयसेवक संघ व इतर परिवारातील संस्था मधून सक्रीय सहभाग घेतात. वीर सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे क्रियाशील कार्यकर्ते. शिवाय विवेकानंद केंद्र व वनवासी कल्याण आश्रम या सस्थांना भरघोस आर्थिक साह्य मिळवून दिले व अजूनही देतात. आपल्या कन्येच्या विवाह प्रसंगी मिळालेला सर्व आहेर त्यानी डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी समितीस व वीर सावरकर दर्शन प्रतिष्ठानस देणगी म्हणून दिला. वास्तव्य–मेयर बिल्डिंग, २ रा मजला सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई–२८.
भार्या : **मंगला**–माहेर–विमल त्रिंबक टकले, नाशिक. लालबाग व आदर्शनगर, वरळी येथे मॉंटेसरीच्या मुख्याध्यापिका म्हणून १५ वर्षे काम केल्यावर निवृत्त.
कन्या :
१) **कालिंदी–जन्म** ४ ।१० ।१९४९. शिक्षण–एस्. एन्. डी. टी. ची बी. ए. (म्युझिक) सासर– शुभांगी शरद ठोसर, दिवे आगर, जि. रायगड.
२) **विद्या**–जन्म २१ ।६ ।१९६२. शिक्षण–बी. कॉम सासर–आरती प्रकाश बेहेरे. वास्तव्य– १७ बुक बॉंड हौसींग सोसायटी, मॉडेल कॉलनी, पुणे–१६.
३) **स्वाती–जन्म** ११ ।१२ ।१९६४. शिक्षण–बी. ए, बी. एड्. शिक्षिका. सासर–स्वाती प्रसाद सहस्रबुध्दे, वास्तव्य–१०६ विजय विक्रांत अपार्टमेंट, दहिसर (पूर्व) मुंबई–६८.
९९/५ **विवेक श्रीपाद–जन्म** २७ ।६ ।१९५३. शिक्षण–डिप्लोमा इन इलेक्टीकल. व्यवसाय–असोसिएटेड टेक्स्टाईल इंजिनियरिंग (ए. टी. ई.) मुंबई येथे नोकरी.
भार्या : **संध्या**–माहेर–संध्या रानडे, रानडे हाऊस, चेंबूर नाका, चेंबूर, मुंबई.
कन्या : **मंजिरी–जन्म** १४ ।७ ।१९८७.
१००/४ **नरहरी रामचंद्र–जन्म** २७ ।८ ।१९२४. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–ट्रेझरी ऑफीसर, रेव्हन्यू खाते, वास्तव्य–प्रसन्न बंगला. होटगी–नाका, लकी

घराणे क्रमांक २

जांभुळपाडा-ठाणे-मुंबई



सोसायटी, सोलापूर.
भार्या : **कुमुद**–माहेर–सिंधु गोविंद काळे, सोलापूर.
कन्या : **माधवी**–जन्म २३ ।११ ।१९५२.
सासर–माधवी अनिल जोगळेकर रा. गुरूकृपा ६ सुभाषनगर. पुणे.
१०१/५ **मोहन नरहरी**–जन्म २० ।४ ।१९५०.
शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–आयकर सल्लागार.
वास्तव्य–द्वारा, द. रा. अभ्यंकर, सोलापूर.
भार्या : **अलका**–माहेर–अलका कर्वे. कानपूर.

घराणे क्रमांक २

जांभुळपाडा–ठाणे–मुंबई

१/१ **रामचंद्र (गणेश)** – #
२/२ **मोरेश्वर रामचंद्र**– #
भार्या : **सरस्वती**– #
३/३ **गोविंद मोरेश्वर**–व्यवसाय कर्जत व पनवेल येथे तलाठी होते.
भार्या : **सत्यभामा**–
कन्या : **गंगाबाई**–सासर–काळे, नागपूर.
४/४ **महादेव गोविंद**–व्यवसाय–पनवेल तालुक्यात तलाठी होते.

भार्या : **गिरीजाबाई**–मृत्यू सन १९२१, ठाणे. माहेर–भिडे.



कै. श्री. सीताराम महादेव

५/५ **सीताराम महादेव**– जन्म इसन १८९४. मृत्यू २ ।१० ।१९६३. शिक्षण–विल्सन कॉलेज मुंबई येथून बी. ए. १९२४ मध्ये एल्. एल्. बी. व्यवसाय–ठाणे येथे वकिलीचा व्यवसाय, १९२४ पासून एक नामवंत वकिल, सार्वजानिक कामाची आवड म्हणून ऐक्य संघ, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे या संस्थेमध्ये उमेदवारीची बरीच वर्षे कार्य केले. सन. १९५३ मध्ये ठाणे जिल्हा मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष. लोकसंग्रह करण्याची मनोवृत्ती त्यामुळे अनेक सामाजिक संस्थांमधून निरनिराळया पदावर कामे केली. ठाणे म्युनिसिपालिटी. चे सभासद, ठाणे ब्राह्मण सभा व ब्राह्मण परस्पर सहाय्यक पतपेढी, म्युलक. लायब्ररी इ. संस्थांमध्ये निरनिराळया पदावर कार्य केले.
भार्या : **इंदिराबाई**–जन्म ४ ।९ ।१९०४. मृत्यू एप्रिल १९७४. माहेर–सोनू मोरेश्वर गोडबोले. परतवाडा.
कन्या : **लीला**–जन्म १९२६. सासर–लक्ष्मी दत्तात्रय फडके. वास्तव्य–७७३/५ उमानिवास, डेक्कन जिमखाना, पुणे–४.
६/६ **राजाराम सीताराम**–जन्म ११ ।९ ।१९२४. शिक्षण–मॅट्रिक, १९४२. व्यवसाय– आर्युविमा कार्पोरेशन मधून १९८४ मध्ये निवृत्त. निवृत्तीनंतर सध्या विमा एजंट. प्रवासाची आवड, १९८७ मध्ये ४ महिने लंडनला मुलाकडे वास्तव्य होते. वास्तव्य–शिवसागर, १५३३ सदाशिव पेठ टिळक रस्ता, पुणे–३०.
भार्या : **विजया**–जन्म १२ ।३ ।१९३१. होमिओपाथिक डॉक्टर–डॉक्टरीचा घरीच व्यवसाय. माहेर–लीला भार्गव भागवत.
कन्या : **पद्मा**–जन्म १९५४. सासर–अनुराधा अजित कानिटकर, रघुनाथनगर सी–७६, आनंद सोसायटी, ठाणे.
७/७ **माधव राजाराम**–जन्म ऑगस्ट, १९४८. शिक्षण–डी. एम्. ई. व्यवसाय–टाटा कन्सल्टींग इंजि, मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–ठाणे.
भार्या : **चारुशीला**–माहेर–चारुशीला गोपाळ जोशी, ठाणे.
कन्या :
१) **मनीषा**–शिकत आहे.
२) **मानसी**–शिकत आहे.
८/७ **मुकुंद राजाराम**–जन्म सप्टेंबर, १९५१. शिक्षण–बी. एस्. सी. पुणे व इलेक्टॉनिक्स इंजिनियर. व्यवसाय–लंडन येथे नोकरी. वास्तव्य–२४, रेवर्हन ब्रोरून ड्राईव्ह चेलम्सफॉर्ड, सेसी लंडन सी. एम्. २५ जे. इंग्लंड व्ही. के.
भार्या : **रश्मी**–माहेर–रश्मी धुंडीराज लेले. पुणे.
कन्या :
१) **विशाखा**–
२) **चैत्राली**–पुत्र–**नीळकंठ**– जन्म १९८८.
९/६ **रामचंद्र सीताराम**–जन्म २९ ।१ ।१९२९. शिक्षण–बी. एस्. सी. (मुंबई विद्यापीठ).बी. फार्मा गुजराथ आय. सी. बी. आय. बेंगलोर. व्यवसाय–फाईन केमिकल लॅबोरेटरी, जे. एल. मॉरीसन सन ॲंड जोन्स (इंडिया) बेंगलोर मधून निवृत्त. लँड स्केप पेंटिग व होमिओपथी. आणि शास्त्रीय संगीत यांची आवड. वास्तव्य–१९३ ।१५ अभिषेक, पहिला मुख्य रस्ता, महालक्ष्मीपुरम् बेंगलोर–८६.

भार्या : **वसुधा**–माहेर–कुंदा बाळकृष्ण दामले, गुहागर.
कन्या : **शुभांगी**–जन्म ६ ।४ ।१९५८. शिक्षण–बी. एस्. सी. व्यवसाय–पुणे टेलिफोन मध्ये नोकरी. सासर– स्वाती कृष्ण किरण वैलणकर, काशिदवाडा, शनिवार पेठ, पुणे–३०
१०/७ **अभिजित रामचंद्र**–जन्म १३ ।६ ।१९६२. शिक्षण–डी. एम्. ई. बंगलोर मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. बी. ई. (मेकॅ) व्यवसाय–नोकरी.
११/७ **चैतन्य रामचंद्र**–जन्म ७ ।१ ।१९६५. शिक्षण–बी. ई. (इले). वास्तव्य–बंगलोर. व्यवसाय–नोकरी. १९८० कर्नाटक एस्.एस्.आय.सी. बोर्डात १५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण.
१२/६ **परशुराम सीताराम**–जन्म २१ ।१२ ।१९३०. मृत्यू ५ ।१० ।१९७८, हृदयविकाराने ठाणे येथे. शिक्षण–इंटर आर्ट्स पर्यंत. व्यवसाय–पी.डब्लू.डी. मध्ये नोकरी, ठाणे. वास्तव्य–ठाणे.
भार्या : **जानकी**–जन्म १९३७. एस्.एस्.सी. खारलँड बोर्ड मध्ये नोकरी. माहेर–विजया दिनकर करंदीकर.
कन्या :
१) **अंजली**–जन्म १७ ।४ ।१९६०. शिक्षण– बी. ए. व्यवसाय–कस्टम खात्यामध्ये नोकरी. धावपटू. सासर–ललिता विश्वास फाटक, मुलूंड.
२) **साधना**–जन्म १२ ।१० ।१९६२. शिक्षण–बी. कॉम्. सासर–साधना सुधीर गाडगीळ, माहीम, मुंबई.
१३/६ **शांताराम सीताराम**–जन्म २९ ।९ ।१९३२. शिक्षण–डिप्लोमा इन टेक्स्टाईल इंजीनीयरिंग. एल.टी.एम्. चा डिप्लोमा, १९६०. व्यवसाय–असिस्टंट स्पिनींग मास्तर म्हणून १९८६ पर्यंत नोकरी. व्यायामाची आवड, मावळीमंडळ ठाणे या संस्थेत सक्रिय सहभाग, बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवराय मंडळ, पुणे या संस्थेशी संबंध, गड किल्ले यांचा अभ्यास. वास्तव्य–अभ्यंकरांचे घर, सावरकर पथ, ठाणे–२.
भार्या : **वासंती**–माहेर–सुमन लक्ष्मण काळे. उपळे ता. राजापूर.
कन्या :
१) **राजलक्ष्मी**–जन्म १ ।६ ।१९६७. शिक्षण– बी.ए.
२) **यामिनी**–जन्म १ ।६ ।१९६९. शिक्षण–बी.कॉम्. शिकत आहे.

१४/७ **उन्मेष शांताराम**–जन्म १४ ।९ ।१९६४. शिक्षण–बी. कॉम्. खाजगी व्यवसाय.
१५/६ **जयराम सीताराम**–जन्म ६ ।१ ।१९३५. शिक्षण–एल्.एल्.बी. व्यवसाय–१९६२ पासून ठाणे येथे वकीलीचा व्यवसाय. वास्तव्य–स्टेशन रोड, विठ्ठल मंदिरा शेजारी, ठाणे.
भार्या : **सुषमा**–शिक्षण–बी. ए. माहेर–प्रभा मनोहर परांजपे, डेअरीवाले, ठाणे.
कन्या :
१) **ज्योती**–जन्म ११ ।६ ।१९६३. शिक्षण–एम्. कॉम्. वास्तव्य–ठाणे. सासर–ज्योती प्रमोद जोशी, रा. पुणे.
२) **स्वाती**–जन्म ११ ।२ ।१९६७. बी.कॉम; एल्.एल्.बी. मुंबई हायकोर्टात वकिली.
३) **दिपा**–जन्म २५ ।७ ।१९७२. कॉमर्सचे दुसरे वर्ष.
१६/६ **श्रीधर सीताराम**–जन्म २१ ।१ ।१९३७. शिक्षण–एस्. एस्. सी. डिप्लोमा इन टूल्स ॲंड डायमेकर. व्यवसाय–काही काळ नॅशनल मशिनरी मॅन्युफॅक्चरींग कंपनी कळवा येथे फोरमॅन म्हणून नोकरी. स्वत:चे १९६४ पासून फॅब्रिक्शन ॲंड मॅचींग चे वर्कशॉप आहे. वास्तव्य–अभ्यंकरांचे घर, महाराष्ट्र विद्यालयासमोर, वीर सावरकर पथ, ठाणे.
भार्या : **सुनीता**–माहेर–मिनाक्षी रामचंद्र सोमण, कुरवली, ता. खेड, रत्नागिरी.
कन्या : **राधा**–जन्म १ ।५ ।१९६८. उत्कृष्ट धावपटू. मुंबई विद्यापीठातर्फे खेळात भाग. शिक्षण–बी.कॉम. सासर–राधा रवींद्र भागवत, पुणे.
१७/७ **मकरंद श्रीधर**–जन्म १ ।७ ।१९६५. शिक्षण–बी.कॉम; एल्.एल्.बी. २रे वर्ष. चा अभ्यास. उत्कृष्ट जलतरणपटू धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया हे २२ सागरी मैलांचे अंतर पोहून पार केले. इंग्लिश खाडी पोहण्यासाठी प्रयत्न.
भार्या : **नीता**–एम्. एस्सी. माहेर–नीता मनोहर जोगळेकर, फडकेवाडी, जुना मुंबई रस्ता, ठाणे–१.
१८/४ **लक्ष्मण गोविंद**–जन्म १८६०. हृदयविकाराने मृत्यू १९३५.
भार्या : **मथुराबाई**–माहेर–आवडी विनायक परांजपे, बदलापूर,
१९/५ **वासुदेव लक्ष्मण**–जन्म १ ।१२ ।१९१५,

झालखंड किहीमजवळ (रायगड) शिक्षण—मॅट्रिक पर्यंत. व्यवसाय—बँक सिल्वर कंपनी, ठाकूरद्वार नाका, मुंबई येथे नोकरी. वास्तव्य—११/१८९ पार्लेश्वर सोसायटी, विलेपार्ले, मुंबई—५७.
भार्या : **सिंधू**—जन्म ३ ।७ ।१९२३, ठाणे. मृत्यू १९८९. माहेर—सिंधू बाळकृष्ण हळबे.
२०/६ **मोहन वासुदेव**—जन्म १९४३
शिक्षण—एम्.कॉम. व्यवसाय—ओटिस एलिवेटर कं त. नोकरी. वास्तव्य—११/१८९ पार्लेश्वर सोसायटी. विलेघार्ले (पूर्व), मुंबई—५७.
भार्या : **विजया**—बी.ए; (ऑनर्स). देना बँकेत नोकरी. माहेर—विजया दिगंबर भावे, गिरगांव.
कन्या : **अपर्णा**—जन्म १९७४. शिक्षण—एस्.एस्.सी.
२१/७ **अमित मोहन**—जन्म १९७९. शिकत आहे.
२२/६ **अरविंद वासुदेव**—जन्म १९४६. शिक्षण एस्. एस्. सी व्यवसाय—स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरी. वास्तव्य—परांजपे स्कीम, विरार.
भार्या : **अंजली**—माहेर—शरयू दत्तात्रय तुळसूलकर. रा सावंतवाडी. पुत्र—**मंदार**—जन्म १९८७.
२३/६ **गोविंद वासुदेव**—जन्म १९४९.
शिक्षण—एस्.एस्.सी. (टेक्निकल). व्यवसाय—ग्रेट रॉयल यॉट क्लब येथे नोकरी. वास्तव्य—पार्लेश्वर सोसायटी, विलेपार्ले (पूर्व).
भार्या : **माधवी**—माहेर—शैला महाजन, डोंबिवली.
पुत्र—**अमोघ**—जन्म १९८१.
२४/६ **दिनकर वासुदेव**—जन्म १९५४.
शिक्षण—एस्.एस्.सी. पास. वास्तव्य—विलेपार्ले. अविवाहित.

घराणे क्रमांक ३

जांभुळपाडा—गौरकामथ—मुंबई—ठाणे.

१/१ **वामन**—वास्तव्य—जांभुळपाडा येथे. तिथे घर व शेतीवाडी करून रहात होते. इतर माहिती नाही.
२/२ **मोरेश्वर वामन**—वास्तव्य—जांभुळपाडा ता. सुधागड येथेच घरी शेती करून रहात होते. विशेष माहिती नाही.
३/३ **पुरुषोत्तम मोरेश्वर**—हे जांभूळपाड्याहून कोहीळला (गौरकामथला) आले. शिक्षण—मराठी ५ वी पर्यंत. आषाढात ब्राह्मण भोजन., वर्षाआड बोडण करण्याची पध्दत होती. कर्जत—गौरकामथ रस्त्यावरील वदप गावी श्री. भिडे इनामदार यांचेकडे कारकून म्हणून नोकरी करीत होते.
भार्या : **सीता**—ही कोहीळच्या जोशी यांची कन्या. तिला ताई म्हणत. सासऱ्याकडून उदरनिर्वाहासाठी घर व तळ्याजवळील २ ।३ बिघे जमीन मिळाली. सीताबाईंचा जन्म १८५३ व मृत्यू १९३१. हे कुटुंब १२ वर्षेपेक्षा जास्त कोहीळ येथेच राहिल्यामुळे जांभुळपाडा येथील घर त्यांचे भाडेकरू श्री. जोगळेकर यांना कोर्टाचे निकालाप्रमाणे मिळाले. त्यामुळे जांभुळपाडा येथील मालकीचे घर कायमचे सुटले. कन्या ३.
कन्या :
(१) नाव माहित नाही. जन्म १८८६. ही भिवपुरीच्या चिपळूणकरांना दिली होती.
(२) **सुंदराबाई**—जन्म १८८८. सासर—सुंदराबाई गोविंदराव गांगल. जांभिवली. ता. कर्जत.
(३) **चिमणाबाई**—जन्म १८९०. सासर—लेले, **कल्याण** जि. ठाणे. विवाहानंतर १ वर्षाचे आत पति प्लेगने मृत्यू पावल्यामुळे माहेरी भावाचा संसार सांभाळित राहिल्या.
४/४ **शिवराम पुरुषोत्तम**—जन्म ९ ।५ ।१८९३. मृत्यू ३० जून १९६८. शिक्षण—मराठी व्ह. फा. त्यांचे मराठी व इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व होते. सिव्हील इंजिनिअरींगच्या आवडीमुळे प्रथम भिवपूरी येथील आंध्रा व्हॅली पॉवर सप्लाय कंपनीच्या धरणावर काम करीत होते. नंतर मुंबई येथे इंम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या बिल्डिंगवर सन १९१४ ते १९३५ पर्यन्त देखरेखीचे काम केले. सन १९३७ ते १९५० देहू रोड (एम्.इ.एस्.) येथे सब—डिव्हीजनल ऑफीसर म्हणून काम केले. नंतर पुन्हा कोहिळ मुक्कामी दोन वर्षे शेती करीत होते.
भार्या : १) **पार्वती**—माहेर—गुळसुंदे येथील चिपळूणकर यांची कन्या. मृत्यू १९२०. कन्या २.
कन्या :
(१) **इंदू**—जन्म ५ ।१० ।१९१६. सासर—इंदूमती

घराणे क्रमांक ३

जांभुळपाडा–ठाणे–मुंबई



सदाशिव गांगल. पति सदाशिव गोविंद गांगल. वास्तव्य–१५. जगजीवन निवास. गोखले रोड (नॉर्थ) दादर मुंबई–२८.

(२) **शांता**–जन्म १९१८. सासर–शांताबाई विष्णू गांगल. पति–विष्णू गोविंद गांगल. वास्तव्य– काळे सेल्स असोसिएशन, भवानी शंकर रोड. दादर मुंबई–२८. सध्या वास्तव्य कॅलिफोर्निआ अमेरिका. वरील दोन्ही बहिणी सख्या जावा आहेत.

भार्या : (२) **पार्वती**–जन्म १९०७. माहेर–वेणूताई अच्यूत गद्रे. पुणे. कन्या २. व पुत्र ६.

कन्या :

१) **चंद्रभागा**–जन्म १९२३. सासर–स्नेहलता वासुदेव फाटक. वास्तव्य–गणेश भुवन, सेनापती बापट मार्ग, माहिम, मुंबई–१६.

(२) **कमला**–जन्म १९३४. सासर–आशा माधव नामजोशी. वास्तव्य–गुंफादर्शन म्युनिसिपल टीचर्स सोसायटी. बोरिवली (पूर्व) मुंबई.

५/५ **विष्णु शिवराम**–जन्म २ ।७ ।१९२५. गौरकामथ येथे. शिक्षण–एस.एस.सी. व्यवसाय–स्वत:चा पेपर प्रिटींग. टिन प्रिटींग रोल्स बनविणे चा धंदा. वास्तव्य–गोपाळ सदन, दत्त मंदिर रोड, मालाड (पूर्व) मुंबई.

भार्या : **मंगला**–जन्म १ ।८ ।१९३५. माहेर–सुशिला अनंत मुळे. फणसावळे, जि. रत्नागिरी. बृहन् मुंबई नगरपालिकेमध्ये शिक्षिका.

कन्या : **प्रगती**–जन्म २८ ।२ ।१९५८. सासर–प्रगती प्रकाश घैसास. श्रीवर्धन. फोर्ट, मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–मुलुंड, मुंबई.

६/६ **पंकज विष्णु**–जन्म ३ ।५ ।१९५६. शिक्षण–इ. ५ वी पर्यंत. व्यवसाय–काही नाही.

७/५ **कृष्णाजी शिवराम**–जन्म १४ जुलै १९२७. शिक्षण–पुणे येथे इ. १० वी पर्यंत. वास्तव्य–कोहिळ (गौरकामथ) ता. कर्जत जि. रायगड.

भार्या : **निर्मला**–जन्म १३ ।१ ।१९३६. माहेर–सुमन

गणपुले—जोशी. रा. परशुराम जि. रत्नागिरी. कन्या २.
कन्या :
(१) **अस्मिता**–जन्म २२ ।९ ।१९६४. सासर—माधव मिलिंद दांडेकर, ता. दापोली, जि. रत्नागिरी.
(२) **अनिता**–जन्म १ ।१२ ।१९६६. सासर—अनिता प्रसाद जोगळेकर. रा. पंढरपुर (सोलापूर)
८/५ **मुकुंद शिवराम**–जन्म १८ ।४ ।१९२९. शिक्षण—डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरींग (पुणे). १९५१. नोकरी—बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये अभियंता म्हणून निवृत्त. पुणे १० सारंग सोसायटी मध्ये स्वत:चे घर आहे. वास्तव्य—११ नूतन सोसायटी, महात्मा गांधी रोड, नौपाडा, ठाणे ४०० ६०२. हार्मोनिअम फ्लूट वाजविता येते. ट्रॅव्हल कंपनी तर्फे काठमांडू, नेपाळ येथे १९८५ मध्ये नंतर कन्याकुमारी, कोडाई कॅनॉक, मद्रास, त्रिची, मदुराई इ. भ्रमण.
भार्या : **मीना**–जन्म ६ ।६ ।१९३६. माहेर—मालती कोंडदेव जोगळेकर. शिक्षण—बी.ए.बी.एड. सेंट पायस कान्वेंट मध्ये शिक्षिका. पुत्र—१.
९/६ **अमोल मुकुंद**–जन्म १७ एप्रिल १९६० पुणे. शिक्षण—बी. कॉम. नोकरी—युनायटेड वेस्टर्न बँकेत.
भार्या : **नेहा**–माहेर—वृंदा चिंतामण पेंडसे. कमर्शियल आर्टिस्ट बांद्रा, मुंबई. पुत्र—**निहार**–जन्म ३१ ।३ ।१९८७.
३४/५ **लक्ष्मण गोपाळ**–यांस अपत्य नव्हते.
३५/५ **श्रीधर गोपाळ**– #
३६/६ **नारायण श्रीधर**– #

(२)

इंदूर–देवास–नागपूर–मंडलेश्वर घराणे

१/१ **महादेव**–ज्ञात मुळपुरूष.
२/२ **विष्णुशास्त्री महादेव**–हे मंडलेश्वर (जि. नेमाड) नर्मदा नदीकिनारी रहात असत. किती पिढ्यांपूर्वी हे किंवा यांचे पूर्वज कोकणातून मध्यप्रदेशात (त्यावेळचा मध्यभारत) वास्तव्यास आले ते माहीत नाही. इतर विशेष माहिती नाही. कोंकणातले मूळ गांवही माहिती नाही. परंतु नारिंग्रे असावे असे वाटते.
भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–अंबू जोग. प. पू. जोग, वारकरी पंथाचे संस्थापक यांची पुतणी होती.
कन्या :
१) सासर–रानडे, टेंभुर्णी.
२) **गोदुताई**–सासर–फाटक विशेष माहिती नाही.
३/३ **रामचंद्र विष्णुशास्त्री**–नागपूर मधील नॉर्मल स्कूल मध्ये प्राथमिक शिक्षक होते.
भार्या : **जानकी**–माहेर–द्वारका परांजपे, जबलपूर (म. प्र.)
कन्या :
१) **अनुसूया**–जन्म १७ ।१ ।१९१५. सासर–मनोरमा पांडुरंग गोखले. वास्तव्य–महाजन चाळ, सीताबर्डी, नागपूर. हयात.
२) **कुसुम**–जन्म १९१२. मृत्यू १९६०. सासर–कुसुम कमलाकर जोशी, रायपूर (म. प्र.).
रामचंद्र विष्णु आणि त्यांची पत्नी अकाली मृत्यू पावली. त्यामुळे त्यांच्या दोन्ही मुलींचे शिक्षण, पालनपोषण आणि विवाह त्यांचे लहान बंधू लक्ष्मण विष्णुशास्त्री यांनी केले.
४/३ **लक्ष्मण विष्णुशास्त्री**–मृत्यू १६ ।२ ।१९८२. वडिलबंधूंच्या अकाली निधनामुळे त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी यांना पत्करावी लागली त्यामुळे त्यांनी स्वत:चे लग्न लवकर केले. वास्तव्य–यशोदीप अपार्टमेंट, रहाटे कॉलनी नं. २, जेल रोड, नागपूर–२२.
भार्या : **सावित्रीबाई**–जन्म १९०८. माहेर–नर्मदा जोशी.
कन्या :
१) **उषा**–जन्म ३ ।४ ।१९३४. सासर–उषा श्रीपाद लेले. वास्तव्य–काँग्रेसनगर, नागपूर.
२) **नीरा**–जन्म मार्च १९३९. सासर–शोभा जनार्दन गोडबोले. वास्तव्य–धरमपेठ, नागपूर.
३) **शीला**–जन्म २५ ।५ ।१९४४. सासर–शीलावती चंद्रकांत सामक. वास्तव्य–उज्वला प्लॅटस्, रहाटे कॉलनी, वर्धा रोड, नागपूर.
४) **पद्मा**–जन्म ऑगस्ट १९४८. सासर–सुनिता बळवंत करंदीकर. वास्तव्य–द्वारा कर्नल बी. जी. करंदीकर बी/१/ २०७ जनकपूरी, नवी दिल्ली.
५/४ **नारायण लक्ष्मण**–जन्म १९ ।९ ।१९३१. शिक्षण–बी. कॉम., आग्रा युनिव्हर्सिटी. नोकरी–नागपूर

(२)

इंदूर–देवास--नागपूर--मंडलेश्वर घराणे



येथे डायरेक्टर ऑफ ऑडिट (पोस्टल) मधे अकौंटस ऑफिसर. वास्तव्य—यशोदीप अपार्ट. रहाटे कॉलनी नं.२, जेलरोड, नागपूर २२.
भार्या : **सुधा**–माहेर—सुधा यशवंत केळकर, अमरावती.
६/४ **वसंत लक्ष्मण**–जन्म वसंतपंचमी मार्च १९४२. शिक्षण—एम्. इ. व्यवसाय—१०/१२ वर्षे निरनिराळ्या कंपन्यांतून नोकरी केल्यावर स्वत:चा कॉम्प्युटर विकण्याचा व्यवसाय. १९७४ पासून अमेरिकन नागरिकत्व स्विकार. वास्तव्य—४२१८ ईस्ट विल्शायर ड्रॉइव्ह, फिओनिक्स—एझेड् ८५००८, (अमेरिका),
भार्या : **डॉ. विमल**–माहेर—विमल अरगेकर. शिक्षण—एम्. डी.; डी. जी. ओ. नोकरी—मुंबई महानगरपालिकेत आर. एम्. ओ. च्या पदावर काही काळ काम केले. सध्या अमेरिकेत मनोरूग्ण तज्ञ (सायशिॲट्रिक) म्हणून हॉस्पिटलमध्ये नोकरी करते.
कन्या : **सोनिया**–वय वर्षे १५.
७/५ **राज वसंत**–वय वर्षे १२. इतर माहिती मिळाली नाही.

(३)

आंबेगांव–पुणे घराणे

१/१ **बाबाजी**–हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **नारायण बाबाजी**– #
३/३ **गजानन नारायण**–जन्म १९०५. मृत्यू १९४०. वास्तव्य—पुणे.
भार्या : माहेर—गोदावरी केशव गोखले. पुणे.
४/४ **अनंत गजानन**–जन्म २६ ।११ ।१९३०. शिक्षण—बी. एस्सी.; बी. ए.; एल् एल् बी. व्यवसाय—१९५१ ते १९८२ ऑर्डिनन्स फॅक्टरीत नोकरी, नंतर १९८२ पासून ॲडव्होकेट म्हणून पुण्यात व्यवसाय. सार्वजनिक कार्य, वाचन मंदिर व वसंत व्याख्यानमाला यात कार्यवाह म्हणून भाग. व गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष. रासायनिक स्फोटक निर्मिती तंत्रज्ञानासाठी नोकरीत असताना संरक्षण खात्यातर्फे

(३)

आंबेगाव--पुणे घराणे



स्वीडन व फिनलंड येथे वास्तव्य. वास्तव्य—१२८, साक्षात्कार अपार्टमेंट, बुधवार पेठ, पुणे—२.
भार्या : **पद्मा**—माहेर—पद्मा गजानन भागवत.
शिक्षण—बी. ए. (ऑनर्स). प्रासंगिक लेखन करतात. संगिताची आवड, जाण आणि गळा.
कन्या : **धनश्री**—जन्म २५ ।१ ।१९७१. शिकत आहे.
५/५ **विद्यानंद अनंत**—जन्म १७ ।१ ।१९६२.
६/४ **चंद्रशेखर गजानन**—जन्म २२ ।५ ।१९४० पुणे येथे. शिक्षण—बी एस्सी.; बी. एड. व्यवसाय—अनंत इंग्लीश स्कूल, सातारा येथे माध्यमिक शिक्षक. वास्तव्य—'आशीर्वाद', १८७/१, व्यंकटपुरा पेठ, सातारा शहर, सातारा ४१५००२.
भार्या : **रोहिणी**—माहेर—लतिका शंकरराव देशपांडे.
कन्या :
१) **ओजस्विता**—जन्म ४ ।८ ।१९७२. शिकत आहे (अकरावी कॉमर्स).
२) **पुनिता**—जन्म २८ ।२ ।१९७५. इ. १० वीत शिकत आहे.
७/५ **निलेंद्र चंद्रशेखर**—जन्म १६ ।९ ।१९८१. इ. ४ थी मध्ये शिकत आहे.
८/३ **दत्तात्रय नारायण**—मृत्यू १९४८ इंदूर येथे. व्यवसाय—शिक्षक. नंतर अकौटंट. वास्तव्य—इंदूर.
भार्या : **इंदिरा**—माहेर—शांता वामन आपटे, इंदूर. मृत्यू १९८३.
९/४ **योगेंद्र दत्तात्रय**—वास्तव्य—२१/३ तात्या सरवटेनगर, इंदूर—३.
१०/४ **धुंडिराज दत्तात्रय**—जन्म १५ ।५ ।१९४२ इंदूर येथे. शिक्षण—सिव्हिल इंजिनिअरिंग, बी. एस्. सी. इंजिनिअर (मेकॅनिकल) एम्. आय्. इ., एम्. एस्. इ. आय. व्यवसाय— पंपतज्ञ. किर्लोस्कर पंप दुरूस्तीचा स्वतंत्र व्यवसाय, नागपूर येथे. समर्थ भक्त, समर्थ सेवा मंडळ, नागपूर यांचे कार्यकर्ते, वाचन, खेळ, बुध्दिबळ, ब्रीज, टेबल—टेनिस इ. ची आवड. १९७५ साली युरोप मधील ८ देशात भ्रमण. १९८० साली सिंगापूर, मलेशिया व कोलंबो येथे भ्रमण. लायन क्लबचे सदस्य.
वास्तव्य—१८, उज्ज्वला नगर, वर्धा रोड, नागपूर—२५.
भार्या : **नीला**—माहेर—नीला रामकृष्ण फाटक. जन्म १७ ।६ ।१९४६. नागपूर.

(४)

नायगांव-देवगांव--पुणे घराणे



कन्या :
१) **गीतांजली**–१६ वर्षे. शिकत आहे.
२) **रूपाली**–१२ वर्षे. शिकत आहे.
३) **उमा**–९ वर्षे. शिकत आहे.
११/३ **त्रिंबक नारायण**–मृत्यू जून १९६७, पुणे येथे.

(४)

नायगांव--देवगांव–पुणे घराणे

१/१ **काशीनाथ**– #
कन्या :
सासर–दामले.
२/२ **बाळकृष्ण काशीनाथ**–जन्म १ ।१ ।१९८६. मृत्यू २० ।६ ।१९८६. व्यवसाय– केसरी वर्तमानपत्रात २४ वर्षे, मुद्रित–शोधक म्हणून नोकरी. राजकारणात सहभागी होते. वास्तव्य–पुणे.
भार्या : **गोदावरी**–माहेर–गोदावरी सखाराम केळकर, राहणार–सांगली.
कन्या : **आशा**–जन्म २१ ।८ ।१९५४. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–रोहिणी गोविंद लिमये.
वास्तव्य–१४६ रामकृपा, कन्साई विभाग, अंबरनाथ पिन कोड नं. ४२१५०१
३/३ **अरुण बाळकृष्ण**–जन्म ८ ।३ ।१९५३.
शिक्षण–एस्. एस्. सी. पास. व्यवसाय– हॉर्टिकल्चरल् टेक्निशियन म्हणून खाजगी नोकरी. वास्तव्य–१४२० सदाशिव पेठ, नृसिंह मंदिर, पुणे–३०.
भार्या : **अनघा**–माहेर–सुनिता वसंत डोंगरे, नागपूर.
पुत्र–**अनिकेत**–जन्म १९८८.
४/२ **वासुदेव काशीनाथ**– #

(५)

हरपळी–लिंबगोवा–पुणे घराणे

१/१ **रामचंद्र**–हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **शंकर रामचंद्र**– #
३/३ **गोपाळ शंकर**–जन्म २९ ।६ ।१९२६ पुणे येथे. मृत्यू २ ।१० ।१९८५. व्यवसाय–देहूरोड ऑर्डिनन्स डेपोत नोकरी. वास्तव्य–२९०, शनवार पेठ, तांबेवाडा, पुणे–३०.
भार्या : **सुनिता**–माहेर–सुमन परशुराम साने. रा. देवरूख.
कन्या :

(५)

हरपळी-लिंबगोवा--पुणे घराणे



१) **शैलजा**–जन्म १६ ।५ ।१९५५. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर—लक्ष्मी गणेश जोशी, पुणे.
२) **नीलिमा**–जन्म २८ ।५ ।१९५७. शिक्षण—एस्. एस्. सी. सासर—नीलिमा सुधाकर अलुरकर, पुणे.
४/४ **शारंगधर गोपाळ**–जन्म इ. स. १८ ।७ ।१९५८. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय— सेंट्रल रेल्वेत मुंबई येथे नोकरी. वास्तव्य—मल्हार नगर, चाळ नं. ५, खो. नं. ४, गणेश आईस्क्रिम मागे, शिवाजी चौक, आग्रा रोड, कल्याण, जि. ठाणे.
भार्या : **सीमा**–माहेर—सीमा भास्कर फडके. रा. वाई. जि. सातारा.
कन्या :
१) **सपना**–जन्म १० ।७ ।१९८६.
२) **अस्मिता**–जन्म १० ।११ ।१९८७.
५/४ **संजय गोपाळ**–जन्म १५ ।६ ।१९६०. शिक्षण—एस्. एस्. सी. पर्यंत. व्यवसाय—माटुंगा रेल्वे ऑफिसमध्ये नोकरी. वास्तव्य—मल्हारनगर, चाळ नं. ५ खोली नं. ४ **गणेश** आईस्क्रिम मागे, कल्याण.
भार्या : **शमा**–माहेर—प्रतिमा नारायण केंजळे. जन्म २९ ।९ ।१९६७.
६/३ **यशवंत शंकर**– #
७/३ **जनार्दन शंकर**– #
८/३ **विनायक शंकर**– #
९/३ **श्रीधर शंकर**– #

(६)

गोवळ–राजापूर–पुणे घराणे

१/१ **रघुनाथ**–हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **वामन रघुनाथ**–जन्म १९१०.
भार्या : **आनंदीबाई**–माहेर—गोदावरी वामन काळे.
कन्या :
१) **सिंधु**–सासर—मंगला दत्तात्रय लिमये, मोशी ता. हवेली, पुणे.
२) **सुमन**–सासर—लक्ष्मी नारायण जोशी, सांगली.
३) **नीला**–सासर—सुधा शंकर केळकर, सांगली.

(६)

गोवळ–राजापूर–पुणे घराणे



४) **मालती**–सुनिता सुधीर परांजपे, सांगली.
५) **शैलजा**–सासर–शैलजा घनश्याम गोडबोले, कऱ्हाड, जि. सातारा.
३/३ **दिनकर वामन**–जन्म २३ ।११ ।१९३५ गोवळ येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–बँक ऑफ कऱ्हाड लि. मधून निवृत्त. वास्तव्य–१०२५ सदाशिव पेठ, विशाल अपार्टमेंट, ब्लॉक नं. १०७, पुणे–३०.
भार्या : **सुधा**–माहेर–कुंदा गणेश भट, ठाणे.
४/४ **नितीन दिनकर**–जन्म ४ ।९ ।१९६४.
शिक्षण–एम्. एस्सी. व्यवसाय–प्राध्यापक वाडिया कॉलेज पुणे. वास्तव्य–१०२५ सदाशिव पेठ, पुणे.
भार्या : **नीला**–माहेर–नीला गोपाळ धरंदीकर–कुलकर्णी, रा. धरंडी, ता. कऱ्हाड, जि. सातारा.
५/४ **सचिन दिनकर**–जन्म ६ ।७ ।१९७०.
शिक्षण–टी. वाय. बी. कॉम. शिकत आहे.
६/३ **नारायण वामन**–जन्म १० ।१० ।१९३७.
शिक्षण–८ वी पास. व्यवसाय–बजाज ऑटो कंपनीत नोकरी. वास्तव्य–१०५९ विजयनगर, मु. पो. काळेवाडी, पुणे–३३
भार्या : **लक्ष्मी**–माहेर माहिती नाही.
७/४ **संतोष नारायण**–जन्म १९७५. इ. १० वीत शिकत आहे.
८/३ **हणमंत वामन**– #

(७)

रावेर–सोलापूर–पुणे घराणे

१/१ **नारायण**–यांची काहीही माहिती मिळाली नाही.
२/२ **रंगनाथ नारायण (द. आ.)** –हे राजवाडे घराण्यातून दत्तक आले. हे रावेर जि. जळगांव येथे मामलेदार होते.
भार्या : नाव माहित नाही.
कन्या : **पिलूताई**–सासर–पिलूताई रानडे, पंढरपूर.
३/३ **सुरेंद्रनाथ रंगनाथ**–जन्म १८९३. मृत्यू १९७५. व्यवसाय–सोलापूर येथे तेलाची गिरणी होती. वास्तव्य–सोलापूर.
भार्या : **सरलाबाई**–माहेर–चंपूताई भालचंद्र गोखले, पुणे.
कन्या :
१) **सरोजिनी**–जन्म १९३५. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–सरोजिनी कृष्णराव पटवर्धन, मुंबई.

(७)

रावेर–सोलापूर–पुणे घराणे



२) **उषा**–जन्म १९३८. शिक्षण–एस्. एस्. सी.
सासर–उषा पां. किल्लेदार, सोलापूर.
३) **शकुंतला**–जन्म १९४२. शिक्षण–एस्. एस्. सी.
सासर–शकुंतला कमलाकर शिंत्रे, नागपूर.
४/४ **मधुकर सुरेंद्रनाथ**–जन्म १५ ।११ ।१९३०.
शिक्षण–बी. ए. वास्तव्य–३, सुरेंद्र नीलकमल हौ.
सोसायटी, नवसह्याद्री चौक, कर्वे रोड, पुणे.
व्यवसाय–स्टेट बँकेत विकास अधिकारी.
भार्या : सविता–माहेर–विनया गणेश जोगळेकर, पुणे.
पिता–गणेश व्यंकटेश जोगळेकर, पुणे.
कन्या :
१) **मंजिरी**–जन्म २३ ।५ ।१९६२. मंजिरी हेमंत, नाशिक.
२) **मधुवंती**–जन्म २८ ।११ ।१९६४. स्नेहल सतिश, पुणे.
५/५ **मनोज मधुकर**–जन्म २४ ।६ ।१९६०.
शिक्षण–एस्. एस्. सी. स्कूटरचे गॅरेज आहे.
६/५ **संतोष मधुकर**–जन्म १४ ।१० ।१९७२. शिक्षण चालू आहे.

(८)

मांगेनल्ही घराणे

१/१ **रामचंद्र**–हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **केशव रामचंद्र**– #
३/३ **भुजंग केशव**– #
भार्या : **पार्वती**–माहेर–मथूबाई गोविंद बिंवलकर.
४/४ **केशव भुजंग**–जन्म १० ।१२ ।१९०८, म्हैसूर.
शिक्षण–मॅट्रिकपर्यंत. व्यवसाय–मध्य रेल्वे, मुंबई येथून १० ।१२ ।१९६६ रोजी गार्ड म्हणून सेवानिवृत्त.
वास्तव्य–जानकी भवन, २ रा मजला, खोली नं. ६, आग्रा रोड, शिवाजी चौक, कल्याण.
भार्या : **लक्ष्मी**–मृत्यू ९ ।२ ।१९७९. माहेर–दुर्गा कृष्णाजी जोशी.
कन्या : **मंगल**–जन्म ५ ।६ ।१९५८. सासर–मंजिरी मधुसूदन पाटणकर, कल्याण.

(८)

मांगेन्मल्ली घराणे

पि. क्र.	व्य. क्र.
१	१रामचंद्र
२	२केशव
३	३भुजंग
४	४केशव

(९)

म्हैसूर-कर्नाटक घराणे

१/१ **रंगराव**-हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **नागेश रंगराव**- #
भार्या : **आनंदीबाई**-माहेर-पेंडसे.
३/३ **वसंत नागेश**-जन्म २७ ।११ ।१९२७, म्हैसूर. शिक्षण-मॅट्रिकपर्यंत व्यवसाय- तिरूपती प्रोसेस, डोंबिवली, येथे खाजगी नोकरी. वास्तव्य-पवार बिल्डींग, आग्रा रोड, कल्याण.
भार्या : **सुजया**-माहेर-शशिकला दिगंबर खाडिलकर, सांगली.
कन्या : **वीणा**-जन्म २२ ।६ ।१९६२. शिक्षण-१२ वी पर्यंत. सासर-वर्षा विनायक गोखले.
४/४ **विनोद वसंत**-जन्म ८ ।१० ।१९६४. शिक्षण-१२ वी पास. इतर माहिती नाही.
५/४ **अभय वसंत**-जन्म १९ ।८ ।१९७१. शिक्षण-इ. ९ वी त शिकत आहे.
६/३ **विनायक नागेश**- #
७/३ **मुकुंद नागेश**- #
८/३ **अच्युत नागेश**- #
९/३ **पांडुरंग नागेश**- #

(१०)

नारिंग्रे-रामदुर्ग-जमखिंडी-हैद्राबाद घराणे

१/१ **कृष्ण**-हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **लक्ष्मण कृष्ण**-हे जमखिंडी येथे होते.
३/३ **दामोदर लक्ष्मण**-मृत्यू १९६१. शिक्षण-मॅट्रिक. वास्तव्य-जमखिंडी.
भार्या : **राधाबाई**-माहेर-भीमाताई यज्ञेश्वर दीक्षित-वझे, सुप्रसिध्द अग्निहोत्री.
कन्या :
१) **उमाबाई**-सासर-आपटे, नाशिक.
२) **पिलूबाई**-सासर-मिरज.
३) **लीलाबाई**-किसन भट. हयात.
४/४ **लक्ष्मण दामोदर**-जन्म १८ ।९ ।१९०६.

(९)
म्हैसूर–कर्नाटक घराणे



शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–शाळा खात्यात शिक्षकाची नोकरी. वास्तव्य–रत्नागिरी.

भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर–शकुंतला वामन गोखले. रा. जमखिंडी.

कन्या :

१) **रजनी**–जन्म १९३९. शिक्षण–बी. ए. पर्यंत, व्यवसाय–शिक्षिका. सासर– शैलजा माधव रानडे, जोगळेकर कॉलनी, 'सदिच्छा' बंगला, सडा, रत्नागिरी.

२) **प्रभावती**–जन्म १९४१. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–मंगला मधुसूदन आपटे. व्यवसाय–सरकारी दवाखान्यात नर्स.

५/५ **विठ्ठल लक्ष्मण**–जन्म २३ ।१२ ।१९३४ जमखिंडी येथे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–काही वर्षे एअर फोर्स् मध्ये नोकरी झाल्यावर इंडियन एअरलाईन्स् सांताक्रुझ येथे टेक्निशियनची नोकरी. वास्तव्य–'हिमकन्या' २५/१९७२ महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड कॉलनी, गोराई रोड, बोरिवली (प.) मुंबई–९२.

भार्या : **सुनीला**–माहेर–सुमन विष्णुपंत पिंपळखरे.

कन्या : **स्मिता**–जन्म १३ ।५ ।१९६३. शिक्षण–बी. ए. कॉन्व्हेंट स्कूल मध्ये नोकरी. सासर–अश्विनी आनंद थत्ते, 'कृपा बंगला' सडा भाग, रत्नागिरी.

६/६ **संतोष विठ्ठल**–जन्म ८ ।१२ ।१९६६. शिक्षण–एरोनॉटिकल डिप्लोमा.

७/५ **श्रीपाद लक्ष्मण**–जन्म २६ ।१ ।१९४३. शिक्षण–एम्. ए. बी. इ. (मेकॅ.) व्यवसाय– खाजगी नोकरी, वास्तव्य–गोरेगांव, मुंबई.

भार्या : **सरस्वती**–माहेर–सरस्वती दीक्षित.

कन्या : **अर्चना**–जन्म ऑक्टोबर १९७२. मेडिकलला शिकत आहे. पुत्र–**राहुल**–जन्म ३० ।३ ।१९७०. व्ही. जे. टी. आय. मध्ये इलेक्ट्रॉनिक्स् कोर्स करत आहे.

८/४ **गुरुनाथ दामोदर**–जन्म १५ ।३ ।१९०९. शिक्षण–बी. ए., बी. टी. व्यवसाय–शिक्षक. हैद्राबाद येथे. वास्तव्य–हाऊस नं. ४–७–९०५ इसामिया बाझार, कोमटी गल्ली, हैद्राबाद (आंध्र प्रदेश) ५०००२७.

भार्या : **सुशिलाबाई**–माहेर–भीमाबाई मराठे.

कन्या :

१) **विनया**–जन्म २२ ।४ ।१९४३. शिक्षण–एम्. ए. एम्. एड. सासर–सुषमा गोपाळराव गोडबोले, बार्शी, सोलापूर.

(१०)

नारिंग्रे–रामदुर्ग–जमखिंडी–हैद्राबाद घराणे



२) **विद्या**–शिक्षण–बी. ए. सासर–दातार. रा. भोपाळ येथे.
३) **कल्पना**–जन्म १९५३. शिक्षण–बी. ए.
४) **सुरेखा**–जन्म १९६३. सासर–सुरेखा मं. दिवाणजी वाकनीस, सोलापूर.

९/५ **मदन गुरूनाथ**–जन्म १९४७.
शिक्षण–इलेक्ट्रिकल इंजि. चा डिप्लोमा.
व्यवसाय–एम्. एस्. बी. एस्. पुणे येथे नोकरी
वास्तव्य–पुणे.
भार्या : **मंजिरी**–माहेर–मंजिरी आपटे, मुंबई.
व्यवसाय–चिंचवड हायस्कूल येथे शिक्षिका.
पुत्र–**महेश**शिक्षण–एम्. इ. चिंचवड येथे शिकत आहे.

१०/५ **मोहन गुरूनाथ**–जन्म १९४८. मेकॅनिकल इंजिनियरिंगचा डिप्लोमा. वास्तव्य–सोलापूर.
भार्या : नाव माहित नाही. माहेर–बाळ.
कन्या :
१) **रूपा**–इतर माहिती मिळाली नाही.
२) **दिपाली**–इतर माहिती मिळाली नाही.
३) **छोटी**–इतर माहिती मिळाली नाही.

११/५ **सुभाष गुरूनाथ**–जन्म १९५८. शिक्षण–इंटर कॉमर्स. व्यवसाय–खाजगी नोकरी. अविवाहित.

१२/४ **गणेश दामोदर**–जन्म १९२० (अंदाजे).
व्यवसाय–सेंट्रल पी. डब्ल्यू. डी. मधून सेवानिवृत्त.
वास्तव्य–विठ्ठल मंदिरा जवळ, मिरज, नदीवेस जि. सांगली.
भार्या : **शारदाबाई**–नर्स. माहेर–पुणे येथे.
कन्या :
१) सासर–सांगली येथे.
२) सासर–राजस्थान येथे.
३) सासर–मिरज येथे.

१३/५ **नंदू गणेश**–शिक्षण–बी. इ. (मेकॅनिकल.)
व्यवसाय–मिरज येथे मोटर गॅरेज आहे.
वास्तव्य–मिरज जि. सांगली.

(११)

होडावडे–पांचवड–पुणे घराणे

या घराण्याचे मूळ गाव घूर्वीच्या रत्नागिरी जिल्ह्यातील होडावडे (जि. सिंधुदुर्ग) येथील. या गावात सध्या कोणी अभ्यंकर कुटुंब नाही. तेथे श्रीक्षेत्र बाळेश्वर शंकराचे देवालय आहे. या घराण्याचा मूळ पुरुष भिकंभट. परंतु त्याचे विषयी किंवा त्याचा पुत्र रामचंद्र भिकंभट याचे बद्दल माहिती मिळू शकली नाही.

१/१ **भिकंभट**–हा ज्ञात मुळपुरूष.

२/२ **रामचंद्र भिकंभट**– #

३/३ **कृष्ण रामचंद्र**–हे इ. स. १८५२ (शके १७७४) मध्ये होडावडे येथून पत्नी व पुत्र दत्तात्रय यांना घेऊन उडतारे ता. वाई येथे आले. तेथे श्री काळेश्वर याचे देवालयात राहिले. तेथे त्यांचे मामा सदाशिवभट ताम्हनकर यांची भेट झाली. सदाशिवभट ताम्हनकर हे पांचवड (ता. वाई जि. सातारा) येथे राहात होते. त्यांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांनी कृष्णभट अभ्यंकरना पांचवडला आणले व स्वतःचे घर त्यांना कायमचे दिले. तेव्हापासून ते घर अभ्यंकरांचे मालकीचे होऊन आजतागायत सुस्थितित आहे. व्यवसाय–श्रीमंत सरदार नातू यांचे तर्फे उडतारे येथील श्री काळेश्वराची पूजा करणे.

भार्या : **गंगाबाई**–

कन्या :

१) **गोदुबाई**–सासर–गंगाबाई चितळे. राहणार गोवे जि. सातारा.

२) **ताराबाई**–सासर–खरे राहणार वाई.

३) **मनुताई**–सासर–नेने राहणार नेरे–पाले. ता. भोर.

४/४ **दत्तात्रय कृष्ण**–मृत्यू–आश्विन वद्य एकादशी इ. स. १९३४. व्यवसाय–श्री काळेश्वराची व पांचवड येथील श्रीमंत सरदार नातू यांचे देवांची पूजा करणे.

भार्या : **सीता**–माहेर–चिमा वसंत वझे, मुक्काम आचरे, जि. सिंधुदुर्ग.

कन्या :

१) **काशी**–सासर–फाटक रा. चिखलगाव–रावडी ता. भोर.

२) **गंगुबाई**–सासर–काणे रा. बावधन ता. वाई जि. सातारा.

३) **मनुताई**–सासर–राधाबाई नरहर शेंडे, जन्म शके १८३५ (इ. स. १९१३). हयात. यांना एक पुत्र व दोन कन्या.

५/५ **विश्वनाथ दत्तात्रय**–लहानपणी मृत.

६/५ **सदाशिव दत्तात्रय**–जन्म २२ जाने. १९१०. (पौष शुद्ध एकादशी) मृत्यू ६ ।८ ।१९८९ (नागपंचमी). शिक्षण–मराठी इयत्ता ७ वी पर्यन्त. व्यवसाय–श्री काळेश्वर (उडतारे) येथील व पांचवड येथील श्रीमंत सरदार नातू यांचे देवांची पूजा करणे. ऑक्टो. १९८८ पासून पुणे येथे मुलाजवळ वास्तव्य.

भार्या : **इंदिरा**–माहेर–यशोदा गोविंद जोशी. राहणार–पनवेल, प्लेगने मृत्यू माघ शुद्ध तृतीया. इ. स.१९४६.

कन्या : **यमुना**–सासर–इंदिरा यशवंत मराठे, टेंभू. जन्म १९३९ हयात.

७/६ **विनायक सदाशिव**–जन्म ११ ।१२ ।१९३४ (मार्गशिर्ष शुद्ध चतुर्थी). शिक्षण–अकरावी एस्.एस्.सी. व चित्रकलेच्या दोन परीक्षा. व्यवसाय–पुणे येथे गरवारे वाणिज्य महाविद्यालय, कार्यालयात नोकरी. लहानपणीच वयाचे १२ व्या वर्षी आईचे निधन झाल्यामुळे वडिलांच्या चुलतीने म्हणजे श्रीमती पार्वतीबाई महादेव अभ्यंकर यानी पुत्रवत सांभाळ केला. सन १९५० मध्ये त्यांची सेवासदन मधील नोकरी संपल्यामुळे सोमयाजी धुंडिराज शास्त्री बापट यांनी त्यांचे पुणे येथील शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांचे घरी ठेवून घेतले. शिक्षण करीत असताना लिखाणाची कामे करणे वगैरेची आवड असल्यामुळे सध्या नोकरी व्यतिरिक्त घरी इंग्रजी टंकलेखनाची कामे करतात. दरवर्षी भाद्रपदात गणेशचतुर्थीस स्वतः हाताने तयार केलेल्या गणेश मूर्तीची स्थापना करतात.

वास्तव्य–१३८७ शुक्रवार पेठ, लेले वाडा, पुणे–२.

भार्या : **वासंती**–माहेर–सुधा वामन जोगळेकर. रा. पुणे जन्म ७ ।१ ।१९४० शिक्षण–एस्. एस्. सी. चित्रकलेच्या दोन परीक्षा. शिवाय गायन, चित्रकला, शिवणकाम, विणकाम यांची आवड. व्यवसाय–पुणे

(११)

होडावडे–पांचवड–पुणे घराणे



येथील तरटे मुक्त शाळेत (मतीमंद मुलांची शाळा) शिक्षिका.

८/७ **निरंजन विनायक**–जन्म ८ ।५ ।१९६४. एम्. कॉम. एल. एल. बी. चित्रकलेच्या दोन परीक्षा, व्यवसाय–पुणे येथे राठी डाय-केम मध्ये अकौंट्स ऑफिसरची नोकरी. चित्रकला व तबला वाजविण्याची आवड.

९/७ **श्रीपाद विनायक**–जन्म २१ ।४ ।१९६६. शिक्षण–दहावी (एस्. एस्. सी.) मेकॅनिकल ड्राफ्ट्समन, इलेक्ट्रिशियन व वायरमनचे खाजगी कोर्स पूर्ण. पुणे विद्यापिठाचा मोटरसायकल मेकॅनिकचा कोर्स. व्यवसाय–पुणे येथील सिंग गॅरेजमध्ये हिरो होंडा मोटरसायकल मेकॅनिकची नोकरी.

१०/६ **अरविंद सदाशिव**–लहानपणी मृत.

११/४ **महादेव कृष्ण**–मृत्यू सन १९१४. शिक्षण–इंग्रजी दोन इयत्ता. व्यवसाय–व्यवसायासाठी पांचवड सोडून जामनेरला गेले. तेथे कापसाचे गिरणीत मोठ्या हुद्यावर होते. मधूनमधून ते पांचवडास ये–जा करीत. तेथील घराची बऱ्याच प्रमाणात दुरूस्ती केली. भार्या : १) **पार्वती**–माहेर–पार्वती (पिली) जोशी रा. चिंधवली ता. वाई. यांना एक कन्या होती. परंतु आईचे मृत्युनंतर लगेच निधन पावली.

२) **पार्वती**–माहेर–द्वारका नारायण जोशी. रा. वाई जन्म १८९३. मृत्यू २९ जाने. १९८३. यांना अपत्य झाले

(१२)

वाई–सातारा घराणे



नाही. परंतु अतिशय कर्तबगार होत्या. पतिचे निधन लवकर झाल्यामुळे पुणे येथे माहेरी भावाजवळ राहात. स्वतःचे पायावर उभे राहून, लिहिणे, वाचणे घरीच शिकून पुणे येथील सेवा सदनाच्या दुकानात नोकरी केली. मनाने अतिशय खंबीर व कष्टाळू. परोपकारी वृत्तीमुळे माहेरच्या अनेकजणांना त्यांनी पुत्रवत् सांभाळले. तसेच पुतण्याचे मुलाचा म्हणजेच विनायक सदाशिवाचा, त्याची आई १९४६ मध्ये प्लेगमध्ये निवर्तल्यावर पुत्रवत् सांभाळ केला.

(१२)

वाई–सातारा घराणे

१/१ **नागेश**–हा ज्ञात मुळपुरूष.
२/२ **रामकृष्ण नागेश**– #
३/३ **बाळकृष्ण रामकृष्ण**–व्यवसाय–पोलिस खात्यांत नोकरी. वास्तव्य–मनमाड.
कन्या : **मंदाकिनी**–जन्म १९३९. सासर–मंदाकिनी माधव सराफ. गोग्रासवाडी देवीचे देवळासमोर, डोंबिवली (पूर्व).

४/४ **जगदीश बाळकृष्ण**–जन्म १५ ।८ ।१९४७.
शिक्षण–इ. ६ वी पास व्यवसाय–समर्थ सह. सोसा. ठाणे येथे नोकरी. वास्तव्य–इंदिरा निवास, वामननगर, वामनचाळ, गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **अश्विनी**–माहेर–कल्पना हरी दर्प, नाशिक.
कन्या : **दिप्ती**–जन्म १९८६.
५/४ **अनिल बाळकृष्ण**–जन्म १५ ।८ ।१९४७.
शिक्षण–नॉनमॅट्रिक. व्यवसाय–महिंद्र आणि महिंद्र, डोंबिवली येथे नोकरी. वास्तव्य–गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व).
भार्या : **मंगल**–जन्म १९५२. माहेर–मंगल अवधूत दर्प.
कन्या : **अपर्णा**–जन्म १९८७.
६/४ **सुरेश बाळकृष्ण**–जन्म १९५९.
शिक्षण–व्यवसाय–लेले डेअरी डोंबिवली येथे नोकरी. वास्तव्य–डोंबिवली,
भार्या : **संगिता**–जन्म १९६१.
पुत्र–**ओंकार**–जन्म १९८८.

(१३)

नारिंग्रे-अमरावती घराणे



(१३)

नारिंग्रे-अमरावती घराणे

१/१ **दामोदर**-ज्ञात मूळ पुरूष. इतर माहिती मिळाली नाही.

२/२ **पद्माकर दामोदर**-तळेगांव-दाभाडे येथे डॉक्टर होते.

कन्या : **शालिनी**-सासर-जोशी, नवी पेठ, पुणे.

३/३ **मधुकर पद्माकर**-अविवाहित. मृत.

४/३ **रवींद्र पद्माकर**-वास्तव्य-सर्वे नं. ३१, सुमंगल कार्यालयाजवळ, धनकवडी, पुणे.

५/४ **पराग रवींद्र**-डी. एम्. इ., व्यवसाय-डब्ल्यू. एन्. सी., लि. मधे नोकरी. वास्तव्य-धनकवडी, पुणे.

६/४ **राहुल रवींद्र**-१२ वीत शिकत आहे.

७/३ **मधुकर पद्माकर**-फ्लाइट लेफ्टनंट, इंडियन एअर फोर्स नवी दिल्ली.

भार्या : **पद्मा**-माहेर माहित नाही.

८/४ **मकरंद मधुकर**-महाराष्ट्र बँकेत नोकरी, मुंढवा, पुणे.

भार्या : **मंजिरी**-

९/४ **मिलिंद मधुकर**-अविवाहित. मृत.

१०/४ **प्रसन्न मधुकर**-शिकत आहे.

११/२ **त्रिंबक दामोदर**-वास्तव्य-पुणे--जबलपूर.

भार्या : **काशीबाई**-

कन्या :

१) **मालन**-अविवाहित. मृत.

२) **कुमुद**-सासर-पति-मोरेश्वर मुंजे, जबलपूर.

३) **सुमन**-सासर-राम साठे, इंदूर. शिक्षिका-नोकरी निमित्त जबलपूरहून नागपूर व नंतर अमरावती येथे आले.

१२/३ **शाम त्रिंबक**-जन्म १२ ।२ ।१९३२. मृत्यू १९८८, अमरावती. मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह होते. वास्तव्य-मोर्शी रोड, खापर्डे बगिचा, अमरावती.

भार्या : **शैलजा**-माहेर-मीनाक्षी गोविंद डेगवेकर.

(१४)

बेल्लूर–बेळगांव–पुणे घराणे



कन्या :
१) **नंदिनी**–जन्म ३१ ।५ ।१९५६. सासर–संगिता प्रकाश कुलकर्णी व्यवसाय–शिक्षिका. वास्तव्य–रेवा (म. प्र.)
२) **अंजली**–जन्म २३ ।१२ ।१९६०. सासर–अंजली शरद कासट, अमरावती.
१३/४ **अनिरुद्ध शाम**–जन्म ८ ।११ ।१९५०.
शिक्षण–बी. कॉम., एल्. एल्. बी.
व्यवसाय–महाराष्ट्र बँकेत नागपूर येथे नोकरी.
वास्तव्य–सीताबर्डी, नागपूर.
भार्या : **शुभदा**–माहेर–शुभदा शामसुंदर लेले, जळगांव.
कन्या :
१) **मैथिली**–जन्म ९ ।१२ ।१९८७.
२) **अनघा**–जन्म १ ।५ ।१९८९.
१४/४ **अनंत शाम**–जन्म ६ ।९ ।१९६३. महाराष्ट्र विद्युत मंडळ मध्ये नोकरी. क्रिकेट, टेबल टेनिस, बॅडमिंटन यांची आवड. वास्तव्य–अमरावती.
१५/४ **अजित शाम**–जन्म १५ ।६ ।१९६६. शिक्षण चालू आहे. वास्तव्य–अमरावती.

(१४)

बेल्लूर–बेळगांव–पुणे घराणे

१/१ **नारायण**–ज्ञात मूळपुरूष.
२/२ **विठ्ठल नारायण**–जन्म १८७९. मृत्यू १९४९. वास्तव्य–बेळगांव.
भार्या : **कुसाबाई**–माहेर–परांजपे, सातारा.
कन्या : **इंदु**–सासर–इंदुताई आपटे. पति–रघुनाथ बळवंत आपटे. ८६१, शिवाजीनगर, पुणे ४.
३/३ **नारायण विठ्ठल**–मृत्यू १९७२. व्यवसाय–प्रिंटिंग प्रेस. वास्तव्य–कुंभोजकर बंगला, सोमवार पेठ, टिळक वाडी, पोलीस चौकीजवळ, बेळगांव.
भार्या : **शोभना**–

४/४ **उल्हास नारायण**–व्यवसाय–स्वतःचा प्रिंटींग प्रेस चालवितात. वास्तव्य–कुंभोजकर बंगला, सोमवार पेठ, टिळकवाडी, बेळगांव.
भार्या : **शालिनी**–माहेर–ओगले, धुळंबे.
कन्या : **युगंधरा**–जन्म १९८३. पुत्र–**गणेश**–जन्म १९८५.
५/३ **पांडुरंग (भाऊराव) विठ्ठल**–जन्म १९१०. शिक्षण–पूर्वीची आठवी.
व्यवसाय–फोटोफ्रेमचे दुकान होते. वास्तव्य–माणिक प्रभू संस्थान हुमणाबाद, जि. बिदर, कर्नाटक.
भार्या : **राधाबाई**–माहेर–बगुताई नारायण दामले, सांगली.
कन्या :
१) **कमल**–जन्म १९४४. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–सुशिला रामचंद्र गोडसे, सांगली.
२) **सुमन**–जन्म १९४६. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–मंगला रघुनाथ लिमये, धामणी, सांगली.
३) **हेमा**–जन्म १९४८, शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–हेमा धनंजय मेहेंदळे, हरिपूर, सांगली.
४) **प्रेमा**–जन्म १९५०. शिक्षण–एस्. एस्. सी. सासर–प्रेमा शशिकांत लिमये, विश्रामबाग, सांगली.
६/४ **रामचंद्र भाऊराव**–जन्म १८ ।३ ।१९३६. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय–भागीदारीत तांब्यांच्या नळ्यांवर थ्रेड पाडण्याचे मशिन स्वतः तयार केले. या तांब्यांच्या ट्युबस् एअर–कंडिशनसाठी उपयोगी. परदेशी मालाऐवजी स्वदेशी माल तयार करण्यांत पुढाकार. विनय इंजि. वर्क्स नावाचा उद्योग गुंडलाव–बलसाड (गुजराथ) येथे आहे. वास्तव्य–सर्व्हे. नं. १४२, ब्लॉक नं. ४/२, भेलके नगर, कोथरूड, पुणे–२९.
भार्या : **शुभदा**–माहेर–इंदु विष्णु खाडिलकर, जायगव्हाण, ता. मिरज, जि. सांगली. जन्म १९४२. शिक्षण–व्ह. फा.
कन्या : **पूर्णिमा**–जन्म १३ ।४ ।१९७६. शिक्षण–१० वीत शिकत आहे. हार्मोनियम (पेटीच्या) ३ परीक्षा उत्तीर्ण. संगीत ३ परिक्षा उत्तीर्ण.
७/५ **चिंतामणी रामचंद्र**–जन्म ९ ।६ ।१९६६. शिक्षण–बी. इ. मेकॅनिकल्, ज्ञानेश्वर विद्यापीठ, पुणे. व्यवसाय–वडिलांच्या व्यवसायांत मदत.
भार्या : **मानसी**–शिक्षण–बी. कॉम्. माहेर–स्वाती वसंत गाडगीळ, सांगली.
८/५ **पुरुषोत्तम रामचंद्र**–जन्म ९ ।५ ।१९७२. शिक्षण–इले. डिप्लोमा ३ रे वर्ष चालू. भारतीय विद्यापिठ, कात्रज, पुणे.
९/४ **मुकुंद पांडुरंग**–जन्म १० ।११ ।१९४०. शिक्षण–एस्. एस्. सी. नंतर इंजिनीअरींगचा डिप्लोमा. व्यवसाय–प्रथम टेल्को कंपनीत स्प्रे पेंटिंग खात्यात नोकरी. नंतर ॲस्टो ॲनॉलीसिसचा १९७६ पासून व्यवसाय, कॉम्प्युटरवर पत्रिका करणे इ. व्यवसाय करतात. १९८० साली ज्योतिष विशारद पदवी प्राप्त. १९८८ साली ज्योतिष भास्कर पदवी प्राप्त. शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते सायन्सच्या फिल्म काढल्या. वास्तव्य–४१, बुधवार पेठ, पुणे.
भार्या : **पद्मजा**–माहेर–पद्मजा कोंडिराम लवाटे, सांगली.
कन्या :
१) **संगिता**–जन्म १३ ।१ ।१९६८. शिक्षण–एस्. एस्. सी. ज्योतिषशास्त्राचे धंद्यात मदत. सासर–माहित झालें नाही.
२) **रसिका**–जन्म १० ।१२ ।१९७४. शिक्षण–८ वीत शिकत आहे.
१०/२ **रामचंद्र नारायण**– #

(१५)

अवसरी–पुणे–मुंबई–घराणे

अवसरी हे मूळ गाव आहे असे सांगणाऱ्या एका माहेरवाशिणीकडून आलेल्या माहितीच्या आधारे खालील वंशावळी व त्यातील व्यक्तींचा परिचय पुढे दिला आहे. पुरुष व्यक्ती अभ्यंकर घराण्यात सध्या हयात नसल्यामुळे संपूर्ण वंशावळी किंवा तपशीलवार माहिती मिळू शकली नाही. तथापि ४४३/अ शनिवार पेठ, हसबनीसांचा बोळ, पुणे. येथे गोविंद विष्णुच्या मागील आठव्या पिढीतील व्यक्तीचे नाव गोविंदच होते व त्या

(१५)

अवसरी-पुणे-मुंबई-घराणे



ठिकाणी त्या घराण्यातील कुणीतरी जिवंत समाधी घेतलेली होती; ती आजही अस्तित्वात आहे.

कुळधर्म कुळाचार–या घराण्यातील व्यक्ती तुळजापूरची भवानी मानतात.

१/१ **चिंतामण**– #

२/२ **मोरेश्वर चिंतामण**– #

३/३ **विष्णु मोरेश्वर**–व्यवसाय–दुकान व धंदा. वास्तव्य–पुणे.

भार्या : **सरस्वती**–

कन्या :

१) **द्वारका**–सासर–यमुना केशव आपटे, पुणे मृत.

२) **गोदावरी**–सासर–अन्नपूर्णा भा. ताम्हनकर, पुणे.

३) **नर्मदा**–सासर–जानकी दत्तात्रय भट, पुणे. मृत.

४) **कावेरी**–सासर–जानकी रा. गोखले. पुणे. मृत्यू १९७५.

५) **कृष्णा**–सासर–सत्यभामा कृष्ण गोखले. पुणे. मृत.

४/४ **गोविंद विष्णु**–जन्म १९०५ मृत्यू ऑक्टोबर १९७५. व्यवसाय–प्रथम रेल्वेत नंतर महाराष्ट्र बँकेत नोकरी. वास्तव्य–पुणे.

भार्या : **मनोरमा**–जन्म १९१०. मृत्यू १९६०. माहेर–कमल प्रभाकर करमरकर, पुणे.

कन्या :

१) **मीरा**–जन्म १९३१. शिक्षण–पी. टी. सी. ट्रेन्ड. सासर–मीरा मधुसूदन गोगटे. पति–मधुसूदन गोगटे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मधे ऑफिसर होते. (मृत्यू १९८९). वास्तव्य–पुणे विद्यार्थी गृहाचे शतायु भवन, खोली नं. ४ विद्यानगरी, पर्वती, पुणे–९.

२) **विजया**–जन्म ५ ।९ ।१९४५. सासर–स्वाती प्रकाश गोळे. वास्तव्य–१ बी, अभिमानश्री, पाषाण रस्ता, पुणे.

५/४ **महादेव विष्णु**–व्यवसाय–सरकारी नोकरीत होते.

भार्या : **उमा**– मृत १९८१ माहेर–छबुताई जोशी, पुणे.

६/३ **शिवराम मोरेश्वर**–व्यवसाय–जी.आय.पी. रेल्वेत नोकरी. हे अंध होते.

भार्या : **लक्ष्मी**–

कन्या : **अंबू**–जन्म १९१४. माहेर–पार्वतीबाई महादेव जोशी. वास्तव्य–रामचंद्र निवास, ब्राम्हण वाडी, कुर्ला (पश्चिम) मुंबई. हयात.

७/२ **शंकर चिंतामण**–व्यवसाय–शेती.

वास्तव्य—अवसरी येथे. यांना एक पुत्र होता. परंतु विवाहापूर्वी मृत्यू झाला.

(१६)

कुर्थे–मेरवी–मिरज–पुणे घराणे

१/१ **हरभट**–ज्ञात मूळपुरूष
२/२ **त्र्यंबक हरभट**– #
३/३ **गणेश त्र्यंबक**–
भार्या : **सरस्वती**–इतर माहिती मिळाली नाही.
४/४ **कृष्ण गणेश**–
भार्या : **गंगा**–इतर माहिती मिळाली नाही.
५/५ **गोविंद कृष्ण**–
भार्या : **राधा**–इतर माहिती मिळाली नाही.
६/६ **महादेव गोविंद**– #
७/६ **जगन्नाथ गोविंद**– #
८/६ **त्र्यंबक गोविंद**– #
९/६ **दत्तात्रय गोविंद**– #
१०/६ **अप्पा गोविंद**– #
११/५ **अनंत कृष्ण**–मृत्यू १९२८. व्यवसाय—भिक्षुकी, याज्ञिकी, शेती. वास्तव्य—मिरज.
भार्या : **गोपिका**–माहेर—काशी सहस्रबुद्धे भिलवडी, जि. सांगली.
कन्या : **बकुळ**–सासर—बकुळ चिंतामणी आपटे, मिरज.
१२/६ **वासुदेव (राजाराम) अनंत**– जन्म १७ । ५ । १९०५. मृत्यू १९८७. दशग्रंथी ब्राम्हण. शिक्षण—७ वी पर्यंत. व्यवसाय—भिक्षुकी, याज्ञिकी, शिवाय बॉंडरायटर, उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध.
भार्या : **लक्ष्मी**–माहेर—द्वारका गणेश जोशी. जन्म ९ ।१२ ।१९१४. वास्तव्य—इचलकरंजी. शालेय शिक्षण नव्हते. तथापि गीता, संत वाड़मय स्तोत्रे, इ. पाठांतर दांडगे. उत्तम कीर्तनकार, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करीत असत.
कन्या : **राधा**–सासर—राधा वासुदेव जोशी, जमखिंडी.
१३/७ **माधव (बाळ) वासुदेव**–जन्म ९ ।५ ।१९३५. शिक्षण—एम्. ए. (हिंदी) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. शिक्षक सनद परीक्षेत महाराष्ट्रांत सर्व प्रथम. कै. वामनबुवा चापेकर (शापित गंधर्व) व श्री. पेटकर यांचेकडून ग्वाल्हेर आणि जयपूर गायकीची उत्तम तालीम घेतली. ज्योतिषाचा उत्तम अभ्यास. मराठी नियत कालिकातून ललित लेखन, कथालेखन करतात. अविवाहित. वास्तव्य— ४६८७, अंबाबाई तालमी जवळ, ब्राम्हणपुरी, मिरज.
१४/७ **श्रीकांत (तात्या) वासुदेव** –जन्म २० ।४ ।१९४२. शिक्षण—एम्. ए, एल्. एल्. बी. व्यवसाय—वकील, त्यापूर्वी शिक्षक. वास्तव्य—४६८७, अंबाबाई तालमी जवळ, ब्राम्हणपुरी, मिरज. सामाजिक कार्याची आवड. जाणकार पटकथा लेखक.
भार्या : **मोहिनी**–शिक्षण—बी.ए. माहेर—बर्वे. कै. स. गो. बर्वे आय. सी. एस्. यांची पुतणी.
१५/८ **अमित श्रीकांत**– #
१६/७ **रामचंद्र वासुदेव**– जन्म ६ ।७ ।१९४४. शिक्षण—जी.डी.आर्ट. व्यवसाय— छायाचित्रण कलाशिक्षण, डिझायनिंग, इत्यादित रस. मासिके, ग्रंथाचे चित्रकार, मुखपृष्ठ इ. चा व्यवसाय. ज्योतिष शास्त्राचा अभ्यास. वास्तव्य—चंद्रप्रकाश, ३३६ शिवाजी नगर, पुणे—१६.
भार्या : **वैशाली**–माहेर—छत्रे, सांगली.
कन्या : **अश्विनी**–जन्म २८ ।९ ।१९७८.
१७/८ **अभिजित रामचंद्र**–जन्म ११ ।१० ।१९७४.
१८/७ **शंकर वासुदेव**– जन्म ५ ।१२ ।१९४६. (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी शके १८६८. गीता जयंती). शिक्षण—एम्. ए. (इंग्रजी); एम्. ए. (संस्कृत); एम्. एड्; पी. एच्. डी.१९७७ साली पुणे विद्यापीठात एम्. एड् ला पहिले आले. स्वामी विवेकानंदांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानावर १९८७ साली पी. एच्. डी. (विद्यावाचस्पती) पदवीचा सन्मान मिळाला. **व्यवसाय**–टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे, येथे संशोधन विभागाचे प्रमुख आहेत. अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. (भाग १) इंग्रजी पाठ्य पुस्तकां मध्ये यांच्या एका पाठाचा अंतर्भाव झाला आहे. एस्.सी.ई.आर्.टी. सारख्या राज्यस्तरीय संस्थांमधून रिसोर्स पर्सन (मार्गदर्शक) या नात्याने योगदान करतात. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात 'भोगी या योगी' या

(१६)
कुर्धे–मेरवी–मिरज–पुणे घराणे



हिंदी नाटकास १९७७–७८ साली सर्वोत्तम लेखनाचा पुरस्कार मिळाला. 'स्वर–भास्कर' या पंडित भीमसेन जोशींवरील चरित्रास महाराष्ट्र शासनाचा १९८४–८५ तील उत्तम वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार प्राप्त. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांवरील मराठी व संस्कृत भाषेत अनुवाद केलेल्या नाटकांना महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात पुरस्कार प्राप्त. 'देवमाणूस' नाटकातील अनिलच्या भूमिकेसाठी रंगायन दिल्ली येथे १९७५ साली भूतपूर्व उपराष्ट्रपती डॉ. बी. डी. जत्ती यांचे हस्ते गौरव. १९८५ साली भोपाळच्या भारत भवन ट्रस्टकडून 'स्वर भास्कर' ग्रंथ लेखनासाठी विशेष गौरव. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् जन्म शताब्दि निमित्त आयोजित केलेल्या अखिल भारतीय निबंध स्पर्धेत १९८९ साली एन्.सी.ई.आर.टी. दिल्लीकडून राष्ट्रीय पुरस्कार. १९९० साली युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशन कडून 'रिचर्स फेलोशिप' चा राष्ट्रीय पुरस्कार. विश्वकोषात अनेक

(१७)
तुळस–मातोंड–पुणे घराणे

पि. क्र.	व्य. क्र.	
१	१	रघुनाथ ज्ञात मूळपुरुष
२	२	नारायण
३	३	अनंत
४	४	वासुदेव
५	५	शशिकांत

नोंदींचे लेखन. विश्वमहामानव कोषासाठी भारतीय संस्कृती, खेळ इ.चे विभाग प्रमुख. 'जाणता राजा' साठी काव्य लेखन. सुमारे २० ग्रंथ प्रकाशित. 'संत ज्ञानेश्वरांचा भक्ति योग' या ग्रंथास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा तुळशीराम वाघ सर्वोत्तम संत वाङमयीन–ग्रंथ पुरस्कार. बहुतेक सर्व मराठी व इंग्रजी नियतकालिकातून लेखन. 'स्पोर्ट वीक' या इंग्रजी साप्ताहिकांत क्रिकेटवर ७५ लेखांची मालिका 'इम्मॉर्टल कोट्स ऑफ क्रिकेटस्' हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ दिल्लीच्या रूपा अँड कंपनी तर्फे प्रकाशित. १९६६ साली लातूर मधील महाराष्ट्र राज्य सुगम संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक, १९७५ साली कालिदास संगीत स्पर्धेत अकरा बक्षिसे मिळवून उच्चांक–आंतर विद्यापीठीय स्पर्धेत सर्वोत्तम सुगम–संगीत मानकरी ! १९८८ साली 'कृष्ण बासरी' ही ध्वनिफित श्री. सुधीर फडके यांचे हस्ते प्रकाशित. भारतीय संस्कृतीचा गौरवशाली इतिहास विविध माध्यमातून जपण्यासाठी 'आदित्य प्रतिष्ठान' ची स्थापना. 'साक्षात्कारी संतांचा भक्तियोग' या संकल्पित भक्ति प्रकल्पाच्या ८० खंडांचे प्रमुख संशोधक व लेखक. नारदीय व वारकरी परंपरेची महाराष्ट्रात सर्वत्र शेकडो कीर्तने. संत ज्ञानेश्वर, संत रामदास, छत्रपती शिवाजी, झांशीची राणी, स्वामी विवेकानंद, भगवान् कृष्ण, फुलांचा राजा गुलाब, सुनील गावस्कर, श्री गणेश इ. विषयांवर महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर शेकडों रंगीत स्लाईड शोज. भारतीय संस्कृती, संत वाङमय, महापुरूष इ. वर अनेक व्याख्याने व प्रवचने. सुगम संगीत व नाट्यसंगीताचे महाराष्ट्रात सर्वत्र कार्यक्रम. रामकृष्ण मठ, ज्ञान प्रबोधिनी, दासगणु महाराज प्रतिष्ठान, विश्व हिंदू परिषद इत्यादि नामवंत संस्थाकडून शाल पांघरून विशेष गौरव. आंतर महाविद्यालयीन व आंतर विभागीय क्रिकेट मध्ये सहभाग. महाराष्ट्र राज्य बुद्धीबळ स्पर्धेसाठी तीन वेळा निवड. अखिल भारतीय वैद्य स्मृति बुद्धिबळ स्पर्धेत सहभाग. वास्तव्य–'तृप्तिदीप', ४१ एल.आय्.सी. कॉलनी, ४७ ।२ पर्वती, योगाचार्य बाबासाहेब कोल्हटकर पथ, पर्वती, पुणे–९.

भार्या : **अपर्णा**–जन्म १२ ।११ ।१९५४.
माहेर–रोहिणी अच्युत कोल्हटकर. पिता–अच्युत कृष्ण कोल्हटकर–सातारा. शिक्षण–एम्.ए. संस्कृत. बी.ए. ला राष्ट्रीय शिष्यवृत्ती चा सन्मान.

१९/८ **जितेंद्र शंकर**–जन्म ३० ।३ ।१९७६.
शिक्षण–१० वीत शिकत आहे.

२०/८ **आदित्य शंकर**–जन्म १२ ।१० ।१९७९.
शिक्षण–६ वीत शिकत आहे.

२१/६ **गणेश अनंत**–अविवाहित.
२२/३ **रामचंद्र त्र्यंबकभट**– #

(१७)

तुळस–मातोंड–पुणे–घराणे

तुळस–मातोंड ता. वेंगुर्ले जि. सिंधुदुर्ग हे आपले मूळ गाव आहे असे सांगणारे एकच कुटुंब आढळले. मात्र तुळस–मातोंड येथे सध्या अभ्यकरांचे एकही घर नाही. या घराण्यातील बंधूंकडून मिळालेल्या माहितीचे आधारे खालील वंशावळी आणि त्यातील व्यक्तींचा परिचय पुढे दिला आहे.

१/१ **रघुनाथ**–ज्ञात मूळपुरूष. #

२/२ **नारायण रघुनाथ**– #
३/३ **अनंत नारायण**–जन्म १८६४. मृत्यू १९११
भार्या : **गंगूबाई**–
४/४ **वासुदेव अनंत**–जन्म २७ ।१० ।१९०५
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–भारत सरकारच्या सरंक्षण विभागातून सेवानिवृत्त. वास्तव्य–१५४० सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे–३०.
भार्या : **इंदिराबाई**– माहेर–इंदुमती गोखले, गृहिणी.
कन्या : **निर्मला**–जन्म २१ ।४ ।१९३२. सासर–धारप, पुणे.
५/५ **शशिकांत वासुदेव**–जन्म १६ ।२ ।१९३४.
व्यवसाय–विंग कमांडर, सरंक्षण खात्यातून निवृत्त.
भार्या : माहेर–कूर्ग,त्रावणकोर.
कन्या :
१) **जयन्ती**–जन्म २० ।७ ।१९६५
२) **नंदिता**–जन्म १ ।३ ।१९६८.

पि. क्र. व्य. क्र.

जांभूळपाडा घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक २

जांभूळपाडा–सोलापूर–बडोदे–ठाणे–मुंबई



(यातील व्यक्तिपरिचयाच्या माहितीसाठी पृष्ठ क्रमांक ३४३ पहा)

(१८)

केतकी-बिवली घराणे

बिवली हे गांव रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणपासून १६ किलोमीटर अंतरावर असून जवळच केतकी गांव आहे. त्यामुळे, केतकी–बिवली असाच उल्लेख सर्वजण करतात. याठिकाणी अभ्यंकरांची दोन घरें असून तिथे आज वास्तव्य मात्र नाही. तिथे थत्ते, गोखले इ. चित्तपावन ब्राह्मणांची वस्ती आहे. या घराण्यातील ठाणे, पुणे, बडोदे इ. ठिकाणी सध्या रहात असलेल्या बंधूंकडून आलेल्या माहितीच्या आधारे पुढील वंशावळी व व्यक्तिपरिचय दिला आहे.

१/१ **लक्ष्मण- #**

२/२ **दिनकर लक्ष्मण- #**

३/३ **काशीनाथ दिनकर- #**

कन्या :

१) सासर–दामले.

२) सासर–सोमण.

३) सासर–गोखले.

४/४ **भिकाजी काशीनाथ**–मृत १९२१.

भार्या : **गंगाबाई**–माहेर–आवडी बल्लाळ नामजोशी, वुरंवाड, माखजन जवळ ता. संगमेश्वर.

कन्या :

१) सासर–कान्हेरे. मृत.

२) **बाळूताई**–सासर–गोपिकाबाई जोगळेकर. मृत १९५०.

३) **मनुताई**–सासर–आनंदीबाई. रिसबूड, चिंचोली बोरघाट. मृत १९८०.

४) **शांताबाई**–सासर–शांता मधुसूदन जोशी, भिले, चिपळूण. मृत १९४७.

५/५ **दिनकर भिकाजी**–मृत नोव्हेंबर १९६३.

व्यवसाय–भिक्षुकी. शेवटी काही वर्षे पुण्यात वास्तव्य होते.

भार्या : **सरस्वती**–मृत जुलै १९३३.

कन्या :

१) **सुमन**–सासर–सुनंदा विद्याधर गांगल, जांभिवली गौरकामथ, जि. रायगड.

२) **बनू**–अविवाहित. मृत १९४१.

६/६ **लक्ष्मण दिनकर- #**

७/७ **रामचंद्र दिनकर**–जन्म ४ ।९ ।१९२१.

शिक्षण–व्ह.फा. व इंग्रजी ३ री. व्यवसाय–१९४८ पासून १९८२ पर्यंत शनिवार पेठ, पुणे येथे कापडाचा मोठा व्यवसाय होता. वास्तव्य–५९, कांचन बंगला, संगम सोसायटी, बिबवेवाडी, सातारा रोड, पुणे–३७. काव्य व पोवाडे यांची आवड. रा. स्व. संघात १९४८ चे सत्याग्रहात ३ महिने तुरुंगवास. ३५ वर्षे दम्याचा आजार. परंतु स्वत:चे घर बांधून मोकळ्या हवेत राहिल्याने दमा विकार पूर्ण बरा झाला.

भार्या : **निर्मला**–माहेर–येसू विष्णू रानडे, भातगांव ता. गुहागर.

८/७ **सुहास रामचंद्र**–जन्म २५ ।७ ।१९६३.

शिक्षण–बी.कॉम.

९/६ **वसंत दिनकर**–वास्तव्य–द्वारा आबा जोशी. मु. पन्हाळी, पोस्ट सैतावडे, रत्नागिरी. ४१५६१३.

१०/६ **विनायक दिनकर**–व्यवसाय–महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात ड्रायव्हर. वास्तव्य–१०९, पर्वती, पुणे–९.

भार्या : **सुधा**–माहेर–हर्डीकर.

११/७ **सुनील विनायक**–वय २६ वर्षे.

१२/७ **समीर विनायक**–वय २१ वर्षे.

१३/६ **नारायण भिकाजी**–जन्म १९०९ मृत्यू २६ ।३ ।१९४७.

भार्या : **लक्ष्मी**–माहेर–मथुरा पुरुषोत्तम बेडेकर.

कन्या :

१) **इंदू**–सासर–सुलभा दत्तात्रय काळे, रामनिवास, छेडा रोड, डोंबिवली (पूर्व.)

२) **कुमुद**–सासर–जयश्री यशवंत पेंडसे, ५२८ व 'सुवास्तु' परचुरे वाडा, शनिवार, पुणे–३०.

३) **पुष्पा**–मृत.

१४/६ **सुधीर नारायण**–जन्म १९४५. शिक्षण–मॅट्रिक, ड्राफ्टसमन. व्यवसाय–टेल्को कंपनीत नोकरी. वास्तव्य–बी–१६, आधार, पुणे सातारा रोड, पुणे–४११०३७.

भार्या : **वृंदा**–माहेर–विनया सदाशिव राहुरकर, पुणे.

(१८)
केतकी–बिवली



१५/७ **अतुल सुधीर**–वय १२ वर्षे.
१६/७ **अजित सुधीर**–वय ९ वर्षे.
१७/५ **यशवंत भिकाजी**–जन्म १९ ।८ ।१९१४. शिक्षण–मराठी ७ वी पर्यंत. व्यवसाय–आठवले, शहाडे आणि कं. गिरगांव कापड दुकानात सेल्समनची नोकरी. करुन निवृत्त. वडील ७ व्या वर्षी व आई ९ व्या वर्षी निधन पावल्याने जास्त माहिती नाही. वास्तव्य–पूर्वी फणसवाडी, ठाकूरद्वार. हल्ली–९

पितृछाया, डॉ. लाझरस रोड, चरई, ठाणे (प.).
भार्या : **विमल**–माहेर–जान्हवी दत्तात्रय लिमये, मिरजोळे, ता. रत्नागिरी.
कन्या :
१) **विजया**–जन्म ३ ।७ ।१९५४. सासर–सुनीता जयकृष्ण शिंत्रे, ठाणे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, बाँबे सेंट्रल, येथे नोकरी.
२) **विनया**–जन्म ५ ।१२ ।१९५६. सासर–रेश्मा रमेश पेडणेकर, जैतापूर. हल्ली वास्तव्य–९ पितृछाया, डॉ. लाझरस रोड, ठाणे.
१८/६ **मधुकर यशवंत**–जन्म ९ ।११ ।१९५१. मृत्यू १६ ।९ ।१९८०. शिक्षण–बी. ई. मद्रास येथे नोकरीवर असताना अपघाती मृत्यू.
१९/५ **हनुमंत भिकाजी**–जन्म २९ ।११ ।१९१९. बिवली येथे. मॅट्रिक. व्यवसाय–पोस्ट व तार खात्यात १९ ।६ ।१९४१ ते ३० ।११ ।१९७७ पर्यंत नोकरी. प्रवास, वाचन व समाजकार्याची आवड. आर्मी पोस्टात ११ ।५ ।१९४६ ते ११ ।३ ।१९४७. या काळात सिलोन, मद्रास व सिंगापूर येथे प्रवास. वास्तव्य–५२६ शनिवार पेठ, पुणे–४११०३०.
भार्या : **कमल**–माहेर–कमल दामोदर जोशी. अपत्य नाही.
२०/३ **गोविंद दिनकर**– #
२१/४ **विष्णु गोविंद**– #
२२/५ **शंकर विष्णु**– #
कन्या :
१) **नर्मदा**–सासर–नर्मदा दामले. बालविधवा. सेवानिवृत्त. शिवण शिक्षिका. वास्तव्य–रावतळे, चिपळूण.
२) **अहिल्या**–सासर–सरस्वती विनायक मेहेंदळे, चिपळूण.
३) **कृष्णाबाई**–मृत १९४३.
२३/६ **राजाराम शंकर**–जन्म १९ ।७ ।१९१२. मृत्यू ११ ।५ ।१९८५. पुणे येथे प्रेसमधे नोकरी. गायनाचे क्लास चालवित होते.
भार्या : **ताराबाई**–माहेर–अनुसुया गोपाळ खाडिलकर.
कन्या : १) **पुष्पा**–सासर–पुष्पलता नरहर रानडे. वास्तव्य–१२२७, शिवाजी नगर, लेले क्वार्टर्स, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे–४.
२४/५ **महादेव विष्णु**–वास्तव्य–१२२७, शिवाजी नगर, लेले क्वार्टर्स, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे–४.
२५/५ **रत्नाकर विष्णु**–मृत.
भार्या : **अन्नपूर्णा**–माहेर–दाभोळ येथे.
२६/५ **श्रीनिवास विष्णु**–जन्म १९०४. मृत्यू १९७४. व्यवसाय–कंपाऊंडर. वास्तव्य–महंमदी बिल्डिंग, कांदेवाडी, मुंबई–४.
भार्या : **इंदिरा**–माहेर–बयो चिंतामण केळकर, पालशेत, ता. गुहागर. कन्या–१.
२७/६ **वसंत श्रीनिवास**–लहानपणी मृत.
२८/६ **विठ्ठल श्रीनिवास**– #
कन्या : **सुरेखा**–सासर–पालगड.
२९/६ **प्रभाकर श्रीनिवास**–जन्म ११ ।५ ।१९३४. शिक्षण–मराठी ७ वी व २ वर्षाचा शेतीचा कोर्स पूर्ण (१९५३ मधे). सरकारी नोकरी. वास्तव्य–८ रावतळे विंध्यवासिनी रोड, चिपळूण.
भार्या : **विमल**–माहेर–विमल गजानन कानडे, हरेश्वर.
कन्या :
१) **उषा**–जन्म १९६७.
२) **विदुला**–जन्म १९७०.
३०/७ **संजय प्रभाकर**–जन्म १९६५.
३१/६ **कमलाकर श्रीनिवास**–जन्म ३१ ।७ ।१९३६. शिक्षण–फायनल पास. व्यवसाय–यजमानवृत्ती (याज्ञिकी). वास्तव्य–इंदुमती अपार्टमेंट, खारीबाव रोड, डॉ. उषाबेन गुप्ते समोर, बडोदे.
भार्या : **कमला**–माहेर–सूर्यप्रभा दामोदर सहस्त्रबुद्धे. बडोदे.
कन्या :
१) **गुणवंती**–जन्म ३१ ।१० ।१९६८. शिक्षण–एस्.वाय.बी.ए. व कंठसंगीत ३ रे वर्ष.
२) **अनुराधा**–जन्म १० ।२ ।१९८०. शिक्षण–मराठी पाचवी.
३२/७ **चिंतामणी कमलाकर**–जन्म २४ ।१२ ।१९७३. शिक्षण–एस्.एस्.सी.

(१९)

कुर्धे–भतगुणकी–पुणे घराणे



कुर्धे–भतगुणकी–पुणे–घराणे

या घराण्याची माहिती भतगुणकी (कर्नाटक) येथून श्री. त्रिंबक विनायक अभ्यंकर यांनी जानेवारी १९९१ मध्ये पाठविली. त्यामुळे अधिक संशोधन करून इतर माहिती मिळविता आली नाही. उपलब्ध माहितीप्रमाणे या घराण्याचे मूळ–गाव कुर्धे असून कुलदैवतासंबंधी नरसिंह, महाविष्णू, आदित्य, बाळईश्वर, पावणाई, नावलाई इ. नावे कळविली आहेत. कै. विनायक केशव यांनी यासंबंधी रचलेला श्लोक पुढीलप्रमाणे लिहून कळविला आहे.

नरसिंहो महाविष्णू आदित्यो बाळईश्वर ।
सत्येश्वर पावणाच नवला दैवते तथा ॥
सप्तै ते कुल देवाश्च अभ्यंकर कुलास्थ वै ।
गोत्रं वासिष्ठ जं स्मृतम् ॥

१/१ **दत्तात्रय**–ज्ञात मूळ पुरुष

२/२ **विष्णु दत्तात्रय**– #

३/३ **केशव विष्णु**– #

४/४ **विनायक केशव**–जन्म १६ ।४ ।१८७८ भतगुणकी येथे. मृत्यू १४ ।१० ।१९६६. व्यवसाय–शेती. वास्तव्य–भतगुणकी, ता. इंडी. जि. विजापूर (कर्नाटक).

भार्या : **उमाबाई**–माहेर–यमूताई गणपुले.

कन्या : **इंदिरा**–सासर–इंदिरा श्रीपाद पाटणकर. वास्तव्य–११, यशोधन अर्पाटमेंट, डफरीन चौक, सोलापूर–पिन. ४१३००१. मृत.

५/५ **त्रिंबक विनायक**–जन्म ८ ।३ ।१९०८. म्हसावद जि. खानदेश येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–भारतात नोकरी न मिळाल्याने चुलत चुलत्याबरोबर (नाव दिले नाही) ब्रिटिश पूर्व आफ्रिकेत, दारे सलाम येथे गेले. तिथे सन १९२८ ते १९६३ पर्यंत वैद्यकीय खात्यात कारकुनाची नोकरी केली. नंतर भारतात आल्यावर भतगुणकी, ता. इंडी, जि. विजापूर येथे शेती करीत आहेत. वास्तव्य–मु. पो. भतगुणकी, ता. इंडी. जि. विजापूर, कर्नाटक–५८६२२७. अविवाहित.

६/५ **नीळकंठ विनायक**–जन्म ११ ।८ ।१९०९ म्हसावद (खानदेश) येथे. शिक्षण–मॅट्रिक व नंतर लोणी काळभोर येथील २ वर्षांचा शेतकी अभ्यासक्रम. व्यवसाय–शेतकी खात्यात ओव्हरसीयर (राणीबाग), मुंबई नगरपालिका येथून निवृत्त. वास्तव्य–१६ (जुना) नारायण पेठ, मोघे वाडा, पोलिस गेटजवळ, पुणे–३०.
भार्या : **उषा**–माहेर–मनुबाई खरे, वेल्हे (पुणे).
कन्या :
१) **आशा**–जन्म २३ ।४ ।१९४०. सासर–आशा नारायण जोशी. शिक्षण–बी.ए. गृहिणी, वास्तव्य–१३, मेरीगोल्ड अपार्टमेंट, कर्वेनगर, पुणे–२९.
२) **लीला**–जन्म १९ ।९ ।१९५५. सासर–विद्या वसंत जोशी. शिक्षण–बी.कॉम्, एल् एल्.बी. वास्तव्य–१६, वेंकटगिरी, अणुशक्ती नगर, देवनार, मुंबई–९४.
३) **मंगला**–जन्म १९ ।५ ।१९५१. सासर–माधुरी अनिल जोशी, बी.कॉम्. वास्तव्य–८३, पल्लवी, पवना नगर, चिंचवड, पुणे–३३.
४) **सुलभा**–जन्म १५ ।३ ।१९५५. सासर–प्राची रवींद्र मराठे. शिक्षण–एम्.कॉम्. वास्तव्य–तृप्ती, २१८, सहकारनगर नं. २ पुणे–९.
७/६ **आनंद नीळकंठ**–जन्म ८ ।११ ।१९४१ माटुंगा येथे. शिक्षण–जी.एफ्.ए.एम्. पोद्दार मेडिकल कॉलेज, वरळी, मुंबई येथे. व्यवसाय–खाजगी वैद्यकीय दवाखाना, घाटकोपर, मुंबई. येथे वास्तव्य–'कृपा', २२, भगत गल्ली, माहिम–४०००१६.
भार्या : **अनघा**–शिक्षण–बी.ए. माहेर–पुष्पा पाळंदे. व्यवसाय–नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यालय, मुंबई येथे शिक्षिका.
कन्या : **अर्चना**–बी.कॉम्. शिकत आहे.
८/७ **अजय आनंद**–शिक्षण– प्रथम वर्ष, बी.कॉम्. शिकत आहे.

अभ्यंकर कुलवृत्तांतासाठी फॉर्म भरून आलेल्या माहितीमधून व्यवसायानुसार वर्गवारी आढळली ती पुढीलप्रमाणे :

वर्ग	संख्या
१) प्राथमिक माध्यमिक शिक्षक, प्राध्यापक इ.	६२
२) डॉक्टर/वैद्य	१८
३) वकील/जज्ज	१५
४) सरकारी नोकरी (रेल्वे, टेलिफोन सरकारी कंपन्या/कार्पोरेशन इ.)	१९१
५) खाजगी नोकरी (बँक, विमा कं. /कार्पोरेशन नगरपालिका इ.)	२३०
६) इंजिनियर/आर्किटेक्ट	१०
७) स्वतंत्र व्यवसाय/दुकान उद्योग, भिक्षुकी, शेती, ज्योतिष इ.	१३२
८) काही नाही	६
९) संन्यासी	१
एकूण	६६५

सासवणे घराणे क्रमांक १

वंशावळी क्रमांक २

सासवणे–डोंबिवली–ठाणे–वसई–मुंबई



(या वंशावळीतील व्यक्तिपरिचयाच्या माहितीसाठी पृ. क्र. ३२६ ते ३२८ पहा)